02-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

KBS/ 11:00

02-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

KBS/ KGS/ MMP/ 11:00

सभापतीस्थानी - माननीय सभापती

म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत.

सभापती : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आज माझ्याकडे म.वि.प.नियम 289 अन्वये, आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून तातडीने महत्त्वाच्या विषयाची चर्चा घेण्याबाबतचा एक प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावाच्या सूचनेवर सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, सर्वश्री दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत, श्री.विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरविंद सावंत यांच्या सह्या आहेत. तरी आता मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना प्रथम त्यांचे या विषयी काय म्हणणे आहे ते मांडण्यासाठी संधी देतो, त्यांनी एक मिनिटामध्ये हा प्रस्ताव स्वीकारण्यायोग्य कसा आहे याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 26 नोव्हेंबर 2008 रोजी या मुंबईवर, देशावर झालेला हल्ला आणि त्यावरून निर्माण झालेली परिस्थिती आणि त्या अनुषंगाने या सभागृहामध्ये आमच्या असलेल्या तीव्र भावना आपण सर्वांनीच अनुभवल्या आहेत. खरे तर त्यावेळीच मी अत्यंत आग्रहाने या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशीची मागणी करीत होतो, न्यायालयीन चौकशीचा आग्रह धरत होतो, न्यायालयीन चौकशीच झाली पाहिजे असे म्हणत होतो. परंतु शासन त्याबाबत ठाम होते की, त्याबाबत कोणतीही चौकशी करू नये. पण अगदीच अति झाले आणि हसू आले अशी परिस्थिती होऊ नये म्हणून या सदनामध्ये अगदी शेवटच्या क्षणी, सभागृह संस्थगित होण्याच्या दोन मिनिटे अगोदर माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी श्री.राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्यात येईल असे जाहीर केले. त्यावर त्यावेळी आम्हाला काहीच बोलता आले नाही, आमचे मत व्यक्त करता आले नाही. कारण अगदी शेवटच्या क्षणी सरकारने ही घोषणा केली होती आणि त्यानंतर लगेच वंदे मातरम् झाले. वास्तविक आमचा अशा चौकशी समितीलाच संपूर्णत: विरोध होता. दुर्दैव असे की, शासनाने हे जे काही निर्माण केले, जी काही चौकशी समिती नेमली त्या समितीने आता आपला अहवाल शासनाला दिला आहे, तर तो नेमका काय आहे, त्या चौकशीमध्ये समितीने कोणते मुद्दे विचारात घेतले आहेत ? कारण या सदनामध्ये आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून जेव्हा काही भावना व्यक्त करतो त्या आमच्या वैयक्तिक भावना नसतात तर जनतेच्या भावना असतात. तेव्हा येथे लोकप्रतिनिधींकडून व्यक्त झालेल्या भावना विचारात घेऊन चौकशीसाठी मुद्दे ठरवून देण्यात आले होते का ? सभापती महोदय, त्या प्रधान समितीचा अहवाल शासनाला सादर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाल्यानंतर त्यासंबंधात ज्या बातम्या आल्या त्यावरून याबाबत नेमके काय झाले आहे हे आम्हाला नीटसे समजले नाही. आमच्या समोर त्याबाबत जे काही आले ते टीव्हीच्या, मिडियाच्या, वर्तमानपत्रांच्या माध्यमातून आलेले आहे आणि त्यातून आम्हाला असे समजते आहे की, महाराष्ट्राचे पोलीस दल या संबंधात निष्पाप आहे, जे पोलीस अधिकारी आहेत त्यांची त्यात काहीही चूक नाही, सरकारचीही चूक नाही असा निष्कर्ष समितीने काढला आहे. सभापती महोदय, यामध्ये सरकारची चूक नाही असे आहे तर मग चूक कोणाची हे कोणी सांगायलाही तयार नाही. या शिवाय त्या समितीच्या एका सदस्यांनी ऑन लाईनवरून समितीच्या अहवालाला विरोधी मत नोंदविले असल्याचेही सांगितले आहे. त्यात त्याने श्री.अनामी रॉय आणि श्री.हसन गफूर हे या पकरणी जबाबदार आहेत असे त्यांचे मत असल्याचे त्यांनी स्वतंत्रपणे नोंदविले आहे. हे सारे ऑन लाईनवर आहे. थोडक्यात सांगावयाचे तर एका बाजूला आम्हाला हा अहवाल द्यायचा नाही. एका बाजूला आम्ही चर्चा करू, समिती नेमू असे सांगावयाचे आणि दुसऱ्या बाजूला त्या समितीचेच एक सदस्य आपले विरोधी मत काय आहे ते नोंदवितात आणि ते ऑन लाईनवरून सांगतात. ...

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी ...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अजून विषय मांडत नाहीए. असा या चौकशी समितीच्या अहवालाबाबत जो काही गोंधळ आहे तो लक्षात घेता... कारण 26 नोव्हेंबरला त्या दुर्दैवी आणि भयंकर अशा हल्ल्यामध्ये जे निष्पाप लोकांचे बळी गेले, जीव गेले त्याबाबत नेमकी चौकशी काय झाली आहे .... सभापती महोदय, नियम 289 अन्वये आम्ही दिलेला प्रस्ताव आपण का स्वीकारावा आणि या विषयी तातडीने चर्चा सर्व कामकाज बाजूला ठेवून का घ्यावी हेच मी आपल्याला सांगतो आहे. या संदर्भात टीव्ही वर जे काही सांगितले गेले ते अतिशय गंभीर आहे. 26 नोव्हेंबरच्या त्या घटनेमध्ये जे पोलीस अधिकारी शहीद झाले त्यांच्या पत्नींनी जे उद्‌गार काढले आहेत तेही असेच विचार करायला लावणारे आहेत. त्यांनी रक्ताळलेल्या आठवणी म्हणून उल्लेख करून सांगितले की, आमच्यावर जो प्रसंग आला त्यात श्री.करकरे हे तेथे का गेले, ते तेथेच तीन तास का पडून होते, त्यांना तात्काळ मदत का मिळाली नाही असे प्रश्न जाहीरपणे टीव्हीच्या माध्यमातून विचारण्यात आले होते. त्यांची उत्तरे यातून मिळाली पाहिजेत. वस्तुत: हा अहवाल या अधिवेशनाच्या तोंडावरच सरकारला सादर झाला आहे, तेव्हा या अधिवेशनामध्ये तो लगेचच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सभागृहाला चर्चेसाठी सादर झाला पाहिजे होता. सभापती महोदय, या संबंधात आम्ही शासनाला काही मार्गदर्शन करू इच्छितो. यामध्ये शासनाच्या काही चुका राहिल्या असतील किंवा शासन यात किती दोषी आहे वगैरे टीका करण्याचा आमचा मुळीच उद्देश नाही. किंबहुना यावर तातडीने चर्चा होऊन राज्यातील जनतेला सर्व समजले पाहिजे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा विचार करून भविष्यात काय आखणी करणे आवश्यक आहे हे आम्हाला सरकारला सांगता येऊ शकेल. त्यात कोणताही बायस माईंड न ठेवता चर्चा व्हावी अशी आमची इच्छा आहे. म्हणूनच या विषयावर तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे, त्यासाठी सभागृहाचे आजचे नियमित कामकाज बाजूला ठेवून ही चर्चा घेणे आवश्यक आहे तरी आपण सर्व कामकाज तहकूब करून या विषयावर ताबडतोब चर्चा सुरू करावी अशी माझी आपणास नम्र व आग्रहाची विनंती आहे.

(यानंतर श्री. सरफरे ..... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपल्या परवानगीने माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी त्यांचे म्हणणे मांडले आहे. सभापती महोदय, माननीय श्री.राम प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात त्यांनी एक वाक्य अतिशय योग्य शब्दामध्ये सांगितले आहे की,राजकीय अभिनिवेशाने सत्ताधारी पक्षावर टीका करण्याची संधी मिळावी हा आमचा उद्देश नाही. परंतु याठिकाणी या राज्यावर आलेले हे संकट, सत्ताधारी पक्षावर आलेले संकट किंवा ठराविक जनतेवर आलेले हे संकट नसून संपूर्ण महाराष्ट्रावर आलेले संकट आहे. त्याचा हादरा संपूर्ण राज्याला बसला आहे. या राज्यातील आणि देशातील संपूर्ण जनता चार दिवस जीव मुठीत धरुन होती. असे असतांना अतिशय उद्विग्नपणे हा संपूर्ण प्रकार सुरु होता. त्या दहा अतिरेक्यांनी 100 कोटींच्या देशाला वेठीस धरले होते. या विषयावर मागील अधिवेशनामध्ये अतिशय प्रभावी आणि चांगल्याप्रकारे चर्चा झाली होती. सभापती महोदय, हे अधिवेशन तोंडावर असतांना या अहवालावर सर्वंकष चर्चा होण्याकरिता हा अहवाल सभागृहापुढे ठेवण्याची शासनाची जबाबदारी होती. आम्ही याबाबत वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीतील वाक्य वाचले. त्यामध्ये लोकांनी पोलीस यंत्रणेला दोष दिला आहे. होय, आम्ही देखील पोलीस यंत्रणेला दोष देतो. परंतु या हल्ल्यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी बलिदान दिले आहे त्यांच्यापुढे सारा महाराष्ट्र आणि सारा देश नतमस्तक होत आहे. परंतु त्याचबरोबर मूळ मुद्दा असा आहे की, ज्या पोलीस अधिकाऱ्यांवर ठपका ठेवला गेला आहे, त्यादृष्टीने सर्व तांत्रिक बाबींचा विचार करुन संपूर्ण पुराव्यासकट चर्चा झाली होती. दुसरी गोष्ट अशी की, माननीय श्री. राम प्रधान हे कॉग्रेस पक्षाचे एकेकाळचे उमेदवार होते. तसेच, ते या सदनाचे माननीय सदस्य होते. त्यामुळे कॉग्रेस पक्षाच्या एका सदस्यांना या समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करुन तुम्ही यामध्ये पक्षाभिनिवेश न आणता पक्षीय अशाप्रकारची एक झळाळी दिली आहे हे उघड आहे. आणि म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या सदनापुढील संपूर्ण कामकाज बाजूला ठेवून नियम 289 अन्वये आपण या चर्चेला परवानगी द्यावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे आपल्या पक्षाचे गट नेते आहेत. त्यांनी याबाबतीत आपल्या भावना मांडल्या आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

भाजपच्या वतीने आपले म्हणणे मांडण्यास संधी दिली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची आणि आपली भावना एकच आहे असे मला वाटते. जर प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा करण्यास मी परवानगी दिली तर आपणा सर्वांना या विषयावर बोलता येईल. आणि म्हणून याबाबतीत सन्माननीय गृहमंत्र्यांनी आपले म्हणणे मांडावे असे मी त्यांना सांगतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय श्री. राम प्रधान यांनी आपला अहवाल शासनाकडे सादर केला आहे. त्यानंतर शासनाने त्वरित मुख्य सचिव आणि अतिरिक्त मुख्य सचिवांची एकत्रितपणे समिती नियुक्त करुन त्यांना अहवालाचे विश्लेषण करण्यास सांगितले आहे. त्यामुळे त्या अहवालाच्या संदर्भात कोणती ॲक्शन घेण्याची आवश्यकता आहे यासंबंधी ॲक्शन टेकन रिपोर्ट ही समिती तयार करीत आहे. तो अहवाल तयार झाल्यानंतर 26 नोव्हेंबरच्या घटनेच्या संदर्भात नेमलेल्या समितीच्या अहवालासहीत ॲक्शन टेकन रिपोर्टवर या सभागृहामध्ये चर्चा करण्यास शासनाची तयारी आहे.

(गोंधळ)

श्री. अरविंद सावंत : माननीय श्री. राम प्रधान समितीचा अहवाल पहिल्यांदा सभागृहापुढे मांडला पाहिजे...

श्री. जयंत पाटील : तो अहवाल सभागृहापुढे येईलच, परंतु त्याचबरोबर त्या अहवालाच्या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे या संबंधीचा ॲटीआर सुध्दा सभागृहासमोर येणार आहे. या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा करण्याची शासनाची पूर्ण तयारी आहे. आणि कोणत्याही परिस्थितीत कुणालाही पाठीशी घालण्याचा किंवा वाचविण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही. त्यामुळे वर्तमानपत्रामध्ये काय छापून आले किंवा मिडियामध्ये काय प्रसिध्द झाले? याची चर्चा करण्यापेक्षा आपण त्या अहवालासंदर्भात कोणती कारवाई करणार आहोत यासंबंधी चर्चा करणे जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे या सभागृहाला विश्वासात घेऊन ॲटीआरसह प्रधान समितीच्या अहवालावर या सभागृहामध्ये चर्चा होईल एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता असे सांगितले की, प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात ॲटीआरसहीत या सभागृहामध्ये आपण चर्चा करु. मुळात मला असे सांगावयाचे आहे की, माननीय श्री.राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या सभागृहामध्ये झाली. त्यामुळे तो अहवाल पहिल्यांदा या सदनामध्ये मांडावयास हवा होता. ही पहिली गंभीर चूक झाली आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे हा अहवाल सदनापुढे न येता तो सर्व जनतेसमोर पहिल्यांदा गेला, वर्तमानपत्रामध्ये छापून आला ही पहिली गंभीर बाब आहे. त्यानंतर आता सुध्दा तो अहवाल आपण सदनापुढे ठेवणार आहोत असे सांगितले जात नाही. त्या अहवालाची प्रत आमच्याजवळ नाही, आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचतो. दुसरी गोष्ट अशी की, त्या समितीमधील एका माननीय सदस्यांनी आपली डिसेंट नोट दिली असून ती ऑनलाईनवर वाचावयास मिळत आहे. या सर्व गोष्टी बाहेर वाचावयास मिळत असतांना त्या सदनामध्ये कां नाहीत? त्यामुळे त्या डिसेंट नोटसहीत माननीय श्री. राम प्रधान समितीचा अहवाल प्रथम या सदनामध्ये मांडला गेला पाहिजे. तो अहवाल आपण केव्हा सदनापुढे मांडणार आहात ते सांगा?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

तो अहवाल सदनासमोर केव्हा मांडणार आहात, ते सांगावे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या संदर्भात सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्याबाबत जी मागणी केली आहे, ती चर्चा कधी घेण्यात येणार आहे ? हे आपण सांगावे अशी माझी विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्याबाबत बोलावयाचे आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत साहेबांनी हरकतीचा मुद्दा मांडला आहे. त्यामध्ये मी आणखी एक गोष्ट ॲड करु इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, हा अहवाल मांडण्यासाठी या सदनामध्ये निर्णय झाला होता आणि असे आश्वासन दिले होते की, "आम्ही याबाबतीत समिती नेमू आणि त्याचा अहवाल सादर करु." परंतु येथे विधीमंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांचा हक्कभंग झालेला आहे. कारण सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली, ती त्यांनी नाकारलेली आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांकडे डायरेक्ट हा अहवाल सादर करण्यात आला आहे. जरी अशा प्रकारची पध्दत असली तरी तो अहवाल या सभागृहामध्ये मांडलाच पाहिजे आणि त्यानंतरच त्यावर चर्चा व्हावयास पाहिजे. परंतु याठिकाणी हक्कभंग झालेला आहे याची नोंद करण्यात यावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ...

सभापती : मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, मी त्यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे . . ..

सभापती : प्लीज, सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय गृह मंत्री श्री.जयंत पाटील यांना काही सांगावयाचे आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाला या समितीचा अहवाल नुकताच प्राप्त झालेला आहे आणि या अहवालाचे विश्लेषण करुन, याबाबतीत कोणकोणती कारवाई करण्याची आवश्यकता आहे, हे ठरविण्यासाठी मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या एकत्रित समितीने काम सुरु केलेले आहे. सभागृहामध्ये सदरहू अहवाल आणि त्याबाबत घेतलेल्या ॲक्शन्स् या बाबी एकत्रितपणे आणणे हे आवश्यक आहे. शासनाची सभागृहामध्ये या अहवालाच्या बाबतीत चर्चा घडविण्याची इच्छा आहे.म्हणून कोणत्याही परिस्थितीत सदरहू अहवाल आणि त्यासंबंधातील ॲक्शन टेकन रिपोर्ट हा एकत्रितपणे सभागृहासमोर आणण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी हरकतीचा मुद्दा मांडला आहे, त्या अनुषंगाने मी सन्माननीय गृह मंत्री महोदयांना स्पष्टीकरण करण्याबाबत सांगितले होते. त्यांनी असे स्पष्टीकरण केले की, ज्यावेळेला ॲक्शन टेकनच्या अनुषंगाने राज्याचे मुख्य सचिव आणि अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) आपला अहवाल देतील, त्याच वेळेला मूळ अहवाल अधिक ॲक्शन टेकन रिपोर्ट या दोन्हीसह . . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, असे कसे काय ? माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : माननीय गृह मंत्र्यांनी जे सांगितले आहे, ते मी सांगत आहे. मला माझ्या पदरचे येथे काही सांगण्याचे कारण नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की,राम प्रधान समितीचा जो अहवाल आहे तो आणि ॲक्शन टेकनच्या अनुषंगाने केलेल्या शिफारशी या दोन्हीसह सदनामध्ये चर्चा होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा महत्वाचा हरकतीचा मुद्दा आहे. आतापर्यंत या सदनाने अनेक प्रसंग पाहिले, अनेक अहवाल पाहिले. याठिकाणी सदनासमोर येणारा राम प्रधान समितीचा पहिलाच अहवाल नाही. परंतु पध्दत अशी आहे की, तो सादर करण्यापुरते वर्तमानपत्रामध्ये फोटो येतात आणि ते तेवढयावरच संपते. मग त्यावर सरकारने भूमिका जाहीर करावयाची असते. या वेळेला नक्की काय घडले ? हे मी स्वत: पाहिलेले आहे म्हणून मी आपल्याला सांगत आहे. त्यामुळे आम्हाला याबाबत चर्चा करावयाची आहे. हा अहवाल सादर केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका योग्य होती. त्यांनी अशी भूमिका मांडली आहे की, "सदरहू अहवाल आताच माझ्या हातामध्ये आलेला आहे. मी तो पाहिलेला नाही, त्यामुळे त्याबाबत मी काही बोलू शकत नाही." पण सन्माननीय राम प्रधान हे त्या अहवालावर चर्चा करीत होते, त्यासंदर्भात मिडियाबरोबर बोलत होते आणि महाराष्ट्र राज्याचे पोलीस कसे निर्दोष आहेत, त्यांना कशी क्लीन चीट देण्यात आलेली आहे आणि त्यांच्याकडून कशा प्रकारे गुन्हा झालेला नाही, हे सांगण्याचा प्रयत्न करीत होते.खरे म्हणजे ज्यांनी अहवाल सादर केलेला आहे, त्यांनी त्याबाबत कोणतेही भाष्य करावयाचे नसते. त्यांनी जे काही मत व्यक्त केलेले असते, त्याबाबत सरकारने निर्णय घ्यावयाचा असतो.पण राम प्रधानसाहेबांनी सर्व लोकांसमोर, चर्चेमध्ये "या महाराष्ट्रातील पोलीस निर्दोष होते, अधिकारी निर्दोष होते, यंत्रणा निर्दोष होती" अशा प्रकारे आपली मते मांडली

. . . .सी-3

श्री.दिवाकर रावते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत.सभापती महोदय, मग आम्ही त्याबाबत चर्चा करावयाची नाही काय ? या अहवालाच्या संदर्भात सरकारकडून ॲक्शन टेकन रिपोर्ट जेव्हा यावयाचा असेल, तेव्हा येईल. पण या सदनामध्ये घोषणा करण्यात आली होती की, आम्ही या घटनेच्या संदर्भात राम प्रधान यांची चौकशी समिती नेमलेली आहे. या संदर्भात करण्यात आलेल्या जाहीर घोषणेबाबत आम्हाला चर्चा करण्याचा पूर्ण अधिकार आहे असे आमचे मत आहे आणि सभापती महोदय, आपण याबाबतीत आम्हाला पूर्णपणे संरक्षण देणे आवश्यक आहे. जर अहवाल सादर करणारे व्यक्तीमत्व, त्या समितीचे प्रमुख जर अहवालाच्या संदर्भात जनतेला अशा प्रकारे माहिती देत असतील आणि त्या समितीचे आणखी एक सदस्य जर ऑन लाईनवर देखील माहिती देत असतील तर ती अत्यंत गंभीर घटना आहे. त्यामुळे आम्हाला याबाबत चर्चा करावयाची आहे. शासनामार्फत जेव्हा मूळ अहवाल आणि ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला जाईल, तेव्हा आम्ही त्याबाबत चर्चा करुच. परंतु राम प्रधान यांनी सभागृहाचा हक्कभंग केलेला आहे, आक्षेप केलेला आहे, ही बाब चर्चेतून पुढे येईल आणि त्यानंतर मग आम्ही पुढील कार्यवाही सादर करु. त्यामुळे ही चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे अशी माझी आग्रहाची भूमिका आहे आणि माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, राम प्रधान समितीची नियुक्ती का झाली ? कारण विधानसभेमध्ये जेव्हा कामकाज थांबले आणि या सगळया प्रकरणांची चौकशी व्हावी अशी विधीमंडळाच्या सदस्यांनी जेव्हा मागणी केली, तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी राम प्रधान यांच्या मार्फत याची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / अशुद्धीपत्र नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम सौ.रणदिवे. . . . 11:15

श्री. नितीन गडकरी....

This is the Committee which is appointed by Hon. Chief Minister. आणि जी डिमांड आहे ती विधानमंडळाची आहे, सभागृहातील हा प्रश्न आहे. विधिमंडळामध्ये मागणी मान्य झाल्यानंतर ही समिती स्थापन झालेली आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. त्या समितीचा रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी अगदी बरोबर सांगितलेले आहे. त्यांनी असे सांगितलेले आहे की, "शासनाने अहवाल स्वीकारलेला आहे. त्यावर मुख्य सचिव आणि इतर दोन सदस्यांची एक समिती नेमून त्याबाबत ॲक्शन टेकन रिपोर्ट काय करावयाचा याबाबतचा विचार करण्यात येईल. तो रिपोर्ट कॅबिनेट पुढे जाईल. तो रिपोर्ट कॅबिनेटमध्ये ॲप्रुव्ह करण्यात येईल. त्यानंतर तो सभागृहाला सादर करण्यात येईल." माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्याबाबत आमचा माननीय मुख्यमंत्र्यांवर आक्षेप नाही आणि शासनबद्दलही आमचे काही म्हणणे नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या कालच्या उद्गाराने आमचे समाधान झालेले आहे. महत्वाचा प्रश्न असा आहे की, या राज्याचे, घटनेने सर्वोच्च असणारे आणि राज्यकारभार करणारे माननीय मुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे अहवाल सादर झाल्यानंतर त्यावर ते विचार करुन ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार करणार आहेत. 'सहयाद्री' या अतिथीगृहावर परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला असे संगितले की, "वर्तमानपत्रात, मिडियात जे छापून आलेले आहे ते निराधार आहे. तसे त्यामध्ये काही नाही" सभापती महोदय, याबाबतीत खरे काय ते त्यांना माहीत आणि राम प्रधान यांना माहीत. पण राम प्रधान साहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे अहवाल सादर केल्यानंतर विधिमंडळाच्या बाबतीत आणि राज्य शासनाकडेही गोपनीय असणारा हा रिपोर्ट आहे. राम प्रधान हे मुख्य सचिव होते. ते एक सनदी आय.ए.एस.अधिकारी होते. त्यांना यामधील गोपनीयतेची आणि जबाबदारीची जाणीव होती. त्यांना याबाबतची जाणीव नव्हती असे म्हणने त्यांच्यावर अन्यायकारक आहे. त्यांनी याबाबतीत दूरदर्शनवर प्रतिक्रया दिलेली आहे. मी अहवाल सादर केलेला आहे, त्यावर माननीय मुख्यमंत्री योग्य कारवाई करतील, मी यावर काही बोलणे योग्य होणार नाही, अशी प्रतिक्रिया दिली असती तर मी समजू शकलो असतो. पण त्यांनी त्यापलीकडे जाऊन अशी प्रतिक्रया दिली की, "पोलीस निर्दोष आहेत." सभापती महोदय,शासनाला अहवाल सादर झाल्यानंतर आणि शासन त्याबाबतचा ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार करणार असल्यामुळे त्यावरील कारवाईचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आणि कॅबिनेटला आहे. असे असताना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

राम प्रधान यांनी या रिपोर्टच्या बाबतीत स्वत:चे व्हर्जन, निर्णय म्हणून मिडियासमोर प्रसारित केले. ती त्यांची भूमिका घटनेतील नियमाच्या दृष्टीने जबाबदारीची आहे काय? माननीय मुख्यमंत्र्यांनी रिपोर्ट, ए.टी.आर. देऊन त्याची घोषणा करणे हे सगळे गोपनीय असताना त्यावर राम प्रधान यांनी केलेले वक्तव्य आणि प्रतिक्रया देऊन आपले मत नोंदवणे हे योग्य आहे की अयोग्य आहे? सभापती महोदय, राज्य घटनेमध्ये रिस्पॉन्सिबिलिटी ऑफ द सिव्हिल सर्व्हन्ट असे एक कलम आहे. राम प्रधान हे सिव्हिल सर्व्हन्ट नाहीत. पण ही लोकशाही कायदेमंडळ कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ आणि पत्रकारिता या चार स्तंभांवर आधारलेली आहे. सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी एक गोष्ट समजून सांगावी. राम प्रधान यांनी केलेले काम हे ज्युडिशिअल कॅपॅसिटीमधील आहे. ज्युडिशिअल कॅपॅसिटीमध्ये असणाऱ्या कामाचा गोपनीय गोष्टीबद्दलचा इन्फरन्स काढण्याचा अधिकार शासनाला आहे. निर्णय घेण्याचा अधिकार शासनाला आहे. Who is Ram Pradhan ? Is he an extra quasi judicial authority.? राम प्रधान यांना अशा प्रकारे ओव्हर रुल बोलण्याचा काय अधिकार आहे? म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे असे म्हणणे आहे की, राम प्रधान यांनी खऱ्या अर्थाने सरकारचा, मुख्यमंत्र्याचा आणि विधिमंडळाचाही अवमान केलेला आहे. गोपनीय अहवालाच्या बाबतीत इन्फरन्स काढणे, आपला निर्णय बाहेर सांगणे, ही त्यांची कृती लोकशाही विरोधी आहे. गैर रिस्पॉन्सिबिलिटीची आहे. आणि एकंदरीतच जबाबदारने वागणारी नाही. म्हणून सभापती महोदय,राम प्रधान यांनी केलेल्या कृती बद्दलची चर्चा करण्याची आवश्यकता आहे. आम्हाला हे मान्य आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ए.टी.आर. मिळेल, ॲक्शन टेकन रिपोर्ट मिळेल आणि त्यावर या अधिवेशनात चर्चा होईल. पण सभापती महोदय, आपण मला हे समजून सांगावे. आपण या विधानमंडळाच्या सर्वोच्च स्थानावर बसलेल्या व्यक्ती आहात. मी आपल्याला प्रश्न विचारु इच्छितो. हे सभागृह नियमाने चालणार आहे. हे सभागृह लोकशाही मुल्यांची पायमल्ली न होऊ देता चालणारे आहे. मग या सभागृहामध्ये तयार झालेल्या समितीच्या बाबतीत एका निवृत्त नावाजलेल्या सनदी अधिकाऱ्यांने, ज्यांना हे माहीत आहे की, घटनेप्रमाणे माननीय मुख्यमंत्री हे या राज्याचे प्रमुख आहेत. कॅबिनेट प्रमुख आहे. आणि त्यांनी दिलेल्या रिपोर्टवर काय करावयाचे, काय करावयाचे नाही हा त्यांचा अधिकार आहे असे असतानाही अशा प्रकारे वर्तमानपत्रात, मिडीयासमोर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

किंवा दूरदर्शनसमोर आपला इन्फरन्स जाहीर केला तर तो निर्णय शिळा होईल. मग शासनाच्या ॲक्शन टेकन रिपोर्टला काय अर्थ आहे? यामध्ये विसंगती अशी आहे की, शासनाने ॲक्शन टेकन रिर्पोमध्ये एक भूमिका घेतली आणि राम प्रधान यांनी वेगळे इन्फरन्स काढले तर पुन्हा प्रश्न निर्माण होणार आहे. म्हणून राम प्रधान यांच्या कृती बद्दल शासनाने खुलासा केला पाहिजे. एक संवेदनशील असा हा विषय आहे. महाराष्ट्राच्या सुरक्षिततेशी संबंधित असा हा विषय आहे. म्हणून राम प्रधान यांची भूमिका योग्य आहे, की अयोग्य आहे? त्यांनी केलेली कृती योग्य आहे, की अयोग्य आहे. याबाबत शासनाने आपली भूमिका जाहीर केली पाहिजे. अशा प्रकारे विधिमंडळाचा अवमान झालेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचा अवमान झालेला आहे. घटनेचा अवमान झालेला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्यांचे हे वर्तन घटनाबाह्य आहे आणि "Responsibility of the Judicial personality regarding democratic system in the Judicial Enquiry" या आधारावर याची चौकशी झाली पाहिजे. ही कृती अयोग्य आहे. म्हणून आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे तो योग्य आहे. त्या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. त्याला आपण अनुमती द्यावी अशी आपल्याला विनंती आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीमध्ये आपण सभागृहात जाहीर केल्यानंतर समिती नेमली. माननीय गृहमंत्री म्हणतात त्याप्रमाणे रिपोर्ट आणि एटीआर झाल्यानंतर मग चर्चा ही नॉर्मल पध्दत बरोबर आहे. या ठिकाणी ॲबनॉर्मल अशा प्रकारची घटना घडलेली आहे की, रिपोर्टचे कंटेन्ट्स हे ऑफिशियली बाहेर आलेले आहेत. अनेक वर्षे आपण पाहत आहोत की, मोठमोठे महत्वाचे रिपोर्ट सादर होतात आणि फक्त अहवाल सादर झाला एवढीच बातमी बाहेर येते. त्यानंतर मग त्यावर ॲक्शन टेकन होऊन सभागृहामध्ये चर्चा होते. माझे याबाबतीत असे स्पष्ट म्हणणे आहे की, स्वत: समितीच्या अध्यक्षांनीच त्याचे कंटेन्ट जाहीर केल्यानंतर या सभागृहामध्ये घोषित झालेल्या समितीचा अहवाल या सभागृहामध्ये न ठेवण्याचा आग्रह धरणे आणि तो अहवाल एटीआरच्या सोबतच ठेऊ असे म्हणणे हे चूक आहे आणि तसा आपण जेवढा आग्रह धराल तेवढे उद्या परिच्छेद चे परिच्छेद छापून येतील. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आपण हा अहवाल आज उद्या ताबडतोब सादर करावा आणि एटीआरसह जी चर्चा होईल ती केव्हा होईल या विषयी आपण सांगावे. जेवढे आपण ते धरुन ठेवाल, लोकशाहीमध्ये जी माहिती गावोगाव आहे, बाजारात आहे, उद्या वृत्तपत्रामध्ये छापून येणार आहे ती माहिती सभागृहामध्ये न देणे त्यामुळे शासनाची अप्रतिष्ठा होते, सभागृहाची अप्रतिष्ठा होते. म्हणून तो अहवाल आपण ताबडतोब ठेवावा आणि एटीआरसह चर्चेची तारीख सांगितली तर आपण सभागृहाला फार मदत केली असे होईल असे मला वाटते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्याला अशी विनंती करणार आहे. आपल्याला आठवत असेल की, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये नेहमीच्या परंपरा बाजूला ठेऊन सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरील सदस्यांनी एत्रितपणे संघटित स्वरुप महाराष्ट्राच्या जनतेसमोर आणले की, हा विषय इतका महत्वाचा विषय आहे आणि यामध्ये राजकारण न करता आम्ही या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. विनोद तावडे ....

विषयाची चर्चा करीत आहोत. जे स्पिरीट आपण नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दाखविले होते त्याचाच हा पुढचा टप्पा मी मानतो. या विषयाचे राजकारण न करता याची चर्चा करु अशा पध्दतीने आपण सर्व विधिमंडळाच्या सदस्यांनी मिळून एकत्रितपणे भावना मांडल्या होत्या. त्याचा पुढचा टप्पा म्हणजे हा अहवाल आहे. त्या स्पिरीटचा पुढचा भाग म्हणून सरकारने स्वत:हून हा अहवाल सभागृहासमोर ठेवावयास पाहिजे. प्रोसीजरप्रमाणे त्याबाबत जो ॲक्शन टेकन रिपोर्ट आहे तो येईल. त्या घटनेच्या आधारे पहिल्या टप्प्याची चर्चा झाली आणि या अहवालानंतर त्यात निर्माण झालेल्या प्रश्नांची चर्चा आता व्हावयाची आहे. तो अहवाल मुख्य सचिवांकडे जाईल आणि नंतर तो अहवाल एटीआरसह ठेऊ असे सांगितले जाते. आताच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे त्यामधील गोष्टी बाहेर यावयास लागलेल्या आहेत आणि त्यातील गोपनीयता भंग व्हावयास लागली आहे. त्यामुळे ते सगळे स्पिरीट संपते. म्हणून मला असे वाटते की, ही गोपनीयता भंग होणे आणि अहवाल येणे हे त्या अर्थाने आवश्यक आहे.

सभापती : मी माननीय गृह मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी जे मुद्दे मांडले त्यातील शेवटचा मुद्दा महत्त्वाचा होता. या ठिकाणी श्री. प्रधान यांनी जे काही वक्तव्य केले ते मी काही वाचलेले नाही त्यामुळे मला त्याबाबत काही कल्पना नाही. त्यामुळे मला त्याबाबत काही भाष्य करावयाचे नाही. त्याबाबतीत आपले काय मत आहे ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, राम प्रधान यांनी जे वक्तव्य केलेले आहे ते वेगवेगळ्या मिडियात वेगवेगळ्या पध्दतीने आलेले आहे. पण जो अहवाल आहे त्या अहवालावर राम प्रधान काय म्हणतात आणि अहवाल काय आहे याच्यावर मी आज काही भाष्य करु इच्छित नाही. परंतु त्यांनी जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालावर त्यांनी काय भाष्य केले हे मी....

श्री. नितीन गडकरी : ते योग्य आहे काय ?

श्री. जयंत पाटील : त्यांनी काय भाष्य केले याची मला पूर्ण माहिती नाही. ते टेलिव्हिजनवर नेमके काय म्हणाले याची माझ्याकडे माहिती नाही. त्यामुळे त्यांनी अहवालातील कंटेन्ट सांगितला असे म्हणणे आज योग्य आहे, असे मला वाटत नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : श्री.राम प्रधान यांनी अहवालातील कंटेण्ट सांगितला आहे असे म्हणणे मला योग्य वाटत नाही. त्यामुळे आज यासंबंधी कोणतेही भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही. गोपनीय अहवालातील कंटेण्ट बाहेर आले असे समजणे चुकीचे आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून माननीय सभापतींबरोबर बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर मी आता निर्णय देत आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर नियम 289 अन्वये चर्चा करण्याचा कोणताही विषय नाही. तांत्रिकदृष्टया नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव स्वीकारणे मला शक्य नाही. त्यामुळे मी हा प्रस्ताव नाकारीत आहे. सन्माननीय गृहमंत्र्यांनी यासंदर्भात आपले मत व्यक्त करताना असे सांगितले आहे की, राम प्रधान समितीचा अहवाल आणि ए.टी.आर.हे दोन्ही अहवाल दोन्ही सदनांमध्ये सादर केले जाणार आहेत. मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर त्या अहवालांवर सभागृहात सविस्तरपणे चर्चा होईल, अशाप्रकारचा यासंबंधीचा माझा निर्णय आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

सभापती : मी आता पुढील कामकाजाकडे वळतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा लागू करण्याकरिता शासकीय कर्मचारी व शिक्षकांनी केलेल्या आंदोलनाबाबत

(१) * ५०४४८ श्री. व्ही.यु. डायगव्हाणे , डॉ. एन. पी. हिराणी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. अनिल परब , श्री.विक्रम काळे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा लागू कराव्या यासाठी राज्य शासकीय मंत्रालयीन कर्मचारी/अधिकारी यांनी दिनांक २५ व २६ फेब्रुवारी,२००९ रोजी 'लेखणी बंद' आंदोलन व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी दिनांक २१ मार्च, २००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली हे खरे आहे काय,

(२) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी,२००९ च्या शासन आदेशाने स्विकृत केलेल्या शिफारशीसह सुधारित वेतनश्रेण्या एप्रिल,२००९ पासून लागू करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) हे खरे असल्यास, अंमलबजावणी तातडीने करावी यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,

(४) अद्यापही केल्या नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३) व (४) शासन अधिसूचना दिनांक २२ एप्रिल, २००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्यात आली आहे.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील 25 लाख सरकारी कर्मचाऱ्यांशी संबंधित हा प्रश्न आहे. परंतु सभागृहामध्ये गोंधळाचे वातावरण असल्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : सभागृहातील गोंधळाच्या वातावरणात कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.27 ते 11.42 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी तहकूब करीत आहे.

(सकाळी 11.48 ते 11.58 पर्यन्त सभागृहाची बैठक तहकूब करण्यात आली.)

...यानंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(अनेक सन्माननीय सदस्य माननीय उपसभापतींच्या आगमनाचे स्वागत करतात.)

उपसभापती : आपल्या स्वागताप्रीत्यर्थ मी आभार व्यक्त करतो आणि सभागृहाचे कामकाज पुन्हा 30 मिनिटांसाठी तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक 11.59 ते 12.31 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, दिवाकर रावते यांनी जो विषय मांडला होता त्याबाबत सभागृहाचे पावित्र्य म्हणून विचार झाला पाहिजे. कोणत्याही चौकशी समितीचा अहवाल हा गोपनीय असला पाहिजे असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. चौकशी समिती सदस्यांनी इंटरनेटवर त्यांचे जे म्हणणे व्यक्त केले त्याची प्रिंट आऊट कॉपी आम्ही आपल्याला वाचून दाखविली आहे. याबाबत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असा विचार न करता सभागृहामध्ये चुकीची प्रथा पडू नये, चुकीची परंपरा निर्माण होऊ नये, सभागृहाची प्रॉपर्टी झाल्यानंतर बाहेर कोणतेही वक्तव्य केले जाणार असेल तर या सभागृहाचे पावित्र कसे राखले जाईल? चौकशी समितीचे अध्यक्ष हे वरिष्ठ अधिकारी असले तरी अशी प्रथा सुरु झाली तर ती प्रत्येक चौकशी समितीबाबत रुढ होईल. यामध्ये कोणाचे चुकले असेल तर सरकारने ते मोकळया मनाने सभागृहात स्पष्ट केले पाहिजे.

उपसभापती : सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.39 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष आकर्षून घेऊन असे सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये दि. 26.11.2008 रोजी जी घटना घडली, त्यानंतर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी माजी मुख्य सचिव श्री. राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती जाहीर केली. विधानमंडळाच्या आतमध्ये आपण विधानसभेत देखील तशी घोषणा केली होती. ही समिती एक क्वॉसी ज्युडिशियल स्वरुपाची समिती असून माननीय सभापतींच्या अखत्यारित असलेल्या सभागृहामध्ये ती घोषणा झाली होती. म्हणून लोकशाहीतील परंपरानुसार तो अहवाल माननीय सभापतींना अगोदर सबिमिट केला पाहिजे. तसेच जोपर्यंत सभागृहात हा अहवाल सादर होत नाही तोपर्यंत त्यावर समितीच्या अध्यक्षांना कुठल्याही प्रकारची प्रतिक्रिया देता येत नाही, प्रेस कॉन्फरन्स घेता येत नाही. खरे म्हणजे हे सेन्सेटिव्ह मॅटर आहे. हा अहवाल ज्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर केला त्यावेळेस माननीय उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे देखील उपस्थित होते. त्यावेळेस माननीय उप मुख्यमंत्री काहीच बोलले नाही तर त्यांनी मॅच्युरिटीचे, परिपक्वतेचे प्रदर्शन केले. तसेच पत्रकारांनी आपल्यालाही छेडण्याचा प्रयत्न केला असता आपण देखील असे बोललात की, नुकताच अहवाल नुकताच मला मिळालेला आहे, मी या अहवालाचा अभ्यास करीन. अभ्यास केल्यानंतर यावर आपल्याला बोलता येईल, असे सांगून आपण मौन बाळगले. सह्याद्रीवर आपण विरोधी पक्षाला चहापानासाठी बोलाविले असताना देखील हा विषय मांडला असता आपण तेवढाच संयम बाळगले आणि सांगितले की, यासंदर्भात ॲक्शन टेकन रिपोर्टसह अहवाल तयार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. त्यानंतर आपण बोलू. आम्ही जंग जंग पछाडतो, आपल्या अनेक मंत्र्यांना विचारतो, आपण पाहिला काय हा अहवाल? त्यांच्यापैकी एकालाही काही माहिती नाही, इतकी त्याची गुप्तता आपण बाळगली आहे. परंतु या अहवालाबद्दल प्रेसने काही वर्शस काढले, आमच्या प्रतिक्रिया दिल्या, पण आमच्याजवळ आधार काहीच नाही. मात्र कोणीतरी भालचंद्रन नावाची व्यक्ती आहे त्याच्या ब्लॉगमध्ये जे आलेले आहे त्याची कॉपी आहे ती फारच भयंकर आहे. पण तो विषय कमिटीचा अहवाल येईल, ए.टी.आर. येईल त्यावर आम्ही बोलू. आम्ही एवढाच मुद्दा उपस्थित केला की, The Quasi Judicial Committee appointed by the Hon. Chief Minister who is

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

constitutional head of this State. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानमंडळात विधानसभेत समिती नियुक्त केली, त्याची सँक्टिटी आहे. हे असताना या अहवालाच्या टर्म्स ऑफ रेफरन्समधील जो मुख्य प्रश्न आहे की, पोलीस अधिकाऱ्यांच्या वर्तनाबद्दल, पोलिसांच्या लॅप्सेसबद्दल किंवा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॅप्सेसच्या संदर्भात अथवा गृह विभागाच्या लॅप्सेसच्या संदर्भात हे सगळे विविध विषय आहेत. यासंदर्भात त्यांनी इन्फरन्स केलेली माहिती प्रेसला दिली. "स्टार माझा" या वाहिनीवर मी स्वत: चेहऱ्याने काही व्यक्ती पाहिल्या. या सगळया वर्तमानपत्राच्या कटिंग्ज मी आपल्यालाही दाखविल्या. त्यांनी पहिले सांगितले की, गुप्तचर संस्थांकडून हल्ल्यासंदर्भात नेमकी माहिती मिळाली नाही. आम्ही तीन वेळा सांगितले होते की, माननीय केंद्रिय गृह मंत्री श्री. शिवराज पाटील यांनी याबाबत डी.जी. कान्फरन्समध्ये वक्तव्य केले होते की, मुंबईममध्ये समुद्रमार्गाने.....तेव्हा त्याचे रेकॉर्ड आम्ही दिले होते. तसेच केंद्रिय संरक्षण मंत्री म्हणून श्री.ए.के.अँटनी यांचे देखील लोकसभेत दिलेले उत्तर असेच होते. माननीय शिवराज पाटील यांनी जाहीर केले होते की, आम्ही माहिती दिली होती. तसेच तत्कालीन गृह राज्यमंत्री श्री. जैसवाल यांनी सुध्दा माहिती दिल्याचे आम्ही सांगितले होते. हे सर्व लोकांनी पाहिले आहे. त्यांचे खरे असेल, खोटे असेल ती माहिती आम्हाला नाही. पण जो कॉन्फिडेन्शियल रिपोर्ट होता, ज्याला सँक्टिटी आहे, जो क्वॉसी ज्युडिशियल रिपोर्ट आहे, जो विधानमंडळामध्ये राज्याच्या घटना प्रमुख्य असलेल्या मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेली कमिटी आहे आणि ज्याच्यावर ए.टी.आर. सह आपण सादर करणार आहात अशी स्थिती असताना या समितीच्या प्रमुखांनी प्रेसशी बोलावं का ? हा पहिला प्रश्न आहे. पहिली गोष्ट बरोबर आहे की, प्रधान साहेब अतिशय जबाबदार व्यक्ती म्हणून राहिलेल्या आहेत, त्यांच्याबद्दल माझी तक्रार नाही. पण त्यांनी प्रेसशी....प्रेसवाले तर आपण नाही बोललो तरी समोर समोर येतात, बोलायला लावतात, हे गुगली बाण टाकणारे असतात. कधी मला टाकतात, कधी तुम्हाला टाकतात आणि आपण कधी टोलवतो. तुम्ही एखादी कॉमेंटस केली की, पुढचं मागचं सोडून तेच छापतात. विषय नाही पण सांगू इच्छितो की, काल उद्योग मंत्र्यांबद्दल आपण कॉमेंट्स केली, विषयाला धरुन त्यांनी भारी उद्योग, उद्योग बरोबर सरकॅस्टिक त्यांनी लिहिले..

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

प्रेसवाले खोदून खोदून विचारतात आणि त्यामध्ये आपण काही वेळेला माणूस अडकतो. आणि मग आपल्याला वाटते की, आपण बोललो नसतो तर बरे झाले असते. हा अनुभव तुम्हाला आणि मलाही आहे. प्रधान साहेबांनी सांगितले आहे की, केंद्रीय गुप्तचर संस्थाकडून मुंबईच्या हल्ल्याच्या संदर्भात नेमकी माहिती मिळाली नाही. टर्म्सा ऑफरेफरन्सेसच्या विषयाच्या संदर्भातील हे अनुमान आहे. राम प्रमधान यांनी हा विषय बोलून लीक -केला. अतिरेक्यांबरोबर केलेल्या सामन्याबद्दल राम प्रधान यांनी पोलिसांचे कौतुक केले आहे. राज्य पोलिसांना या हल्ल्याच्या संदर्भात ठोस माहिती मिळाली नव्हती. या कारवाईच्या दरम्यान कोणत्या त्रुटी राहिल्या तसेच या काळात पोलीस कंट्रोल रुम मधून उच्च पदस्थ अधिका-याकडून करण्यात आलेले मार्गदर्शन, तरुण पोलिसांनी दाखवलेली धडाडी यासह विविध बाबींचा परामर्श घेण्यात आल्याचे राम प्रधान यांनी सांगितले आहे. माझा पहिला मुद्दा असा आहे की, "Being a Convenor or a Chairman of a Quasi Judicial Committee" त्यांनी पब्लीक कॉमेंन्टस् करावयास नको होत्या. अहवालातील टर्म्स ऑफ रेफरेन्सेसच्या संदर्भात राम प्रधान यांनी गुप्तता पाळावयास पाहिजे होती. त्यांनी यासंदर्भात मिडीया समोर जे कॉमेन्टस् केलेले यात त्यांनी गोपनियतेचा भंग केलेला असून त्यांच्याकडे जी जबाबदारी सोपविण्यात आली होती ती जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही. या विषयाच्या संदर्भात मी शासनाला दोष देत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आधी हा ॲक्शन टेकन रिपोर्टसह सादर केला जाईल. त्यामुळे या वक्तव्याबद्दल आम्ही आपल्यावर विश्वास ठेवून आम्ही त्याचे स्वागत केले. परंतु ज्यांना आपण क्वाशी ज्यूडीशिअल कमिटीवर नेमणूक करतात त्या कमिटीचे निष्कर्ष विचाराधीन असतांना व त्या रिपोर्टवर अंतिम निर्णय करण्याचा अधिकार माननीय मुख्यमंत्री, कॅबिनेटला असतांना तसेच हा रिपोर्ट विधिमंडळात सादर केल्यानंतर विधी मंडळात चर्चा करुन त्यावर ॲक्शन घेण्याचा अधिकार विधी मंडळाला असतांना राम प्रधान यांनी या अहवालाचे रेफरेन्सेस डायरेक्ट मिडीया समोर सांगणे हे लोकशाहीमध्ये बरोबर नाही. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ आणि मिडीया हे लोकशाहीचे चार स्तंभ आहेत. घटनेने प्रत्येकाला मर्यादा घालून दिलेल्या आहेत. नोकरशाहीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

जबाबदारीच्या संदर्भात घटनेत उल्लेख आहे तसेच क्वासी ज्यूडीशिअल कमिटीच्या संदर्भात अशा प्रकारचे वक्तव्य करणे हे संकेताला सोडून आहे, जबाबदारीला सोडून आहे व एक प्रकारे हा रिपोर्ट फोडण्याचे तसेच या रिपोर्टमधील काही माहिती उघड करण्याचे कृत्य कळत न कळत राम प्रधान यांच्याकडून झालेले आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि मी उपस्थित केला व या विषयावर चर्चा झाली पाहिजे असे सांगितले. या विषयाच्या संदर्भात श्री. भालचंद्रन यांनी तर अजून स्फोटक माहिती लिहून हा रिपोर्ट ओपन केलेला आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावतो आहे अशी परिस्थिती आहे. मंत्र्यापेक्षा अधिकारी शिरजोर होऊ लागले आहेत. श्री. भालचंद्रन यांनी त्यांच्या ब्लॉगवर जे लिहिले आहे ते अजून भयंकर आहे. या रिपोर्टमध्ये त्यांनी कमिटीच्या रिपोर्टच्या संदर्भात विवादास्पद उल्लेख केलेला आहे. त्यासंदर्भातील चर्चा मी आज येथे करीत नाही. परंतु कोणत्याही ज्युडीशिअल कमिटीच्या सदस्याने जोपर्यंत सरकार अहवाल प्रकाशित करीत नाही, जोपर्यंत जनतेसमोर चर्चेकरिता सादर होत नाही तोपर्यंत त्याच्या कंटेन्ट बद्दल, त्याच्या इन्फरन्सेसबद्दल पब्लिक कॉमेंन्टस् करणे योग्य आहे की, अयोग्य आहे यासंदर्भात हा मुद्दा सभागृहात उपस्थित करण्यात आलेला आहे. यासंदर्भात माझे सबमिशन असे आहे की, माणूस कितीही मोठा असो, तो सभागृहासमोर आणि सिस्टीम समोर मोठा असूच शकत नाही. घटनेचा प्रत्येकाने आदर केला पाहिजे, सन्मान केला पाहिजे व त्या प्रमाणे वागले पाहिजे. रिपोर्टच्या संदर्भात जे लीकेज झालेले आहे, मिडीयाशी बोलतांना जे लूज टॉक झालेले आहे हे कळत न कळत विधानमंडळाचा अपमान करणारे आहे, हे माननीय मुख्यमंत्र्यांचा अपमान करणारे आहे, कॅबिनेटचा अपमान करणारे आहे, गोपनियतेचा भंग करणारे आहे. या विषयाच्या संदर्भात श्री. राम प्रधान साहेबांबद्दल नाराजी व्यक्त करावी, त्यांना तंबी द्यावी असे आम्हाला वाटत नाही कारण त्यांचे व्यक्तिमत्व मोठे आहे. श्री. राम प्रधान यांनी गव्हर्नर, लेफटनंन्ट गव्हर्नर पद भूषवलेले आहे. या सभागृहात मी जेव्हा नवीन नवीन आलो होतो तेव्हा ते या सभागृहाचे सदस्य होते, त्यांची प्रशासकीय कारकीर्द फार चांगली आहे, त्यांच्याबद्दल अनेक चांगल्या गोष्टी आहेत. परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्यांच्याकडून कळत न कळत हे सर्व घडलेले आहे. त्यामुळे त्यांना वॉर्निंग द्या असे मी म्हणत नाही परंतु माझी एवढीच अपेक्षा आहे की, भविष्यात ज्युडिशिअरी, क्वासी ज्युडीशिअरी कमिटीच्या सदस्यांनी अधिकारवाणीने रिपोर्ट लिक करु नये, कॉन्फीडेन्शिअल रिपोर्टच्या संदर्भात प्रेसशी बोलणे योग्य नाही हे लक्षात घेता कमित कमी सरकारने याबाबतीतील आपली भूमिका जाहीर करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

त्याचप्रमाणे असा प्रकार पुन्हा घडणार नाही याचीसुध्दा काळजी घेतली पाहिजे. लोकशाहीची, सदस्यांची तसेच विधीमंडळाची आणि गोपनीयतेच्या नियमांची प्रतिष्ठा आणि या सर्वांची सॅन्क्टिटी रहावी या दृष्टीने आम्ही हा विषय उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भात विचार करण्यात यावा आणि सरकारने आपली भूमिका जाहीर करावी अशी माझी आपल्या मार्फत सरकारला विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी या ठिकाणी आता जो मुद्दा उपस्थित केला आहे तोच मुद्दा त्यांनी सकाळी उपस्थित केला होता. त्यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याच्या मेरिटमध्ये मी जाऊ इच्छित नाही. त्याला मेरिट असेलसुध्दा परंतु सभागृहात सकाळी जी चर्चा झाली होती ती चर्चा आपण सर्वांनी ऐकली आहे. त्या विषयावर जर माननीय सभापतींनी रुलिग पेंडीग ठेवले असते तर ते मी समजू शकतो परंतु त्या संदर्भात माननीय सभापतींनी रुलिग दिले होते. त्यानंतर पुन्हा त्यावर चर्चा करणे बरोबर नाही. एखाद्या विषयावर माननीय सभापतींनी रुलिग दिल्यानंतर पुन्हा त्याच विषयावर चर्चा करता येते असे सभागृहाच्या कोणत्याही नियमामध्ये लिखित वा अलिखित स्वरुपात नाही .माननीय सभापतींनी रुलिग दिल्यानंतर त्यावर पुन्हा सन्माननीय सदस्य सभागृहात चर्चा करु शकतात असा नियम नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना माझी विनंती आहे.....

श्री.नितीन गडकरी : असे नाही. या बाबतीत मला खुलासा केला पाहिजे....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत जरुर खुलासा करावा . मी त्यांच्या केसच्या मेरिटमध्ये जात नाही. मी मघाशी असेही म्हटले होते की, त्या केसमध्ये मेरिट असेलही. या संदर्भात मला व्यक्तिगत विचारण्यात आले तर त्या विषयाला मेरिट असुही शकते असे मी सांगेन. एकदा एखाद्या विषयावर चर्चा झाल्यानंतर आणि माननीय सभापतींनी त्यावर रुलिग दिल्यानंतर पुन्हा त्या विषयावर चर्चा घडवून आणण्यासंबंधी कोणताही नियम नाही. असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा विषय नियम 289 चा होत नाही असे माननीय सभापतींनी रुलिग दिलेले आहे हे 101 टक्के बरोबर आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी सागतात ते बरोबर आहे. परंतु या प्रकरणातून मार्ग काढण्यासाठी तीन चार वेळा सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर माननीय सभापतींनी चर्चा करण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्हाला बोलावले होते, सरकारच्या प्रतिनिधींना सुध्दा बोलवले होते आणि या सबंधीची चर्चा घडवून आणली होती. त्यानंतर आम्ही आपल्याला अशी विनती केली की, माननीय मुख्यमंत्र्यांनासुध्दा या चर्चेसाठी बोलाविण्यात यावे. त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलावले होते. तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी आम्ही हा विषय मांडला होता आणि ही चर्चा संपल्यानंतर आपण सभागृहात आला होता. त्यावेळी आपण मला बोलण्यासाठी अनुमती दिल्यानंतर मी बोलण्यास सुरुवात केली होती. सभापती महोदय, आपण आपल्या अधिकारात कोणतीही चर्चा केव्हाही सुरु करु शकता . आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिल्यानंतरच मी बोलण्यास सुरुवात केली होती.आपली परवानगी न घेता मी बोलण्यास सुरुवात केली नाही. नियम 289 च्या प्रस्तावाच्या संदर्भात आपण रुलिग दिलेले आहे हे मला मान्य आहे. परतु सभागृहामध्ये ज्यावेळी अटीतटीचे प्रसंग उद्‌भवतात तेव्हा लोकशाही पध्दतीने चर्चा करुन त्यातून मार्ग काढण्यासाठी आपण बोलण्यासाठी अनुमती देता. माननीय सभापतींचा अवमान करण्याचा माझा उद्देश नव्हता त्याचबरोबर माननीय सभपतींची अनुमती न घेता मी बोलण्यास सुरुवात केलेली नाही. काही गोष्टी पडद्याआडच्या असतात त्यामुळे त्या जाहीर करता येत नाहीत. एवढेच मी सांगू इच्छितो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी एवढेच सांगेन की, मघाशी नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी मी निर्णय जाहीर केला होता. हा निर्णय जाहीर करीत असतांना मी प्रश्न पुकारला होता. दरम्यानच्या काळात सभागृहामध्ये काहीसा गोंधळ झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी मी तहकूब केले होते. त्यानंतर चर्चा करण्यासाठी मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना बोलावले, विरोधी पक्षाच्या नेत्यांना बोलावले होते .विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून दरम्यानच्या काळात जे हरकतीचे मुद्दे मांडले होते त्या चर्चेच्या वेळी मी एक निर्णय दिला होता पण या हरकतीच्या मुद्यावर निर्णय देणे गरजेचे होते त्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांचे या बाबतीतील मत जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला असून त्या संदर्भात माझ्या दालनात दोन तीन वेळा चर्चा केली होती ..

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मला एक मुद्दा मांडावयाचा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माझे रुलिंग पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी बोलावे. माननीय मुख्यमंत्र्यानासुध्दा चर्चा करण्यासाठी मी बोलावले होते आणि ती चर्चा झाल्यानंतर माझ्या दालनात जो निर्णय झाला होता त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना या विषयाला सुरुवात करण्याकरिता मी परवानगी दिली होती सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडला होता त्याचा गाभा सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी सांगितला आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

त्या अनुषंगाने प्रधान समितीने जो अहवाल दिलेला आहे त्यानंतर जे भाष्य आहे त्याबद्दल मी मघाशी देखील सांगितले की, ते भाष्य मी ऐकलेले नाही, मला माहिती नाही त्यामुळे त्यावर मी कोणतेही भाष्य करणे, बोलणे बरोबर होणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी आपले मत येथे मांडले आहे आणि त्या अनुषंगाने ही चर्चा होती इतकेच. आता मी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास परवानगी देतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपला आता निर्णय झाल्यानंतर त्यावर भाष्य करणे उचित नाही हे मलाही माहिती आहे. आता मुद्दा एवढाच आहे की, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे जेव्हा येथे बोलण्यास उभे राहिले तेव्हा अपेक्षा अशी होती की, त्याच्या अगोदर आपण तीन तीन वेळा सभागृह तहकूब केले होते. अशा प्रकारच्या तहकुबीनंतर आपण अनेकदा अशा प्रसंगातून मार्ग काढत असतो म्हणून तहकुबीनंतर सुरूवातीसच आम्हाला थोडेसे सांगितले असते, कल्पना दिली असती की, या प्रसंगातून आपण असा असा मार्ग काढत आहोत त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचे काय म्हणणे आहे ते त्यांनी येथे मांडावे. म्हणजे मग आमचे कन्फ्यूजन वाढले नसते. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी बोलत असताना आम्हाला नेमके हे कळत नव्हते की, आपण त्यांना चर्चेला परवानगी दिली आहे का ? त्यांनी येथे आता नियम 289 खालील प्रस्तावावर बोलण्यास सुरूवात केलेली आहे की काय ? सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे जे काही बोलत होते त्यामुळे आम्हाला असे वाटत होते की, त्यांनी चर्चेला सुरूवात केलेली असेल तर मग मध्यंतरी सभागृह तहकूब तरी कशासाठी केले गेले होते ? एवढाच केवळ मर्यादित मुद्दा होता. ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी नंतर दाखविलेला समंजसपणा अगोदरच दाखविला असता तर बरे झाले असते. पण आता त्यांनी तो दाखविला त्याबद्दल त्यांना जरूर धन्यवाद.

सभापती : मी आपणा सर्वांनाच सांगू इच्छितो की, सभापती म्हणून मी सभागृहाचे लक्ष वेधले असते तरी चालले असते. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी त्यांच्या बोलण्याला सुरूवात करतानाच आपण म्हणता तसे त्यांनी सांगितले असते तर बरे झाले असते यात शंका नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे देखील जागरूक आहेत तेव्हा त्यांनी देखील सुरूवातीच्या एका वाक्यातच त्यांची अपेक्षा काय होती हे त्यांनी सांगितले असते तरी चालले असते. असो. मी आता सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना बोलण्याची परवानगी देतो.

.... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचाही गोंधळ होऊ शकतो हे आम्हाला यातून समजले हेही नसे थोडके. सभापती महोदय, हा जो विषय आहे तो या सदनाचा जो यातून अधिक्षेप झालेला आहे त्या संबंधीचा आहे. हा शासनाच्या विरोधातील अहवाल आहे किंवा नाही हा यात मुद्दा नाही. या सदनामध्ये ती समिती जाहीर झाल्या नंतर त्या समितीने दिलेल्या अहवालासंबंधात जी चर्चा झाली ती योग्य नाही, त्यातून या सदनाचा अवमान होतो असा आमचा मुद्दा होता व आहे आणि सभापती महोदय, आपण देखील आमच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जी भूमिका घेतली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो, आपल्या या भूमिकेचे स्वागत करतो. सभापती महोदय, आपण आज तीन वेळा सभागृह तहकूब केल्यानंतर येथे जी चर्चा चालू झाली त्या संबंधात यापूर्वीच सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी हे नेहमी सारखे आम्हाला मार्गदर्शन करण्यास आले असते तर ते आपणा सगळ्यांनाच जास्त लाभदायी ठरले असते, कदाचित लवकर तोडगा निघू शकला असता. तसे झाले नाही पण तरीही ते स्वत: आमच्या भावनांशी सहमत आहेत याबद्दल मनापासून त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात.

सभापती महोदय, मुळात हा विषय या सदनामध्ये नेमका काय व कसा होता हे मी प्रथमत: येथे सांगू इच्छितो. त्यावेळी झालेली सर्व चर्चा आपल्या समोर आहे. ती चर्चा इतक्या टोकापर्यंत गेली होती की, आमचा आग्रह हा न्यायालयीन चौकशीचा होता. पण त्याला शासन तयार नव्हते. त्यातूनच या सदनामध्ये फार मोठ्या आक्रमकतेने रणकंदन झाले. शेवटी सभागृह संस्थगित होता होता, वंदे मातरम् होण्याच्या पूर्वी, अगदी शेवटच्या क्षणाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सभागृहात आले आणि त्यांनी ही चौकशी समिती जाहीर केली. शेवटच्या क्षणी हे जाहीर झाल्याने आम्हाला त्याबद्दलच्या आमच्या भावनादेखील येथे व्यक्त करता आल्या नाहीत. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत चौकशी समिती जाहीर केली, ठीक आहे. त्यानंतर त्या समितीचा अहवाल आपल्याला सादर झाला. आम्हालाही आनंद झाला की, चला, काही ना काही तरी अहवाल आला आहे. पण टी.व्ही.वर या संबंधीची बातमी जेव्हा आम्ही पाहत होतो तेव्हा आम्हाला असे दिसून आले की, अहवाल सादर होताना मुख्यमंत्री महोदय, आपण जेवढा सावध होता तेवढे अहवालकर्ते सावध नव्हते. त्यातूनच हा सगळा प्रश्न निर्माण झालेला आहे. शेवटी ते

..... एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पत्रकार आहेत. ते आमच्या समोर आले, तुमच्या समोर आले तरी ते शेवटी पत्रकार आहेत. ते त्यांच्या पद्धतीने आपला पिच्छा पुरविणारच. पण आपण त्यांना किती मागे लावून घ्यायचे आणि त्यांना किती सांगायचे हे आपण ठरवायचे असते. ते त्यांचे काम करीत असतात. म्हणूनच यामध्ये पत्रकारांना दोष किती द्यायचा हा प्रश्न निर्माण होत नाही. सभापती महोदय, माझ्यापुढे या संबंधातील 'दै.सामना'मधील बातमी आहे. आता आपण हंसक्षीर न्यायाने निर्णय घेऊही शकता, मी त्याबद्दल काही बोलत नाही. जेव्हा याबाबत चर्चा होईल आणि माननीय मुख्यमंत्री जे काही सांगतील तेव्हा आपण बघू, बोलू. अर्थात त्यांचे सारे म्हणणे आम्ही स्वीकारूच असे नाही. सभापती महोदय, या संबंधातील 'दै.सामना'तील जी बातमी आहे ती अशी आहे की, "शहीद पोलीस कर्मचारी व अधिकारी यांची कामगिरी कौतुकास्पद" अशी अगदी हेडलाईन दिलेली बातमी आहे. आता त्या ठिकाणी वर्तमानपत्रांचे जे कोणी वार्ताहर हजर होते ते एक तर या विषयाशी अनभिज्ञ असावेत किंवा ते पूर्ण वार्ताहर नसावेत किंवा त्यांना वर्तमानपत्राची पत्रकारिता माहिती नसावी असे वाटते. सभापती महोदय, मी एकाच वर्तमानत्रातील बातमी येथे वाचून दाखविणार आहे असे नाही तर इतरही वर्तमानपत्रांतील यासंबंधीच्या बातम्या वाचून दाखविणार आहे. तेव्हा हा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर होताना तेथे उपस्थित असलेल्या वार्ताहरांनी जे काही ऐकले ते त्यांनी आपापल्या वृत्तपत्रात छापून आणले आहे. त्यात त्या वार्ताहराने काय म्हटलेले आहे ? "शहीद पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची कामगिरी कौतुकास्पद" ... "..अशा प्रकारे सागरी संरक्षण मजबूत करणे गरजेचे ...." म्हणजे ते नव्हते. ....

(यानंतर श्री. सरफरे ....एन 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. दिवाकर रावते...

पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण द्या. हल्ल्याच्या वेळी महासंचालक कार्यालयात बसून असल्यामुळे त्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा उल्लेख नाही. म्हणजे अहवालात काय आहे? हे पत्रकारांना कसे कळले? हा प्रश्न आहे. त्यानंतर असे म्हटले आहे की, राज्य सरकारने माजी मुख्य सचिव श्री. राम प्रधान व माजी सनदी अधिकारी श्री.बालचंद्रन यांची समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांना दिला. तो अहवाल सादर केल्यानंतर समिती प्रमुख माननीय श्री.राम प्रधान हे टी.व्ही. वाहिन्यांशी बोलतांना जे म्हणाले व आम्ही जे ऐकले ते असे की, या दहशतवादी हल्ल्याचे स्वरुप पहाता अशा परिस्थितीत कोणतीही यंत्रणा या हल्ल्याचा समर्थपणे सामना करु शकली नसती. म्हणजे त्यांनी अहवालात काय निर्णय दिला हे जाहीर करुन टाकले. अशाप्रकारे हे चित्र सर्व समोर आले आहे. म्हणजे हा अहवाल आपण सभागृहापुढे मांडणार आहात, ऐटीआर मांडणार आहात, त्यावर चर्चा होणार आहे. असे असतांना हे वर्तमानपत्राचे वार्ताहर जे म्हणत आहेत ते मी सुरुवातीला सांगितले. त्या वार्ताहरांबद्दल त्यांना प्रेम आहे काय? हा अहवाल सादर केल्यानंतर त्याचे वृत्त आमच्या दै. सामनामध्ये छापून आले. त्यानंतर दै. लोकमत हा आपला ब्रँडेड पेपर आहे असे म्हटले जाते, परंतु तो तसा नाही. त्या लोकमतमध्ये काय म्हटले आहे?

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सभासदांचे काही तरी कन्फ्यूजन होत आहे असे सांगितले. आता याठिक्राणी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते जे बोलत आहेत ते कशाच्या आधारावर आहे? कुणाच्या संदर्भात आहे? यामुळे माझे सुध्दा कन्फ्यूजन व्हावयास लागले आहे. त्यामुळे सभागृहामध्ये नक्की काय चालू आहे याची माननीय सभासदांना माहिती मिळावी.

सभापती : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना आपले म्हणणे मांडण्यास मी परवानगी दिली त्याप्रमाणे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सुध्दा आपले म्हणणे मांडण्यास परवानगी दिली. सकाळी 12 वाजता ज्या विषयासंबंधी चर्चा सुरु झाली ती सभागृहामध्ये गोंधळ झाल्यामुळे व सभागृह तहकूब करावे लागल्यामुळे अपूर्ण राहिली. त्या संदर्भात माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलत असून त्यांनी त्रोटक स्वरुपात आपले म्हणणे मांडावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचा जो मूळ प्रस्ताव आहे त्यामधील पहिला परिच्छेद महत्वाचा आहे. तो असा आहे की,ज्याअर्थी हा अहवाल सादर केल्यानंतर त्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

महत्वाचे मुद्दे आणि समितीने काढलेले निष्कर्ष दि. 28 मे 2009 रोजीच्या वर्तमानपत्रातून छापून आले आहेत असे आमच्या मूळ प्रस्तावात नमूद केले आहे. म्हणून त्या संदर्भात मी दै. सामनामधील वृत्त वाचल्यानंतर ज्याला आपले वर्तमानपत्र म्हटले जाते त्या दै. लोकमतमध्ये तसे आलेले नाही. त्यामध्ये असे म्हटले आहे की, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांना अहवाल सादर केल्यानंतर पत्रकरांशी बोलतांना श्री. प्रधान यांनी मुंबईचे पोलीस आपले कर्तव्य बजाविण्यात कमी पडल्याचे दिसून आले नसल्याचे त्यांनी अहवालातील निष्कर्ष जाहीर केले. मुंबईचे पोलीसच काय, तर कुठलीही यंत्रणा 26.11 ची युध्दजन्य परिस्थिती हाताळू शकली नसती. असे नमूद करुन सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी वेगाने सर्व परिस्थिती उत्तमरित्या हाताळली असे नमूद केले आहे. म्हणजे अहवालातील निष्कर्ष त्यांनी जाहीर केले असे आमचे म्हणणे आहे. मुंबईवर झालेल्या हल्ल्याबाबत केंद्रीय गुप्तचर यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा थेट इशारा देण्यात आला नव्हता. असे या प्रकरणाच्या चौकशी दरम्यान आढळून आले असे त्यांनी सांगितले. सभापती महोदय, काही महत्वाच्या गोष्टी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. त्यानंतर हा अहवाल आता प्रशासनाकडे सोपविण्यात आला आहे. आता दै. सकाळमध्ये छापून आलेली बातमी वाचून दाखवितो. हे वर्तमानपत्र आपल्या शेजारच्यांच्या मालकीचे असल्यामुळे आपल्याला याठिकाणी सांगितले पाहिजे. सभापती महोदय, पोलिसांनी वेळीच आणि धाडसाने प्रतिकार केल्याचे प्रशस्तीपत्र देऊन मुंबई पोलिसांची पाठ थोपटली. तसेच, हल्ल्याची पूर्वसूचना राज्याला देण्यात केंद्रीय गुप्तचर यंत्रणेला अपयश आले होते याकडेही समितीने लक्ष वेधले. म्हणजे पुन्हा त्यांनी अहवालातील माहिती सांगितली. त्यामध्ये काही लोक जखमी झाले. अधिकाऱ्यांनी चांगले काम केल्याबद्दल आम्ही कौतुक केले आहे. त्यांनी अहवालात काय शिफारशी केल्या त्या सुध्दा सांगितल्या. सभापती महोदय, हे सर्व अहवाल फुटल्याचे लक्षण आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

श्री.बालचंद्रन यांच्या ब्लॉगवर काय आलेले आहे, ते आम्ही पाहिले आहे आणि ते तुम्हीही पाहू शकता. त्यामुळे हा अहवाल फुटल्याचाच प्रश्न आहे. तो अहवाल व्हाईट वॉश नव्हता. या अहवालामध्ये काय-काय सांगितले आहे, हे सगळे काही आता ब्लॉगवर आलेले आहे. त्याबाबत आम्ही आणखी काही बोलावे अशी गोष्ट नाही. मात्र एका गोष्टीचा अत्यंत खेद होतो आणि ती गोष्ट म्हणजे कै.हेमंत करकरे यांच्या पत्नी त्या अहवालाच्या चर्चेमध्ये सहभागी झाल्या असताना, त्या टी.व्ही.च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला आपले आक्रंदन सांगत होत्या. त्यांनी असे सांगितले की, आम्ही स्वत: या समितीपुढे गेलो आणि आम्हाला काही मांडावयाचे आहे अशी विनंती केली. तसेच आमच्या वकिलांनी देखील सांगितले, परंतु त्यांनी आमची अजिबात दादही घेतली नाही, नोंदही घेतली नाही. मग त्यांनी असे विचारले की, माझा नवरा हा एक धाडसी पोलीस अधिकारी होता, परंतु ते तीन तास त्याठिकाणी का पडून होते ? याचे मला उत्तर मिळत नाही. त्यांना वेळेवर मदत का मिळाली नाही हे मला समजत नाही. माझे पती हे जेवता-जेवता फोन आला म्हणून एक बूट पायामध्ये घालून आणि दुसरा बूट एका हातामध्ये घेऊन पळत सुटले होते आणि ते दृश्य आजही माझ्या डोळयासमोर दिसत आहे. तसेच त्यांची रक्ताने भरलेली डायरी दाखवून त्यांनी सांगितले की, आता माझ्याजवळ मरेपर्यंत त्यांची ही शेवटची आठवण आहे आणि याची या अहवालामध्ये नोंद घ्यावयास हवी होती, पण ती घेतलेली नाही, अशा प्रकारचा त्यांनी आक्रोश केल्याचे संपूर्ण जनतेने पाहिले आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे या विधीमंडळाचा देखील आक्षेप झाला असा आमचा यातील एक मुद्दा आहे. या संदर्भात हे सर्वकाही अयोग्य झाले आहे असे आमचे मत आहे. श्री.राम प्रधान यांच्या बाबतीत सांगावयाचे तर ते ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असे सगळे काही असले तरी मला असे वाटते की, आता फारच वयस्कर माणसांकडे अशा प्रकारच्या जबाबदाऱ्या द्याव्यात काय ? असा प्रश्न निर्माण होतो. मी त्यांचा आदर करतो आणि आदर वगैरे सर्वकाही ठीक आहे. परंतु ते केवळ सनदी अधिकारी नव्हते, तर महाराष्ट्र राज्याचे चीफ सेक्रेटरी होते.ही चौकशी क्वॉसी ज्युडिशिअरी आहे काय ? असा आपण मुद्दा काढला, पण त्यांनी "नाही" असे म्हटलेले आहे. श्री.राम प्रधानसाहेब असे म्हणतात की, आमची समिती न्यायालयीन नव्हे .....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (खाली बसून) : बरोबर आहे.

श्री.दिवाकर रावते : तर प्रशासकीय चौकशी समिती आहे. या अहवालामध्ये आम्ही . . . .

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : ही समिती ज्युडिशिअरी आणि क्वॉसी ज्युडिशिअरी अशी दोन्ही आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हणजे माझे म्हणणे असे आहे की, मी जी न्यायालयीन चौकशीची मागणी करीत होतो, तेच बरोबर होते असा माझा मुद्दा आहे. तसेच याठिकाणी विधीमंडळाचा अधिक्षेप झालेला आहे असा आमचे म्हणणे आहे. त्यामुळे आपण यासंदर्भात आम्हाला योग्य ते मार्गदर्शन करावे अशी आमची नम्र विनंती आहे.

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सभापती महोदय, 26/11 ला मुंबईमध्ये झालेल्या आतंकवादी हमल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूरच्या अधिवशेनामध्ये चर्चा झाली आणि त्या चर्चेच्या शेवटी मी सभागृहामध्ये असे जाहीर केले की, या सर्व प्रकरणाचा तपास करण्यासाठी, माहिती घेण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. नागपूर येथील विधीमंडळाच्या सभागृहामध्ये मी माझा टेक्स्ट अशा प्रकारे घोषित केला होता की, दोन सदस्यांची उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. त्यामध्ये श्री.आर.डी.प्रधान आणि श्री.बालचंद्रन् हे दोघेही अनुभवी अधिकारी असतील. श्री.बालचंद्रन् ज्यांनी "रॉ" मध्ये काम केले होते, त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि भूतपूर्व मुख्य सचिव आणि केंद्रीय माजी गृह सचिव श्री.आर.डी.प्रधान यांना नेमण्यात आले होते. त्यांचा अहवाल शासनाकडे 27 तारखेला प्राप्त झाला आणि अहवालामधील कोणतीही माहिती किंवा कोणताही मजकूर प्रेस समोर त्यांनी उघड केलेला नाही हे मी येथे खात्रीपूर्वक सांगू इच्छितो. वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातम्यांचा जो निष्कर्ष काढला जात आहे, तो चुकीचा आहे. कारण मी देखील अजून अहवाल वाचलेला नाही. मी तो अहवाल जसाच्यातसा मुख्य सचिवांकडे सादर केला आणि त्यांना सांगितले की, ताबडतोब, वेळ न घालविता यावर ॲक्शन टू बी टेकन या अनुषंगाने पुढे जी काही कार्यवाही करावयाची आहे, तसेच या अहवालाच्या माध्यमातून पुढे जे काही करणे अपेक्षित आहे, त्या बाबतीत आपण माझ्याकडे तातडीने ही माहिती सोपवावी. आम्ही तो अहवाल कोणाच्याही हातामध्ये दिलेला नाही हे मला मुद्दाम याठिकाणी सांगितले पाहिजे. त्यामुळे अहवालाच्या माध्यमातून गोपनीयतेचा काही भंग झालेला आहे किंवा अहवालातील माहिती कोणासमोर उघड करण्यात आली आहे असे म्हणणे चुकीचे होणार आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : मग ते छापले कसे गेले ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, त्यादिवशी प्रेस कॉन्फरन्स् झाली असे म्हणता येणार

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही, पण मिडियासमोर हा अहवाल देता यावा म्हणून तेथे काही इलेक्ट्रॉनिक मिडियाचे प्रतिनिधी आणि काही प्रेसचे प्रतिनिधी या सर्वांच्या उपस्थितीमध्ये तो अहवाल त्यांनी माझ्याकडे सुपूर्द केला आणि मी तसाच्यातसा अहवाल मुख्य सचिवांकडे सुपूर्द केलेला आहे. त्याठिकाणी त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. पण त्यांनी राज्यातील जे तरुण अधिकारी आहेत, ज्यांनी चांगले काम केलेले आहे, त्यांच्याबद्दल फक्त त्याठिकाणी प्रशंसा केली. अर्थात ती प्रशंसा करीत असताना तो त्या अहवालाचा भाग होता किंवा नाही हे मी आज सांगू शकणार नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण....

त्यामुळे अहवालातील काही गोष्टींचा त्यांनी बाहेर उल्लेख केला म्हणून गोपनीयतेचा भंग झालेला आहे असा दावा करणे सुध्दा उचित होणार नाही. हे मला मुद्दाम सांगितले पाहिजे. (अडथळा) ठीक आहे. मला याबाबतीत एवढेच सांगावयाचे आहे की, अहवालामध्ये ज्या गोष्टींची जिकर असेल आणि तो जिकर जर त्यांनी बाहेर उघड केला असेल तर मग अहवालातील माहिती त्यावर निर्णय होण्या अगोदर, सभागृहासमोर ठेवण्या अगोदर किंवा त्यावर विचार होण्या अगोदर हा अहवाल बाहेर लोकांसमोर ठेवण्यात आला, असा निष्कर्ष कदाचित काढता आला असता. एकंदरीत तरुण अधिकाऱ्यांनी जे चांगले काम केलेले आहे त्याचा उल्लेख त्यांनी या ठिकाणी केलेला आहे. थोडया वेळा पूर्वी सन्माननीय सदस्यांनी भालचंद्र यांच्या ब्लॉग बद्दल उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल मी जरुर माहिती घेईन. आपण ही बाब आजच माझ्या निदर्शनास आणलेली आहे. निश्चितपणे अशा प्रकारचे अपेक्षित नव्हते. मी असो, गृह मंत्री असोत,आमचे गृह राज्यमंत्री असोत कोणाच्याही माध्यमातून किंवा मी तर असे म्हणेण की, श्री. आर.डी. प्रधान असोत किंवा श्री. बालचंद्रन असोत यांच्या माध्यमातून कोठल्याही प्रकारच्या गोपनीयतेचा भंग होऊ नये, ही आपली अपेक्षा रास्त आहे.ब्लॉगच्या माध्यमातून जर एखादी गोष्ट बाहेर गेली असेल तर मी याबाबतीत जरुर माहिती घेईल. पण आपली अपेक्षा रास्त आहे की, अशा प्रकारे कोठल्याही गोपनीयतेचा भंग होता कामा नये. या सगळया गोष्टीच्या बारकाव्यात जाण्यापेक्षा खऱ्या अर्थाने अहवालामध्ये काय आलेले आहे, त्या अनुषंगाने काय कारवाई करण्यात येणार आहे ही त्यातील महत्वाची बाब आहे. याबाबतीत अधिक चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. आपण सभागृहाचा वेळ घेतला आणि काही गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या. (अडथळा) माझी त्याबाबतीत काही तक्रार नाही. आपल्याला पूर्ण अधिकार आहे. ज्या सगळया गोष्टी वृत्तपत्रात छापून आलेल्या आहेत त्यांचा मी निश्चितपणे इन्कार करेन. प्रेस कॉन्फरन्सच्या माध्यमातून अहवालातील काही भाग लोकांसमोर देण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे मी कधीही म्हणणार नाही.

श्री. नितीन गडकरी : टी.व्ही. वर जाहीर केलेले आहे.

श्री. अशोक चव्हाण : मी जरुर याबाबतची माहिती घेईन, जरुर यामध्ये काही आक्षेपार्ह असेल तर श्री. राम प्रधान यांनाही सूचना करीन.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण वर्तमानपत्राचा अवमान करीत आहात. म्हणून मी असे म्हटले होते की, ते वेडे होते काय, मुर्ख होते काय? त्यांना कळलेले नव्हते काय? जबाबदार वर्तमानपत्रात ही बातमी छापून आलेली आहे.

श्री. अशोक चव्हाण : आपण या ठिकाणी ज्या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे,त्या अनुषंगाने श्री. प्रधान आणि श्री. बालचंद्रन यांच्या बरोबर जरुर चर्चा करीन.

श्री. नितीन गडकरी : टी.व्ही.वर दाखविण्यात आलेल्या क्लीपमुळे हे सगळे बाहेर आलेले आहे.

श्री. अशोक चव्हाण : अहवालाचा एवढाच निष्कर्ष आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? अहवालामधल्या ज्या बऱ्याचशा गोष्टी अद्याप पुढे यावयाच्या आहेत आणि ज्याबद्दल काही कृती करणे अपेक्षित आहे त्या गोष्टी अजून व्हावयाच्याच आहेत. मी खालच्या सभागृहात हे स्पष्ट केलेले आहे की, या अनुषंगाने हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर याबाबतीत निर्णय घेण्यात येईल आणि त्यावर सभागृहात चर्चा घडवून आणण्यात येईल, हे मी कबूल केलेले आहे त्यामुळे याबाबतीत अधिक चर्चा करणे योग्य होणार नाही. श्री. आर.डी. प्रधान हे एक जिम्मेदार सदगृहस्थ आहेत. त्यांनी जे काही विधाने केलेली आहेत. त्यामध्ये हेतुपुरस्सरपणे गोपनीयतेचा भंग व्हावा, आणि अडचण निर्माण व्हावी असा त्यांचा हेतू आहे, असे मला वाटत नाही. म्हणून सभापती महोदय, ही चर्चा या ठिकाणीच संपवून, सभागृहाचे पुढील कामकाज सुरु करण्यात यावे अशी
माझी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, आम्ही पुरावे दिले तरीही माननीय मुख्यमंत्री संबंधितांना संरक्षण देणार असतील तर यातून चुकीची प्रथा पडेल. गोपनीयतेचा भग झालेला आहे. पावित्र्य समाप्त झालेले आहे म्हणून आम्ही सरकारचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील सदस्यांचे बहिर्गमन)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 50448 व 50212बाबत</u>

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या संदर्भातील निर्णय अद्याप झालेला नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 1वरील तारांकित प्रश्न क्रमांक 50448 आणि अनुक्रमांक 27 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 50212 हे दोन प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू. डायगव्हाणे आणि इतर सदस्यांचे आहेत. ते दोन्हीही प्रश्न घेण्याच्या बाबतीत काय करता येईल याबबतीत मी विचार करीन. हे प्रश्न आज चर्चेसाठी येऊ शकले नाहीत, त्यामुळे याबाबतीत अन्य माध्यमातून काही मदत करता येईल काय हे मी तपासून घेतो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, "हे प्रश्न राखून ठेवण्यात येतील" असे आपण आपल्या दालनामध्ये म्हटले होते. हे प्रश्न राखून ठेवण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख आणि इतर सगळे सदस्य आपल्याला दालनात भेटलो होतो त्यावेळी हे प्रश्न राखून ठेवण्याच्या संदर्भात आपण मान्यता दिलेली आहे. माझी विनंती आहे की, हे अत्यंत जिव्हाळयाचे असे प्रश्न आहेत. तेव्हा हे प्रश्न चर्चेला घेण्यात यावेत.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला असता तर मी हे दोन्ही प्रश्न चर्चेला घेणार होतो. पण आज हे प्रश्न चर्चेला घेता आलेले नहीत. हे प्रश्न चर्चेला घेण्याच्या बाबतीत काय करता येईल याबाबत जरुर मी माझ्या दालनात विचार करीन.

श्री. संजय दत्त :सभापती महोदय, महत्वाचा विषय आहे म्हणून सदस्यांच्या भावना मला आपल्या निदर्शनास आणावयाच्या आहेत. अधिवेशनाच्या कारकीर्दीत आपण नेहमी बघतो की, चार-चार, पाच-पाच दिवस सभागृहात गोंधळ घातला जातो. त्यामुळे महत्वाचे प्रश्न 30 दिवस अगोदर सादर करुन सुध्दा ते घेता येत नाहीत. सभापती महोदय, आपण या विषयी गांभीर्याने विचार करावा आणि काही तरी मार्ग काढावा. गोधळा नंतर जेव्हा सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु होते तेव्हा प्रश्नोत्तराच्या तासापासून सुरुवात करण्यात यावी, किंवा प्रश्नोत्तराच्या यादीतील जे पहिले महत्वाचे दहा-बारा प्रश्न चर्चेला येऊ शकतात त्यावर चर्चा करण्याच्या संदर्भात काही तरी मार्ग काढण्यात यावा, ही नम्र विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तरे सातत्याने घ्यावीत या मताचा मी आहे. परंतु प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर प्रश्न क्रमांक 1 आणि प्रश्न क्रमांक 27 च्या संदर्भात ...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी माझी भावना मांडली.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण दालनामध्ये मान्य केले म्हणून मी तो प्रश्न उपस्थित केला.

सभापती : त्याबाबतीत कशी मदत करावयाची ते मी बघतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपण पाहिले की, या ठिकाणी नियम 289 अन्वये विषय उपस्थित केले जातात. अगदी रेअर केसेसच्या बाबतीत नियम 289 चा वापर करण्याचा विरोधी पक्षाला अधिकार आहे. आता असे झाले आहे की, प्रत्येक दिवशी दोन तीन प्रस्ताव येतात आणि त्यावर चर्चा झाली की, त्याचा परिणाम सभागृहाचा वेळ खर्च होण्यावर होतो. मी आपल्याला विनंती करतो की, एखादा महत्वाचा विषय असेल तरच तो दाखल करुन घ्यावा. हा आपला अधिकार आहे. आपल्या अधिकारामध्ये मी हस्तक्षेप करु इच्छित नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, वेळेच्या अनुषंगाने मी विचार करण्याचा प्रयत्न करतो परंतु काही वेळा वेगळी परिस्थिती निर्माण होते. उदा. काल नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यासंधीचा प्रश्न होता तसेच आजचा विषय श्री. राम प्रधान यांच्या अहवालासंबंधीचा होता. हे दोन्ही विषय महत्वाचे आहेत असे मला वाटले. तांत्रिकदृष्ट्या जे योग्य नाहीत ते विषय मी नाकारलेले आहेत. त्यानंतर एखादा इश्यू तयार झाला तर अनेक वेळा या सदनाच्या माध्यमातून याबाबत चर्चा होते आणि नंतरच्या काळामध्ये माझ्या दालनामध्ये दोन्ही बाजूकडून चर्चा करुन त्यावर आपण एखादा निर्णय घेतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझी देखील आपल्याला नम्र विनंती आहे. काही प्रस्ताव असे असतात की, ते तांत्रिकदृष्ट्या नियम 289 मध्ये बसत नाहीत तरी सुध्दा ते रेकॉर्डवर येण्याकरिता आपण कधीकधी त्याचा उल्लेख करण्याची संधी देता. आपण संधी दिल्यानंतर बाहेर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. भास्कर जाधव .....

असा संदेश जातो की, काही सन्माननीय सदस्यांनी विषय मांडण्याचा प्रयत्न केला परंतु माननीय सभापतींनी तो विषय मांडू दिला नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, जो विषय तांत्रिकदृष्ट्या आणि खऱ्या अर्थाने तातडीचा नाही, नियम 289 च्या व्याख्येमध्ये बसत नाही असे प्रस्ताव आपण दालनामध्ये फेटाळले तर बरे होईल. त्याचा उल्लेख सुध्दा या ठिकाणी करण्याची आवश्यकता नाही अशी माझी आपल्याला विनंती आहे. ते प्रस्ताव दालनामध्येच फेटाळले पाहिजेत.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापतींनी दालनात प्रस्ताव फेटाळलेले आहेत.

श्री. भास्कर जाधव : वारंवार उल्लेख केल्यानंतर ते मिडियामध्ये येते परंतु या ठिकाणी सभागृहाचा वेळ जातो.

डॉ. दीपक सावंत : हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा आपला अधिकार आहे. सन्माननीय सदस्य हे माननीय सभापतींना आदेश देत आहेत. हा आपला अवमान आहे.

श्री. भास्कर जाधव : मी विनंती केलेली आहे. हा अवमान नाही. माझे मत मांडण्याचा मला अधिकार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे जागरुक सदस्य आहेत याबद्दल वाद नाही. परंतु माननीय सभापतींच्या अधिकाराचा अधिक्षेप करण्याचा त्यांना अधिकार नाही. विरोधी पक्षाने कोणते हत्यार वापरावयाचे आणि कधी वापरावयाचे हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे. शासनाला त्रास होतो किंवा शासनावरील टीका बाहेर जाते अशा प्रकारचे विधान सन्माननीय सदस्यांनी केले आहे. विरोधी पक्षाचे ते काम आहे. आम्ही आमचा अधिकार वापरतो.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना समजून घेतलेल्या आहेत. नियम 289 अन्वये आपण जो अधिकार दिलेला आहे त्याचा वारंवार वापर होणेही बरोबर नाही. एखाद्या अचूक आणि अत्यंत महत्वाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने त्याचा वापर व्हावा अशी आपणा सगळ्यांची इच्छा आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

मी काही वेळा नियम 289 अन्वये दिलेल्या सूचना माझ्या दालनातच नाकारलेल्या आहेत. परंतु एखादा महत्वाचा प्रश्न असेल त्यावेळी सभागृहात 1-2 मिनिटात त्यासंबंधी उल्लेख व्हावा यादृष्टीने मी बोलण्याचीही परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. नियम 289 अन्वये सूचना द्यावयाचे आयुध बोथट झाले तर ते योग्य नाही. हे आयुध धारदार असावयास पाहिजे. हे आयुध बोथट झाले तर त्याचे अतिक्रमण प्रश्नोत्तराच्या तासावर होण्याची शक्यता आहे. काही वेळा सदनात असे पाहिले आहे की, प्रश्नोत्तरासाठी एक तासाचा अवधी असताना नियम 289 कसा होतो हे सांगण्यासाठीच 34 मिनिटांचा वेळ गेलेला आहे. हा वेळ भरुन काढला पाहिजे असा विचार केला तर सभागृहाच्या एकूण कामकाजावर त्याचा परिणाम होऊ शकतो. म्हणून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन हे आयुध अति धारदार असता कामा नये आणि बोथटही होता कामा नये असे मला वाटते. नियम 289 खालील आयुधाचा अचूक वापर कसा करता येईल या अनुषंगाने जरुर विचार करीन. सन्माननीय सदस्यांनी या आयुधाचा अकारण वापर केला आहे असे माझ्या निदर्शनास येईल त्यावेळी मी तो प्रस्ताव दालनातच नाकारीन आणि एखाद्या वेळी महत्वाच्या विषयावर या आयुधाचा वापर केला गेला असेल त्यावेळी मी सभागृहात 1-2 वाक्यात आपले म्हणणे मांडण्याची संधी मी त्या सूचना मांडू इच्छिणाऱ्या सन्माननीय सदस्यांना देईन. पण आपले म्हणणे 1-2 वाक्यात मांडण्यासाठी परवानगी दिलेली असताना 14 मिनिटांचा वेळ संपल्यानंतरही सन्माननीय सदस्य खाली बसत नसतील तर तेही बरोबर होणार नाही. तेव्हा यासंबंधी काय निर्णय करता येईल ते मी ठरवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयासंबंधी बोलत नाही. राज्यामध्ये दररोज महत्वाचे प्रश्न निर्माण होत असतील आणि त्या विषयासंबंधी आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला तर या आयुधाची धार बोथट होत आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या अनुषंगाने रोज धिंडवडे काढले जात आहेत. त्याचप्रमाणे कालचा विषय देखील महत्वाचा होता. त्यामुळे अशाप्रकारचे विषय सभागृहात आले तर त्याबाबत आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आम्ही आपल्यावर दडपण आणत नाही तर आपल्याला विनंती करीत आहोत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, शिवसेना पक्षाच्या वा भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ नेत्यांनी काही तरी धोरण ठरविले पाहिजे. आपल्या पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी विविध विषयांवर नियम 289 अन्वये सूचना दिली तर ते योग्य आहे काय, कामकाजाची ही कोणती पध्दत आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पक्षाच्या प्रमुखांना सभागृहात नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्याची परवानगी आपण द्यावी अशी मी आपल्या दालनामध्ये येऊन विनंती केली होती.

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2007-08 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा (पुणे) सन 2005-2006 चा महालेखापाल महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मानकर, विनोद तावडे यांनी "नागपूर येथील इंडोरामा कामगार गृहनिर्माण संस्थेला बुट्टीबोरी औद्योगिक क्षेत्रातील कामगार वसाहतीकरिता 2 सप्टेंबर, 2005 रोजी भूखंड मंजूर होणे, सदर भूखंडाची रक्कम भरण्याकरिता संस्थेकडे पैसे नसल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्र्यांना लेखी विनंती केल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी निधीनुसार भूखंड उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देऊनही त्यावर कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील नगरपालिका व जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षण सेवकाच्या भरतीसाठी सन 2008-09 पासून सीईटी पध्दत सुरु करण्याचा शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय, प्राथमिक शिक्षकांची सुमारे 12 हजार पदे रिक्त असून ती अद्याप भरली न गेल्याने तसेच सीईटीबाबतची अधिसूचना अद्यापही प्रसिध्द न केल्याने या शिक्षकांचे होणारे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण आणि विनोद तावडे, यांनी " एमएमआरडीए या संस्थेचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे 2500 कोटी रुपयांचे असणे, या महामंडळाने सन 2005 ते 2009 या आर्थिक वर्षात सुमारे एक हजार कोटी रुपये राज्याच्या बुडीत असणा-या अन्य सार्वजनिक उपक्रमात गुंतविल्यामुळे सदर रक्कम व त्यावरील व्याज परत मिळण्याची शक्यता नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व भगवान साळुंखे, यांनी "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या राज्यातील सर्व जिल्हे मिळून हजारो पाणी योजना असणे व त्यावर हजारो कोटी खर्ची पडलेले असणे, प्राधिकरणाने स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात न घेता योजना आखणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व कपिल पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य पर्यटन स्थळ असलेल्या मुरुड-जंजिरा शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या बनून शहरात चार-पाच दिवसाआड दूषित पाणी पुरवठा होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "दिनांक 11 एप्रिल 2009 रोजी दत्तात्रय शंभूदेव कुंभार या शेतक-याने सततच्या होणा-या सावकारी जाचास व कर्जास कंटाळून केलेली आत्महत्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "पनवेल तालुक्यातील कोयना वेळे ग्रामपंचायतीमधील कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी जिल्हाधिका-यांनी आदेश देऊनही त्यावर कारवाई होत नसल्याने रामचंद्र कदम या नागरिकाने अंगावर रॉकेल ओतून घेऊन पेटवून घेण्याचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेला प्रयत्न " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "मुंबई शहर जलमय झाले असताना शासनाने यावर उपाययोजना करण्यासाठी नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या अहवालानुसार मुंबई शहरातील नद्यांचे विस्तारिकरण करण्याबाबत सुचवूनही प्रशासनाने दहिसर व पोईसर या नद्यांचे विस्तारिकरण केले नसल्याने सदर परिसर जलमय होण्याची परिस्थिती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर व परशुराम उपरकर यांनी " दहिवली खुर्द या चिपळूण तालुक्यातील गावात शासकीय स्वस्त धान्य दुकानांमधील तांदूळ निकृष्ट प्रतीचा आढळल्याने नागरिकांनी तहसीलदाराकडे तक्रार देऊनही त्यावर कारवाई न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी " मुंबईतील बीडीडी चाळीत एकूण 16 हजार 553 कुटुंबीय राहात असून त्यांच्या राहाण्याच्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले असून तेथे सफाई कामगारांची कमतरता असल्याने सदरची रिक्त पदे भरण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, संजय केळकर व मधुकर चव्हाण यांनी "मौजे हिंगणगाव, जि. पुणे येथे शाहीर अमर शेख यांचे नावाने स्मारक व्हावे म्हणून गेल्या 18 वर्षापासून भीमा-नीरा विकास संस्था प्रयत्नशील असणे, या स्मारकासाठी जमीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती....

मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सुमारे 5 वर्षापासून प्रलंबित असूनही त्यावर कारवाई न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "शासकीय जी.टी. हॉस्पिटलच्या निवासी वैद्यकीय अधिकारी व इतर आठ अधिकारी यांच्या निवासार्थ रुग्णालयाकडून कोणतीही व्यवस्था नसल्याने त्यांना रुग्णालयाच्या शवागारात निवास करावा लागत असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक दोन व तीनच्या निवेदनासंबंधी</u>

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक दोन व तीनची निवेदने आलेली नाहीत.

श्री. दिलीपराव देशमुख : लक्षवेधी सूचना क्रमांक एकचे निवेदन आलेले आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक दोन व तीनची निवेदने आलेली नाहीत.

सभापती : पहिल्या लक्षवेधी सूचनेचे निवेदन आलेले आहे. अन्य ज्या लक्षवेधी सूचनांची निवेदने आलेली नाहीत त्या लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : पहिल्या दिवसापासून कामकाज पुढे जाऊ लागले तर शेवटच्या दिवशी इतक्या लक्षवेधी सूचना येतात की त्यावर सांगोपांग चर्चा होऊ शकत नाही. तेव्हा लक्षवेधी सूचनेवर ताबडतोबीने निवेदने देणे आवश्यक आहे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय श्री. दिलीपराव देशमुख यांनी यासंदर्भात नोंद घ्यावी. त्या त्या विभागाची लक्षवेधी सूचना मी निश्चित केल्यानंतर त्या लक्षवेधीचे निवेदन तातडीने कसे येईल यासंदर्भात संबंधित विभागांना सूचना देण्याच्या अनुषंगाने संसदीय कार्य मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणावी.

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, होय.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय येथे "होय" म्हणतात आणि निघून जातात. खात्याला उत्तर देण्यास अवधी मिळावा म्हणून आम्ही 7 दिवस आधी लक्षवेधी सूचना देतो. राहिलेले कामकाज पुढे जाऊ लागले तर शेवटच्या एका दिवसात राहिलेले कामकाज आपण घेऊ शकत नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, माझी अशी नम्र विनंती आहे की, ज्या दिवशी लक्षवेधी सूचना लावली असेल व त्या दिवशी त्या लक्षवेधी सूचनेचे निवेदन आले नसेल तर संबंधित खात्याचे अवर सचिव, उप सचिव व इतर संबंधित अधिकारी यांनी वेळेवर काम न केल्यामुळे लक्षवेधी सूचनेला निवेदने आली नसावीत असे समजून त्या अधिका-यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्या सेवा पुस्तकात याची नोंद घेण्यात यावी. एखाद्या लक्षवेधी सूचनेसंबंधी निवेदन आले नाही तर विरोधी पक्षाचे सदस्य हरकत घेतात, शासनाचा निषेध करुन सभात्याग करतात. त्या विषयाच्या बाबतीत सभागृहात एकमेकात भांडणे होतात. परंतु प्रशासनातील अधिकारी मात्र नामानिराळे राहतात. तारांकित प्रश्न तसेच लक्षवेधी सूचनेसंबंधी लेखी उत्तरे देण्याची जबाबदारी प्रशासनातील अधिकाऱ्यांचीच आहे. मंत्र्यांना सुध्दा प्रशासनातील अधिकारी दाद देत नाहीत. म्हणून या बाबतीत आपण एखादा निर्णय द्यावा.

श्री. विनोद तावडे : सभागृहाच्या कामकाजाची कार्यक्रमपत्रिका एका दिवसापूर्वी ठरते. ज्या लक्षवेधी सूचनेची निवेदने प्राप्त झालेली आहेत, अशाच लक्षवेधी सूचना दिवसाच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविल्या गेल्या पाहिजेत. परंतु अशा लक्षवेधी सूचनेची निवेदने सकाळी प्राप्त होतील एवढे अपेक्षित राहणे हे बरोबर नाही. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या दोन लक्षवेधी सूचनांची निवेदने अद्याप आलेली नाहीत. त्या लक्षवेधी सूचना आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविल्या नसत्या तर पुढच्या दोन लक्षवेधी सूचना दाखवून त्यावर चर्चा होऊ शकली असती. ज्या लक्षवेधी सूचनांची निवेदने आली नसतील त्या बाजुला ठेवून पुढील क्रमांकाच्या लक्षवेधी सूचना दाखविण्यात आल्या तर त्या उपयोगी ठरु शकतील.

सभापती : ठीक आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: डोंबिवली येथील ग्रंथसंग्रहालय स्थलांतरीत करण्याचा महापालिका आयुक्त व उपायुक्त यांनी घेतलेला निर्णय

मु.शी.: डोंबिवली येथील ग्रंथसंग्रहालय स्थलांतरीत करण्याचा महापालिका आयुक्त व उपायुक्त यांनी घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,सय्यद जामा, चरणसिंग सप्रा, प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" डोंबिवली (जि.ठाणे) येथील नागरिकांशी ऋणानुबंध निर्माण केलेले डोंबिवली शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले ग्रंथसंग्रहालय प्रशासनाने महासभेला कोणतीही माहिती न देता आयुक्त व उपायुक्त यांनी ग्रंथ संग्रहालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती माहे मे, 2009 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, प्रशासनाने अचानक ग्रंथ संग्रहालय स्थलांतर करण्याचा घेतलेला निर्णय यामुळे तेथील ग्रंथप्रेमी नागरिकांची होत असलेली गैरसोय, त्यामुळे सदर नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, परिणामी ग्रंथप्रेमी नागरिकांनी ग्रंथालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा दिलेला इशारा, ही बाब विचारात घेता ग्रंथ संग्रहालयाचे होत असलेले स्थलांतर रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटालावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, डोंबिवली येथील ग्रंथसंग्रहालयांच्या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी तेथील महानगरपालिका प्रशासनाने कोणत्याही लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले नाही. शासनाकडून ग्रंथसंग्रहालयाला अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. असे असतानाही या निर्णयाच्या बाबतीत शासनाची परवानगी घेण्यात आली नाही. सदरहू लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रंथ संगहालयाची इमारत ही धोकादायक आहे. कोणतीही इमारत एका दिवसात धोकादायक होत नाही. या ठिकाणी प्रोसीजर फॉलो का करण्यात आली नाही ? यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी. सदरहू ग्रंथ संग्रहालय तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला. परंतु ग्रंथसंग्रहालयाच्या पूर्वीच्या इमारतीच्या जागेवर नवीन इमारत बांधण्यासंबंधीचे नियोजन काय आहे? सदर इमारत कधीपर्यंत बांधण्यात येणार आहे ? या नवीन इमारतीत किती मजले ग्रंथ संग्रहालयासाठी राखून ठेवण्यात येणार आहेत ? वाढत्या लोकसंख्येचा विचार केला तर डोंबिवली (पूर्व) येथे दोन ग्रंथ संग्रहालये होऊ शकतात. याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 1972 साली या ग्रंथ संग्रालयाच्या इमारतीचे बांधकाम झाले होते. ही इमारत धोकादायक आहे म्हणून दोन वर्षापूर्वी महासभेने ठराव करुन जाहीर केला होता. या इमारतीच्या जागेवर तळ मजल्यावर कमर्शियल आणि वरच्या मजल्यावर ग्रंथ संग्रहालय अशा प्रकारची इमारत बी.ओ.टी.तत्वावर बांधण्यात येईल अशा प्रकारचा ठराव देखील महासभेने केला आहे. हे ग्रंथसंग्रहालय स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतल्यानंतर वर्गणीदार आणि नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला. त्यामुळे तो निर्णय दोन दिवसापूर्वी बदलण्यात आला. बँक ऑफ महाराष्ट्राकडे कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेची जागा होती आणि ती जागा रिकामी झाली होती. आणि तेथे तात्पुरत्या स्वरुपात हे ग्रंथालय स्थलांतरीत करावयाचे आणि ग्रंथालयाच्या जागेवर नवीन इमारत बी.ओ.टी.तत्वावर बांधावयाची व त्या इमारतीचा वरचा मजला ग्रंथालयासाठी ठेवावयाचा असे ठरले आहे. त्या विभागातील सर्व आमदार आणि कल्याण-डोंबिवली महापालिकेचे आयुक्त यांची बैठक घेऊन त्यांना या ग्रंथालयासाठी जेवढी जागा लागेल, तेवढी जागा देण्याची तयारी शासनाची आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणच्या महानगरपालिकेच्या प्रशासनाने तेथील लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन महासभेमध्ये यासबंधीचा ठराव आणावयास पाहिजे होता. ज्यावेळेला हा निर्णय घेतला गेला, त्यावेळेला तेथील लोकप्रतिनिधींना ग्रंथ संग्रहालयाच्या संदर्भात काय निर्णय झाला याची काहीही माहिती नव्हती. सभापती महोदय, लोकशाही प्रक्रियेमध्ये महापालिकेची महासभा ही महत्वाची आहे. प्रशासनाने महासभेत यासंबंधीचा ठराव आणला नाही. त्याबाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे ? ग्रंथ संग्रहालयाची इमारत धोकादायक आहे. त्या धोकादायक इमारतीच्या जागेवर नवीन इमारतीची निर्मिती कधी होईल ? वाचन संस्कृती वाढीस लागावी म्हणून शासनातर्फे निरनिराळया घोषणा करण्यात येतात. त्या अनुषंगाने निरनिराळया योजना शासनाच्या माध्यमातून आखल्या जातात. डोंबिवली सारख्या ठिकाणी वाचन संस्कृतीची जपणूक व्हावी म्हणून ग्रंथसंग्रहालये असणे आवश्यक आहे. म्हणून ग्रंथ संग्रहालयाच्या पूर्वीच्या जागेवर नवीन इमारतीची पुनर्रचना किती दिवसात होईल ?

श्री. हसन मुश्रीफ : मी मघाशीच सांगितले की, त्या विभागातील सर्व आमदार आणि आयुक्त यांची एक संयुक्त बैठक घेऊन लवकरात लवकर यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

पृ. शी. : पुणे जिल्हयातील बुधवार पेठेत इमारतीच्या पाया खोदकामाच्या वेळी सापडलेले प्राचीन अवशेष

मु. शी. : पुणे जिल्हयातील बुधवार पेठेत इमारतीच्या पाया खोदकामाच्या वेळी सापडलेले प्राचीन अवशेष याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"दिनांक 24 मे, 2009 रोजी पुण्यातील सावतामाळी भवनाशेजारी 723, बुधवार पेठ येथे नव्या इमारतीच्या पाया खोदकामाचे काम सुरु असताना सुमारे 18 ते 20 फूट खोलीवर खापराचे, भांड्यांचे सापडलेले अवशेष, सदर अवशेष हे 2000 वर्षापूर्वीच्या सातवाहन काळातील असल्याचा दावा इतिहासाचे प्रसिध्द अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी केलेला आहे. या ठिकाणी प्राचीन मानवी वसाहतीचे आठ नऊ थर आहेत, प्राचीन पुण्याची वस्ती नदी काठापासून काही अंतरावर असल्याचा निष्कर्ष निघत असून याबाबत शासनाच्या पुरातत्व विभागाने सखोल संशोधन करुन आपला निष्कर्ष तात्काळ जाहीर करावा व तसे निवेदन शासनाने तातडीने करावे, ही विनंती."

सभापती महोदय, 3 वर्षापूर्वी पुण्यातील नदीच्या काठावर असेच मंदिराचे अवशेष सापडले होते. त्यावेळेला मी विधानपरिषदेमध्ये प्रश्न उपस्थित केल्यावर शासनाने उत्तर दिले होते की, पुण्यामध्ये महानगरपालिका, खास करुन राज्य शासनाचा पुरातत्व विभाग यांच्याकडून निधी उपलब्ध करुन देऊन या सगळ्या ऐतिहासिक वारसाबाबत संशोधन करण्यासाठी म्हणून मी एक समिती करु आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार या वारसांचे संवर्धन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाचा पुरातत्व विभाग घेईल. त्याबद्दल काय कारवाई केली, काय प्रगती झाली याची कोणतीही माहिती समोर आलेली नाही. म्हणून मी पुन्हा एकदा या मुद्याकडे लक्ष वेधून राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने पुण्यातील या ऐतिहासिक वारसाचे संवर्धन करण्यासाठी लक्ष घालावे अशी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांची सुरक्षितता

मु. शी. : मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांची सुरक्षितता याबाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"मुंबईवरील 26/11 च्या अतिरेकी हल्ल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातूनच शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयातून नवजात बालक चोरीला गेल्यानंतर रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था अपुरी आहे हे लक्षात येते. मुंबईतील सर्व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये दररोज हजारोंची वर्दळ असते. केईएम रुग्णालयाचा परिसर 25 ते 30 एकराचा असून 64 ओपीडी व 43 वॉर्ड आहेत. रुग्णालयाला अनेक दरवाजे आहेत. ऑपरेशन थिएटर, एलपीजी गॅस प्लांट, ऑक्सीजन गॅस प्लांट अशी संवेदनशील ठिकाणे आहेत. एवढ्या विस्तीर्ण यंत्रणेची सुरक्षा सांभाळण्यासाठी 25 वर्षापूर्वी 168 सुरक्षा रक्षकांचा स्टाफ निश्चित करण्यात आला. त्यातील 46 जागा सध्या रिक्त आहेत. त्यामुळे रुग्णालयाच्या सुरक्षेला अपुरी कर्मचारी संख्या आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे ही विनंती.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर जिल्हयातील आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या

मु. शी. : नागपूर जिल्हयातील आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"नागपूर जिल्हयातील आदिवासी विकास विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक महिन्यापासून सामूहिक व वैयक्तिक समस्या प्रलंबित आहेत. त्यामध्ये माहे डिसेंबर, 2008 चे वेतन, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातील अनियमितता तसेच वैद्यकीय देयकाबाबत, शिक्षकांच्या सेवापुस्तिका दुय्यम प्रत व भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या, अधीक्षकांचे पद मान्य व कार्यरत असताना सहाय्यक शिक्षकांना/शिक्षण सेवकांना रात्रपाळीत काम करण्याबाबत संस्थेकडून वारंवार होणारी सक्ती, ग्रामीण भागातील आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रवासभत्ता/वाहतूक भत्ता मासिक रु.75/- न मिळणे, श्री.लिलाधर डी.रेवतकर, स्व.श्री गंगाधरराव कोरडे आदिवासी आश्रमशाळा, पिठोरी, ता.नरखेड, जि.नागपूर यांचे वैद्यकीय देयक रु.39,000/- न मिळणे, 6 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जुलै, 2007 या एक महिन्याच्या वेतनाची मुख्याध्यापकांनी केलेली कपात, विद्याभारती आदिवासी आश्रमशाळा, सावडी, ता.सावनेर या शाळेतील तीन शिक्षकांचे दुय्यम सेवापुस्तक व जीपीएफ पावत्या न मिळणे, या समस्यांबाबत एक लोकप्रतिनिधी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करावी असे एक निवेदन नागपूर जिल्हा कार्यवाही यांनी दिनांक 9.1.2009 च्या पत्रान्वये मा.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर जिल्हा यांना दिलेले असणे, अद्यापही बैठक आयोजित न केल्यामुळे, या गंभीर समस्यांना न्याय द्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

...व्ही.1...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील लोकल मार्गावर रेल्वे पोलिसांची संख्या वाढविणे

मु.शी.: मुंबईतील लोकल मार्गावर रेल्वे पोलिसांची संख्या वाढविणे याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

कल्याण (जि.ठाणे) लोहमार्ग पोलीस क्षेत्राच्या अंतर्गत कल्याण ते कसारा पर्यंतची हद्द असून त्यात शहापूर/वासिंद/आसनगांव/आटगांव/खर्डी/कसारा या स्थानकांचा समावेश आहे. या स्थानकांच्या हद्दीत सातत्याने दर वर्षी शेकडो प्रवाशांचा ट्रेनमधून पडून, रेल्वे लाईन क्रॉस करताना, रेल्वे लाईन शेजारील खांबावर आदळून बळी गेलेला आहे. कसारा हे लोकल सेवेचे अंतिम स्थानक असल्याने या परिसरात चाकरमानी, लहानमोठे व्यावसायिक, नाकरी धंद्यानिमित मुंबईस ये-जा करतात व रेल्वे स्थानकापासून बहुतेक पाडे, वाड्या लांब असल्याने जाण्या-येण्यासाठी प्रवासी रेल्वे रुळाचाच वापर करतात, त्यामुळे अपघात घडल्यास मृत पावलेल्या प्रेताची विल्हेवाट लावणे. या बाबी रेल्वे पोलिसांची अपुरी संख्या लक्षात घेता एक मोठे दिव्यच असते. दैनंदिन प्रवाशांसाठी रेल्वे लाईनलगत रस्ते तयार करणे व गस्तीसाठी पोलीस संख्या वाढविणे गरजेचे आहे. यासाठी ग्रामस्थ सातत्याने मागणी करीत आहेत. परंतु शासनाच्या उदारीन धोरणामुळे त्या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने जनतेत निर्माण झालेला असंतोष शासनाच्या लक्षात यावा म्हणून सदर विशेष उल्लेखाद्वारे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: खालापूर (जि.रायगड) बाजारपेठेकडे जाणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीबाबत

मु.शी.: खालापूर (जि.रायगड) बाजारपेठेकडे जाणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

"मौजे खालापूर (जि.रायगड) हे गाव तालुक्याचे मुख्य ठिकाण असून खालापूर गावाचे दोन भाग पडतात. एक खालापूर बाजार पेठ व दुसरा अप्पर खालापूर, सदर दोन भागामधून नाला असून त्या नालयावर ब्रिटीशांचे काळातील बांधलेला एक छोटा पूल आहे. पूर्वी खालापूर हा एक पेठा होता आज खालापूर तालुका असून सर्व शासकीय कार्यालय, बँका, शाळा, विद्यालये येथे आहेत. तरी खालापूर बाजार पेठेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर असलेला छोटा पूल मोडकळीस आला आहे. पूलाला खालून तडे गेले आहेत तो केव्हा पडेल याचा नेम नाही, कारण बाजार पेटेकडे हेवी लोडच्या गाडया जात आहेत. पूल पडला तर खालापूर बाजार पेठेकडे व वणवे निबोंडे, शिरवलीवाडी, नडोदे, लोप, रसायनीकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद होईल, शाळेत मुलांना जाता येणार नाही. त्यामुळे वाहतुकीची अतिशय गैरसोय होणार आहे.

तरी शासनाने या गंभीर प्रश्नी लक्ष देऊन या ठिकाणी पुलाचे काम सुरु करावे व आवश्यक ती तरतूद करावी यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या कु.कृष्णा पाटील या मुलीचा गौरव करुन तिला मदत करण्याबाबत

मु.शी.: एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या कु.कृष्णा पाटील या मुलीचा गौरव करुन तिला मदत करण्याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: निधीअभावी राज्यातील सिंचन प्रकल्प अपूर्ण राहणे

मु.शी.: निधीअभावी राज्यातील सिंचन प्रकल्प अपूर्ण राहणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

"राज्यात निधीअभावी एक हजाराच्या वर सिंचन प्रकल्प रखडणे, त्यापैकी 32 मोठे आणि 146 मध्यम स्वरुपाचे प्रकल्प असणे, सदर प्रकल्पांची कामे रखडल्यामुळे सरकारपुढे अनेक अडचणी निर्माण होणे, तसेच प्रकल्पांच्या प्रकल्पांच्या प्रस्तावित किमतीत दीडपट वाढ झाल्यामुळे त्याची झळ सरकारलाच सोसावी लागणे, या प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिगृहित करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांचा रोष सरकारवरच वाढत जाणे, त्यामुळे सिंचन क्षमता वाढविणे, पेयजलाची मागणी पूर्ण करणे, औद्योगिक वसाहतींना लागणाऱ्या पाण्याची मागणी पूर्ण करणे, यासाठी सदर प्रकल्प पूर्णत्वाकडे नेणे आवश्यक असणे, परंतु निधीअभावी गेल्या दहा वर्षांपासून रखडलेल्या एक हजार सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी वीस बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे सरसावणे, दरम्यान या प्रकल्पात गुंतवणूक करण्यासाठी पन्नास टक्के जलसाठयांवर सदर कंपन्यांनी हक्क बजावणे, यावर राज्य शासनाच्या विशेष प्रकल्प विभागाने पुन्हा चर्चा करुन पन्नास टक्के जलसाठा संबंधित कंपन्यांकडे सोपविण्याची तयारी दर्शविणे, तसेच प्रकल्पात तयार होणाऱ्या वीज खरेदीचा करार काही जलसाठे स्थानिक स्वराज्य संस्थांना विकण्याचे अधिकार या कंपन्यांनी दिलेल्या प्रस्तावात मांडण्यात येणे, परंतु सदर कंपन्यांनी पन्नास टक्के जलसाठयांवर हक्क बजावल्यामुळे राज्यातील सर्वसामान्य जनतेला भासणारी पाणीटंचाई, त्यामुळे पाण्यासाठी सामान्य लोकांची होणारी भटकंती लक्षात घेता, राज्य सरकारने सदर कंपन्यांना पन्नस टक्के जलसाठयांवर हक्क न बजावता अपेक्षित निधीची पूर्तता करण्याची आवश्यकता लक्षात घेता, शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखा" द्वारे उपस्थित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत

मु.शी.: सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :--

बीड शहरातून जवळपास 4 किलोमीटर अंतराच्या सोलापूर-धुळे या राष्ट्रीय रस्त्यावर दिवसेंदिवस रहदारी वाढणे, दिवसाकाठी या रस्त्यावरुन 10 ते 12 हजार वाहनांची ये-जा होणे, सद्य:स्थितीत केवळ एकाच ठिकाणी रस्ता दुभाजक असून अन्य ठिकाणी दुभाजक नसणे, त्यामुळे आठवडयातून एक-दोन अपघात होऊन त्यात नाहक पादचाऱ्यांचा मृत्यू होणे, एकप्रकारे सदर रस्ता हा मृत्यूचा सापळा बनणे, केंद्र शासनाने रस्त्याच्या रुंदीकरणासाठी 2 कोटी 60 लाख रुपयांच्या खर्चास मंजूरी दिली असून दि. 12 फेब्रुवारी, 2009 रोजी राजकमील कन्स्ट्रक्शनला कामाची परवानगी देऊन केवळ पावसाळयात काम झाल्यास मजबूत होते हे कारण देऊन रस्त्याचे रुंदीकरणाचे काम लांबणीवर पडणे, याबाबत सदर प्रकरणी कोणतीच कार्यवाही न केल्याने रस्त्यावर वाढत चाललेली अपघाताची संख्या, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना.

.....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.:राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला)

सभापती : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव श्री. जयप्रकाश छाजेड यांनी मांडला असून, श्री. भास्कर जाधव यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता आज मंगळवार, दिनांक 2 जून व बुधवार, दिनांक 3 जून, 2009 रोजी मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचा एक तास धरुन अंदाजे सुमारे 6 तास एकूण चर्चेकरिता उपलब्ध आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उत्तरादाखल भाषणाचा एक तास सोडून उर्वरित पाच तासांचा वेळ सदस्यांना भाषणांकरिता उपलब्ध राहील. प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणासाठी 20 ते 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदामार्फत माझ्याकडे 10 मिनिटात पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी माननीय सदस्यांना मिळाली आहे असे मी समजतो. सुधारणा मांडावयाच्या नाहीत असे मी समजतो.

आता प्रस्ताव मांडणारे सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड हे भाषण करतील. तद्नंतर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सदस्य श्री. भास्कर जाधव भाषण करतील.

सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा या ठिकाणी मी मांडलेला आहे व त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण ऐकल्यानंतर राज्यामध्ये घडलेल्या अनेक घटनांचा परामर्श त्यांनी आपल्या भाषणात केला होता. या घटनांमध्ये 26.11 रोजीची घडलेली घटना, गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी पोलिसांची केलेली हत्त्या, विदर्भातील दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यात निर्माण झालेले प्रश्न, जागतिक मंदीमुळे निर्माण झालेली परिस्थिती या सर्व प्रश्नांच्या संदर्भात शासनाने घेतलेले निर्णय आणि आखलेल्या योजना आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताचे प्रतिबिंब माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहेत असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, 26/11 चे केंद्र मुंबई जरी असले तरी हा संपूर्ण लोकशाहीवर झालेला हल्ला होता. 10 आतंकवाद्यांनी मुंबईत 72 तास हल्ला चालविला होता. मुंबईवर झालेल्या आतंकवाद्यांच्या हल्ल्याला राज्याचे झुंजार पोलीस अधिकारी, कमांडोज, बृहन्मुंबई पोलीस दल, बृहन्मुंबई फायरब्रिगेड तसेच राज्य शासनाच्या संघटना यांनी एकत्र येऊन मूकाबला केला होता. या हल्ल्याच्या संदर्भात शासनाने अतिशय चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे. पोलीस आणि इतर संघटनांबरोबर राज्यशासनाने अतिशय चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळली होती. या हल्ल्यामध्ये एकंदर 142 लोक मारले गेले तसेच या हल्ल्यामध्ये कर्तबगार पोलीस अधिकारी म्हणजे श्री. हेमंत करकरे, श्री. कामटे, श्री.साळसकर तसेच कमांडर श्री. उन्नीकृष्णन् तसेच इतरही शूर अधिकारी अतिरेक्यांचा मुकाबला करतांना झाले होते. तुकाराम ओंबाळे यांनी आपल्या पोटात एके 47 मशिनगनच्या गोळया खाऊन कसाब नावाच्या एका आतंकवाद्याला जिवंत पकडले होते. या हल्ल्यामध्ये ज्यांचे प्राण गेले त्यांना केंद्रशासनाने आणि राज्यशासनाने मोठया प्रमाणात मदत केलेली आहे. या हल्ल्याचा मुकाबला करतांना जे अधिकारी व पोलीस कर्मचारी शहीद झाले त्यांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपयांची मदत व एक सदनिका देण्यात आली आहे तसेच या हल्ल्यात ज्या व्यक्ती मृत पावल्या त्यांना 5 लक्ष रुपयांची मदत करण्यात आली व जखमींना 50 हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे. त्यामुळे या घटनेच्या संदर्भात शासनाने संवेदनशीलता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ....

दाखवलेली आहे असे आपल्याला म्हणता येईल. या हल्ल्याचे गांभीर्य लक्षात घेऊन देशात आणि राज्यात असे हल्ले पुन्हा होऊ नयेत व असे हल्ले झालेच तर त्याचा मुकाबला कशा प्रकारे करावा यासाठी शासनाने गंभीरपणे पावले उचलली आहेत त्यामुळे या शासनाचे आपण सर्वांनी निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, नॅशनल सिक्युरिटी गार्डच्या धर्तीवर स्टेट सिक्युरिटी गार्डची स्थापना करण्याचा तसेच राज्य सुरक्षा परिषदेची स्थापना करुन सल्लागार मंडळ निर्माण करण्याचा देखील राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यामध्ये दहशतवादी हल्ला झाल्यास त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी अशा प्रकारच्या सिक्युरिटी गार्डची आणि राज्य सुरक्षा परिषदेची स्थापना करुन त्या सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे त्यामुळे हे शासन अभिनंदनास पात्र आहे.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयात या अगोदर नक्षलवाद्यांनी पोलिसांवर हल्ला केला होता. त्याचप्रमाणे गेल्या महिन्यात सुध्दा त्यांनी दुसरा हल्ला केला होता त्यामध्ये अनेक निरपराध नागरिक आणि पोलीस मारले गेले होते. नक्षलवाद्यांनी पोलिसांवर हल्ला केला होता त्यावेळी पोलिसांनी त्यांच्याशी ज्या पध्दतीने संघर्ष केला त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्याकरिता शासनाने एक धडक कार्यक्रम तयार करण्याचासुध्दा निर्णय घेतला आहे आणि जवळजवळ 1378 कोटी रुपये येत्या तीन वर्षात त्यासाठी खर्च करण्याची योजना आखली आहे. अशा प्रकारे नक्षलवादी चळवळ नेस्तनाबूत करण्याचा शासनाचा प्रयत्न असून आदिवासी आणि सीमावर्ती भागात नक्षलवाद्यांकडून पुन्हा हल्ले होऊ नयेत यासाठी गांभीर्याने लक्ष देऊन नक्षलवादी चळवळ नियंत्रणात आणण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक विषयांना स्पर्श करण्यात आला आहे. विदर्भातील अनेक जिल्हयात दुष्काळ पडला आहे . दुष्काळी भागातील शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने अनेक निर्णय घेतलेले आहेत जून - जुलै 2008 मध्ये कमी पाऊस पडल्यामुळे अनेक भागातील शेतक-यांच्या पिकावर परिणाम झाला होता व हे शतकरी हवालदिल झाले होते त्यामुळे 13 हजार 186 गावे टंचाईग्रस्त जाहीर करुन त्यांच्यासाठी विविध कार्यक्रम आखले आहेत.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, विदर्भातील सहा आपदग्रस्त जिल्हयाकडे शासनाने विशेष लक्ष दिले आहे.2008-2009 सालाकरिता 70 हजार 500 हेक्टर्स सिचन क्षमता निर्माण करण्यासाठी 536 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केली असून आपदग्रस्त जिल्हयामध्ये विदर्भ पॅकेज अंतर्गत विविध उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. माननीय पंतप्रधान पॅकेज अंतर्गत 3578 कोटी रुपये देण्यात आले आहेत आणि राज्य शासनाने सुध्दा स्वत:चे पॅकेज जाहीर करुन 1230 कोटी रुपयांचा धडक कार्यक्रम आखला आहे इतकेच नव्हे तर आपदग्रस्त जिल्हयासाठी विहिरी खोदण्याचा धडक कार्यक्रम आखला आहे त्यानुसार एका एका तालुक्यात 1300 विहिरी खोदण्याचा महात्वाकांक्षी कार्यक्रम हातात घेतला आहे त्याच प्रमाणे 120 कोटी रुपये खर्च करुन विदर्भातील सहा हजार चेक डॅम्स दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम देखील शासनाने हाती घेतला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील 16 जिल्हे आणि उत्तर महाराष्ट्रातील 5 जिल्हयामध्ये शेततळी बांध्ण्याचा कार्यक्रम घेण्यात आला असून या शेत तळयाच्या माध्यमातून विहिरींच्या पुनर्भरणाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम घेण्यात आला आहे. त्यामध्ये साडे तीन लाखापेक्षा जास्त विहिरींचा समावेश आहे. शेतक-यांसाठी कायम स्वरुपाची एखादी उपाययोजना असावी यासाठी शासनाने अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत आणि शासनाने केलेले प्रयत्न महत्वाचे असल्यामुळे त्याची नोंद घेतली पाहिजे असे मला या निमित्ताने येथे सांगावयाचे आहे..

सभापती महोदय, शेतक-यांना वेळेवर खतपुरवठा व्हावा यासाठी या वर्षी खताचा मोठया प्रमाणावर साठा केला आहे. केन्द्र सरकारने शेतक-यांसाठी पॅकेज जाहीर केले होते परंतु ज्या शेतक-यांना या पॅकेजला लाभ होऊ शकला नाही अशा शेतक-यांसाठी राज्य सरकारने स्वत:चे पॅकेज तयार केले आणि राज्यातील 40 लाख शेतक-यांना फायदा मिळावा म्हणून 6 हजार 208 कोटी रुपयांचे पॅकेज दिले ही गोष्ट या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय,विदर्भातील शेतक-यांच्याा आत्महत्तेच्या संदर्भात सभागृहात अनेकदा चर्चा उपस्थित केली जाते त्यावेळी कर्जबाजारी झाल्यामुळे शेंतकरी आत्महत्या करतो अशा प्रकारचे चित्र निर्माण करण्यात येते. सहकारी बॅन्केच्या मार्फत हे शेतकरी कर्ज घेत नाही तर खाजगी सावकाराकडून ते कर्ज घेत असतात त्यावेळी त्यांची ज्या पध्दतीने पिळवणूक केली जाते त्यामुळे

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकरी आत्महत्या करतात म्हणून बेकायदेशीर सावकाराकडून शेंतक-यांची होणारी पिळवणूंक थांबविण्यासाठी सावकारी नियंत्रण कायद्यात बदल करण्याचा निर्णय शासानाने घेतला आहे.

सभापती महोदय कापसाला जास्त भाव मिळाला पाहिजे अशा प्रकारची मागणी सर्वानीच केली होती. कापूस पिकविणा-या शेतक-यांना कापसासाठी 2850 रुपये ते 3000 रुपये प्रती क्विंटल भाव देऊन 1540 लाख कापूस उत्पादक शेतक-यांना शासनाने मदत दिली आहे त्याचा फायदा विदर्भातील कापूस उत्पादक शेतक-याना झाला आहे ही बाब आपल्याला विसरता येणार नाही. शेतक-यासाठी केवळ पॅकेज देऊन चालणार नाही तर त्यांच्याकरिता कायम स्वरुपाच्या उपाययोजना करण्याची गरज आहे म्हणून औरंगाबाद आणि हिंगोली जिल्हयात केन्द्र आणि राज्य सरकारच्या मदतीने आधुनिक कृषी बाजार निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे

सभापती महोदय, अनुसूचित जाती आणि नवबौध्द शेतकरी हे समाजातील शेवटचे घटक अ ाहेत त्यांच्या उन्नतीसाठी सरकार प्रयत्न करीत आहे. या शेतक-यांच्या शेतामध्ये पॉवर टिलर्स बसविणे त्यांना परवडत नाही म्हणून सरकारने 100 टक्के अर्थसहाय्य दिले व त्यासाठी 10 कोटी रुपयाची तरतूद केली होती. अशा प्रकारे त्यांच्या शेतात पॉवर टिलर्स बसविण्यात आल्यामुळे या शेतक-यांच्या शेतातील उत्पन्न वाढणार आहे . या शेतक-यांना प्रोत्साहन देण्याचे शासनाने ठरविले आहे. शेतातील सिंचनाची गरज लक्षात घेऊन शासनाने 6 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद केली आहे . संपूर्ण देशातील महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की, ज्या राज्याने एका वर्षात सिंचनाकरता 6 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. छाजेड ...

विदर्भातील जीगाव व लघु पेनगंगा प्रकल्पाला केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून मान्यता मिळाली असल्याने त्यातून लवकरच 2.62 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. हे सगळे करीत असताना ग्रामीण भागामध्ये गावांजवळील वाड्या-वस्त्या असतील त्यांना शुद्ध पाणी मिळत नाही म्हणून तेथील लोक आजारी पडतात हे लक्षात घेऊन अशा वाड्या-वस्त्यांना शुद्ध पाणी मिळावे म्हणून शासनाने गांभीर्याने उपाय योजना सुरू केली आहे. त्यासाठी भारत निर्माण कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. यातून 32,773 वाड्या-वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या शासनाने यशस्वीरित्या सोडवून तेथील सामान्य माणसाला शुद्ध पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था केलेली आहे. राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्यामध्ये सुरू केलेल्या सुजल आणि निर्मल अभियानाद्वारा तसेच संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत केलेल्या कामामुळे नागरी व ग्रामीण भागातील जनतेला स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली आहे आणि स्वच्छता अभियान राबविल्यामुळे भारत सरकारचा निर्मल ग्राम पुरस्कार देखील या राज्याने मिळला असून हे राज्य यात नेहमी अग्रेसर राहिले आहे. त्यामुळेच या वर्षी भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते राज्यातील 6,668 ग्रामपंचायतींना आणि 7 पंचायत समित्यांना निर्मल ग्राम पुरस्कार मिळाले आहेत.

सभापती महोदय, पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये देखील अनेक योजना राज्य सरकारने हाती घेतल्या आहेत. गरीब जनतेला दूध मिळावे आणि शेतकरी-शेतमजूर यांना पूरक व्यवसाय मिळावा म्हणून दूध उत्पादनात वाढ करण्याची योजना सरकारने हाती घेतली आहे. त्यातून मुलभूत सोयींमध्ये वाढ करण्यासाठी सरकारने 33 कोटी रूपयांच्या 16 प्रकल्पांना राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्याच बरोबर कोकणातील मच्छिमारांना देखील कोकण विकास विशेष पॅकेज देऊन त्यांचेसाठी 31.56 कोटी रूपये राज्य सरकारने वितरित केले असून त्या योजनेतू 63,250 मच्छिमारांना लाभ दिला आहे. तसेच मच्छिमारांसाठी अपघात विमा योजना देखील हे सरकार केंद्र सरकारच्या सहाय्याने राबवित असून त्या योजनेतून 3 लाखापेक्षा जास्त मच्छिमारांना लाभ होणार आहे. सभापती महोदय, राज्याच्या एकूण लोकसंख्येत 50 टक्के लोकसंख्या महिलांची आहे. हे लक्षात घेऊन महिला सक्षमीकरणाकडे हे सरकार लक्ष देत आहे. त्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे की, विशेषत: ग्रामीण भागामध्ये आणि शहरी भागामध्ये ज्या गरीब आणि दुर्बल घटकांमधील महिला आहेत त्यांचे बचत गट तयार करून त्यांना सूक्ष्मपद्धतीचे कर्ज अत्यंत कमी दराने, 4 टक्के दराने

.... वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छाजेड .....

उपलब्ध करून हे सरकार करून देणार आहे. त्यामुळे या बचत गटाद्वारा महिलांचा चांगला फायदा होणार आहे. त्याचे दृश्य स्वरूप असे दिसून येत आहे की, ग्रामीण भागातील बहुसंख्य महिला या बचतगटातून काम करणाऱ्या असल्याने त्या आपापल्या घरांमध्ये स्वयंपूर्ण झालेल्या आहेत. या महिलांच्या बचतगटांना चार टक्के दराने केवळ कर्जपुरवठा करूनच हे सरकार थांबले नाही तर या महिलांच्या बचत गटाकडून उत्पादित होणाऱ्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा देखील सरकारने निर्णय घेतला असून त्यानुसार जिल्हा आणि विभाग स्तरावर विक्री-प्रदर्शन यासाठी विभाग स्तरावर 25 लाख रूपये आणि जिल्हा स्तरावर 10 रूपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. यासाठी या वर्षामध्ये शासनाने एकंदर 30 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. इतकेच नाही तर अंगणवाड्यांमधून तेथील बालकांसाठी पूरक पोषण आहाराची योजना राबविली जात असताना त्यासाठी पोषण आहार बनविण्याचे काम महिलांच्या बचत गटांना दिल्यामुळे त्या त्या भागातील बचत गटांतील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ लागल्या आहेत हे चित्र आपण सर्वत्र पहावयास मिळते.

सभापती महोदय, जागतिक मंदीची परिस्थिती जगामध्ये तसेच आपल्या देशामध्ये आणि राज्यामध्ये देखील आली आहे. त्यावर गेल्या वर्षी या सदनामध्ये चांगल्या प्रकारे चर्चाही झाली आहे. तसे पाहिले तर देशामध्ये आपले राज्य हे एक प्रमुख औद्योगिक राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात त्यादृष्टीने असलेल्या पायाभूत सुविधामुळे एक वेगळे वातावरण या राज्यात निर्माण झालेले आहे. त्यामुळेच चालू वर्षात विशाल प्रकल्पांचे धोरण घोषित झाल्यापासून 135 विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांमध्ये दीड कोटीवर गुंतवणूक अपेक्षित असून त्यातून 3.31 लाख नोकऱ्या नव्याने निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तसेच राज्यात 141 विशेष आर्थिक क्षेत्रांना म्हणजेच एसइझेडना मान्यता मिळाली असून त्यामध्ये जवळपास 2 कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून त्यातून 65 लाख बेरोजगारांना रोजगार मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. इतके मोठे विश्वासार्ह असे काम या राज्यात झालेले आहे. सभापती महोदय, बालकामगार प्रथेचे निर्मूलन करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून त्यांच्या पुनर्वसनासाठी देखील विशेष कृती योजना राज्य सरकारने आखली आहे. त्यानुसार राज्यात 200 पेक्षा जास्त विशेष शाळा चालविण्यात येत असून त्यात सध्या 8 हजार पेक्षा अधिक बालकामगार शिकत आहेत.

..... वाय 3 ...

KBS/ SBT/ MMP/ श्री. गायकवाड नंतर --- 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छाजेड .....

सभापती महोदय, आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये ज्यांच्याशी नेहमीच आपला संबंध येतो त्या घरेलू कामगारांचा देखील विचार या शासनाने केलेला आहे. ज्या महिला घरेलू काम करतात ....

(यानंतर श्री. सरफरे .... झेड 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड...

ज्यांना कोणत्याही प्रकारची सुरक्षितता नव्हती त्यांना सुरक्षा मिळावी. त्यांना नोकरीमध्ये सुरक्षा मिळावी, विम्यामध्ये सुरक्षा मिळावी, पेन्शन आणि रजेच्या सवलतीची सुरक्षा मिळावी यासाठी महाराष्ट्र घरेलु कामगार मंडळाची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्याचप्रमाणे माता व नवजात शिशु यांच्यातील रोगाचे प्रमाण व बालमृत्यू दर कमी होण्यासाठी मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये गरीब रुग्णांवर आधुनिक पध्दतीने औषधोपचार व्हावेत यासाठी टेलिमेडिसीन प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असून 33 जिल्हयांमध्ये अशाप्रकारची टेलिमेडिसीन केंद्रे उभारण्यात आली आहेत. अशाप्रकारे राज्याच्या कोणत्याही ग्रामीण भागामध्ये टेलिमेडिसीन असेल त्याठिकाणी नागरिकांना जगातील कोणत्याही उपचार पध्दतीचा लाभ घेता येईल. त्याचप्रमाणे या शासनाने अल्पसंख्यांकाच्या प्रश्नामध्ये लक्ष केंद्रीत केले असून जवळपास 1553 शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी 167.62 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निमाण अभियानांतर्गत देशात सर्वात प्रथम आपल्या राज्यामध्ये शासनाने योजना सुरु केली आहे. या योजनेन्वये शासनाने सर्वात जास्त म्हणजे 1814 कोटींचा निधी केंद्र सरकारकडून मिळविला आहे. अशाप्रकारे राज्य सरकारने जबाबदारीने केलेल्या कामाचा हा परिपाक आहे. त्याचप्रमाणे लहान व मध्यम शहरांसाठी नागरी पायाभूत सुविधांचा विकास योजनेंतर्गत 46 प्रकल्पांसाठी 552 कोटी रुपयांचे अनुदान मिळविले आहे. त्याचप्रमाणे नागरी क्षेत्रातील गरीब लोकांना मूलभूत सुविधा आणि एकात्मिकृत गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेंतर्गत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, नांदेड, ठाणे, पिंपरी-चिंचवड आणि कल्याण या नागरी क्षेत्रामध्ये 1 लाख 90 हजार घरांना मंजूरी मिळाली आहे. अशा प्रकारे या लाभार्थींना सर्व सोयी सुविधांसह स्वत:च्या मालकीचे घर मिळण्याचे स्वप्न साकार होणार आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टी पुनर्विकासाच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन शासनाने झोपडपट्टीविरहित शहरे उभारण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. हा कार्यक्रम महत्वाकांक्षी असल्यामुळे त्याला वेळ लागणार आहे. तरीसुध्दा शासनाने हा कार्यक्रम हाती घेतला आहे हे आपल्याला विसरता येणार नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागाच्या विकासामध्ये शासनाने ग्रामपंचायतीमार्फत शाळा, अंगणवाडया, स्मशानगृहे यांचा विकास करण्यासाठी 1193 कोटी रुपयें वितरीत केले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. जयप्रकाश छाजेड...

आहेत.त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रांमध्ये इंदिरा आवास योजना आणि राजीव गांधी निवारा योजना 1 व 2 अंतर्गत राज्यात 5 लाखाहून अधिक घरे बांधण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत जो पारधी समाज भटका समजला जातो त्या समाजातील लोकांकडे स्वत:चे घर नव्हते. त्या समाजाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी आणि त्या समाजाला एकाच ठिकाणी वसविण्यासाठी घरे पुरविण्याचा 9 कोटींचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. सभापती महोदय, मुंबई शहराला जागतिक दर्जा प्राप्त व्हावा यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मदतीने जे काम केले आहे त्याचे दृश्य परिणाम पहावयास मिळत आहेत. मुबई शहरातील लोकांचा निवाऱ्याचा प्रश्न असेल तो सोडविण्यासाठी शासनाने 225 चौरस फूटाऐवजी 300 चौरस फूट फरसबंद क्षेत्र असलेली घरे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे वीज निर्मितीच्या बाबतीत सुध्दा सरकारने फार मोठया प्रमाणावर उपक्रम हाती घेतला आहे. त्यामध्ये सद्या राज्यामध्ये असलेली वीजेची टंचाई लक्षात घेऊन नवीन वीजनिर्मिती संयंत्रव्दारे वीज निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

सभापती महोदय, शासनाने रस्त्यांच्या बांधणीकरिता अनेक योजना हाती घेतल्या आहेत. त्यामध्ये पुणे व नाशिक - मुंबई हे रस्ते चौपदरी करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्याचप्रमाणे राज्य सरकारने नवीन रेल्वे मार्ग बांधण्याकरिता 50 टक्के खर्च सोसून 1302 कोटी रुपये उपलब्ध करुन अनेक ठिकाणी नवीन रेल्वे मार्ग सुरु केले आहेत. त्याचप्रमाणे चाकण, सोलापूर व शिर्डी येथे नवीन विमानतळ विकसित करण्याचा आणि अमरावती व जळगाव येथील विमानतळांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. सभापती महोदय, मला याठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले योगदान दिले आहे, त्यांच्या प्रती आपले ऋण व्यक्त करण्यासाठी शासनाने त्यांच्या मानधनामध्ये 2 हजार रुपयांनी वाढ केली आहे. समाजाचा त्यांच्याकडे कृतज्ञतेने बघण्याचा दृष्टीकोन असल्यामुळे शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे शासनाने 65 वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना व विकलांग व्यक्तींना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करण्यासाठी भाडयामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे त्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. जयप्रकाश छाजेड...

सभापती महोदय, शासनाने राज्यातील 21 लाख शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करुन त्यांचे आर्थिक वेतनमान सुधारले आहे. या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये प्रत्येक मराठी माणसाच्या मनामध्ये 105 हुतात्म्यांचे बलिदान कायम स्मरणात राहिले आहे. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करीत असतांना राज्याचा काही भाग कर्नाटकामध्ये राहून गेला. तेव्हापासून हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न प्रलंबित आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष दिवाणी दावा दाखल करण्यात आला असून त्याकरिता शासनाची बाजू मांडण्यासाठी नामांकित वकिलाची नेमणूक करुन राज्यातील नागरिकांना दिलासा देण्याचे काम हे शासन करीत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड . . . .

याबद्दल देखील माननीय राज्यपालांचे आणि शासनाचे आभार मानले पाहिजेत, अभिनंदन केले पाहिजे. राज्यातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याचे राज्य शासनाचे जे धोरण आहे, ते धोरणच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून प्रतिबिंबीत झालेले आहे. मला असे वाटते की, केवळ एवढेच नव्हेतर माननीय राज्यपालांनी भाषण केले, तेव्हा राज्यामध्ये आचारसंहिता लागू असल्यामुळे त्यासंदर्भात चर्चा घडवून आणली नाही, या बाबी लोकांपर्यंत जाऊ नयेत यासाठी प्रयत्न करण्यात आले. परंतु लोकशाही प्रक्रियेमुळे म्हणजे निवडणुकांच्या माध्यमातून या राज्यातील जनतेने ज्यापध्दतीने मतदान केलेले आहे, त्यावरुन हे स्पष्ट झालेले आहे की, या सरकारने जे काम केलेले आहे, त्यावर जनतेने विश्वास ठेवला आहे. तसेच सरकारने जनतेच्या पुढच्या भविष्यकाळासाठी जे निर्णय घेतलेले आहेत, त्याबद्दल शासनावर विश्वास ठेवलेला आहे. म्हणून मी याठिकाणी माननीय राज्यपालांच्या आभार मानण्यासाठी, त्यांचे अभिनंदन करण्यासाठी ठराव मांडत आहे आणि सभागृहाने देखील हा ठराव एकमताने मंजूर करावा अशी मी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याकरता जो आभार प्रदर्शनाचा ठराव मांडलेला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय,माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासन जे काही काम करते, त्याचे या अभिभाषणामध्ये एक प्रकारचे प्रतिबिंब उमटत असते. हा प्रत्यक्षपणे शासनाच्या कामगिरीचा आरसा असतो असे म्हटले जाते. शासनाने केलेल्या कामाची संपूर्ण माहिती माननीय राज्यपालांच्या भाषणातून संपूर्ण महाराष्ट्र राज्याला दिली जाते आणि महाराष्ट्राच्या हिताच्यादृष्टीने, सर्वसामान्य जनतेच्यादृष्टीने सरकार कोणकोणते संकल्प करीत आहे, कोणकोणत्या उपाययोजना आखणार आहे याची माहिती या अभिभाषणामध्ये असते. आपण जर संपूर्ण भाषण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, या राज्यातील शेतकरी असतील, कामगार असतील, शासकीय कर्मचारी असतील, व्यवसायिक असतील, अल्प उत्पन्न बचत गटातील लोक असतील, महिला असतील किंवा उद्योगपती असतील इ.सर्वांचा विचार करुन शासनाने जे विविध निर्णय घेतलेले आहेत, त्यामुळे या महाराष्ट्राची दिवसेंदिवस होणारी जी प्रगती आहे, महाराष्ट्राची प्रत्येक क्षेत्रात होणारी जी वाढ आहे, त्या सगळयाचे चित्र, त्या सगळया गोष्टींचा आरसा कोणता असेल तर त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण होय.

सभापती महोदय, आपण एक गोष्ट पाहिली असेल की, महाराष्ट्रामध्ये सातत्याने गेल्या 8-10 वर्षापासून कापसाच्या पिकाला विशेष करुन विदर्भातील या पिकाला भाव वाढवून द्यावा यासाठी सातत्याने मागणी होत होती. त्यासाठी आमचे विरोधी सहकारी सातत्याने मोर्चे काढत होते,आंदोलने करीत होते. त्यांची मागणी अशी होती की, कापसाच्या पिकाला 2700 रुपये क्विं. असा भाव देण्यात यावा. परंतु आपण गेल्या वर्षी पाहिले असेल की, महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापसाचा भाव वाढवून द्यावा यासाठी आंदोलने करण्याची, मोर्चे काढण्याची किंवा सरकारवर टीका करण्याची संधी आमच्या विरोधी पक्षातील मित्रांना मिळाली नाही.कारण त्यांची अशी मागणी होती की, कापसाच्या पिकाला 2700 रु.क्वि.भाव देण्यात यावा,पण शासनाने या शेतकऱ्यांना 3000 रु.क्विं.भाव देऊन, हे आघाडी सरकार शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विचार करणारे आहे याची प्रचिती दिली आहे. त्यामुळे याबाबतीत माझ्या विरोधी पक्षातील मित्रांना आंदोलन .....

. . . .2 अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याची संधी मिळाली नाही. तसेच मला ऊसाच्या बाबतीत सांगावयाचे आहे. आपण यापूर्वीचा सिझ ान पाहिला तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस तोडला गेला नाही, त्यामुळे त्याचे गाळप होऊ शकलेले नाही अशी सातत्याने ओरड करणाऱ्या मंडळींना यावर्षी ती देखील तशी संधी मिळालेली नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

तसे पाहिले तर मागच्या वेळी तशा प्रकारची अडचण ही संबंधित मंडळींनीच केली होती. ऊस तोडणी कामगारांचे आंदोलन करुन ऊस तोडण्याकरिता वेळ लावणाऱ्या मंडळींनी नंतर ऊसाची वेळेवर तोडणी झालेली नाही, गाळप वेळेवर झालेले नाही अशा प्रकारची ओरड सुरु केली. यावर्षी या लोकांना तशा प्रकारची ओरड करण्याची संधी मिळू शकलेली नाही. इतकी सरकारने व्यवस्थितपणे आणि नियोजनपध्दरीत्या उपाययोजना केलेली आहे.

सभापती महोदय, या वर्षी देशामध्ये एक अतिशय महत्वाचा ऐतिहासिक आणि जागतिक जो निर्णय झालेला आहे तो म्हणजे या देशातील जवळ जवळ 60 लाख शेतकरी बांधवांचे 71 हजार कोटी रुपयाचे कर्ज माफ करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ 38 लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळालेला आहे. त्याशिवाय या योजनेच्या लाभापासून जे शेतकरी वंचित झाले होते त्यांचाही विचार महाराष्ट्र राज्याने केला आणि 6208 कोटी रुपये देऊन जवळ जवळ 40 लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा करुन दिला. या महाराष्ट्रातील शेतकरी, या शेतकऱ्यांचा विचार आणि शेतकऱ्यांची फक्त कणव आणि कळवळा हा बोलण्याकरिता नसून त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता हे आघाडी शासन आहे याची प्रचिती संपूर्ण महाराष्ट्राला आणून दिलेली आहे. सभापती महोदय, शासन एवढयावरच थांबले नाही तर जे शेतकरी कर्ज घेतात आणि नियमितपणे कर्जाची परतफेड करतात, कर्जाची परतफेड करीत असताना त्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये अशा प्रकारची भावना निर्माण होता कामा नये की, आम्ही कर्जाची परतफेड वेळेवर करीत असल्यामुळे आम्हाला सुध्दा या योजनेचा लाभ कां मिळू नये. आम्हाला सुध्दा या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे, या त्यांच्या भावनेचा आदर करुन सरकारने अशा प्रकारे नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर 20 हजार रुपये जमा करुन त्यांची हिंम्मत व हौसला वढविला आहे. त्यांनी सुध्दा अशा पध्दतीने वेळेवर कर्ज भरावे आणि महाराष्ट्राच्या प्रगतीला हातभार लावावी यासाठी या सरकारने त्यांच्या पाठीवर एक कौतुकाची थाप दिलेली आहे.

सभापती महोदया, घटनेच्या 73 व्या आणि 74 व्या दुरुस्तीच्या अनुषंगाने 6 ते 14 या वयोगटातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण देण्याचे सरकारचे आद्य कर्तव्य आहे या भावनेतून सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत शासनाने व्यवस्था केलेली आहे. दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे, ते सुध्दा चांगल्या व सुस्थितीत असलेल्या शाळांमधून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/

श्री. भास्कर जाधव...

मिळाले पाहिजे, यासाठी सर्व शिक्षा अभियान या योजनेंतर्गत प्रभावीपणे उपाययोजना करुन आणि त्याची अंमलबजावणी करुन चांगल्या प्रकारच्या शाळा, चांगल्या प्रकारचे ऑफिसेस, चांगल्या प्रकारची शौचालये निर्माण केली आहेत. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत विद्यार्थ्यांची पट दोनशे संख्या असेल तर त्यांना प्राथमिक शाळेत संगणकाचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे, याची सुध्दा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे काम या सरकारने केलेले आहे.

सभापती महोदय,त्याचप्रमाणे प्रत्येकाला चांगले, स्वच्छ आणि भरपूर पाणी मिळण्याच्या दृष्टीने भारत निर्माण येाजना ही केंद्र सरकारची योजना महाराष्ट्र राज्याने महाराष्ट्रामध्ये अतिशय प्रभावीपणे राबविली आहे. त्याचा उपयोग आपल्या राज्याला मोठया प्रमाणात झालेला आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर राज्य आहे, हे या ठिकाणी सांगताना मला आनंद होत आहे.

सभापती महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत देशातील इतर राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याला सगळयात जास्त पैसे मिळालेले आहेत. गल्ली-बोळातून, वाडया-वस्त्यांमधून आणि छोटया-छोटया वस्त्यांमधून रस्ते करणे ही अवघड असलेली गोष्ट आज सहज साध्य करण्याचे काम हे प्रतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून झालेले आहे. त्याचबरोबर राज्य शासनाने या योजनेच्या संदर्भातील आपला हिस्सा, आपला वाटा, आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी तितक्याच प्रभावीपणे पार पडल्याचे आपणा सर्वांना पहावयास मिळते.

सभापती महोदय, हे सगळे करीत असताना मच्छिमारांचा विचार देखील राज्य शासनाने केलेला आहे. गेल्या वर्षी मच्छिमरीच्या संदर्भात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी राज्य सरकारने कोकणातील मच्छिमारांसाठी 31 कोटी, 56 लाख रुपयांचे पॅकेज देऊन तेथील मच्छिमारांना खूप मोठा हातभार आणि खुप मोठा दिलासा देण्याचे काम या शासनाने केलेले आहे.

सभापती महोदय, डिझेलवर मिळणारी सबसिडी आणि डिझेलवर मिळणारा टॅक्स घेण्यासाठी राज्य शासनाकडे यावे लागत होते. परंतु या सरकारने एक नियम केला त्यामुळे डिझेलवरील परतावा घेण्यासाठी मंत्रालयापर्यंत खेपा घालाव्या लागू नयेत यासाठी शासनाने जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तो मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. ही व्यवस्था करीत असताना ज्या प्रमाणे शेतकऱ्यांकरिता आम विमा योजना ही अतिशय चांगली अशी योजना शासनाने आणली.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

त्याचबरोबर मच्छिमारांकरिता एक चांगल्या प्रकारची योजना आणली. एकेकाळी समुद्रामध्ये किंवा खाडीमध्ये मासेमारी करण्यासाठी गेलेल्या मच्छिमारांच्या बाबतीत एखादी दुर्घटना घडली किंवा अपघात झाला तर त्यांना 50 हजार रुपये मिळत होते. परंतु सरकारने ही मर्यादा 50 हजार रुपयांवरुन 1 लाख रुपयांपर्यंत वाढविलेली आहे आणि त्यांना हातभार लावण्याचे काम सरकारने केलेले आहे. पूर्वी एनसीडीसीची प्रकरणे खूप मर्यादित प्रमाणात होत होती. परंतु गेल्या दोन वर्षाची परिस्थिती पाहिली तर अर्ज आले पाहिजेत आणि अर्ज आल्यानंतर सरकार ते मंजूर करते अशा प्रकारचे चित्र आपल्याला पहावयास मिळते. त्याचा चांगला फायदा आपल्याला होत आहे.

सभापती महोदय, आपण कोकणातील आहात. मीही कोकणातील आहे. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत सुध्दा कोकणातील आहेत. आपण पाहिले तर गेली दोन वर्षे कोकणामध्ये आंब्याचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. परंतु गेल्या वर्षी सरकारने त्याबाबतीत हातभार लावलेला आहे आणि चांगल्या प्रकारची नुकसानभरपाई दिलेली आहे. माननीय फलोत्पादन मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. सरकारचे अभिनंदन करीत असताना मला सांगितले पाहिजे की, या ठिकाणी गारपिटीवर चर्चा होणार आहे परंतु गारपिटीबरोबर या वर्षी पहिल्यांदा कोकणामध्ये सगळ्यात जास्त आंब्याचे नुकसान झालेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा सोडला तर बाकीच्या जिल्ह्यांमध्ये या वर्षी आंबा पिकलेला नाही. या वर्षी मलाही आंबा बघावयास मिळालेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी केवळ चर्चेकरिता, समाधानाकरिता उल्लेख करीत नाही. आपण नुकतेच भूदर येथे जाऊन आला. त्या प्रोजेक्टवर आम्हाला बोलावले नाही. त्या ठिकाणी सुध्दा आपल्याला कोणी आंबा खावयास दिला असेल असे मला वाटत नाही. दरवर्षी प्रमाणे विचार करीत असताना या वर्षी आपण शेतकऱ्यांना मदत करण्याचा विचार करावा अशी मी विनंती करतो. माननीय मंत्रिमहोदय श्री. कोरे साहेबांचे मी अभिनंदन करतो. मागच्या वर्षी बागायती क्लस्टर करण्याचा चांगला विचार कोकण कृषी विद्यापीठामध्ये मांडला होता. परंतु त्यावेळी तो विचार आम्हाला मानवला नाही किंवा तो आमच्या कृतीमध्ये येऊ शकला नाही. परंतु आता केंद्र शासनाने नारळ बागायतीकरिता हा कंसेप्ट कोकणामध्ये सुरु केलेला आहे. सगळे पैसे जर आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

शेतकऱ्यांच्या हातामध्ये दिले तर ते पैसे दुसऱ्या कोणत्या तरी अडचणींकरिता किंवा अन्य कामाकरिता वापरतो. पण ज्या बागायतीकरिता पैसे दिलेले असतात त्याच बागायतीकरिता खर्च करण्याऐवजी तो अन्य ठिकाणी खर्च करतो. म्हणून त्या बागायती डेव्हलप करण्याकरिता त्याला वस्तू रुपाने काही मदत देण्याचा विचार माननीय मंत्रिमहोदय श्री. कोरे यांनी मांडला होता. तो विचार तत्वत: जास्त उचलून धरण्याचे काम मी केले होते. कारण क्षणिक शाबासकी मिळविण्याकरिता, क्षणिक समाधान मिळविण्याकरिता आणि क्षणिक वाहवा मिळविण्याकरिता ते जरी मान्य नसले तरी पुढच्या दीर्घ कालावधीकरिता त्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्या निमित्ताने आता तो विचार कोकणात रुजू झालेला आहे. नारळ बागायतीच्या रुपाने केंद्र सरकारचा निधी नारळ बागायतीकरिता आलेला आहे. तशाच पध्दतीचा विचार आपण भविष्यामध्ये करावा अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो. तो विचार आपण जरुर करावा. या सरकारने केवळ ग्रामीण भागामध्येच काम केले असे नाही. या सरकारवर सातत्याने टीका केली जाते. देशाला जेवढा महसूल मिळतो त्यातील 25 ते 30 टक्के महसूल एकट्या मुंबईतून मिळतो परंतु त्या तुलनेमध्ये मुंबईला मात्र त्याचा हिस्सा मिळत नाही असे सातत्याने सांगितले जाते. परंतु गेल्या दोन वर्षाची आकडेवारी आपण काढून पाहिली तर गेल्या अनेक वर्षांमध्ये जेवढे पैसे मुंबईकरिता आले नव्हते त्याच्या किती तरी पटीने केंद्र सरकारकडून मुंबईला पैसे आलेले आहेत. याचा अर्थ या सरकारचे लक्ष मुंबईकडे सुध्दा आहे. म्हणूनच मुंबईकडे जास्त लक्ष असल्यामुळे मुंबईतून आघाडीच्या सगळ्या जागा निवडून आल्या असाव्यात असे मला वाटते. सरकारच्या त्याच निर्णयामुळे मुंबईतून विशेषकरुन जागा निवडून आल्या. परंतु माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने एवढ्यावरच थांबून चालणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

मुंबईसाठी पैसा दिला म्हणून समाधान मानण्याचे कारण नाही. मुंबईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. औद्योगिकरणामुळे मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे असे म्हटले जाते. परंतु केवळ आमच्या राज्याची राजधानी नाही तर ती देशाची आर्थिक राजधानी आहे म्हणून तिच्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. या मुंबईसाठी राज्य सरकारने केंद्र सरकारचे अधिक लक्ष वेधावे अशाप्रकारची सूचना मी यानिमित्ताने करतो.

सभापती महोदय, या सरकारचे अभिनंदन करीत असताना मी असे सांगेन की, या राज्यातील मागासवर्गीय असतील, अनुसूचित जाती/जमातीचे लोक असतील त्यांच्यावरील शिक्षणाचा खर्च करण्याचे काम, त्यांना मदत देण्याचे काम या सरकारने केलेले आहे. मुलींच्या मोफत शिक्षणाचा विषय असेल, मुलींना पोषण आहार देण्याचा विषय असेल, मुलींना एस.टी.चा मोफत पास देण्याचा विषय असेल, मुलींना मोफत पुस्तके देण्याचा विषय असेल, मुलींना उपस्थिती भत्ता देण्याचा विषय असेल असे चांगले निर्णय या सरकारने घेतले आहेत. त्यावरुन या सरकारने सगळयाच घटकाकडे निश्चितपणे लक्ष दिले आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आज सामान्यातील सामान्य माणसांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरविली जाते, मोफत शिक्षण दिले जात आहे, दारिद्रय रेषेखालील लोकांना अंत्योदय योजनेंतर्गत 60 रुपयांमध्ये 25 किलो धान्य दिले जात आहे. दोन रुपये या दराने गहू व तीन रुपये या दराने तांदुळ दिला जात आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत राज्यामध्ये अनेक जिल्हयात कामे सुरु आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, अनेक जिल्हयात या योजनेंतर्गत कामे करण्यासाठी माणसे मिळत नाहीत. याचा अर्थ राज्यातील बेकारी दिवसेंदिवस कमी होत आहे. या राज्यात सरकार प्रभावीपणे काम करीत आहे. सभापती महोदय, या सर्व बाबींबद्दल मी राज्यपालांच्या अभिषणावरील चर्चेच्या निमित्ताने सरकारचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, आपण मला 2-4 मिनिटे अधिक बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला सुध्दा धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल निषेध किंवा खेद हा शब्द वापरता येत नाही. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी या चर्चेत भाग घेण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सुंदर भाषण केले. काही लोकांना शेणामध्येही सौंदर्य दिसते. कारण त्यांच्यात व्यापक दृष्टी असते. म्हणून त्यांना तसे दिसते. सन्माननीय सदस्यांनी राज्याचे अतिशय चांगले चित्र रंगविले आहे. जनतेच्या घरावर सोन्याची कौले आहेत, जेवण्यासाठी खाली चंदनाचा पाट आहे, पाटासमोर चांदीचा ताट आहे, त्यात सोन्याचा चमचा आहे, त्याला खुळखुळा आहे. समोर रांगोळी काढलेली आहे, रंगीबेरंगी गालिचा अंथरलेला आहे, भरजरी वस्त्रे घातलेली आहेत, म्हणजे एकूणच रामराज्य चालले आहे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय सुंदर वर्णन केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारच्या धोरणाचे प्रतिबिंब असते. मुंबईमध्ये आघाडी सरकारला विजय मिळाल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी 'जय हो' असे म्हटले. पण जय या शब्दाबरोबर भय असा शब्द येतो. तेव्हा पराजयाने खचता कामा नये आणि विजयाने उन्माद येता कामा नये या दोन्ही गोष्टी राजकीय जीवनामध्ये लक्षात ठेवल्या पहिजेत असे मला वाटते. राज्यपालांचे अभिभाषण झाले त्यावेळी त्यात अनेक मुद्दे आले नाहीत अशा भावना आम्ही व्यक्त केल्या होत्या. त्यावेळी अभिभाषणाबद्दल चर्चा झाली नव्हती. त्यावेळचे राज्यपालांचे अभिभाषण गव्हर्नमेंट ओरिएंटेड, रिझल्ट ओरिएंटेड असे नव्हते. तर इलेक्शन ओरिएंटेड, पॉवर ओरिएंटेड असे होते. सन्माननीय सदस्यांनी स्वत:ची पाठ थोपटून घेण्यास काहीच हरकत नाही. महाभारतामध्ये शकुनी हा सोंगटयांचा खेळ खेळताना 'जितंमया, जितंमया' असे म्हणत असे आणि तो जिंकत असे. याचे कारण असे की, त्या सोंगटया जरासंधाच्या हाडांपासून बनविलेल्या होत्या. मला एवढेच सांगावयाचे आहे की, कारण नसताना स्वत:ची पाठ थोपटून घेतली तर कौरवांचा जसा पराभव झाला तसा परिणाम होऊ शकतो हे ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

(श्री. मधुकर चव्हाण....)

आपणास राजकीय सत्ता मिळाली त्यात मोठे नवल मानू नका. आम्ही त्याबद्दल आपले कौतुक करतो, स्वागत करतो. काही वेळा शर्यतीत अनेक मुले असतात, परंतु चपळ पळणारी मुले चुका करतात आणि तंगडीत तंगडी अडकवितात त्यामुळे कमी क्षमतेच्या मुलांचा नंबर येतो. आमचेही तसेच झाले. मुंबईमध्ये तुम्ही मिजास करु नका. श्रीमती प्रिया दत्त यांची जागा सोडली तर बाकीच्या 5 जागांवर विरोधी पक्षांना पडलेल्या मतांचा विचार केला तर प्रत्येक ठिकाणी दीड-दोन लाखांनी आपला पराभव झाला असता. परंतु जनतेचा कौल आम्ही मान्य करतो.

सभापती महोदय, विषय असा आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अभिव्यक्ती असायला पाहिजे. सर्वसामान्य गोरगरीब माणसाचा त्यात उल्लेख असायला पाहिजे. राज्यकर्ता हा आईच्या भूमिकेत जावा लागतो. सर्वसामान्य माणाला डोळयासमोर ठेवून हे अभिभाषण लिहिलेले नाही. या अभिभाषणातील सर्वच मुद्यांवर मी बोलणार नाही. मी काही मुद्यांचा परामर्श येथे घेणार आहे. माझे सहकारी काही मुद्यांचा परामर्श घेतील. मुद्दा क्रमांक 4मध्ये माननीय राज्यपालांनी असे म्हटलेले आहे की "....या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने वेळीच पावले उचलली व जनतेनेदेखील असीम धैर्य दाखवले याचा मला अभिमान आहे." सभापती महोदय, जनतेने 1993मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी असीम धैर्य दाखवले, रल्वेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी असीम धैर्य दाखवले, जातीय दंगे होतात त्यावेळी जनता असीम धैर्य दाखवते. या मुंबई शहरामध्ये हातावर पोट घेऊन माणसे आलेली आहेत. त्यांना जीवन जगायचे आहे. 1993च्या बॉम्बस्फोटातील, रेल्वे बॉम्ब स्फोटातील हृदय पिळवटून टाकणारी, थरार दृष्ये जनतेने पाहिली, अनुभवली, तरीही जनतेने असीम धैर्य दाखवले. त्यामध्ये या सरकारचा काही पराक्रम नाही. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना मी सांगू इच्छितो की, आपण जरा विचार करा. 12 मार्च 1993 ला दाऊदने मुंबईमध्ये 12 बॉम्बस्फोट घडवून आणले. त्यातील एका तरी घटनेचा उल्लेख माननीय राज्यपालांनी केला असता तर अधिक बरे झाले असते. 10 कोटी जनतेला दिलासा मिळाला असता. सत्ता मिळाल्यानंतर अतिशय सावधपणे आपणाला पावले टाकावी लागतात. आपणास सत्ता मिळाली. सत्ता मिळाल्यानंतर मी उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

टाकणार नाही, एकाच कुटुंबासाठी आयुष्यभर जी हुजूरगिरी करणार नाही अशा प्रकारचे आपले वर्तन असले पाहिजे.

1993 साली बॉम्बस्फोट झाला. त्यामध्ये पकडलेल्या आरोपींचे काय झाले? परवा सरकारी वकील श्री. उज्वल निकम यांनी आपल्या व्यथा व्यक्त केल्या. शासनाच्यावतीने अनेक खटले त्यांनी चालविले. काहींना जन्मठेपेची शिक्षा झाली, काहींना फाशीची शिक्षा झाली. परंतु त्याचे पुढे काय झाले ? 16 वर्षामध्ये 1993च्या बॉम्बस्फोटातील एकाही गुन्हेगाराच्या शिक्षेचा अंमल झालेला नाही. विशेष न्यायालयामध्ये खटले चालवून गुन्हेगारांना शिक्षा दिल्यानंतर तसेच सर्वोच्च न्यायालयाने त्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केल्यावरही तुमच्या शासनाने काय केले ? जो आरोपी पॅरोलवर आहे तो संजय दत्त लाल टोपी धालून एका राजकीय पक्षाचा प्रचार करतो...(अडथळा)... ही चर्चा आपण गांभीर्याने करु या. थोडीशी थट्टा-मस्करी ठीक आहे. हा कोणत्या राजकीय पक्षाचा विषय नाही. 1993 मध्ये दंगल झाली. भारतात अतिरेकी आले. हे अतिरेकी भारतात का आले ? तर त्यांना माहीत आहे की भारतामध्ये आम्हाला शिक्षा होऊ शकत नाही. भारतामध्ये क्रौर्याचा नंगा नाच केला तरी, काहीही केले तरी शिक्षा होत नाही. येथील राज्यकर्ते मतासाठी शेवटी आम्हाला घरामध्ये नेऊन बसवतील असे त्यांना वाटते आणि त्यामुळे कसाबसारखा निर्दयी माणूस मुंबईमध्ये आला आणि अनेक लोकांचे त्याने बळी घेतले. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब, मी आपणास सांगू इच्छितो की 1993मध्ये बॉम्बस्फोट झाले त्यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा शेवटचा पेपर होता. शेवटचा पेपर देऊन बेंगाल केमिकल जवळ मुले उभी होती. कोण मावशीकडे जाणार, कोण आजोळला जाणार अशी मुले चर्चा करीत असताना त्या बॉम्बस्फोटात 87 मुलांच्या शरीराच्या चिंधड्या झाल्या. आपल्या शाळेत गेलेल्या मुलांच्या आईवडिलांना त्यांच्या मुलांचे चिंधड्या झालेले कलेवर हातामध्ये घेऊन अंत्यसंस्कार करावे लागले. मला हे सांगायचे आहे की, या गोष्टीचा आपण विचार करा.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

...नंतर श्री. गिते...

श्री. मधुकर चव्हाण....

सभापती महोदय, रेल्वेमध्ये सात ठिकाणी बॉम्बस्फोट झाले, त्यातील किती आरोपी मिळालेले आहेत याची माहिती शासनाने सांगावी. या प्रकरणी शासनाने कोणाला शिक्षा दिली ? ज्या नराधमांनी बॉम्बस्फोट करुन अनेकांना निदर्यपणे ठार मारले त्यांना कोणत्याही परिस्थितीत कडक शिक्षा झाली पाहिजे असा प्रयत्न शासनाकडून केला गेला आहे काय ? या बॉम्बस्फोटात 189 लोक मृत्युमुखी पडले, त्या मृत व्यक्तींच्या कथा "दैनिक लोकसत्ता" आणि "इंडियन एक्सप्रेस" या वृत्तपत्राच्या प्रथम पानावर छापून येत होत्या. या बॉम्बस्फोटात अनेक पुरुष मृत झाले, त्या मृत व्यक्तींच्या पत्नींना केस विंचरताना मोकळे कपाळ बघावे लागत असेल. ज्या नराधमांनी निदर्यपणे निरपराध माणसांना रेल्वेत बॉम्बस्फोट करुन ठार मारले त्यांना शिक्षा झाली असे तरी जनतेला पहावयास मिळाले पाहिजे होते. परंतु या प्रकरणातील आरोपींना शिक्षा झाल्याचे राज्यातील जनतेला पहावयास मिळाले नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या राज्यात अपराध्याला शिक्षा नाही. दूरदर्शनवर श्री.नितीन चंद्रकांत देसाई यांची छत्रपती शिवाजी महाराजांवरीची सिरियल चालू आहे. त्यातील श्री.खोपडे अभय मागतो. त्याला सांगितले जाते की, तुला अभय देण्यात आले आहे. शेवटी त्यास महाराजासमोर आणले जाते. त्यावेळी महाराज सांगतात की, त्याचा उजवा हात आणि डावा पाय कापून टाका. ज्यांनी दहशत निर्माण केली, ज्याने अन्याय केला आहे, ज्यांनी कौर्य केले आहे, त्यांना कडक शासन दिलेच पाहिजे. मला तर जनतेच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करावयाचा आहे. मी जाणता राजा आहे, मी जनकल्याण करणारा राजा आहे. राज्यातील जनतेच्या सुरक्षिततेची, जनतेच्या पोटाची काळजी करणारा तसेच जनतेच्या जीवनाची काळजी करणारा राजा आहे अशा प्रकारची खात्री करुन द्यावयाची असेल तर मला त्यास शिक्षा करावीच लागेल. तुम्ही राज्यकर्ते आहात, तुम्ही तसे केले आहे काय ? रेल्वेत झालेले बॉम्बस्फोट असतील, अन्य ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट असतील, त्या बॉम्बस्फोटातील आरोपींना कडक शिक्षा केली आहे काय ? याबाबतची माहिती या सभागृहात सांगावी. माननीय राज्यपालांनी शासनाला सांगितले पाहिजे की, माझ्या भाषणात काय लिहिले आहे त्याबाबतचा जाब शासनाला विचारला पाहिजे. शासनाच्या वतीने मी भाषण करतो आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दहशतवादाचा मुद्दा नमूद करण्यात आलेला आहे. या शासनाने श्री. शशांक शिंदे यांना मरणोत्तर पुरस्कार का दिला नाही ? तेथे शासनाने त-र-तम भाव का बाळगला ? संपूर्ण देश, जगातील सर्व देश पाकिस्तानला दहशतवादी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

देश म्हणून जाहीर करा असे सांगत होते. मुंबई शहरावर हल्ला करण्यासाठी जे दहशतवादी आले होते ते सर्व पाकिस्तानातील होते अशा त-हेचे पुरावे आम्ही जगाकडे देत होतो. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व कॉंग्रेस पक्षचे ज्येष्ठ नेते श्री. अंतुले साहेब या बाबतीत सांगत होते की, "I am doubtful." श्री. करकरे यांना कोणी मारले ? त्यासंदर्भात निषेधाचा एकही शब्द तुम्ही काढला नाही. तुम्ही तुमच्या नेत्यांना सांगितले की, या घटनेच्या बाबतीत ते असे असे बोलले म्हणून त्यांना तिकीट देऊ नका. उलटपक्षी त्यांना लोकसभेचे तिकीट देऊन जनतेच्या जखमेवर तुम्ही मीठ चोळले. हे कसले राज्य चालले आहे? तुम्ही प्रत्येक ठिकाणी स्वत:ची पाठ थोपटून घेता. सभापती महोदय, मला असे वाटते की, याचा निषेध करणे आज जरी शक्य नसले तरी खेद व्यक्त करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद 8 मध्ये असे नमूद केले आहे की, या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भविष्यात असे प्रसंग घडू नयेत म्हणून समाजातील विविध घटकांचा सल्लागार प्रक्रियेमध्ये सहभाग असावा यादृष्टीने राज्य शासनाने राज्य सुरक्षा परिषदेची रचना केली आहे. ही गोष्ट हास्यास्पद आहे. मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भात शासनावर मोठया प्रमाणात ताशेरे ओढलेले आहेत. शासनाला सल्ला देण्यासाठी एवढी मोठी कमिटी निर्माण केली, त्यामुळे शासनाचे हसे झाले आहे. शासनाला सल्ला देण्यासाठी कमिटया लागतात तर मग यासंदर्भात सर्व यंत्रणा का तयार केल्या आहेत ? सल्ला देण्यासाठी वेगळी कमिटी लागते ही गोष्ट शासनाला भूषणावह नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद 10 च्या अनुषंगाने काल सभागृहात चर्चा झाली आहे. त्या चर्चेस थातूर-मातूर उत्तर दिले. प्रत्येक वेळी थातूर मातूर उत्तरे देऊन वेळ मारुन न्यावयाची, सभागृहातील कामकाजपत्रिका पूर्ण करावयाची. परंतु या राज्याला भेडसावणारे मुलभूत प्रश्न आहेत ते प्रश्न नंतर भयानक स्थिती निर्माण करु शकतात आणि बुमरँग सारखे, भस्मासुरासारखे ते आपल्यावर ते उलटू शकतात. या प्रश्नांच्या बाबतीत सर्वांनी एकत्रित येऊन चर्चा करु आणि एक नवनीत आपण निर्माण करु. प्रत्येक वेळेला राजकीय भांडणे केली पाहिजेत असे नाही. केवळ राजकारण करण्याच्या उद्देशाने आम्ही त्या प्रश्नांना विरोध केला आहे असे एखादे उदाहरण आम्हाला आपण सांगावे. दिनांक 1 फेब्रुवारी, 2009 रोजी गडचिरोली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

जिल्हयात नक्षलवाद्यांनी पोलीस दलावर हल्ला केला. त्यात काही पोलीस मृत्यूमुखी पडले. ही घटना का घडली ? या गोष्टीचा कधी शासनाने विचार केला आहे काय ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आदिवासींच्या बाबतीत एक चकार शब्द लिहिला गेलेला नाही. या राज्यात महिलांचे प्रश्न भेडसावत आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी पैठण येथून संभाजीनगर येथे येत होतो. संभाजीनगर येथे येताना दुपारचे 2.00 वाजले होते. येताना रस्त्याच्या कामावर नऊ महिने गरोदर असलेली एक महिला खडी फोडण्याचे काम करीत होती. ती गरोदर असल्याबाबत मी अंदाज केला. कारण आपल्या घरात महिला असतात. आपली बहीण बाळंतपणासाठी आपल्या घरी येते, आपली मुलगी बाळंतपणासाठी येते, त्यामुळे गरोदर महिलांच्या बाबतीत आपल्याला अंदाज असतो. त्या ठिकाणी गरोदर महिला खडी फोडण्याचे काम करीत होती. गरोदर महिला ज्या ठिकाणी काम करीत असेल त्या महिलेस सातव्या महिन्यापासून सुटी देण्यात आली पाहिजे असे माझे मत आहे. या अनुषंगाने कायदा करण्यास काय हरकत आहे ? तशा प्रकारचा कायदा करण्याचा शासनाला पूर्णपणे अधिकार आहे. जे संघटीत कामगार आहेत, तेथे तुम्ही पाठ थोपटून घेता. महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे असे शासनाकडून वारंवार सांगितले जाते. महिलांचे सक्षमीकरण करण्यास काही हरकत नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, महिला ही सगळयात जास्त दु:खी असते. लहानपणी त्या महिलेचे वडील नीट निघाले नाही, तिची आर्थिक परिस्थिती बरोबर नसेल, तिचे वडील व्यसनी असतील तर त्या महिलेचे बालपणाचे पूर्णपणे वाटोळे होते.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

तरुण वयामध्ये जीवनाचा साथीदार नीट मिळाला नाही तर उभे तारुण्य संपून जाते. म्हातारपणी तिच्या पोटी जन्माला आलेली मुलगी नीट निघाली नाही तर तिचे म्हातारपण संपून जाते. अशा तीनही अवस्थांमध्ये आयुष्यात स्त्री ही पुरुषांपेक्षा दुर्बल असू शकते. तिला सक्षम करण्यासाठी केवळ चार महिलांना जवळ करु नका. बाकी महिलांकडे देखील बघा. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी क्षेत्रामध्ये काम करीत असताना त्याठिकाणी कोणत्या योजना राबविल्या? मागासवर्गीय आश्रमशाळांमध्ये काय परिस्थिती आहे? लोकसत्ता या दैनिकामध्ये संदीप प्रधान यांनी उत्तम लेख प्रसिध्द केले होते. ऑन पेपर तुमच्या शाळा आहेत. केवळ पैसे घेतात. त्यांच्यावर फौजदारी खटले दाखल केले का? मागासवर्गीयांचे जे प्रतिनिधी आहेत ते केवळ भीक मागण्याचे काम करीत आहेत. श्री.रामदास आठवले हे भीक मागत आहेत. मला मंत्री करा, मला खासदार करा. खालपासून वरपर्यंत ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, महानगरपालिका, विधानसभा निवडणुकांमध्ये राखीव जागा का ठेवल्या जातात? अन्य समाजातील लोक गरिबांचा, मागासवर्गीयांचा विचार करीत नाहीत असे माझे मत नाही. या देशातील मागासवर्गीयांच्या सगळ्या चळवळी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोडले तर अनेक ब्राम्हण कुटुंब किंवा तथाकथित उच्च कुटुंबात जन्मलेल्या लोकांनी चालविल्या आहेत. तुम्ही या राखीव जागा आहेत त्यांचा कसा उपयोग करणार आहात? एखाद्या वॉचडॉगसारखे अर्थसंकल्पाकडे लक्ष द्यायचे आहे. मागासवर्गीयांसाठी, आदिवासी समाजासाठी दिलेल्या निधीचा योग्य उपयोग होतो की नाही हे पहायचे सोडून मंत्रीपदाची, खासदारकीची भीक मागता? या नक्षलवाद्यांचा जो प्रश्न आहे तो तुम्हाला सोडवायचा असेल तर युध्द पातळीवर याचा विचार करणे आवश्यक आहे. माननीय राज्यपालांनी मार्च महिन्यात केलेल्या अभिभाषणात एक वाक्य लिहिले आहे. माझे शासन आपल्या राज्याच्या सीमातून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यास कटिबध्द आहे. या बाधित क्षेत्रासाठी पुढील 3 वर्षात 1387 कोटी रुपये कृती योजनेसाठी ठेवले आहेत. काय झाले मे महिन्यात? काय योजना केल्या? नक्षलवाद हद्दपार केला का? या परिसरातील गरीब लोकांना 3 ते 5 हजार रुपये देतात. मोटारसायकल देतात. डिझेलपेट्रोलसाठी पैसे देतात. जंगलात घेऊन जातात आणि त्यांना महिन्याला पगार देतात व प्रशिक्षण देतात. ते प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्याच लोकांचे मुडदे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

पाडतात. त्या नक्षलवादाचा प्रश्न सहज एका परिच्छेदामधून खरडून टाकला आहे. यासंबंधी सुध्दा आपल्यासमोर खेद व्यक्त करीत आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्टया प्रथम क्रमांकावर आहे असे सांगितले जाते. अतिशय चांगले भाषण केले आहे. वीज क्षेत्रात नव्याने एकही मे.वॅट वीज निर्मिती केलेली नाही. यासंबंधी श्वेतपत्रिका जाहीर केली का? महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्षेत्रात सहाव्या क्रमांकावर आहे की नाही? 44 व्या परिच्छेदात लिहिले आहे की, 331 लाख नोकऱ्या निर्माण होतील. 135 विशाल व तत्सम प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांचा प्रकल्प अहवाल घेतले का? त्यांना जमिनी दिल्या का? त्यांना मान्यता दिला का? त्यानी एमओयू साईन केला का? वीज प्रकल्पाबाबत सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील नेहमी सांगायचे, इतके एमओयू केले, सह्याद्रीवर बैठका झाल्या, महाराष्ट्रात लखलखाट होईल. चांदण्या प्रकाशात महाराष्ट्र न्हाऊन निघेल, दिवसा चंद्र दिसेल. काय झाले ते महाराष्ट्राला सांगा. स्वत:चीच पाठ थोपटून घेऊ नका. महाराष्ट्राचा औद्योगिक क्षेत्रात नंबर काय आहे हे सांगितले पाहिजे. सार्वजनिक रुग्णालयातील स्थितीबाबत मी थोडक्यात बोलणार आहे. आज एखाद्याला कॅन्सर झाला तर त्याला मुंबईत यावे लागते. राज्यातील जिल्हयांच्या ठिकाणी एखादे रुग्णालय आहे का? गेली 60 वर्षे तुम्ही राज्य करीत आहात, मध्यंतरी साडेचार वर्षे आम्ही राज्यकर्ते होतो. गेल्या 60 वर्षात अशी योजना आखली का? महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हयांमध्ये आजारी पडणाऱ्या गरीब व सामान्य माणसाला शहरात यावे लागणार नाही अशी योजना आखली का?

....2एच.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

सामान्य माणूस ब्रीच कँडी, जसलोकसारख्या रुग्णालयांमध्ये जाऊ शकत नाही. गरिगांची स्थिती बघावयाचीच असेल तर आपण महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रुग्णालयात जा, के.ई.एम. रुग्णालयात जा, जेथे 50 खाटा आणि 150 पेशंट्स असतात व त्यांच्यावरील चादर सुध्दा बदलली जात नाही. मग राज्यकर्ते म्हणून आपले याकडे लक्ष देण्याचे कर्तव्य नाही काय, हा खरा प्रश्न आहे. पंडित दिनदयाल उपाध्याय यांनी चांगले उदाहरण दिलेले आहे. ते म्हणजे एका कुत्रीला चार पिल्ले असतात. त्यातील सर्वात धष्टपुष्ट जे पिल्लू असते ते आईचे जास्तीत जास्त दूध शोषून घेते. आई त्याकडे लक्ष देत नाही पण आई त्या दुबळया पिल्लाला जवळ घेते आणि त्याला सर्वात जास्त मायेची ऊब देत असते. म्हणून गरिबांना, आदिवासी, दलितांना, भुकेल्यांना डोळ्यासमोर ठेवून राज्य करावयाचे असते, त्यांच्यासाठी योजना घ्यावयाच्या असतात. श्रीमंत लोक त्यांच्याकडे असलेल्या पैशातून सगळी सुखे विकत घेऊ शकतात आणि गरीब लाचार असतात म्हणून त्यांच्याकडे कोणीच पाहत नाही. मग आपण कसली पाठ थोपटून घेतात. आपण शहरांचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. देशाचे नागरीकरण 27 टक्के आहे आणि या राज्याचे नागरीकरण मात्र 48 टक्क्यावर दोन वर्षापूर्वी गेले होते, ते आता 50 टक्के आहे. आमच्या कोकणात दसरा, देवव किंवा गणपती अथवा होळीसाठी लोक जातात. लोक हातावर पोट घेऊन शहराकडे का आले याचा विचार सरकार करणार की नाही ? नगरविकास मंत्री किंवा सचिव फक्त एफएसआयचेच वाटप करतात. कधी महापालिकेच्या कमिशनरांना मंत्रालयात बोलावतात काय ? सांगा मिरलमध्ये पाणीपुरवठ्याची परिस्थिती काय आहे ? संभाजीनगरमध्ये काय परिस्थिती आहे ? असा जाब त्यांना विचारतात काय ? शहरे वाढली परंतु ती आज बकाल दिसत आहेत. शहरांमध्ये पार्किंगची सोय नाही, पाणीपुरवठ्याची सोय नाही, भुयारी गटारे नाहीत, आरोग्याची व्यवस्था नाही, शाळा नाहीत, खेळाची मैदाने नाहीत, बगीचे नाहीत. आज 60 वर्षे होऊन गेली आपण स्वतंत्र झालो परंतु अशा बाबतीत मात्र कोणत्याही सुविधा निर्माण करु शकलो नाही. एवढ्या मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे आणि दुसऱ्या बाजूला गांवे ओस पडत चालली याचा गांभीर्याने विचार नगरविकास विभाग करणार की नाही ? फक्त एफएसआय आणि टीडीआर वाटण्याचेच काम आपण करणार आहात काय ? मोहेंजोदडो येथील उत्खननात जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

अवशेष सापडले त्याची रचना आपण पाहिली. अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांनी सांगितले की, माझ्या शासनाने झोपडपट्टी पुनर्विकासाला प्राधान्य देऊन झोपडपट्टीविरहित शहरे निर्माण करण्याचे ठरविले आहे. मला आपण दाखवून द्यावे की, कोणते शहर झोपडपट्टी विरहित आहे. मुंबईत सन 1960 साली 35 लाख झोपड्या होत्या, सन 1970 मध्ये 40 लाख, 1980 मध्ये 50 लाख आणि 1990 मध्ये 60 लाख झोपड्या आहेत. आज मुंबईची लोकसंख्या 1.15 अब्ज आहे व त्यापैकी 70 ते 72 लाख लोक झोपड्यातून राहतात आणि शासन म्हणते की झोपडपट्टी निर्मुलन करणार. घटनेत जरी लिहिलेले असले तरी या शहराला मर्यादा आहेत की नाही ? या शहरात बांगला देशाचे नागरिक किती आले याचाही विचार करणे आवश्यक आहे. घटनेची अडचण येत असेल तर त्यात बदल करा. मुंबई शहरात किती माणसे येणार, किती राहणार व कशी राहणार, त्यांना पाणी कोठून देणार. नुकतेच आता दक्षिण आणि मध्य मुंबईत चार दिवस पाणी मिळणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज मुंबई हे ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. माननीय श्री. अरुण गुजराथी साहेबांना मी सांगू इच्छितो की, मुंबईत वडाळ्याला ट्रक टर्मिनस आहे याची माहिती आपल्याला देखील आहेच. कारण आपण सुध्दा नगरविकास मंत्री म्हणून काम केलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

वडाळा ट्रक टर्मिनस् येथे 120 फूट रुंदीच्या रस्त्याचे काम गेल्या 10-20 वर्षापासून सुरु होते ते काम आता चार महिन्यापूर्वी पूर्ण झालेले आहे. या रस्त्याची लांबी सुमारे 3 ते 4 कि.मी. आहे. परंतु मोनो रेलसाठी 150 कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेला हा रस्ता आता खणण्यास सुरुवात केलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण जे अधिकारी लिहितात त्या अधिकाऱ्याच्या डोक्यात काय भुसा भरलेला असतो की, काय हे मला समजत नाही. चार महिन्यापूर्वी 150 कोटी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेला रस्ता मोनो रेलसाठी खणण्यास सुरुवात केली गेली असे असतांनाही आपल्याच हाताने आपली पाठ आपण थोपटत आहात.

सभापती महोदय, दोन तीन मुद्यांना स्पर्श करुन मी माझे बोलणे संपविणार आहे. या शासनाने शिक्षणाचा पार बट्टयाबोळ करुन टाकलेला आहे. शालेय पाठय पुस्तकाच्या धडयात संतांची आणि राष्ट्रीय पुरुषांच्या कर्तुत्वाच्या संदर्भात एका ओळीचा सुध्दा समावेश करण्यात आलेला नाही. आता माननीय विखे-पाटलांकडे शिक्षण मंत्र्याचा पदभार सोपविण्यात आलेला आहे. त्यांनी 11 वी चे प्रवेश ऑन लाईन सुरु करण्यात येईल अशी घोषणा केलेली आहे. झोपडपट्टीतील गरीब लोक काय इंटरनेट घेणार, कंप्युटर घेणार की, मोबाईल घेऊ शकणार आहेत ? तुघलकाने जसा कारभार केला होता तशा प्रकारचा कारभार हे शासन करीत आहे. तुघलकाने जशी आपली राजधानी दिल्ली वरुन औरंगाबादला व औरंगाबादवरून पुन्हा दिल्लीला हलवली होती, तुघलकाने सुरुवातीला सोन्याची नाणी व्यवहारात आणली नंतर पुन्हा सोन्याची नाणी बंद करुन त्याने पितळेची नाणी व्यवहारात आणली तसा प्रकार या राज्यशासनाने चालविला आहे. तुम्ही मोघलांचा इतिहास सोडून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास कधी वाचतच नाही. त्यामुळे तुम्हाला हे काही समजणारच नाही. लॉर्ड मेकॅनन याने असे म्हटले होते की, लढाया कशासाठी करता ? लढाया करण्यापेक्षा येथील लोकांना येथील इतिहास विसरावयास लावा, पराक्रम विसरावयास लावा, महापुरुष विसरावयास लावा, महापुरुषांचा इतिहास विसरावयास लावा. जनता हे विसरावयास लागल्यावर या ठिकाणी आपोआप ब्रिटिशांचे राज्य येईल. आपण इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हणतो. आपण त्या भाषेला "वाघिणीची दूध प्यायला वाघ बच्चे फाकडे" असेही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

म्हणतो. इंग्रजी भाषेला आम्ही वाघिणीची उपमा दिली परंतु त्यामुळे आमची संस्कृत भाषा पार कोपयात गेली. महाराष्ट्रात शिक्षणाच्या संदर्भात या शासनाने एकही चांगली योजना आखली नाही. माननीय शिक्षण मंत्री श्री.पुरके आले परंतु ते पुरात वाहून गेले. त्यांनी वाट्ल ते केले आणि आताचे शिक्षणमंत्री सुध्दा वेडयासारखेच करीत आहेत. शिक्षणाच्या संदर्भात शासनाने निश्चित असे धोरण ठरविले पाहिजे. महाराष्ट्राच्या शिक्षणाच्या संदर्भात निश्चित अशी दिशा ठरवली पाहिजे. महाराष्ट्रात अनेक संत परंपरा होऊन गेलेली आहे, अनेक महापुरुष होऊन गेलेले आहेत. पहिली पासून बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात झालेल्या महान संतांची आणि पुरुषांची माहिती द्या. परंतु हे शासन अशा प्रकारे चांगले काम कधीही करणार नाही. रक्ताचा एकही थेंब न सांडता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांती घडवून आणली होती. नाशिक येथील काळाराम मंदिराच्या प्रवेशाच्या संदर्भात हजारो अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबर होते त्यांनी सांगितले असते की, मंदिरावर दगड मारा तर अनुयायानी दगडे मारली असती परंतु डॉ. बाबासाहेबांनी तशा प्रकारचा आदेश दिला नाही. त्यांनी त्यावेळेस सांगितले होते की, मला देखील माणसासारखा दर्शन घेण्याचा अधिकार आहे असे सांगून त्यांनी चळवळ केली होती. महाड येथील चवदार तळयाच्या संदर्भात सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळयात घाण टाका असे आदेष अनुयायांना दिले नाहीत. त्यांनी जर अशा प्रकारचे आदेश दिले असते तर अनुयायांनी चवदार तळयात घाण टाकली असती. उलट त्यांनी सांगितले की, चवदार तळयाचे पाणी पिण्याचा तुम्हाला जसा अधिकार आहे तसाच अधिकार मला सुध्दा आहे. सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, शिक्षणाच्या संदर्भात पहिली ते बारावी पर्यंतच्या पिढीवर चांगल्या गोष्टी अभ्यासक्रमात शिकवल्या पाहिजेत. परंतु वीर पुरुषांच्या संदर्भात, संताच्या संदर्भात विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार शिकवले जात नाहीत. त्यामुळे पहिली ते बारावीच्या पुस्तकामध्ये संत आणि राष्ट्रपुरुषांच्या जीवनाचा उल्लेख झाला तर त्याचा चांगला परिणाम होऊ शकेल.

सभापती महोदय, युएलसी कायद्याच्या संदर्भात आमचे एक धोरण होते तर आमचा मित्र पक्ष शिवसेनेचे दुसरे धोरण होते त्यामुळे आम्हाला वाईट वाटले होते. सभापती महोदय, युतीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

एक विचार असला पाहिजे. जसे दो तन एक मन, डोळे अनेक दृष्टी एक, पाय अनेक गती एक, हृदये अनेक स्पंदने एक, अशी युती असली तरच आघाडी चांगली चालते नाही तर बिघाडी होते. कोणत्याही राजकीय पक्षांची युती अशीच असली पाहिजे. त्यावेळेस आम्ही युएलसी कायद्याला पाठिंबा दिला होता. युएलसीमध्ये जी जमीन उपलब्ध होईल त्या जमिनीचा उपयोग सामान्य माणसाला घरे बांधण्यासाठी झाला पाहिजे असे धोरण होते. परंतु प्रत्यक्षात युएलसी कायद्यामुळे किती माणसांना घरे मिळाली याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. परवा म्हाडाच्या 3000 घरांच्या संदर्भात लॉटरी काढण्यात आली त्यावेळेस लाखो माणसे उन्हातान्हात अक्षरश: भिका-यांसारखी लाईन लावून उभी होती. ज्या माणसांना घरे मिळाली नाहीत ते आत्महत्या करण्यास देखील तयार झाले होते. यावरुन हे शासन आईच्या ममतेने राज्य करीत आहे असे आपल्याला वाटते काय ?

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

नरिमन पॉईन्ट आणि बॅक बे रिक्लमेशन येथील समुद्र केवळ श्रीमंतासाठीच शासनाने बुजवले आणि `आकाशाला गवसणी घालणा-या इमारती बांधल्या परंतु मनोरा आमदार निवासाच्या बाजुला झोपडपट्टी आहे. या निमित्ताने मला एक कविता आठवते ती कविता अशी आहे की, " उभे भोवती प्रासाद गगनभेदी .. कोप-यात उभा एक.... " त्या कवितेचा असा अर्थ आहे की, ज्याने घर बांधले होते त्याला एक विट सुध्दा नाही . शासनाने यु.एल.सी. कायदा रद्द केल्यानंतर मुंबई शहरातील किती घरे बांधली आहेत याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. गेल्या मार्च महिन्यात जी भाषणे करण्यात आली हाती ती सगळी भाषणे इलेक्शन ओरिएंटेड होती. मी आपल्याला सांगू इच्छितो की, निवडणुका येतील आणि जातील. " राम - कृष्ण आले आणि गेले त्याविना जग काय ओसच पडले " असे आपण म्हणतो त्याप्रमाणे सत्ता येईल आणि जाईल परंतु जनता मात्र कायम स्वरुपी असते. त्या जनतेसाठी शासनाने नेमके काय केले आहे हे महत्वाचे आहे. ग्रामीण भागातील जनतेला वा शहरी भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ठोस असा उल्लेख करण्यात आलेला नाही . त्यांच्या अभिभाषणात बेरोजगारांसाठी काहीच देण्यात आलेले नाही. मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला शेवटचा इशारा देत आहे. मी काही द्रष्टा नाही तर मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. ज्यावेळी भूक लागते त्यावेळी ती व्यक्ती भय विसरते ,आणि भय विसरल्यानंतर ती व्यक्ती हिंसेकडे वळते. ज्यावेळी हाताला काम नसेल , शेताला पाणी नसेल आणि चालण्यासाठी रस्ता नसेल , पोटाला अन्न नसेल तर ती माणसे क्रांती करतील आणि हातामध्ये शस्त्रे घेतील . फ्रान्समध्ये क्रांती झाल्यानंतर दुसरी गिलोटीन क्रांती झाली होती .ती प्रती क्रांती होती. ज्यांनी गरिबांसाठी राजाला उलथवून टाकले होते त्यांनीच गरिबांवर अन्याय करण्यास सुरुवात केली होती त्यांना बाजूला करण्यासाठी लोकांना हातामध्ये शस्त्रे घ्यावी लागली होती. महाराष्ट्रामध्ये असे होऊ नये असे जर शासनाला वाटत असेल तर अन्न, वस्त्र, निवारा या तीन गोष्टी गरिबातच्या गरीब व्यक्तिला दिल्या पाहिजेत ही दृष्टी समोर ठेवून आपले राज्य चालले नाही त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे. सर्व प्रथम मला एका गोष्टीबद्दल खेद होत आहे. या पेक्षा जास्त तीव्र शब्द माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल बोलत असतांना वापरल्यास तो औचित्याचा भंग होईल . संयुक्त महाराष्ट्राचे हे सुवर्ण् महोत्सवी वर्ष आहे . या वर्षा संबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही. या वर्षाच्या निमित्ताने एक बोधचिन्ह तयार करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे पुढील वर्षामध्ये कोण कोणते कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत याबाबतीत शासनाने सांगितले आहे. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जर त्यासंबंधीचा उल्लेख केला असाता तर ते अधिक संयुक्तिक झाले असते असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणाची सुरवात करीत असतांना संयुक्त महाराष्ट्रासाठी 105 हुतात्मे झाले होते त्यांना विनम्रपणे अभिवादन करुन पुढच्या विकासाचा संकल्प शासनाने केला असता तर ते अधिक योग्य झाले असते परंतु महाराष्ट्रातील जनतेची त्यांना आठवण नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी जे हुतात्मे झाले होते त्यांची सुध्दा आठवण नाही, आता शेतकरी आत्महत्या करतात त्यांचीसुध्दा शासनाला पर्वा नाही त्याचबरोबर मुंबईवर दहशतवादी हल्ल्यात जे पोलीस अधिकारी, शिपाई, नागरिक शहीद झाले होते त्यांचीसुध्दा आठवण नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जे हुतात्मे झाले होते त्यांचीसुध्दा शासनाला आठवण नसल्यामुळे त्यांचे आत्मेसुध्दा आता तळमळत असतील असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 84 मध्ये असे म्हटलेले आहे की, दीर्घकाळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या शासनाने भारताच्या साविधानाच्या अनुच्छेद 131 (ख) अन्यये सर्वोच्च न्यायालयात एक विशेष दिवाणी दावा दाखल केला आहे " त्याचप्रमाणे बेळगावला उपराजधानी करण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न चालला आहे त्याची दखल घेतलेली आहे ? म्हणजे शासन नेमके काय करणार आहे. ? याचा खुलासा झालेला नाही. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात चांगले वकील देऊन महाराष्ट्राची बाजू कशी मांडली जाणार आहे.? बरेच जण स्वत:ला वकील म्हणवतात परंतु प्रत्यक्षात मराठीचा व्देष करणारे महाराष्ट्रातून लोकसभेमध्ये जे प्रतिनिधी निवडून गेलेले आहेत ते आता महाराष्ट्राची वकीली कशी करणार आहेत हे सुध्दा आम्ही पाहणार आहोत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडालेला आहे. आज सकाळ पासून त्या संबंधी सभागृहात चर्चा चालू होती परंतु त्यासबंधी कोणताही निर्णायक मुद्यापर्यंत आपण येऊन पोहोचलो नाही. श्री. राम प्रधान समितीच्या अहवालात काय म्हटलेले आहे आणि त्यावर शासन कोणती कृती करणार आहे हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. मुंबईतील दहशवादी हल्यानंतर नागपूरचे अधिवेशन तीन आठवडे पुढे ढकलण्यात आले होते. नागपूरच्या अधिवेशनात शेवटच्या दिवशी समिती सबंधीची घोषणा करण्यात आली होती. त्या संदर्भात कृती कार्यक्रमाची आता आपण वाट पहात आहोत .सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला अनेक प्रश्न विचारावयाचे आहे परंतु वेळेच्या अभावी मी सविस्तर न बोलता थोडक्यात सांगू इच्छिते की , दहशवादी हल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांचे मृतदेह अजूनही सडत पडलेले आहेत. ॲडव्होकेट श्री. उज्ज्वल निकम यांनी अशी मागणी केली की, या प्रकरणात लवकरात लवकर निर्णय लागला पाहिजे यामध्ये वेळकाढूपणा केला जाता कामा नये.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

परंतु कसाबला अत्तर पाहिजे, कसाबला त्याची आई भेटायला येणार होती., त्याचीही मोठी बातमी आली होती. कसाबसाठी बोगदा तयार करण्यात आला, कसाबसाठी स्पेशल व्हॅन करण्यात आली अशा बातम्या येत आहेत. दुसरीकडे महाराष्ट्रात पोलिसांमध्ये आम्ही सुधारणा करू अशी शासनाने घोषणा केली परंतु त्या दृष्टीने आम्ही काही अमलबजावणी केलेली आहे व त्यासाठी आम्ही काय पावले उचलली आहेत या संबंधीचा कोठलाही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही याचा मला अतिशय खेद वाटतो. सभापती महोदय, या राज्यातील 43 हजार पोलिसांना त्यांचा मार्च महिन्याचा पगार मिळालेला नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये ज्या पोलिसांनी मोठ्या प्रमाणात इलेक्शन ड्युटी केली आहे त्यातील अनेकांनी दिवसभर काम केले अशा एकंदर 5167 पोलिसांपैकी 5034 पोलिसांना उपाशी पोटी काम करावे लागले आहे. त्यासंबंधीच्या आकडेवारी वरून देखील दिसून येते आणि त्यांनी देखील सांगितले आहे की, आम्ही दिवसभर काम केले पण त्या कामाचे पैसे देण्याची कोठलीही सोय केलेली नाही परिणामी ते पोलीस कर्मचारी उपाशी राहिले अशी बातमी आहे. त्याचबरोबर 800 पीएसआय नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. दुसरीकडे संरक्षणाची साधने अपुरी आहेत व त्यावर वारंवार चर्चा होत आहे आणि म्हणून मला राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्ती करीत असतानाच हेही सांगितले पाहिजे की, ज्याप्रमाणे या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा संपूर्णत: बोजवारा उडालेला आहे त्याचबरोबर अनेक ठिकाणी असे चित्र दिसते आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. बारामती तालुक्यामध्ये दुनवडी या गावी श्री.कुंभार या शेतकऱ्याने आत्महत्या केली आणि त्या आत्महत्येनंतर अनेक आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या. पाथर्डीमध्ये झाली. आज देखील सांगली जिल्ह्यातील तासगावच्या शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. या आत्महत्यांच्यामध्ये आपण जेव्हा मोठमोठ्या घोषणा करतो आहोत, त्यात सहकार क्षेत्रात अनेक सहकारातील उद्योग जे चांगल्या प्रकारे सुरू असले तरी मी लक्ष वेधू इच्छिते की, 57 सहकारी बँका या डबघाईला येऊन त्याबद्दल लिक्विडेशनचा निर्णय शासनाने घेतलेला आहे आणि 462 पतपेढ्या या अडचणीत आहेत. अजित बँकेच्या 50 कोटींच्या ठेवी होत्या त्यापैकी 37 कोटींचा अपहार झालेला आहे. मघाशी येथे ऊसाच्या भावासंबंधी बोलले जात होते. आता या ठिकाणी माननीय मंत्री श्री.विनय कोरे येथे उपस्थित आहेत. त्यामुळे मी साखर कारखान्यांच्या संबंधात सांगू इच्छिते की, एकूण साखर कारखान्यांपैकी 21 कारखान्यांवर कारवाई

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आली आहे तर 29 साखर कारखाने हे लिक्विडेशनमध्ये निघालेले आहेत. सहकारातील या घोटाळ्यांच्या बरोबरच आपल्याला दुसरी असे चित्र दिसते आहे की, शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये प्रत्येक ठिकाणी शेतकरी कायदा हातात घेण्यासाठी प्रवृत्त होत आहेत. मघाशी येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात उल्लेख झाला पण मी येथे मुद्दाम सांगेन की, कापसांच्या गंजींना प्रत्यक्षात काही घातपात करून किंवा वेगवेगळ्या पद्धतीने आग लागल्याच्या घटना घडल्याचे दाखविले गेले आणि त्यामागे केवळ विम्याचे पैसे लाटणे हाच मुख्य होता आणि त्यामुळेच कापूस प्रत्यक्षात जळालेला नसताना तो जळाल्याचे दाखवून विम्याचे पैसे हडप करण्याचे प्रकार चालू आहेत, अशा प्रकारे जवळपास प्रत्येक बाबतीत गोलमाल चालू आहे. पारोळा या ठिकाणी तर खतांच्या प्रश्नावरून गोळीबार झाला आणि शेतकऱ्याचे रक्त सांडले गेले. तरीही सरकार सातत्याने सांगत आहे की, आम्ही शेतकऱ्यांच्या विकासासाठी कसे सातत्याने काम करीत आहोत. मघाशी बोलत असताना काहींनी स्वत:चा बेछूट, बेफिकीर असा जो कारभार आहे तो निवडणुकीशी जोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मला असा प्रश्न येथे विचारावासा वाटतो की, तसे होते, एवढा चांगला कारभार होता तर मग हिंगोलीला श्रीमती सूर्यकांता पाटील का पडल्या ? रायगडमध्ये श्री.अंतुले का पडले आणि शिर्डीमध्ये श्री.रामदास आठवले का पडले ? या निवडणुकीत अनेक मंत्र्यांचा पराभव झालेला आहे असे आपल्याला दिसून येते. मी तर त्यापुढे जाऊन म्हणेन की, तुम्हाला जनतेचा आवाज ऐकू येत नसेल तर तुम्ही विमानातील प्रवासी ज्याप्रमाणे कानात बोळे घालतात तसे बोळे घालू शकता. परंतु ग्रामीण महाराष्ट्रात जनतेमध्ये जो काही परिवर्तनाचा आवाज ऐकू येतो आहे तो तुम्ही शब्दांतून मान्य केला नाहीत तरी पडलेले जे अनेक चेहरे मला दिसताहेत त्यावरून तो निश्चितपणे स्पष्ट होतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करीत असताना मला आपल्या निदर्शनास आणावयास पाहिजे की, या राज्यात शिक्षणाची काय परिस्थिती आहे ? महाराष्ट्रातील 19,910 शाळांत मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत तर प्रगत महाराष्ट्रातील 11,745 शाळेतील विद्यार्थी हे पाण्याविना आहेत. सर्वशिक्षा अभियानाचा निधी येतो आहे म्हणून त्याची कशा रीतीने वासलाव लावली जाते आहे यावर कोणाचेही परिणामकारक वा प्रभावी असे संनियंत्रण नाही. त्याचा परिणाम म्हणजे फार मोठ्या प्रमाणात या शैक्षणिक क्षेत्रात मोठे दुर्लक्ष होत असताना

..... केके 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिसते आहे. आदिवासी आहेत, दलित आहेत, या सगळ्या विपरित परिस्थितीमध्ये देखील आई-वडिलांचे स्वत:च्या मुलांकडे जे थोडेफार लक्ष आहे आणि मध्यम वर्गामध्ये शिक्षणासंबंधी जी उत्सुकता निर्माण झाली आहे त्यातून आपल्याला एक चित्र दिसते आहे की, समाजाच्या तळागाळातीलदेखील गरीब मुलगे आणि विशेषत: मुली आज चांगल्या प्रकारे मार्क्स मिळवित आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे ....एलएल 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

परंतु त्यामध्ये त्यांचे वैयक्तिक कष्ट किती? आणि सरकारचे कष्ट किती याची जर आपण तुलना करावयास लागलो तर गरीब मुलांसाठी सरकारमार्फत जे शिक्षण दिले जाते त्यामध्ये फार मोठया प्रमाणात त्रुटी असल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते. शासनाकडून दोन घोषणा जरी सातत्याने होत असल्यातरी त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे होणार आहे? कोणत्याही शाळांनी निधी घेऊ नये अशाप्रकारची घोषणा माननीय शिक्षण मंत्र्यानी केली. सर्व मुलांकडून देणगी न घेता आपण त्यांना शिक्षणामध्ये संधी देणार आहोत असे त्यांनी सांगितले. त्याची अंमलबजावणी कशी होणार आहे? हा एक मोठा प्रश्न तयार होतो. सभापती महोदय, महिलांना कशाप्रकारे न्याय दिला आहे हे सातत्याने सांगितले जाते. बचत गटांना चार टक्के व्याजाने कर्ज दिले जाईल अशाप्रकारची घोषणा केली आहे. परंतु फक्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडूनच कर्जाची सोय केली जाईल. अशाप्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. त्याचप्रमाणे सप्टेंबर 2008 नंतर जे बचत गट स्थापन झाले असतील त्यांनाच ही व्याजाची सवलत मिळणार आहे, सप्टेंबर 2008 पूर्वी जे लक्षावधी बचत गट स्थापन झाले आहेत त्यांना या चार टक्के व्याजाची सवलत मिळत नाही. त्यामुळे बचत गटाच्या नावाने जो डांगोरा पिटला जात आहे, त्यामधून महिलांच्या अपेक्षा वाढत आहेत. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. सामाजिक कल्याण, आदिवासी कल्याण आणि बाल कामगार यांच्या बाबतीत हे शासन म्हणजे संवेदनहिनतेचा नमुना आहे असे मला म्हणावेसे वाटते. बाल हक्क आयोग तयार करुन त्यावर फक्त एक अधिकारी नेमले गेले. परंतु त्या आयोगावर या सरकारने आतापर्यंत सदस्यांची नियुक्ती केली नाही. जळगाव येथील फटाक्याच्या कारखान्यामध्ये झालेल्या भीषण स्फोटामध्ये लहान मुले अशाच पध्दतीने दगावली. त्या आगीमध्ये महिला व लहान मुले इतक्या प्रमाणात भाजली की, त्यांना ओळखू सुध्दा येत नव्हते. या गोदामांमध्ये काम करणाऱ्या लहान मुलांच्या बाबतीत बोलत असतांना आणि एकीकडे या लहान मुलांचे खून होत असतांना बाल हक्क आयोगाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये या शासनाची संपूर्णपणे संवेदनहीन भूमिका दिसून येते. म्हणून सभापती महोदय, याठिकाणी महिलांच्या प्रश्नासंबंधी बोलत असतांना कायदा व सुव्यवस्थेचा जो बोजवारा उडाला आहे त्याचे चित्र आपणास दिसत आहे. याबाबतीत शासनाने न्याय संस्थेच्या पाठीमागे शक्ती उभी करावयास पाहिजे. त्याठिकाणी रिक्त असलेली अनेक पदे भरली गेली पाहिजेत. फास्ट ट्रॅक कोर्टासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे.....

न्यायाधीश आणि त्यांच्या कर्मचारी वर्गाची सोय केली गेली पाहिजे ती केली गेली नाही. त्यामुळे एका बाजूला संपूर्ण पोलीस दलाचा अकार्यक्षम असा कारभार असल्याचे दिसत आहे. त्याचा परिणाम म्हणजे अनेक खटले उभे रहातात. त्याबाबत www.mahacid.com या वेबसाईटवर संपूर्ण क्राईम ब्रँचचा रिपोर्ट ठेवलेला आहे. त्यामध्ये स्पष्ट झाले आहे की, 10 टक्के केसेसमध्ये सुध्दा आरोपींना शिक्षा होत नाही. खासकरुन जे सामाजिक स्वरुपाचे वेगवेगळे गुन्हे आहेत त्याबाबतचा गुन्हा दाखल होत असतांना त्यामध्ये मोठया प्रमाणात त्रुटी राहिल्या असल्यामुळे आरोपी मोठया प्रमाणात निर्दोष सुटत आहेत. त्यामुळे या आरोपींना असे वाटते की, आम्ही परत परत गुन्हे करीत राहू, आम्हाला वाचविणारा कुणीतरी अधिकारी या सरकारमध्ये आहे अशाप्रकारची भूमिका या सरकारच्या न्याय यंत्रणेमध्ये दिसून येते.

सभापती महोदय, या संपूर्ण पार्श्वभूमीवर समाज कल्याणच्या योजनांची परिस्थिती पाहिली तर सरकार स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. एकीकडे जागतिक मंदीमुळे महाराष्ट्राच्या उत्पनामध्ये 2300 कोटींची घट होणार आहे हे सरकारने स्वत: मान्य केले आहे. अशाप्रकारे उत्पन्न कमी झाल्यानंतर त्यामधून कशाप्रकारे मार्ग काढला जाणार आहे? याबाबत कोणतीही गोष्ट स्पष्ट होत नाही. आज औद्योगिक क्षेत्रातील अनेक कारखाने व उद्योग बंद पडले आहेत. या औद्योगिक क्षेत्रातील अनेक उद्योगांची अवस्था वाईट झाली आहे. त्यांच्या पाठिमागे कुणीही तारणहर्ता नाही. दुसरीकडे ग्रामीण भागात खासकरुन रायगड जिल्हयात एसई झेडच्या नावाखाली जमिनी गिळंकृत करण्याचा धंदा सुरु आहे. त्याठिकाणी कामगारांच्या हाताला काम देण्याऐवजी गरीब लोकांच्य जमिनी स्वत:च्या खिशामध्ये घालण्याचा धंदा सुरु असल्याचे दिसत आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हयातील लवासा येथील कंपनीच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना असो, किंवा सुजलान कंपनीच्या पवन चक्क्याच्या संदर्भातील उपस्थित केलेले मुद्दे असो, सोलापूर जिल्हयात रोजगार हमी योजनेमध्ये झालेला कोटयावधी रुपयांचा घोटाळा असो, लाल गव्हाचा प्रश्न असो या सर्व प्रश्नांच्या बाबतीत विधीमंडळामध्ये आपल्याला न्याय मिळणे अपेक्षित आहे, तो मिळत असतांना 100 अडचणी निर्माण होतात. शेवटी या घोटाळयांना जबाबदार असणाऱ्या लोकांना निर्णायकपणे जी शिक्षा झाली पाहिजे ती कां होत नाही? त्यांना कोण संरक्षण देत आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या लोकांना कोण संरक्षण देत आहे ? एस.ई.झेड.च्या जमिनी गिळंकृत करण्यासाठी कोण, कशा पध्दतीने प्रयत्न करीत आहेत. सुप्रीम कोर्टाने सांगितले की, तुम्हाला या जमिनी अधिग्रहण करता येणार नाहीत, तरी देखील सरकारने या जमिनींच्या संबंधातील 6:1 ची नोटीस अजूनही का रद्द केलेली नाही. पण अशी स्थिती आहे की, सरकारची या सगळया प्रश्नांची उत्तरे देण्याची नैतिक क्षमताच नाही. परंतु मी असे म्हणेन की, नैतिक-अनैतिक पेक्षा सुध्दा कायदेशीररित्या जे निर्णय दिले पाहिजेत, ते सुध्दा दिले जात नाहीत ही यातील वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आमचे बरेचसे सहकारी मुंबईच्या प्रश्नांबाबत बोलतील, परंतु मला मुद्दाम दोन मुद्यांच्या बाबतीत लक्ष वेधले पाहिजे. एक म्हणजे मुंबईसाठी मोठया प्रमाणात जो निधी उपलब्ध व्हावयास पाहिजे, तो निधी गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईसाठी मिळालेलाच नाही. त्यामुळे सातत्याने अशी चर्चा होत आहे की, मुंबईसाठी एक सी.ई.ओ.असला पाहिजे आणि तो मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील असावा अशा प्रकारची भूमिका काल माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवसेना कार्याध्यक्ष माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांच्याबरोबर बोलत असताना स्पष्ट केलेली आहे. परंतु ही भूमिका स्विकारल्यानंतर मुंबई महानगरपालिकेला कशा प्रकारे अधिकार मिळणार आहेत, ही गोष्ट आजही स्पष्ट झालेली नाही. आपल्याला प्रत्येक ठिकाणी एका बाजूने राज्य सरकार आणि दुसऱ्या बाजूने केंद्र सरकार मुंबईच्या विकासामध्ये अडथळे आणत असल्याचे दिसत आहे ही यातील वस्तुस्थिती आहे. तसेच मला मुंबईच्या संदर्भात दुसरा एक महत्वाचा मुद्दा मांडावयास पाहिजे. मुंबई आणि आसपासचे सर्व भागाबाबत सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी भाषण करीत असताना मुद्दा मांडला आहे आणि शिवसेनेने यु.एल.सी.च्या बाबतीत वेगळी भूमिका घेतली होती आणि त्याचे कारण असे होते की, मुंबईमध्ये भूमिपूत्रांना राहण्यासाठी जागा मिळावी यासाठी सरकारचा हस्तक्षेप असावयास पाहिजे आणि आमचा या दृष्टीकोनातून सदरहू मुद्याला विरोध आहे. परंतु सरकारने हा कायदा रद्द केल्यानंतर खरोखर किती गरीब लोकांना घरे मिळवून दिली आहेत? याची उत्तरे कुठे ना कुठे मिळाली पाहिजेत. परंतु आपल्या लोकशाही प्रक्रियेमध्ये ज्या गोष्टी घडत असतात, त्यामध्ये अनेक वेळेला सर्वसामान्य माणसांचा आवाज उठविणाऱ्या लोकांपेक्षा देखील, जसे एक जुने गाणे आहे की, "उष:काल होता-होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली" तशा पध्दतीने येथील जे सामान्य लोक आहेत, सामान्य शेतकरी आहेत,

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

किंवा मुंबईमधील माणसे आहेत, ग्रामीण भागातील माणसे आहेत, त्यांच्याबाबतीत आपल्याला एक चित्र स्पष्टपणे दिसत आहे की, आता लोकांच्या मनामध्ये जागृती होत आहे. पण राज्यामध्ये भारनियमनासारखे मुद्दे आहेत, बँकांच्या व्यवहाराचे मुद्दे आहेत, परंतु या सगळया मुद्यांच्या बाबतीत सरकारकडून कोणतेही संरक्षण मिळत नसल्यामुळे लोक स्वत:च हिंसाचाराकडे प्रवृत्त होत आहेत. काल याठिकाणी नक्षलवादावर चर्चा झाली आहे. तशाच पध्दतीने आजही या विषयाच्या बाबतीत चर्चा होत असताना, सरकार मात्र स्वत:ची पाठ थोपटून घेऊन कुठे ना कुठे सारवासारव करण्याचा प्रयत्न करीत आहे. मला याठिकाणी एका प्रसिध्द नाटकाची आठवण होते आणि त्याचे नाव आहे "तो मी नव्हेच". त्यामध्ये लखोबा लोखंडे हे पात्र असते आणि कोर्टामध्ये ज्यावेळी प्रत्येक महिला त्याच्यावर फसवणुकीचा आरोप करते, तेव्हा तो एक मोठे भाषण करतो आणि शेवटी असे म्हणतो की,"तो मी नव्हेच". तसेच शेतकरी आत्महत्या करीत आहे पण सरकार म्हणते की "तो मी नव्हेच", दलितांना डावलले जात आहे परंतु सरकार म्हणते की,"तो मी नव्हेच", तुम्ही ज्या अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे तुणतुणे सारखे वाजवित असता, पण तुम्ही त्या अल्पसंख्यांकांना निर्णय प्रक्रियेमध्ये अजिबात वाव दिलेला नाही, तरी सरकार म्हणते की,"तो मी नव्हेच", महिलांवर अत्याचार होत असताना, अनेक ठिकाणी लोकांवर कायदा हातामध्ये घेण्याची वेळ येत आहे आणि याबाबत सरकारला जाब विचारीत आहेत, परंतु सरकार म्हणते की,"तो मी नव्हेच". अशा प्रकारे "तो मी नव्हेच" "तो मी नव्हेच" अशा प्रकारची भूमिका घेतली जात आहे आणि तुमच्या सरकारच्या "तो मी नव्हेच" या भूमिकेबद्दल जनतेच्या न्यायालयामध्ये उत्तर द्यावे लागणार आहे, सर्वांनाच उत्तर द्यावे लागणार आहे. अशा वेळी "तो मी नव्हेच" असे म्हणणे म्हणजे चांगल्या पध्दतीचे प्रशासन आणि विकास देण्याची कुवत सरकारमध्ये नाही आणि अशा वेळेला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सरकारने जो प्रयत्न केलेला आहे, तो म्हणजे एखाद्या माणसाच्या कुडीतील प्राण निघून गेल्यानंतर देखील माणूस म्हणतो की, तो जिवंत आहे. तशा पध्दतीची तुमची धडपड सुरु आहे, त्यातून जनतेला मात्र सर्व चित्र स्पष्टपणे दिसत आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपविते. जय महाराष्ट्र.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर चर्चा के दौरान सामने बैठे हुए विरोधी पक्ष के मित्रों के भाषण मैंने सुने. मुझे आश्चर्य होता है कि बाहर कितनी भी धूप हो, लेकिन अगर किसी ने काला चश्मा लगाया है तो उसे काला ही दिखाई देता है. कुछ ऐसी ही परिस्थिति विरोधी पक्ष के माननीय सदस्यों की हो रही है. हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्यों ने तो काले चश्मे की जगह काली पट्टी ही लगा ली है, उनको सब तरफ अंधेरा ही दिखाई देता है. देश और प्रदेश के सामने हजार समस्याएं होती हैं और इसमें से 985 समस्याओं का हल निकलता है तो उनको हल की गई समस्याएं दिखाई नहीं देती, बल्कि जिन 15 समस्याओं का हल नहीं निकला है, वे ही उनको दिखाई देती है. पानी का गिलास 90 प्रतिशत भरा है तो मुझे आश्चर्य होता है कि उनको भरा हुआ भाग दिखाई नहीं देता, उनको तो केवल 10 प्रतिशत खाली गिलास दिखाई देता है.

सभापति महोदय, इन लोगों ने 26.11.2008 की घटना के बारे में बहुत कुछ बोला और यह कहा गया कि कसाब पर एक्शन क्यों नहीं लिया गया. अन्तर्राष्ट्रीय परिस्थिति होती है और कानून को देखते हुए कसाब को भी न्याय का मौका देने का मतलब यह नहीं हुआ कि हमने उसे छोड़ दिया. मैं इस बारे में सब से पहली बात यह कहना चाहूँगी कि कम से कम टेररिस्ट को प्लेन में बिठाकर हम उन्हें विदेश में छोड़कर तो नहीं आए. आप उनको घर तक छोड़कर आए, इसलिए 26.11.2008 की घटना के बारे में आपको बोलने का अधिकार नहीं है. दूसरी बात मैं यह कहना चाहूँगी कि जब पार्लियामेंट पर हमला हुआ तो आप ने क्या किया. जबकि 26.11.2008 की घटना होने के बाद हमारे माननीय मुख्य मंत्री और उप मुख्य मंत्री ने त्यागपत्र दिया. पार्लियामेंट पर हमले की घटना के बाद आप में से किसी ने भी त्यागपत्र नहीं दिया था. यह सब देखने और समझने वाली बातें हैं.

सभापति महोदय, हमारे विरोधी पक्ष के मित्रों ने कहा कि सरकार ने शेतकरी के लिए कुछ नहीं किया. इन्होंने तो काला चश्मा पहन रखा है. महाराष्ट्र सरकार ने अपनी नीतियों के द्वारा प्रदेश की जनता का सर्वांगीण विकास किया है. हमारी सरकार ने शेतकरी का हमेशा ख्याल रखा है. उनको जब जब जरुरत पड़ी है, तब तब सरकार ने उनको मदद की है. कई स्थानों पर बारिश नहीं हुई तो विदर्भ में रोजगार हमी योजना के अन्तर्गत ग्रामीण भाग के लोगों को

. . . NN 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती मधु जैन

तत्काल रोजगार देने का प्रयत्न किया गया. सिंचन के क्षेत्र में बहुत से प्रकल्पों के ऊपर हजारों करोड़ रुपए खर्च हुए हैं. बहुत से बांध बनाकर पानी को रोका गया है और उससे महाराष्ट्र की सिंचन क्षमता में बढ़ोतरी हुई है. यह सब हमारे माननीय मित्रों को दिखाई नहीं देता है.

सभापति महोदय, हजारों करोड़ रुपए की कर्जमाफी शेतकरी को दी गई है और उन्होंने चैन की सांस ली है. शेतकरी की चैन की सांस उनको सुनाई नहीं देती है. केवल इतना ही नहीं, उनको यह भी मालूम नहीं होगा हमारे महाराष्ट्र में स्वच्छ गांवों के लिए निर्मल ग्राम पुरस्कार सरकार की ओर से दिए जाते हैं. इसके अन्तर्गत 6,668 ग्राम पंचायतों को और 60 पंचायत समितियों को यह पुरस्कार दिया गया है.

सभापति महोदय, हमारे देश के सामने दूसरी बड़ी समस्या रोजगार की है. रोजगार की समस्या को हल करने के लिए रोजगार की निर्मिति करने की कोशिश की गई है. लेकिन सब से बड़ी बात यह है कि बेरोजगार लोगों को मालूम नहीं होता है कि उनको रोजगार की संधि कहां मिलेगी. इसके लिए महाराष्ट्र सरकार ने "ई-गवर्नेंस" के अन्दर "रोजगार वाहिनी" के नाम से वेब साइट शुरु की गई है. इसके द्वारा लोगों को बहुत मदद मिलती है. उसके लिए महाराष्ट्र सरकार को "ई-गवर्नेंस अवार्ड" मिला है. ये सब बातें हमारे मित्रों की समझ से बाहर हैं.

सभापति महोदय, हमारे विरोधी पक्ष के मित्र जब महिलाओं के विषय में बोलते हैं कि महाराष्ट्र सरकार ने महिलाओं के लिए कुछ नहीं किया तो मुझे आश्चर्य होता है. हमारी सरकार ने 4 प्रतिशत की दर पर कर्ज देकर महिलाओं को सशक्त बनाने की कोशिश की है. इसके पहले हमारी केन्द्रीय सरकार ने लोकल सेल्फ गवर्नमेंट में महिलाओं को 33 प्रतिशत का आरक्षण दिया, जिससे स्थानीय स्तर पर महिलाओं का योगदान बढ़ा है. इस अवसर पर मैं माननीय नीलम ताई के ध्यान में यह बात लाना चाहती हूँ कि शिवसेना के एक पदाधिकारी के कारखाने में बच्चों को जिस तरह से रोजगार दिया जाता है और उनसे जिस तरह से काम लिया जाता है, वह कितना गैर कानूनी है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुद्धित प्रत/ शीघ्रलेखाही नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. सुरेश जेथलिया)

श्रीमती मधु जैन .....

शायद मेरी बहन सम्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोरहे को मालूम नहीं है कि पारोला स्थित जिस कारखाने में दुर्घटना हुई है, उस कारखाने के मालिक शिवसेना पार्टी के है और वे नगरपालिका के अध्यक्ष थे.

डॉ. नीलम गोऱ्हे : आपण अंमलबजावणी का केली नाही ? आम्ही निरपेक्ष आहोत.

श्रीमती मधु जैन : कार्रवाई की है.

डॉ. नीलम गोऱ्हे : मुले मेल्यावर कारवाई करण्यात काय अर्थ आहे ?

श्रीमती मधु जैन : उस मामले में उचित कार्रवाई हो रही है. आप मेरे कहने का मतलब समझिए. उन्होंने कितने झूठे रिकॉर्ड किए हैं, मैं उसके बारे में बहुत कुछ बोल सकती हूं. लेकिन वह विषय दूसरा है, इसलिए मैं उस पर बोलना नहीं चाहती.

सभापति महोदय, सम्माननीय सदस्य ने अभी यहां बताया कि पहले के अनुपात में उत्पन्न कम हुआ है. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगी कि विश्व में फैली मंदी का असर सभी देशों पर हुआ है. यह सच है कि मंदी का असर हमारे देश पर भी हुआ है. हमारा देश जगत के बाहर नहीं है. जगत के अंदर ही है. इसलिए स्वाभाविक है कि मंदी का असर हमारे देश पर भी होगा. लेकिन इसके बावजूद भी जिस तरह से हमारा देश प्रगति कर रहा है, उसके आंकड़े सभी के सामने है. इसके अतिरिक्त मैं और दो-तीन मुद्दों के बारे में बोलना चाहूंगी. एसईझेड के बारे में यह बताना चाहती हूं कि केन्द्रीय सरकार ने 141 विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर किए हैं. इस विशेष आर्थिक क्षेत्र में 1 लाख 80 हजार 734 करोड़ रुपये इनवेस्ट किए जाएंगे और इसके द्वारा 65 लाख रोजगार के अवसर उपलब्ध होंगे. चालू वित्तीय वर्ष में 14 विशेष आर्थिक क्षेत्र सहित अब तक कुल 43 विशेष आर्थिक क्षेत्र नोटिफाईड हुए है. ये विकास के ही कदम हैं. एक दिन में या एक रात में विकास नहीं होता है. रात्री खाल्ले तूप आणि दिवसा आले रुप, ऐसा नही होता है. विकास करने के लिए प्लानिंग करनी पड़ती है. एक एक कदम बढ़ाकर चलना पड़ता है तब विकास होता है. देश के सर्वांगीण विकास के लिए इस प्रकार की प्लानिंग करनी पड़ती है. इसी प्रकार से देश का सर्वांगीण विकास हो सकता है. जिस देश (भारत) की जनसंख्या विश्व में दूसरे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन .....

नंबर पर है वह देश इसी प्रकार से प्रगति कर सकता है. माननीय राज्यपाल जी के अभिभाषण में यह भी उल्लेख है कि ग्रामीण क्षेत्रों में स्वास्थ्य संबंधी सुविधाओं का लाभ पहुंचाया जा रहा है. नई योजनाएं शुरु हुई है. बीपीएल के अन्तर्गत 15 हजार 726 परिवारों को स्मार्टकार्ड दिए गए हैं. उनके द्वारा ये परिवार 725 बीमारियों का नि:शुल्क इलाज करवा सकते है. अल्पसंख्याक समाज के बच्चों की शिक्षा के लिए स्कालरशिप प्रदान करने की योजना है. अनुसूचित जाति के विद्यार्थियों के लिए प्रशिक्षण कार्यक्रम तैयार किया गया है. सरकार ने अनुसूचित जाति के बेरोजगार युवकों के लिए रिटेल व्यवस्थापन के तहत प्रशिक्षण कार्यक्रम शुरु किया है. इस कार्यक्रम के अन्तर्गत 5653 युवकों को प्रशिक्षण दिया गया है. राज्य के युवकों को अधिकाधिक नौकरी के अवसर उपलब्ध कराने की दृष्टि से 33 शॉर्ट टर्म के व्यावसायिक पाठ्यक्रम शासकीय तंत्र शाला तथा अशासकीय संस्था इन दोनों में शुरु किए गए हैं ताकि ज्यादा से ज्यादा बेरोजगार युवकों को रोजगार मिल सके. उसी प्रकार से केन्द्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सड़क योजना सफलतापूर्वक कार्यान्वित की गई है. इस योजना के अन्तर्गत मंजूर किए गए 4199 रास्तों में से 3801 ग्रामीण बस्तियों को जोड़ने वाले 9520 किलोमीटर के 3139 रास्तों का निर्माण किया गया है. इसी तरह से कुछ महत्वपूर्ण राज्य महामार्ग के चौपदीकरण का कार्यक्रम शुरु किया गया है. इसके तहत 8444 करोड़ रुपये के 2561 किलोमीटर मार्ग के 39 प्रोजेक्ट को मान्यता दी गई है. ग्रामीण क्षेत्र में इंदिरा आवास योजना और राजीव गांधी निवारा योजना के तहत 5 लाख से अधिक घरों का निर्माण किया जा रहा है. अभी यहां मेरे एक भाई ने कहा कि स्लम का विषय बहुत गंभीर होते जा रहा है. मैं यह कहना चाहूंगी कि एक दिन में स्लम नहीं हटेगा. शहर को स्लमलैस करने के संबंध में कदम उठाए गए हैं. इस कार्य के लिए केन्द्रीय सरकार से अनुदान मिला है. अत: मैं यह कह सकती हूं कि स्लम में रहने वालों का पुनर्वास करने के लिए कदम उठाए जा रहे हैं.

यानंतर श्री शर्मा.....

अशोधित प्रति / अशोधित नहीं

. . . . श्रीमती मधु जैन का भाषण जारी (पूर्वी तालेवार)

पावर के बारे में विरोधी पक्ष के मित्रों ने कहा. मैं फिर से वही बात कहना चाहती हूँ "रात्री खाल्ले तूप, दिवसा आले रुप" इस प्रकार की बात नहीं है, उसमें समय लगता है. 2 हजार मेगावाट की इन्सटॉल केपेसिटी बढ़ाई गई है और आने वाले ढाई-तीन साल में इतने प्रकल्प आ रहे हैं कि पावर की समस्या हमारे राज्य में खत्म हो जाएगी.

सभापति महोदय, इसके अलावा 5 जगह पर नए एयरपोर्ट बनाए जा रहे हैं. एक भी क्षेत्र ऐसा नहीं है जहां पर सरकार ने काम नहीं किया है. आम आदमी के लिए महाराष्ट्र सरकार और केन्द्र सरकार की ओर से काम किए गए हैं और केन्द्र सरकार के लिए जनता ने अपना समर्थन देकर इस बात पर मोहर लगा दी है कि कांग्रेस पक्ष आम आदमी के साथ है. केन्द्र सरकार को जो समर्थन मिला है, वह केवल आम आदमी का ही नहीं मिला है, बल्कि सब लोगों का समर्थन मिला है.

सभापति महोदय, लोकसभा के चुनाव प्रचार के दौरान मुझे एक बात महसूस हुई कि विपक्ष के पास कोई मुद्दा ही नहीं था. इसलिए उनके बारे में एक कहावत सही मालूम होती है "खिसियानी बिल्ली खंबा नोचे". उनके पास जब कोई मुद्दा नहीं था, जब उनकी कुछ समझ में नहीं आ रहा था, तब उन्होंने खिसियाकर खंबे को नोचना शुरु कर दिया. जो 5 प्रतिशत काम बाकी है, वहीं उनको दिखाई दे रहा था. लोकसभा चुनाव के नतीजों के बारे मैं यह कहना चाहूँगी कि विपक्ष के लिए अंगूर खट्टे हैं. माननीय राज्यपाल महोदय ने जो अभिभाषण किया है, इसके लिए मैं उनका हार्दिक अभिनंदन करती हूँ. धन्यवाद.

. . . . .

भाषण पूर्ण, नंतर PP-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल राज्यपालांचे आणि सरकारचे अभिनंदन करण्यासाठी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, मी माझे विचार थोडक्यात व्यक्त करणार आहे. खरे म्हणजे 26 नोव्हेंबर, 2008 रोजी अतिरेक्यांकडून मुंबईवर झालेला हल्ला हा केवळ मुंबईवर नव्हता किंवा महाराष्ट्रावर नव्हता तर या देशावर झालेला हल्ला होता, देशाच्या एकात्मतेवर झालेला हल्ला होता. या हल्ल्याला सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक, कमांडोज, पोलीस आणि मुंबईच्या नागरिकांनी या हल्ल्याला धीरोदात्तपणे उत्तर दिले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या हल्ल्यामध्ये 9 अतिरेक्यांचा मृत्यू झाला आणि एकाला जिवंत पकडण्यात आले. सभापती महोदय, मला या महाराष्ट्रातील आणि आपल्या देशातील जनतेचे कौतुक करावेसे वाटते ते यासाठी की, आपल्या देशावर कोणताही हल्ल झाला तरी त्या हल्ल्यानंतर जनजीवन सुरळीत करण्यामध्ये आपण यशस्वी होतो. म्हणूनच मुंबईवरील 26/11च्या हल्ल्यानंतर देखील आपण थोडयाच कालावधीमध्ये आपण आपले जनजीवन सुरळीत करण्यामध्ये यशस्वी झालो. या हल्ल्यामध्ये हुतात्मे झालेल्यांना जी मदत करण्यात आली त्या मदतीच्या संदर्भात मी महाराष्ट्र शासनाचे कौतुक करते. परंतु एक बाब स्पष्टपणे लक्षात ठेवली पाहिजे की गेलेल्या जिवाची कोणतीही किंमत असू शकत नाही. आपण जरी 25 लाख रु.ची मदत दिली तरी गेलेल्या माणसाच्या जिवाची ती किंमत असू शकत नाही. म्हणून अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले होऊ नयेत यासाठी खबरदारी घेणे आणि यंत्रणेमध्ये सुधार करणे ही काळाची गरज आहे. मला सांगण्यास समाधान वाटते की, महाराष्ट्र शासनाने या दृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केलेली आहे. ज्याप्रमाणे 26/11च्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांना शासनाने मदत केली त्याच पध्दतीने नक्षलवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या पोलीसांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. आपली कुटुंब व्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्यावर घर उघड्यावर पडते. त्या कुटुंबाची जबाबदारी शासनाने घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. हे नक्षलवादी हल्ले, अतिरेकी हल्ले पुन्हा पुन्हा होणार नाहीत या दृष्टीनेही शासनाने पावले टाकलेली आहेत. काल या सभागृहामध्ये गडचिरोली जिल्ह्यामध्ये झालेल्या नक्षलवादी हल्ल्याच्या संदर्भात चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये नक्षलवादी पुन्हा निर्माण होऊ नयेत याची दक्षता घेण्यासंबंधीच्या सूचना करण्यात आल्या. त्या सूचनांची चर्चा प्रत्येक ठिकाणी होण्याची गरज आहे. ज्या दिवशी विकास समान पातळीवर येईल त्या दिवशी एकही नक्षलवादी निर्माण होणार नाही. महाराष्ट्र शासनाने देखील नक्षलग्रस्त भागामध्ये करोडो रुपये खर्च करुन विकास करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या कामाला गती देऊन विकासाचा असमतोलपणा दूर करण्याची गरज आहे. तसेच राज्य सरकार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा नाही, सामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे...)

किंवा नाही हे देखील आपण तपासून पाहिले पाहिजे. तळागाळातील शेवटच्या घटकाला न्याय देण्यासाठी कोणती पावले शासनाने उचलली आहेत या गोष्टींचा देखील आपण विचार केला पाहिजे आणि त्यामध्ये सर्वात महत्वाची अशी कोणती गोष्ट असेल तर ती मला वाटते घरेलू कामगारांच्या संदर्भातील आहे. नोंदणीकृत घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम 2008 हा विशेष कायदा केला त्याबद्दल मला महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करावेसे वाटते. तसेच 1 जानेवारी 2006 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला असल्यामुळे राज्यातील 21.42 लाख शासकीय कर्मचा-यांना त्या निर्णयाचा फायदा होईल. या निर्णयाबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. त्याचप्रमाणे अत्यंत महत्वाच्या अशा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात घटनेच्या अनुच्छेद 31(ख) नुसार तो विषय न्यायालयात दाखल करुन चांगले वकील नेमण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्राची अस्मिता जपण्याचा या शासनाने प्रयत्न केलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 15:50

ॲड.उषा दराडे....

महाराष्ट्राचा विकास सिंचनावर अवलंबून आहे. या राज्यात जेवढा शहरी भाग आहे, तेवढाच ग्रामीण भाग आहे. सिंचनाचा अनुशेष ही महाराष्ट्राची फार मोठी अडचण आहे. तो अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने विदर्भातील सहा जिल्हयामध्ये 89 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न महाराष्ट्र शासनाने केलेला आहे. 2008-09 या वर्षाकरिता 70 हजार 500 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी 536 कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारने केली आहे. याच पॅकेजसाठी केंद्र सरकारने 1500 कोटी रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे. एवढयावर शासन थांबले नाही तर विदर्भातील सहा आपदग्रस्त जिल्हयामध्ये धडक विहीर योजनेची अंमलबजावणी केली आहे. प्रत्येक तालुक्यात 1300 विहिरी देण्याचा निर्णय घेतला. 16 एकर पर्यंत जमीन धारणा करण्याची क्षमता आहे अशा शेतक-यांना या योजनेचा लाभ दिला. विदर्भात 6 हजार चेक डॅम्स निर्माण केले. त्यासाठी 20 कोटी रुपये खर्च केलेला आहे. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये शेततळी शासनाने निर्माण केली आहेत. मराठवाडयातील 16 जिल्हयांना शेततळयांचा फायदा दिलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात देखील 5 जिल्हयांमध्ये शेततळयांचे विस्तारीकरण राज्य शासनाने केलेले आहे. राज्य शासनाने सिंचन क्षमता वाढविण्यासाठी उचललेले हे अत्यंत चांगले पाऊल आहे. केंद्र पुरस्कृत योजनेतून 30 हजार विहिरींचे पुनर्भरण करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे कृषी विकास फार मोठया प्रमाणावर होणार आहे. 3 लाख 30 हजार विहिरींचे पुनर्भरण करुन कृषी क्षेत्रामध्ये सिंचन वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासन चांगल्या प्रकारे प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासामध्ये कधी मिळाले नाही असे 62 हजार कोटी रुपयांचे पॅकेज केंद्रीय कृषी मंत्री आणि केंद्रीय सरकार यांनी राज्य शासनास उपलब्ध करुन दिले आहे. त्यापैकी 7 हजार 872 कोटी रुपयांचा महाराष्ट्राला लाभ झाला. या पॅकेजचा 38 लाख शेतक-यांना लाभ झाला आणि 6 हजार 802 कोटी रुपयांचे पॅकेज महाराष्ट्र शासनाने दिले आहे आणि त्याचा फायदा 40 लाख शेतक-यांना झाला आहे. या पॅकेजच्या माध्यमातून 20 हजार रुपयांपर्यंतच्या पार्शीयल कर्जमाफी 40 लाख शेतक-यांना देण्यामध्ये राज्य शासन यशस्वी झाले आहे. शेतक-यांच्या जगण्याचा मार्ग राज्य शासनाने सुसहय केलेला आहे. ज्या चांगल्या गोष्टी आहेत, त्या स्वीकारल्या पाहिजेत. ज्या गोष्टी चांगल्या नाहीत, त्याला नकारात्मक सूर लावला पाहिजे. शासनाने ज्या चांगल्या गोष्टी केल्या, त्याही चांगल्या नाहीत आणि नाही केल्या त्याही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

वाईट आहेत असे म्हणून सरकारला एका नकारात्मक भूमिकेमध्ये उभे करणे हे लोकशाहीच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या आरोग्याला हितकारक असणार नाही. या गोष्टीची दखल सभागृहाने घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सावकारी पध्दतीचं नियमन करण्यासाठी महाराष्ट्र शासनानें निर्णय घेऊन माननीय राष्ट्रपतींकडे हा कायदा करण्याच्या दृष्टीने अनुदेशासाठी सादर केलेले आहे. खाजगी सावकारांकडून शेतक-यांची मोठया प्रमाणात पिळवणूक होते आहे, त्यातून त्यांना मुक्त करणे ही भावना महाराष्ट्र शासनाची आहे. महाराष्ट्र शासनाच्या या भावनेचे आपण सर्वांनी निश्चितपणे स्वागत केले पाहिजे. ज्या प्रमाणे केंद्र सरकारने पतपुरवठा वाढवून देण्याचा प्रयत्न केला. खताला सबसिडी देण्याचा प्रयत्न केला. खतांचे भाव जागतिक पातळीवर वाढता आहेत, पण या देशामध्ये ते वाढू नयेत अशी केंद्र शासनाची भूमिका आहे. आज जागतिक पातळीवर रासायनीक खतांचे भाव 10 पटीने वाढले आहेत. जगात मोठया प्रमाणात जागतिक मंदी असताना सुध्दा केंद्र शासनाने रासायनीक खतासाठी 2 लाख कोटीची सबसिडी ज्या पध्दतीने दिली, त्याच पध्दतीने शेतक-यांच्या प्रत्येक प्रश्नाकडे महाराष्ट्र शासन सुध्दा तेवढयाच गांभीर्याने बघते आहे. या वर्षी खताची टंचाई दूर व्हावी म्हणून जाणीवपूर्वक चार-सहा महिने अगोदर पैशांची तरतूद करुन महाराष्ट्र शासनाने सुध्दा रासायनीक खतांचा साठा करण्याचा प्रयत्न केला. म्हणून मला खात्री वाटते की, गेल्या वर्षी किंवा तसेच मागील काही वर्षामध्ये खतांचा तुटवडा आपल्याला बघावयास मिळाला. तो तुटवडा या वर्षी आपल्याला बघावयास मिळणार नाही.

सभापती महोदय, विदर्भात तीन वर्षात 120 कोटी रुपये खर्च करुन 6 हजार चेक डॅम्स तयार केले आहेत. कापसाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर महाराष्ट्र हे कापूस उत्पादक राज्य म्हणून पुढे येत आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

बी.टी.वाण महाराष्ट्रात लोकप्रिय झाले. बीड जिल्हा कापूस उत्पादनामध्ये राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. हे पांढरे सोने कॅश क्रॉप म्हणून पिकविले जाते. देशाला अन्नधान्याची गरज होती. दोन वर्षापूर्वी परदेशातून गहू आयात करावा लागला होता. केंद्र शासनाच्या निर्णयामुळे आणि भूमिकेमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले. शेतकऱ्यांच्या मालाचे भाव वाढले. गहू, डाळी यांचे भाव वाढले. त्याचा परिणाम म्हणून आपण स्वयंभू झालो. देशाला अन्नधान्याची गरज असताना सुध्दा कॅश क्रॉप म्हणून शेतकरी कापसाकडे पाहतो. कापूस महाराष्ट्रात मोठया प्रमाणात पिकविला जातो. या कापसाला 2850 प्रति क्विंटल भाव देऊन 4500 कोटी रुपयांचा 150 लाख क्विंटल कापूस केंद्र शासनाच्या मदतीने खरेदी करण्यात आपण यशस्वी झालो व शेतकऱ्यांना वेळेवर पैसे देऊ शकलो याची देखील विशेष दखल घ्यावी लागेल.

सभापती महोदय, माळेगाव, ता.बारामती येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे केंद्र स्थापन करण्याचा निर्णय झाला. या केंद्रात नवीन पध्दतीने संशोधन होण्याची गरज आहे. नवीन प्रदुषित वातावरणामध्ये कमी पाण्यामध्ये कशी शेती करायची याचे संशोधन झाले पाहिजे. आपण ठिबक व स्प्रिंकल, वेगवेगळी रासायनिक खते वापरुन शेती करण्याचा प्रयोग केला. परंतु यापुढे जाऊन जगाच्या पाठीवर शेतकऱ्यांनी स्पर्धा करावयाची असेल तर त्यादृष्टीने संशोधन करण्याची गरज आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने जमीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला त्याचे आपण स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 6 मे, 2002 पूर्वी हस्तांतरित केलेल्या विविध वतन व इनामी जमिनींचे हस्तांतर नियमित करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा केली गेली. नवबौध्द व अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना 100 टक्के अर्थसहाय्य देऊन पॉवर टिलर्स पुरविण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद फार अत्यल्प असल्यामुळे त्यामध्ये भरीव वाढ करुन मागासवर्गीय, नवबौध्दांकडे जमीन फार कमी प्रमाणात असल्यामुळे त्यांना पॉवर टिलर पुरविण्यासाठी निधीमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. तो निधी दिला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, मागील तीन वर्षात 13,446 कोटी रुपये खर्च करुन 4.82 लाख हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करण्यात आली आहे. सर्व ग्रामीण वाड्या वस्त्यांना शुध्द पिण्याचे पाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

पुरविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. तांडा विकास योजनेत पूर्वी 5 लाख रुपये दिले जात होते त्यामध्ये वाढ करुन 10 लाख रुपये देऊन ती योजना यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न केला आहे. निर्मल ग्राम योजनेमध्ये ग्रामीण स्वच्छता अभियान ही योजना सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी सुरु केली होती त्या योजनेचे देश पातळीवर स्वागत केले गेले आहे. निर्मल ग्राम योजनेमध्ये महाराष्ट्र देशाच्या पातळीवर अग्रेसर राहिला आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन योजनेमध्ये उस्मानाबादी शेळी विकसित करण्यासाठी शेळी पैदास व विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहे. दूध उत्पादनात वाढ करण्यासाठी शासनाने मराठवाडा क्षेत्रात एकात्मिक दुग्धशाळा उद्यान योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा स्तरावर डीपीडीसी जिल्हा योजनेसाठी असलेला 900 कोटी रुपये इतका नियतव्यय 2500 कोटी रुपयांपर्यंत वाढविला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महिला बचत गटाच्या संदर्भात भूमिका व्यक्त केली आहे. 4टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा महाराष्ट्र शासनाने केली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. 4 टक्के व्याज दराने महिला बचत गटांबरोबरच शेतकऱ्यांना व ज्यांना कर्ज आवश्यक आहे त्यांना कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. या योजनेची ताबडतोबीने अंमलबजावणी व्हावी. राज्यातील सर्वच महिला बचत गटांना ही योजना कशी लागू होईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 135 विशाल प्रकल्प मान्य केले असून 1,53,900 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित केलेली आहे. त्यातून 3.31 लाख नोकऱ्या निर्माण होतील असा आशावाद महाराष्ट्र शासनाने व्यक्त केला आहे. 35 नवीन विशाल प्रकल्पांना मान्यता दिली आहे. मी माननीय राज्यपाल व महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करते. संकटांचा सामना करीत करीत महाराष्ट्र पुढे जात आहे. नकारात्मक बाबींचा सामना करीत पुढे जात आहे. मालेगावमध्ये ज्या पध्दतीने घटना आणि दंगल घडली त्यामध्ये ज्या पध्दतीने आरोपी समोर आले ते पाहता निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात जातीय दंगली घडवून आणण्याचा हेतू होता आणि विशिष्ट धार्मिक भावनांनी पेटून उठलेली ही मंडळी होती.

...2टी.1....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे .

त्या आरोपींना शोधून काढण्यात महाराष्ट्र सरकार यशस्वी झाले आहे. त्यामुळे या राज्यावरचे जातीय दंगलीचे संकट दूर झालेले आहे. कायदा सुव्यवस्था, महिला, घरेलू कामगार , शेतकरी शेतमजूर, प्राध्यापक, कर्मचारी, शिक्षक इत्यादींच्या बाबतीत महाराष्ट्र शासन पुरोगामी विचारांची कास धरत एक एक पाऊल पुढे टाकत आहे.

तालिका सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 4.00 वाजेपर्यंत होती. आता सभागृहाची वेळ 5.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, महाराष्ट्राचा विकास म्हणजे नेमके काय आहे ? महाराष्ट्राचा विकास हा फक्त पैशाच्या स्वरुपात सांगता येणार नाही. भौतिक विकाससुध्दा त्यामध्ये अपेक्षित आहे. परंतु फक्त भौतिक विकास म्हणजेच विकास आहे असेही आपल्याला गृहित धरता येणार नाही. महाराष्ट्राने स्वत:चे पुरोगामित्व किती टिकवलेले आहे, महाराष्ट्राने मागासवर्गीय समाजाच्या अस्मिता किती जपण्याचा प्रयत्न केला आहे, महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार जपण्याचा किती प्रयत्न केला आहे, त्याचप्रमाणे जातीयवाद्यांना, अतिरेक्यांना, नक्षलवाद्यांना तोड देत असतांना महाराष्ट्राने स्वत:चे अखंडत्व कसे टिकवले आहे या गोष्टीचे सुध्दा ॲनालिसेस करावे लागेल . सभापती महोदय, या ठिकाणी मी अत्यंत स्वाभिमानाने सांगू इच्छितो की, मुंबईवर जो अतिरेक्यांनी हल्ला केला होता तसेच गडचिरोली भागात नक्षलवाद्यांनी जो हल्ला केला होता त्याचबरोबर राज्यामध्ये आणि देशामध्ये ज्या धार्मिक प्रवृत्ती डोके वर काढू पहात आहेत व समाजामध्ये जातीय दुफळी निर्माण करु पाहतात त्या सगळया प्रवृत्तींना रोखून धरण्यामध्ये महाराष्ट्र यशस्वी झाला आहे.

सभापती महोदय, या चर्चेत भाग घेण्याची आपण मला जी संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल तीव्र खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या चर्चेत भाग घेत असातांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला होता त्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अनेक गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे. राज्यातील शूर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी दहशवाद्यांशी लढतांना शहीद झाले होते त्यांच्या वारसांना मदत देण्याच्या बाबतीत देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यास मला खेंद होतो की, 2007 साली शासनाने अतिरेकी विरोधी पथकातील अधिकारी आणि कर्मचा-यांच्या संदर्भात विमा योजना सुरु केली होती शिपायाचा किती लाख रुपयांचा विमा असावा, पोलीस निरीक्षकाचा किती लाख रुपयांचा विमा असावा, त्याचप्रमाणे कै.हेमंत करकरे यांच्या सारख्या अधिका-यांचा किती लाख रुपयांचा विमा असावा हे ठरविण्यात आले होते. दुर्देवाने शासनाने या अधिका-यांच्या विम्याचा हप्ता भरला नाही त्यामुळे या अधिका-यांच्या वारसांना विम्याचे पैसे मिळू शकलेले नाहीत.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. कोकणाच्या बाबतीत अनेक वेळा या ठिकाणी चर्चा होत असते. आबा उत्पादक शेतक-यांना मदत देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी मागणी केली होती . अवेळी पाऊस आणि कमी थंडी यामुळे या वर्षीसुध्दा कोकणातील आंबा उत्पादकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे कोकणातील आंबा उत्पादक संकटात सापडलेला आहे. मागच्या वर्षी ज्या प्रमाणे आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई देण्श्यात आली होती त्या प्रमाणे या वर्षीसुध्दा नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी मी या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो.

सभापती महोदय, कोकणामध्ये सिंचनापासून शिक्षणापर्यंत सर्वच क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुशेष आहे. त्यामुळे शासनाकडून कोकणावर अन्याय केला जात आहे अशा प्रकारची भावना कोकणातील लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. हा अनुशेष भरुन काढण्यासाझी शासनाने निरनिराळया योजना कोकणात सुरु केल्या पाहिजेत. पर्यटनाच्या संदर्भात कोकणामध्ये विविध योजना सुरु केल्या पाहिजेत. राज्य शा्सनाने गेला दहा वर्षात कोकणाकडे दुर्लक्ष केले आहे त्याबद्दल मी तीव्र खेद व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, राज्यात सिंचनासाठी कोण कोणत्या योजना घेण्यात आलेल्या आहेत याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केलेला आहे. परंतु अनेक प्रकल्प वन जमिनीच्या कायद्यामुळे अडकले आहेत हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. सभापती महोदय , मुंबईच्या जवळ ठाणे जिल्हा असून या जिल्हयातील अनेक प्रकल्प वन विभागाची परवानगी न मिळाल्यामुळे रखडलेले आहेत. शासनाने त्याकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे व केन्द्र सरकारकडे पाठपुरावा न केल्यामुळे ठाणे जिल्हयातील प्रकल्प प्रलंबित आहेत त्यामुळे ठाणे जिल्हयात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या जिल्हयातील अनेक प्रकल्प प्रस्तावित आहेत परंतु वन विभागाची आणि केन्द्र सरकारची परवानगी मिळाली नाही .....

यानतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे प्रकल्प रखडलेले आहेत. अनेक बंधाऱ्यांची कामे रखडलेली आहेत. त्याबाबतीत शासनाने जेवढे लक्ष द्यायला पाहिजे होते ते दिलेले नाही असे म्हणावेसे वाटते. सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे तर या योजनेचा एकंदरीत बट्ट्याबोळ झालेला आहे. या योजनेची जाहिरात करताना एस.टी.च्या मागे लिहिलेले असते की, 15 दिवसात काम आणि 15 दिवसात दाम. परंतु या योजनेची व्याप्ती ज्या प्रमाणात वाढायला पाहिजे होती ती वाढली नाही आणि याबाबतीत शासनाची इच्छाशक्ती देखील तेवढी नसल्याने या योजनेचा बट्ट्याबोळ झालेला आहे. ठाणे जिल्ह्यातील 968 ग्रामसेवकांपैकी जवळपास 700 पदे मंजूर आहेत. एका एका ग्रामसेवकाकडे 4-5 ग्रामपंचायती दिलेल्या असल्याने हे ग्रामसेवक या योजनेकडे योग्य प्रकारे लक्ष देऊ शकत नाहीत. त्यामुळे देखील या योजनेचा पुरता बोजवारा उडालेला आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीएच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, या एमएमआरडीएच्या माध्यमातून केवळ मुंबईला हजारो कोटी रूपये दिले गेले. परंतु ज्याने कोणी या एमएमआरडीएची रचना केली आहे त्याने मुंबईच्या बाहेरील ठाणे आणि रायगड जिल्ह्याचा देखील काही भाग या एमएमआरडीएमध्ये येतो हे लक्षात घेतलेले दिसत नाही. आज मुंबई बाहेरील ठाणे जिल्ह्याचा जो भाग आहे किंवा मुंबईतील ज्या भागातून आपण बाहेर पडतो तेथे आपण योजना राबविली नाही तर मुंबईचा विकास होऊनही काही उपयोग होणार नाही. म्हणूनच मुंबई बरोबरच ठाणे आणि रायगड जिल्ह्यापर्यंतचा जो भाग एमएमआरडीएमध्ये येतो आहे त्या भागामध्ये देखील मुंबईच्या बरोबरीनेच विकास कामे झाली पाहिजेत. त्यासाठी पैसा दिला गेला पाहिजे आणि तो खर्च केला पाहिजे. आज 5 हजार कोटी रूपयांचा बॅकलॉग ठाणे जिल्ह्यात एमएमआरडीएच्या माध्यमातून निर्माण झालेला आहे. याबाबतीत तेथील जनता जागृत झाली आणि आम्ही या संबंधात मोर्चे काढले आणि सांगितले की, तुम्ही मुंबईमध्येच पैसा खर्च करता, पण बाकी ठिकाणी करीत नाही. त्यामुळे आता कोठे निरनिराळ्या योजना ठाणे जिल्ह्याच्या भागामध्ये होऊ लागल्या आहेत. माझ्या मते एमएमआरडीएच्या माध्यमातून आम्ही सर्व राज्यामध्ये समान धोरण घेऊन समतोल साधणार आहोत की नाही ? तसे धोरण ठेवून आपण काम करणार असाल तर रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील भागांसाठी देखील आपल्याला योजना तयार कराव्या लागतील आणि त्याचे प्रस्ताव शासनाकडे पडून आहेत. ते आपण लवकर मार्गी लावले पाहिजे. आणखी एक गोष्ट अशी निदर्शनास येत आहे

..... यूयू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

की, एमएमआरडीकडे जो आपण पैसा दिलेला आहे त्या पैशाचा दुरूपयोग करण्याचा प्रकार सुरू झालेला आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून आपण अनेक स्कायवॉक बांधण्याचे काम घेतले आहे. पण कित्येक ठिकाणी तर त्यांची गरजच नाही पण तेथेही स्कायवॉक घेतले जात आहेत. उदाहरण म्हणून मी सांगेन की, ठाणे शहराच्या पूर्व भागामध्ये जेथे स्कायवॉक बांधण्याचा घाट घातला जात आहे तेथे वस्तीच नाही कारण तेथे खाडी आहे. पण तेथेही स्कायवॉक बांधण्याचा आग्रह एमएमआरडीएकडून होत आहे. त्यामुळे माझ्या मनामध्ये एक शंका येते की, हे स्कायवॉक बांधणाऱ्यांची एक लॉबी झाली आहे किंवा काय ? नको त्या ठिकाणी, जेथे नागरिकांची मागणी नाही तेथे देखील स्कायवॉक करावयाचे आणि त्यातून लाखो रूपये कमवावयाचे असा प्रकार चालला आहे. तेव्हा तेथील लोकांना, महापालिकेला विश्वासात घेऊन ही कामे झाली पाहिजेत असे मला येथे सांगावयाचे आहे तसेच जेथे खरोखरी गरज असेल तेथे अवश्य स्कायवॉक आपण करावेत पण गरज नसताना केला जाता कामा नयेत, गरज नसेल तेथे नियोजित स्कायवॉक रद्द आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, गृहनिर्माण धोरणाच्या बाबतीत एका बाजूला एक न्याय तर दुसऱ्या बाजूला दुसरा न्याय लावला जात आहे. ठाणे शहर आणि जिल्ह्यामध्ये अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात झालेली आहेत व होत आहेत. जवळपास 5 लाख अनधिकृत बांधकामे या भागात झालेली आहेत. त्याच बरोबर अनेक जुन्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे ठाणे शहर आणि जिल्ह्यासाठी घरदुरूस्ती मंडळाची गरज मोठ्या प्रमाणात आहे. त्याचा निश्चित उपयोग होईल. 26 जुलै मध्ये हो हाहाकार उडाला होता त्यामुळे या भागामध्ये देखील प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. तेव्हा घरदुरूस्ती आणि पुनर्रचना मंडळ ठाण्यासाठी स्थापन करण्याची गरज आहे. त्यातून समतोल साधला जाऊ शकतो.

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत देखील सांगण्यासारखे खूप आहे. आदिवासी भागामध्ये इतक्या जागा रिकाम्या आहेत पण त्या भरण्याकडे लक्ष दिले जात नाही. तेथील दोन आश्रमशाळांमधील एका मुलीला विंचू चावला होता तर एकीला साप चावला होता पण त्या ठिकाणी त्या मुलींना दवाखान्यामध्ये घेऊन जाण्यासाठी कोठलेही वाहन नसल्यामुळे उपचाराअभावी त्यांचा मृत्यू झाला. तेव्हा ठाणे जिल्ह्यातील आदिवासी सेवेचाही बोजवारा उडालेला आहे. अनेक ठिकाणी

.... यूयू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राथमिक आरोग्य केंद्राची, दवाखान्यांची गरज आहे पण ती दिली जात नाहीत. तेथे लोक बदलून येतात पण तेथील अवस्था पाहिल्यानंतर, दुर्गम भाग पाहिल्यानंतर तेथून बदली करवून निघून जातात. आपण नेहमी शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेता आणि आदिवासींचा, दलितांचा विकास करणार असे म्हणता. पण खऱ्या अर्थाने आज आदिवासी भागामध्ये जाऊन पाहिले तर पूर्वी होती तशीच अवस्था आजही आहे असेच आपल्याला दिसून येते. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... व्हीव्ही 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

एका बाजूला आपण मोनोरेलसारख्या सुविधा निर्माण करीत आहात तर दुसऱ्या बाजूला आदिवासी पाडयातील गरीब माणसाने कधी साधी रेलगाडी पाहिली नाही त्यांच्यासाठी आपण केवळ घोषणा न करता त्या प्रत्यक्षात उतरविल्या पाहिजेत.

सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळांच्या योजना कशापध्दतीने राबविल्या जाणार आहेत याचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आला आहे. परंतु मला याठिकाणी उल्लेख करण्यास खेद होतो की, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांच्याबरोबर मी अनेक आश्रमशाळांना भेटी दिलेल्या आहेत. त्या भेटींचा अहवाल सुध्दा मंत्रिमहोदयांना सादर केला आहे. त्या आश्रमशाळांची अवस्था इतकी वाईट आहे. त्या आश्रमशाळा आपण कशासाठी निर्माण केल्या आहेत? त्या आपण बंद केल्या पाहिजेत इतके वाईट दृश्य आपणास पहावयास मिळते. तेथील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही, प्रातर्विधीची व्यवस्था केली जात नाही, आंघोळ करण्यासाठी मुलांना बाहेर जावे लागते. आश्रमशाळेच्या इमारतीची दुरुस्ती केली जात नाही. अशा अनेक प्रकारच्या गोष्टी पहावयास मिळतात. तरीसुध्दा आपण म्हणत असाल की, आपले सरकार महान आहे आपला महाराष्ट्र महान आहे. या राज्याची विकासाकडे वाटचाल सुरु आहे. परंतु हा विकास नाही "खूप खूप शिक गं पोरी, ताठ मानेने जगशील तरी" अशाप्रकारे आश्रमशाळेतील आदिवासी मुलांचे शिक्षण महाग असेल, त्यांचे राहणे महाग असेल तर ती दुर्दैवाची गोष्ट आहे. या आश्रमशाळेची खऱ्या अर्थाने निर्मिती करावयाची असेल तर ज्या ज्याठिकाणी आश्रमशाळा बांधण्यात आल्या आहेत त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, एक-दोन आश्रमशाळांमध्ये लाल गहू पुरविण्यात आल्याचे दिसून आले. त्या आश्रमशाळांमधील मुलांना निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवून अनेक ठिकाणी फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे आश्रमशाळांना ज्या गाद्या पुरविण्यात आल्या आहेत त्या सुध्दा निकृष्ट दर्जाच्या आहेत. या गाद्या केव्हा पुरविण्यात आल्या आहेत असे अधिकाऱ्यांना विचारण्यात आले. त्या दहा वर्षापूर्वी पुरविण्यात आल्या असाव्यात असे तपासणीमध्ये लक्षात आले आहे. तसेच, महाराष्ट्रातील सर्व आश्रमशाळांना गाद्या पुरविण्याचे कंत्राट एकाच ठेकेदारास देण्यात आले आहे काय? त्या गाद्या झोपण्याकरिता योग्य नाहीत. त्या पुरविण्यामध्ये सुध्दा भ्रष्टाचार झाला आहे, घोटाळा झाला आहे याची शासनाने चौकशी केलेली नाही. सभापती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

महोदय, "दु:ख म्हातारी मेल्याचे नाही तर काळ सोकावतो" अशाप्रकारचे घोटाळे हे दरवर्षी आपणास पहावयास मिळत आहेत.

सभापती महोदय, ज्याप्रमाणे अनुसूचित जमातीच्या लोकांकरिता शासन घोषणा करीत असते त्याप्रमाणे दुसऱ्या बाजूला सुध्दा अनुसूचित जातीच्या लोकांच्या संदर्भात शासन निरनिराळया घोषणा करुन सवलती जाहीर करीत असते आणि या लोकांच्या डोळयामध्ये धूळफेक करीत असते. एका बाजूला शासन म्हणते की, आम्ही तुमच्यासाठी विकासाची कामे करीत आहोत. परंतु प्रत्यक्षात त्यांच्यापर्यंत या योजना पोहोचत नाहीत. निरनिराळया जिल्हयातील अनुसूचित जातीच्या लोकांसाठी स्वाभिमान योजना राबविण्यात आली. त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांना 1 एकरापासून 3 एकरापर्यंत कसण्यासाठी जमीन दिली जाईल असे घोषित करण्यात आले. परंतु ठाणे जिल्हयातील जिल्हाधिकारी व जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता दारिद्रय रेषेखालील एकाही माणसाला एक इंच सुध्दा जमीन दिली गेली नसल्याचे आढळून आले. एका बाजूला आपण या योजना आणीत आहात तर दुसऱ्या बाजूला या योजनांचा बटयाबोळ सुरु आहे. अशाप्रकारचा महाराष्ट्र आम्हाला अपेक्षित नाही. म्हणून मला याठिकाणी सांगण्यास खेद होतो की, केवळ घोषणा करुन चालणार नाही तर ज्या योजना आपण बनवितो त्या गरीब सामान्य माणसापर्यंत पोहोचल्या पाहिजेत अशाप्रकारची व्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी हे सरकार स्वतंत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरण निर्माण करीत आहे, तर दुसऱ्या बाजूला मुंबई-ठाण्याच्या सीमेलगत एम.एम.आर.डी.ए.चा जो भाग आहे तो या परिवहन प्राधिकरणाचा असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्याठिक्राणी वाहतुकीची सोय व्हावी म्हणून हे प्राधिकरण निर्माण केले आहे. शासनाने अनेक प्रकारचे जी.आर. काढले. परंतु आज सुध्दा 2006 सालापासून म्हणजे मी आमदार झाल्यापासून या प्रश्नाकरिता आंदोलन करीत आहे की, सरकार एका बाजूला आदेश देते, परंतु त्याचबरोबर त्याचे पालन हे सरकार करीत नाही. आज सुध्दा मुंलुंड किंवा ठाणे याठिकाणी जाण्यासाठी ठाण्याच्या अलिकडे लोकांना उतरावे लागते. आणि तेथून मुलुंडमध्ये चालत जाऊन दुसरी रिक्शा पकडावी लागते. एका बाजूला हे प्राधिकरण निर्माण केले असतांना प्रत्यक्षात महिला, विद्यार्थी, वयस्कर गृहस्थ यांचे हाल होत आहेत. त्यांना अर्धा किलोमीटर चालत जाऊन दुसरी रिक्शा पकडावी लागत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरकार अशी घोषणा करते की, हा सर्व भाग एक आहे, या भागातील रिक्षा त्या भागामध्ये जाण्या-साठी परवानगी दिलेली आहे. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही याचा मला सांगण्यास खेद होतो. तेव्हा सरकारला जर नियम करावयाचे असतील तर त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावी. नाहीतर नुसते नियम करु नका. सरकारला एका बाजूला नियम करते, परंतु विभागाचे लोक त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे करीत नाहीत अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये न्यायदानाच्या संदर्भात देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. या राज्याच्या स्थापनेला 61 वर्षे पूर्ण झाली. या कालावधीमध्ये राज्यामधील लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली. परंतु न्यायालयांची संख्या वाढविण्यात आली नाही. त्यामुळे न्यायालयामध्ये बोर्डावरच लाखोंच्या संख्येने खटले शिल्लक राहिल्याचे दिसून येते. काही ठिकाणी अशी स्थिती आहे की, न्यायालयांच्या इमारतींचे काम पूर्ण झालेले आहे, परंतु तेथे न्यायाधीश उपलब्ध नाहीत. त्यामुळे देखील न्यायालये सुरु झालेली नाहीत. मला आठवते की, माणगाव येथे न्यायालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाले होते, परंतु केवळ त्याठिकाणी न्यायाधिशांचे निवासस्थान नसल्याने दोन वर्षे न्यायालय सुरु होऊ शकलेले नाही. आता सहा महिन्यापूर्वी माणगाव येथील न्यायालय सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे न्यायालय सुरु करण्यासाठी तेथे न्यायाधीश, इतर स्टाफ, त्यांच्या निवासस्थानाची व्यवस्था, इ.बाबत सोय केली तर जे लाखो खटले प्रलंबित आहेत, ते निकाली काढता येतील. म्हणून मला हे सांगताना तीव्र खेद वाटतो. एका बाजूला अभिमानाने सांगण्यात आले की, हा महाराष्ट्र दीनदुबळयांचा, गरीबांचा, शाहू-फुले-आंबेडकर यांचा आहे.परंतु खरेच हा महाराष्ट्र तसा आहे का ? असा प्रश्न पडतो आणि ते या सगळयावरुन सिध्द होते. एका बाजूला जातीयवादी-जातीयवादी म्हणून समोरच्या लोकांवर टीका केली जाते, परंतु प्रत्यक्षात सत्ताधारी पक्षाकडून व्होट बँक पॉलिटीक्स केले जाते. भिवंडी सारख्या ठिकाणी पोलीस स्टेशनची गरज असताना सुध्दा ते तेथे उभारले जात नाही, कारण कोणत्या तरी समाजाला वाईट वाटेल. परंतु तेथे जनतेच्या हितासाठी पोलीस स्टेशनची निर्मिती झाली पाहिजे अशी प्रकारची भूमिका घेतल्यानंतर संबंधितांना जातीयवादी ठरविले जाते. त्यामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्य हे देशाच्या पातळीवर पहिल्या क्रमांकावर न्यावयाचा असेल, जे राज्य सध्या सगळयाच बाबतीमध्ये सहाव्या-सातव्या क्रमांकावर आहे. अशा वेळी हे राज्य पहिल्या क्रमांकावर

. . . .2डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

आणण्यासाठी निरनिराळया प्रकारच्या योजना आखलेल्या आहेत, त्या सगळीकडे समतोल साधणाऱ्या असल्या पाहिजेत. सर्वांना न्याय देणाऱ्या असल्या पाहिजेत, राज्यातील सर्व समाज घटकांना पुढे नेणाऱ्या असल्या पाहिजेत. तरच हे महाराष्ट्र राज्य पुढे जाईल. एवढे सांगून आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल तीव्र खेद व्यक्त करुन मी माझे भाषणे संपवितो. धन्यवाद.

. . . .2 डब्ल्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी सदनाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो. त्यावेळी देखील सदनाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून दिली होती की, माननीय राज्यपालांचे जेव्हा अभिभाषण झाले, तेव्हा राज्यामध्ये नुकतीच आचारसंहिता लागू झाली होती. या अभिभाषणामध्ये अनेक मुद्यांचा उहापोह करण्यात आला असून, जो आचारसंहितेचा भंग करणारा होता. उदाहरण द्यावयाचे तर आर्थिक क्षेत्रात करण्यात येणारी 1,80,374 कोटी रुपयांची गुंतवणूक, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणार म्हणजेच 135 प्रकल्पातून 1,53,900 कोटी गुंतवणूक करणार, साडेतीन हजार नव्या नोकऱ्या उपलब्ध करुन देणार इ.या अभिभाषणामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले होते. त्याचबरोबर राजीव गांधी निवारा योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी 1 लाख 25 हजार घरे बांधून देण्यात येतील. अशा प्रकारे घोषणा करुन आचारसंहितेचा भंग केलेला आहे हे सर्वप्रथम मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

(सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड खाली बसून बोलतात.)

माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले त्यावेळी. याबाबतीत त्यांना उत्तरामध्ये काय ते सांगू दे. तसेच मृत पोलीस आणि सुरक्षा अधिकाऱ्याच्या कुटुंबियांसाठी 25 लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. 600 ते 1000 चौ.फू.पर्यंतच्या सदनिका मोफत देण्यात आल्या आणि मृतांच्या कुटुंबातील दोन मुलांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्याचा, तसेच त्यातील एका सदस्याला त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय सेवेमध्ये नियुक्त करण्याचा निर्णय देखील घेण्यात आल्याचे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सांगण्यात आले आहे. हे सर्व झाल्यानंतर 25 लाख रुपयांच्या अनुदानाच्या बाबतीत शहीद हेमंत करकरे यांच्या पत्नीने काही प्रश्न उपस्थित केले होते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

हे 25 लाख रुपये खरोखर आम्हाला मिळाले काय?. त्यावेळी राज्य शासनातर्फे अनेक वर्तमानपत्रातून राज्य शासनाने हे 25 लाख रुपये कशा पध्दतीने दिले याबाबतचा ब्रेकअप आला होता. सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवी अशी गोष्ट आहे. ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली अशा लोकांना मग ते उच्च अधिकारी असोत,सामान्य पोलीस अधिकारी असोत वा रुग्णालयामध्ये काम करणारे कर्मचारी असोत त्या सर्वांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे. पण त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या संदर्भात वर्तमानपत्रातून ब्रेकअप दिला गेला त्याला एक नाव देण्यात आले होते. हे पैसे वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट या नियमानुसार देण्यात येणार होते पण त्याला कात्री लावण्यात आली होती. सभापती महोदय, जर हे कॉम्पेन्सेशन वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टनुसार दिले गेले असेल तर माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तर देताना माझी अशी माफक अपेक्षा आहे की, कोणाला नेमके किती पैसे दिले यासंबंधिचे अकाऊंन्ट त्यांनी द्यावे. या विषयाच्या बाबतीत मी माझ्या पूर्वीच्या भाषणात देखील उल्लेख केलेला आहे. अशा प्रकारे किती लोकांना काय कॉम्पेन्सेशन देण्यात आलेले आहे याची माहिती देण्याबाबत मी मुंबईच्या कलेक्टरांना एक पत्र लिहिले होते. पण आज तागायत मला त्यापत्राचे उत्तर मिळालेले नाही. मी या सभागृहात देखील हा प्रश्न विचारला होता पण माननीय मंत्रिमहोदयांनी देखील मला त्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. मी आज पुन्हा एकदा हा प्रश्न सभागृहासमोर मांडतो. श्री. हेमंत करकरे असतील, साळसकर असतील, रुग्णालयामधील कर्मचारी असतील वा इतर कोणी असतील त्यांना नेमके किती कॉम्पेन्सेशन दिले? या शासनाने अझहर आणि रुबिनाचे घर तोडल्यामुळे त्यांना म्हाडाचे फ्लॅट दिले आहेत.(अडथळा) शासनाच्या दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे. पण शासन या दोघांचे मूल्यमापन एकाच तराजूमध्ये करणार आहे काय? माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतचा नीट विचार करुन किती लोकांना काय मदत देण्यात आलेली आहे याचे उत्तर द्यावे. सभापती महोदय, मला आजपर्यंत एका प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. सभापती महोदय, मी पहिल्यांदा याठिकाणी प्रश्न उपस्थित केला होता की, श्री. साळसकरांची स्टेनगन काढून घेण्यात आली त्याचे कारण काय, ती चुकीने काढून घेतली असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली आहे काय? परंतु या प्रश्नाचे उत्तर मला या सभागृहात मिळालेले नाही. जर अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे सभागृहात मिळत नसतील तर या सभागृहात भाषणे करुन फायदा काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा राज्य शासनाने राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांच्या धर्तीवर राज्य सुरक्षारक्षकांची स्थापन करण्यासंबंधीचा आहे. बुलेटप्रुफ जॅकेट विषयी नेहमीच प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. हे बुलेटप्रुफ जॅकेट खरोखरच त्यांना उपयोगी आले आहेत का या बुलेटप्रुफ जॅकेटमुळेच त्यांचे प्राण गेले आहेत, हा देखील प्रश्न आहे. हे बलेटप्रुफ जॅकेट नेमके कोणाकडून मागविण्यात आले होते, याबाबतची निविदा प्रक्रिया कशी होती आणि ते कोणत्या कंपनीकडून मागविले होते. माझी अशी माहिती आहे की, ज्यांच्याकडून हे बुलेटप्रुफ जॅकेट मागविले हेते ते अतिशय निकृष्ट दर्जाचे होते. माननीय मंत्रिमहोदयांनी यावर प्रकाश टाकावा. आज त्या अजमल कसाबसाठी पाच कोटी रुपयाचा बोगदा तयार करण्यात आला आहे. माझी दुसरी माहिती अशी आहे की, या अजमल कसाबसाठी जे.जे. रुग्णालयाच्या ऑपथॉलमिक वार्डच्यावर एक बुलेटप्रुफ कोठडी बनविण्यात येत आहे. हे खरे आहे काय? मी याबाबतीत सामना या आमच्या वर्तमानपत्रात वाचलेले आहे. जे.जे. रुग्णालयामध्ये देखील मी याबाबतीत चौकशी केली. पण जे.जे. रुग्णालयातील लोकांना देखील त्या ठिकाणी कसले काम चालले आहे याबाबतची माहिती नाही. सभापती महोदय,नेमके काय चालले आहे? माझे सौभाग्य आहे की, माननीय गृहराज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. अशा प्रकारे खरोखरच त्या कसाबसाठी जे.जे. रुग्णालयात जर बुलेटप्रुफ कोठडी बांधण्यात येत असेल तर शासन किती मोठा धोका पत्करत आहे. हजारो, लाखो लोक या जे.जे. रुग्णालयात रोज येतात. तेथे डोळयाचे हॉस्पिटल आहे. ऑपथॉलमिक वॉर्डच्या वरच्या मजल्यावर या बुलेटप्रुफ कोठडीचे काम चालू आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी श्री. हेमंत टकले)

डॉ. दीपक सावंत .....

खाली जो ऑप्थॉल्मीक वॉर्ड आहे त्या ठिकाणी काम चालू आहे. त्या ठिकाणी डोळ्याचे हॉस्पिटल आहे आणि काम चालू आहे. अतिशय सेन्सेटिव्ह गोष्ट आहे. कॅटरॅक्ट झालेल्या माणसाला या धुळीच्या कणांमुळे इन्फेक्शन होऊ शकते. हजारो लोकांचे प्राण घेण्याची सुपारी घेऊन जो मुंबईला आला होता त्याच्यासाठी हे सगळे करीत आहात काय ? या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी त्या वेळी दिले नव्हते. आज त्याबाबत उत्तर देणार काय ?

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 10 मध्ये धानोरा तालुक्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, खरोखरच जर त्या नक्षलवाद्यांना आपल्याला आळा घालावयाचा असेल तर बंदुकीचे उत्तर बंदुकीनेच द्यावयास पाहिजे. पण त्याचबरोबर त्या भागातील जी सामाजिक व्यवस्था आहे, जी आर्थिक व्यवस्था आहे ती देखील सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. त्या ठिकाणी जर आपल्याला इंजिनिअर्स तयार करावयाचे असतील तर त्यांना कमी परसेंटेजमध्ये इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश दिला पाहिजे. जर त्यांना डॉक्टर बनवावयाचे असेल तर कमी परसेंटेजमध्ये वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश दिला पाहिजे. अशा प्रकारच्या सोयी अधिक संवेदनशील भागामध्ये केल्या पाहिजेत. आपल्याकडे डोंगरी भागासाठी रिझर्वेशन आहे परंतु त्या ठिकाणी रिझर्वेशन लागू होत नाही. ही दुःखदायक गोष्ट आहे. याबाबतीत शासनाने धडक कार्यक्रम हाती घेतला तर यासारखे अनेक प्रश्न सुटू शकतील.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 40 मध्ये "रोजगार वाहिनी" आणि "ई-गव्हर्नन्स पुरस्कार" याबाबत उल्लेख केलेला आहे. माझ्याकडे काही आकडेवारी उपलब्ध आहे. ती आकडेवारी मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. राज्य शासनाच्या रोजगार आणि स्वयंरोजगार खात्यातर्फे बेरोजगारांसाठी मिळावे घेतले जातात. सन 2006-07, 2007-08 आणि 2008 मधील डिसेंबरपर्यंत जे मेळावे घेतले गेले त्याची माहिती देऊन हे सरकार किती कार्यक्षम आहे त्याचा पुरावा देऊ इच्छितो. सन 2006-07 मध्ये फक्त 3 मिळावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

घेतले गेले. महाराष्ट्रात लाखो बेरोजगार आहेत. त्यांच्यासाठी 2006-07 मध्ये फक्त 3 मेळावे घेतले. त्यावेळी 80 कंपन्यांनी लोकांना नोकऱ्या देण्यासाठी त्या मेळाव्यांमध्ये भाग घेतला. रिक्त पदांची संख्या 7258 होती. उपस्थित उमेदवारांची संख्या 8150 होती आणि निवड झालेल्या उमेदवारांची संख्या 875 होती. म्हणजे 10 टक्के उमेदवारांना देखील नोकऱ्या मिळाल्या नाहीत. 3.31 लाख लोकांना रोजगार देणार आहोत अशी आपण घोषणा करतो. सन 2007-08 मध्ये 43 मेळावे झाले. त्यावेळी 520 कंपन्यांनी त्यामध्ये भाग घेतला. महाराष्ट्रात 21268 पदे रिक्त होती. उपस्थित उमेदवारांची संख्या 42,774 होती. निवड झालेल्या उमेदवारांची संख्या 5164 होती. ही संख्या फार कमी आहे. 2008 मध्ये डिसेंबरपर्यंत 16 मेळावे घेतले. त्यावेळी 181 कंपन्या उपस्थित होत्या. मेळावे कमी झाल्यामुळे रिक्त पदांची संख्या 6326 होती. उपस्थित उमेदवारांची संख्या 15900 होती. म्हणजे जवळपास 16 हजार उमेदवार उपस्थित होते. निवड झालेल्या उमेदवारांची संख्या 2111 होती. जर आपल्याला हा कार्यक्रम कृती कार्यक्रम म्हणून राबवावयाचा असेल आणि जर अशा प्रकारची आकडेवारी आपल्यासमोर असेल तर मराठी तरुणांना कशा नोकऱ्या मिळणार ? आपण म्हणता की, मार्च 2009 पर्यंत 5223 लोकांना मॉलमध्ये नोकऱ्या मिळणार आहेत. आतापर्यंत किती लोकांना नोकऱ्या मिळाल्या ? 332 लोकांनी मॉलचे प्रशिक्षण घेऊन नोकऱ्या नाकारल्या. फक्त 1767 लोकांना मॉलमध्ये नोकऱ्या मिळाल्या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

आणि या सगळया प्रक्रियेमध्ये कोण होते ? यामध्ये 5 इंटरनॅशनल कंपन्या होत्या. त्यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरपर्यंत ॲप्रोच केला होता. त्यांनी काय सांगितले तर मराठी मुलांचे इंग्रजी भाषेचे उच्चार चुकीचे आहेत. त्यांना इंग्रजी भाषा नीट बोलता येत नाही. सभापती महोदय, आपण पॅरीसला, जर्मनीला गेला असाल, तेथील राजभाषेमध्ये ते बोलत असतील. परंतु इंग्रजीचे जुजबी ज्ञान असले तरी त्यांना नोक-या मिळतात. मग महाराष्ट्रामध्ये का नोक-या मिळत नाहीत ? फ्रण्ट लाईनवर काम करणाऱ्यांना इंग्रजी भाषा येणे आवश्यक आहे. परंतु मागील लाईनवर काम करणाऱ्यांचे काय ? शासनाने 80 टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याबाबत जी.आर.काढला आहे. त्या जी.आर.चे कायद्यात रुपांतर करुन त्यामध्ये शिक्षेची तरतूद केली पाहिजे. जो या कायद्याचे पालन करणार नाही त्यांना जेलमध्ये पाठविले पाहिजे. यासंबंधी केवळ जी.आर.काढून चालणार नाही. खाजगी कंपन्यांनी त्या जी.आर.ला केराची टोपली दाखविली आहे अशी परिस्थिती आहे. शासनाला खरोखरच राज्याचा सन्मान करावयाचा असेल तर 3 लाख 31 हजार नोक-या कोठून देणार आहे ते सांगावे.

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये रिटेल व्यवस्थापनासंबंधीचा एक मुद्दा आलेला आहे. राज्यामध्ये रिटेल व्यवस्थापनाची केंद्रे किती ठिकाणी सुरु आहेत ? यामध्ये असे म्हटले आहे की, "अनुसूचित जातीच्या बेरोजगार युवकांकरिता रिटेल व्यवस्थापनामधील महत्वाकांक्षी प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे." हा कार्यक्रम कोणकोणत्या केंद्रामध्ये सुरु आहे ते सांगावे. एन.एम.कॉलेजमध्ये कदाचित सुरु असेल, परंतु सरकारी कॉलेजमध्ये हा कार्यक्रम सुरु नाही, सुरु असेल तर मला माहिती सांगावी, माझ्या ज्ञानामध्ये भर पडेल. या कार्यक्रमांतर्गत 5,653 युवकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी किती ठिकाणी केंद्रे सुरु आहेत त्याची माहिती द्यावी. शासनाने ई-गव्हर्नन्सचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबवित असल्याचा आव आणून स्वत:चीच फसवणूक करुन घेतली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 45 मध्ये राज्यामध्ये 141 विशेष आर्थिक क्षेत्रांना केंद्र शासनाने मान्यता दिल्याचे नमूद केले आहे. ज्यायोगे राज्यात काही कोटींची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे आपल्या राज्यात रोजगार उपलब्ध होणार आहेत. परंतु ही पंचवार्षिक योजना आहे की, दशवार्षिक योजना आहे ते समजलेले नाही. कारण अद्याप भूसंपादनाचे काम संपलेले नाही, कंपन्या उभ्या राहिलेल्या नाहीत. पण त्याचा आजच डांगोरा पिटण्यात येत आहे. आज एखाद्याचे वय 25 वर्षे असेल तर 10 वर्षांनी तो 35 वर्षांचा होईल, तो सेवानिवृत्तीला येईल. पण शासन त्यांना नोक-या देणार आहे असे त्यात म्हटलेले आहे.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 48 मध्ये माता व नवजात शिशु यांच्यातील रोगाचे प्रमाण व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी मातृत्व अनुदान योजना राज्याच्या सर्व जिल्हयामध्ये राबविण्यात येत आहे. गर्भवती स्त्रियांना रुपये 400 आणि रक्कम रोखीने रुपये 400 इतक्या रकमेची औषधे देण्यात येत असल्याचे नमूद केलेले आहे. सभापती महोदय, आपण या मुद्यासंबंधी आपले विचार मांडले होते, सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी देखील आपले मत मांडले होते. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी आम्हाला असे सांगितले होते की, यासंबंधी एक बैठक घेण्यात येईल. मंत्रिमहोदय वचनाला जागले, त्यांनी केवळ एकच बैठक घेतली. पण त्याच्यातून काही निष्पन्न झालेले नाही. मी त्या बैठकीला उपस्थित होतो, सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी हेही उपस्थित होते. पण त्या बैठकीतून काहीही निष्पन्न झालेले नाही असे मी दुर्दैवाने सांगावे लागत आहे. मी त्यावेळी असा प्रश्न विचारला होता की, 400 रुपयांची औषधे दिली जातात ती 400 रुपयांची नसतात. त्या औषधांची किंमत मला सांगावी. मी आज देखील तो प्रश्न विचारत आहे. गेली 4 वर्षे मी हाच प्रश्न विचारत आहे. ही औषधे केवळ 284 रुपयांचे असतात, बाकीचे पैसे कोठे जातात हा माझा प्रश्न आहे. त्यासंबंधी आज तरी आम्हाला उत्तर मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन आहे, निदान जाताना तरी खरे बोलावे की, होय, आमच्या अधिका-यांनी औषध खरेदीत भ्रष्टाचार केला आहे, ही औषधे 284 रुपयांची आहेत. गरीबांचे पैसे खाऊन या अधिका-यांना काय मिळणार आहे ? या अधिका-यांवर सरकारचा अंकुश नाही. त्यामुळे हे अधिकारी मनाला वाटेल तेवढया औषधांची खरेदी करतात आणि वाटेल तसे त्याचे वाटप करतात.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन यांनी जीवनदायी योजने बद्दल अतिशय चांगल्या पध्दतीने सांगितले. माझ्याकडे जिल्हा परिषदेच्या शाळातील सर्व्हेचे कटींग होते. ते मला आता सापडत नाही. त्यामध्ये अशी माहिती आहे की, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील 39 हजार विद्यार्थ्यांची तपासणी झाली. त्यापैकी जवळ जवळ तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी हृदयरोगाने पीडित आहेत. ही इतकी बालके जर हृदयरोगाने पीडित असतील तर मग त्यांना जीवनदायी योजनेचा लाभ का दिला जात नाही ? सभापती महोदय, जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये श्रीमंतांची नाही तर गरिबांची मुले जातात. तेव्हा या हृदयरोगाने पीडित मुलांना जीवनदायी योजनेमध्ये का समावून घेतले जात नाही असा माझा शासनाला सवाल आहे ?

सभापती महोदय, 33 टेलिमेडिसिन केन्द्रे स्थापन करण्यात येणार आहेत. रुग्णालयातील एखाद्या रुग्णाला कोणते औषध द्यावे किंवा कोणते उपचार करावेत यासंबंधी एका रुग्णालयातील डॉक्टरने दुस-या रुग्णालयातील डॉक्टरचा फोनद्वारे सल्ला घेणे असा टेलिमेडिसिनचा अर्थ आहे असा माझा समज आहे. या बाबतीतील माझे ज्ञान मर्यादित आहे. अशा प्रकारे एका डॉक्टरने अमूक अमूक प्रकारचे ॲण्टीबायोटीक रुग्णाला द्यावे असे सांगितल्यानंतर ते रुग्णालयामध्ये उपलब्ध असायला पाहिजे. नाही तर आपण रुग्णास चिठ्ठी देऊन ते औषध बाजारातून आणण्यास सांगणार. दुसरे असे की, आपणाकडे लोडशेडिंग असते, दूरध्वनी नादुरुस्त असतात, मोबाईल असले तरी नेटवर्क नसते. तेव्हा अशा परिस्थितीमध्ये टेलिमेडिसिन केन्द्र कितपत उपयोगी पडतील याबद्दल शंका आहे. सभापती महोदय, मला एवढेच सांगायचे आहे की, शासनाने पचतील अशाच प्रकारच्या घोषणा कराव्यात.

सभापती महोदय, जे.जे. हॉस्पिटलसाठी 150 कोटी रुपये दिलेले आहेत. ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. हे 150 कोटी रुपये कसे खर्च करणार याची माहिती मी माननीय मंत्री महोदयांना आणि संचालकांना पत्र पाठवून विचारली. या 150 कोटी रुपयातील फक्त 20 कोटी रुपये पीडब्ल्यू वर्क्सवर म्हणजे बांधकामावर खर्च होणार आहेत आणि उर्वरित 130 कोटी रुपये उपकरण खरेदीवर खर्च होणार आहेत. सभापती महोदय, या खरेदी व्यवहाराचे टेंडर आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत...)

किंमती पाहिल्या तर कोणीही खाजगी हॉस्पिटल उभारु शकणार नाही इतक्या चढया किंमती उपकरणांच्या आहेत. मग ते एक्स-रे मशिन असो, सोनोग्राफी मशिन असो, सिटीस्कॅन मशिन असो, या सर्व उपकरणाच्या बाजारभावापेक्षा एक दीड लाखाने जास्त आहेत. उदा. एका मशिनची बाजारातील किंमत 3 लाख असेल तर टेंडरमधील किंमत साडेचार लाख आहे. इतका किंमतीमध्ये फरक आहे. ह्या आलेल्या निविदा पारदर्शक नाहीत असा माझा आरोप आहे. माझे माननीय मंत्री महोदयांना आवाहन आहे की, त्यांनी सिटीस्कॅन, सोनोग्राफी,एक्स-रे मशिन यांच्या बाजारातील किंमती आणि निविदेतील किंमती पहाव्यात. आपण चढया दराने ही मशिनरी खरेदी केलेली असल्याचे आपणास दिसून येईल.

मुद्दा क्रमांम 53 मध्ये असे म्हटलेले आहे की, शासनाने ज्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांनी 2008-09या वर्षामध्ये, खाजगी मान्यताप्राप्त व्यावसायिक संस्थांमध्ये प्रवेश घेतला आहे. त्यांच्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवणी फी प्रतिपूर्ती योजना सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सभापती महोदय, अनुसूचित जाती/जमातीची मुले शिक्षण घेत असलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा प्रश्न मी, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, आम्ही गेले कित्येक दिवस या सदनामध्ये मांडत आहोत. अनुसूचित जाती/जमातीचे मुले शिक्षण घेत असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अशा प्रकारचे अनुदान दिले जात नाही. या प्रश्नासंबंधी मी मागील अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु ते अधिवेशन चारच दिवसांचे झाल्यामुळे ते शक्य झाले नाही.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, त्या शाळांना ताबडतोब अनुदान द्यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, मी इंदिरा आवास योजनेच्या संदर्भात बोलू इच्छितो. इंदिरा आवास योजनेतून दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांना घरकुलाचा लाभ देतो. घरकुलाच्या दुरुस्तीसाठी 15 हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे प्रमाण 75 आणि 25 एवढे आहे. 2008-09 मध्ये केंद्राने महाराष्ट्रासाठी 30,418 लक्ष रुपये मंजूर केले होते. त्यापैकी सरकारने 10,138 लक्ष रुपये आपला वाटा टाकावयाचा आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला 1825 लक्ष रुपये आले असून राज्य सरकारने 6,800 लक्ष रुपयांचा वाटा टाकावयाचा आहे. या निधीतून 69521 घरकुले बांधणे अपेक्षित होते. परंतु आज प्रत्यक्षात केवळ 47 हजार 764 घरकुले बांधली गेली आहेत. इंदिरा आवास योजने अंतर्गत 31 डिसेंबर, 2008 पर्यंत फक्त 41 टक्के ध्येयपूर्ती झालेली आहे. त्यानंतर आचारसंहिता लागली. इंदिरा आवास योजनेसाठी आपण खूपच मागे आहोत. त्यामुळे महाराष्ट्राला या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत "सी"ग्रेड मिळाली आहे हे दुर्दैवाने मला सांगावेसे वाटते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात किती पोकळता आहे हे या योजनेवरुन सर्वांना दिसून येईल.

सभापती महोदय, स्कॉय वॉक विषयी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. मुंबई शहरासाठी किती स्कॉय वॉक अपेक्षित होते ? किती स्कॉय वॉक बांधले जात आहेत ? जवळ जवळ मुंबई शहरात 56 स्कॉय वॉक बांधले जात आहेत. यासंदर्भातील अहवालाप्रमाणे या शहरात एवढया स्कॉय वॉकची आवश्यकता नव्हती. परंतु एम.एम.आर.डी.ए.चे उपाध्यक्ष श्री. रत्नाकर गायकवाड आणि त्यांचे अधिकारी यांच्या अट्टाहासापोटी हे स्कॉय वॉक बांधले जात आहेत. अनेक स्कॉय वॉक मागे घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालला आहे. स्कॉय वॉकच्या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ताडोबाचा वाघ्र प्रकल्पांचा मुद्दा आहे,पेंच प्रोजेक्टचा मुद्दा आहे. मेळघाटचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील वाघ्र प्रकल्पांतील वाघांचे संरक्षण कसे केले जाणार आहे ? जुनी टेकनिक वाढविणार की पगमारची टेकनिक कायम ठेवणार ? यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदय कधी सांगतील ? वाघांची संख्या खूप कमी होऊन आज वाघ शिल्लक राहिलेले दिसून येत नाही. ताडोबाच्या जंगलात गेलात तर तेथे वाघ दिसून येत नाही. आपण पगमार कडून

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

वाघाची गणना करणार आहात की आपण प्रायव्हेट एन.जी.ओ. यांच्या माध्यमातून करणार आहात या विषयाच्या बाबतीत वन विभागाचे नेमके धोरण काय आहे ? वाघांची गणना कशी केली जाणार आहे या बाबतीत मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. इंटरनॅशनल नॉर्म प्रमाणे जर आपण वाघांची गणना करणार असाल तर तेवढया पूरतीच माननीय वन मंत्र्यांनी माहिती द्यावी.

सभापती महोदय, सीमा प्रश्नाबाबतचा शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. त्याबाबतीत माननीय राज्यपालांनी देखील चिंता व्यक्त केलेली आहे. बेळगाव येथे अधिवेशन घेऊन त्या शहराला उप राजधानीचा दर्जा दिला. सभापती महोदय, राज्य शासन या प्रश्नाच्या बाबतीत नेमके कधी हस्तक्षेप करणार आहे ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे की, शिष्टमंडळासह माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन या प्रश्नाबाबतीत हस्तक्षेप केला जाणार आहे. हस्तक्षेपाची नेमकी तारीख कोणती राहणार आहे ? सीमा लढयाला अनेक वर्षे होऊन गेली आहेत. सीमा प्रश्नाच्या बाबतीत विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहाने एकमताने केंद्र शासनाकडे ठराव पाठविला होता. तरी देखील या प्रश्नास अद्याप वाचा फुटलेली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या सर्व गोष्टींवर खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जगात आणि देशात चिंता करण्या सारख्या एका महत्वाच्या विषयात हात घातलेला आहे. पट्टेरी वाघ संपूर्ण जगात कमी होत चालले आहेत ते नष्ट होतील की काय अशी शंका निर्माण झाली आहे आणि यासंदर्भात देशामध्ये खास चर्चा झाली आहे आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने वाघ्र प्रकल्प सुरु करण्यास केंद्रीय वन विभागाकडून परवानगी देण्यात येत आहे. महाराष्ट्रात तीन वाघ्र प्रकल्प आहेत आणि चौथा वाघ्र प्रकल्प चांदोली येथे होऊ घातलेला आहे. संपूर्ण जगात आणि देशात वाघांची संख्या कमी होत आहे ही गोष्ट खरी आहे.

. यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

पण आपण दोनवेळा सेन्सस केल्यानंतर वाघांची संख्या वाढली आहे असे दिसून आले. याबद्दल काही लोकांनी शंका व्यक्त केल्यामुळे पुन्हा एकदा याची चर्चा झाली. आता सेन्सस घेण्यासाठी एरिया निश्चित करुन कॅमेरे लावून टॅपिंग करुन चार दिवसात नव्हे तर वर्ष-दोन वर्ष सतत पाहणी करुन सेन्सस करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या दोन महिन्यात वेगवेगळया ठिकाणी 3 वाघिणींसहित 10 पिल्लांची सायटिंग झाले आहे. वाघांची संख्या वाढत आहे. चांदोली प्रकल्पामध्ये वाघ नव्हते. तेथे नवीन सेन्ससप्रमाणे 9 ते 10 पट्टेरी वाघ दिसून आले. काही दिवसापूर्वी पट्टेरी वाघाची हत्या झाली त्याची चौकशी चालू आहे. अशाप्रकारे वाघांची संख्या वाढली पाहिजे यासाठी दोन-तीन प्रकल्प घेतले आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने मदत दिली आहे. प्रकल्पातून 39 गावे बाहेर काढण्यासाठी त्यांनी मोठी मदत जाहीर केली आहे. मध्यंतरी कार्यशाळा घेण्यात आली त्यावेळी एका कुटुंबाला 1 लाख रुपयांऐवजी 10 लाख रुपये दिले जाणार आहेत. त्यात आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे त्याच्या घरामध्ये असणाऱ्या 18 वर्षे वयावरील मुलगा किंवा मुलगी असेल तर त्यांचे सुध्दा स्वतंत्र कुटुंब गणले जाणार आहे. एका कुटुंबामध्ये अशी 3-4 मुले असतील तर चार कुटुंबे आणि पालकांचे कुटुंब अशी एकूण 5 कुटुंबे गृहित धरुन एका कुटुंबाला 40 ते 50 लाख रुपये मिळतील अशा प्रकारचा प्रस्ताव तयार केला असून तो केंद्राकडे पाठविण्याची व्यवस्था केली आहे. 10 लाख रुपयांबरोबर तो तेथे जमीन मागत असेल तर जमीन वनामध्ये देण्यात येईल. व्याघ्र प्रकल्पामध्ये राहणाऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र लोक तयार केले आहत. त्यांना प्रशिक्षण देऊन तयार केले आहे. इको टूरिझम वाढवायचे असेल तर जंगलाबाहेर काही जमीन देऊन तेथे रेस्टहाऊस बांधण्याचा निर्णय घेतला आहे. इको टूरिझममुळे फायदा होतो. वाघांची संख्या वाढणार आहे. वाघांचे सेन्सस चालू करणार आहोत.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये हमरस्त्यावर येऊन बिबळे मरत आहे याची मंत्रीमहोदयांना माहिती आहे का? सन्माननीय सदस्यांनी ताडोबा येथील वाघांच्या सेन्ससबद्दल प्रश्न विचारला आहे. त्याबाबतच मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : चांदोली अभयारण्य हे कोकण आणि पश्चिम घाटामध्ये आहे. पश्चिम घाटामध्ये 9 वाघांचे सायटिंग झाले आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणात 75 बिबटे आढळून आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये व्याघ्र प्रकल्प आणि त्याविषयी मदत देण्याचा विषय नाही. परंतु महाराष्ट्र राज्य 50 व्या वर्षात पदार्पण करीत आहे. महाराष्ट्र शासनाने मोठया प्रमाणात वाघाची शिकार करुन सुवर्ण महोत्सव साजरा करण्याची तयार केली आहे काय? या सभागृहातील दारिद्र्य पाहिले तर महाराष्ट्राच्या वैभवाची चर्चा चालू आहे ती किती योग्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षातील मंडळी करीत आहेत आणि ते किती अयोग्य आहे हे सांगण्यासाठी आम्ही येथे बसलो आहोत. अशाप्रकारे सभागृहाची अप्रतिष्ठा होणार असेल तर कामकाज थांबले पाहिजे. पुरवणी मागण्यांप्रमाणे चर्चा सुरु आहे. महाराष्ट्राच्या 50 वर्षात निर्माण झालेले अत्यंत दुर्भाग्य कोणते हे आम्हाला सांगता येईल का?.....

....3डी.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.भोगले 16.50

श्री.दिवाकर रावते ..

ते सांगण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. या ठिकाणी येऊन काही तरी चापलुशी केल्यासारखे सरकारच्या बाजूने बोलावयाचे आणि बोलणे झाल्यानंतर आपले दप्तर उचलावयाचे व सभागृहाच्या बाहेर निघून जावयाचे हे बरोबर नाही. हे काय चालले आहे ? महाराष्ट्र विधान सभा आणि विधान परिषदेचे हे अधिवेशन आहे काय ? आपल्याला महाराष्ट्राशी काही बाधिलकी नाही काय ? संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी 106 हुतात्मे कशासाठी झाले होते आणि कशासाठी हा महाराष्ट्र निर्माण झाला होता ? सुवर्ण महोत्सवी वर्षाचे ढोल ताशे आपण कशासाठी वाजवत आहात ? हे काय चालले आहे ? सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज ताबडतोब थांबविण्यात आले पाहिजे. पाटया टाकावयाच्या म्हणून एखाद्या मंत्र्यांनी या ठिकाणी येऊन बसावयाचे आणि दोन तीन सन्माननीय सदस्यांनी येथे थाबावयाचे हे काही बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी येथे उपस्थित आहेत तसेच इतरही वेळीही ते उपस्थित असतात त्यामुळे त्यांचा मी नेहमी आदर करतो. परंतु बाकीचे सन्माननीय सदस्य आणि मंत्री मात्र उपस्थित नाहीत. मंत्री होण्यासाठी रांग लागलेली असते. लाल दिव्याची गाडी मिळविण्यासाठी सर्व देव पाण्यात बुडविले जातात. परंतु नंतर दोन चार मंत्र्यांनासुध्दा सभागृहात बसण्यासाठी फुरसद मिळत नाही ? सभापती महोदय, मघाशी मी या ठिकाणी उपस्थित नव्हतो. तेव्हा मी खालच्या सभागृहात डोकावून आलो होतो तेथेसुध्दा हीच स्थिती आहे. तेव्हा ते काय करतात ? ते कशासाठी आमदार होतात. ? त्यांना एवढी आस का लागलेली आहे ? माननीय राज्यपालांनी नियुक्त केलेले आमदार कोठे आहेत ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर या ठिकाणी चर्चा चालू आहे तेव्हा माननीय राज्यपालांनी नियुक्त केलेले आमदार कोठे आहेत? हे फुकटचे आमदार कोठे आहेत ? एक दमडासुध्दा खर्च न करता आलेले आमदार कोठे गेले आहेत ? हे आमदार नेत्यांच्या मर्जीतील आहेत . तेव्हा हे आमदार कोठे गेले आहेत ? महाराष्ट्राच्या पन्नासाव्या वर्षातील ही दुर्दशा अत्यंत वेदना देणारी आहे. माझ्या हातामध्ये काही कागदपत्रे असून ती मी मघापासून वाचत आहे. पन्नासाव्या वर्षातील महाराष्ट्र कसा असावा या संबंधी मला उद्या बोलावयाचे आहे. महाराष्ट्र कसा असावयाला पाहिजे या बाबतीत बाहेरच्या लोकांनी काही लेख लिहिलेले आहेत व ते मी वाचत होतो. त्या संदर्भात येथे चर्चा झाली पाहिजे. परंतु येथील परिस्थिती पाहिल्यानंतर मात्र मी व्यथित झालो आहे. आता जर आम्ही सभागृहाच्या बाहेर गेलो

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

तर येथे कोरम राहणार नाही. कोरम ठेवण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची आहे काय ? वास्तविक ही जबाबदारी ट्रेझरी बेंचची आहे . सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांचा मला नेहमीच अभिमान वाटतो. ते या पूर्वी खालच्या सभागृहाचे अध्यक्ष होते. त्यांनी प्रतिष्ठेच्या पदावर काम केले होते परंतु त्यांना मंत्री केले नाही. हे आपण सोडून देऊ ते सुध्दा या सभागृहात कायम उपस्थित राहतात. त्यामुळे त्यांना मंत्री करावयास पाहिजे होते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आजारी असल्यामुळे मी त्यांच्या विषयी काही बोलत नाही परंतु त्यांनीसुध्दा मंत्री व्हावयास पाहिजे होते अशी आमची भावना आहे. सभापती महोदय, सभागृहात सदस्य आणि मंत्री उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे. महाराष्ट्राचे सुवर्ण वर्ष असल्यामुळे वैभवाने अधिवेशन चालले पाहिजे, या ठिकाणी सुंदर चर्चा झाली पाहिजे . वैचारिक देवाण घेवाण झाली पाहिजे, सभापती महोदय, नक्षलवादी हल्याच्या संदर्भात आम्हाला काल सरकारची वस्त्रे नक्की उतरवता आली असती. परंतु राज्यातील सोळा जवान शहीद झालेले असल्यामुळे आम्ही तसे केलेले नाही. नक्षलवादी हल्यात महाराष्ट्रातील सोळा जवान शहीद झालेले असल्यामुळे त्यांना सन्मानित करण्यासाठी वेगळया पध्दतीने चर्चा घडवून आणली होती. सभापती महोदय, या ठिकाणी चार पाच मंत्र्याना देखील हजर राहता येत नाही हे मला पसंत नाही व ते बरोबरही वाटत नाही त्यामुळे आता ही चर्चा येथेच थांबविण्यात यावी. एक मंत्री सभागृहात आला की दुसरा येथून निघून जातो. हा काय आटयापाटयाचा खेळ चालला आहे काय ? कधी कॅबिनेट मंत्री सभागृहात येतात आणि मी कधी बाहेर जातो असे त्यांना वाटत असते. ही पध्दत बरोबर नाही. सभापती महोदय, आपण संसदीय कार्यमंत्र्यांना ताबडतोब बोलवा . या ठिकाणी आम्ही कोणा समोर भाषणे करावयाची ? श्री.राम प्रधान यांना वाचविण्यासाठी मघाशी माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, "पत्रकार काहीही छापतात." ते ऐकतांना मला खूप वाईट वाटले. त्यामुळे महाराष्ट्रात वाईट संदेश जात आहे. या सभागृहाच्या माध्यमातून अत्यंत वाईट घटना घडत आहे. सभागृहात चांगल्या प्रकारची चर्चा झाली पाहिजे. पूर्वीचे सदस्य असे होते, तसे होते असें सांगून काही लोक आम्हाला सतत जुन्या आठवणी करुन देतात. परंतु या ठिकाणी आम्ही कोणा साठी चर्चा करावयाची ? एखाद्या सदस्याने बोलण्यासाठी उठावयाचे त्याला जे वाटते, जे भावते ते त्याने

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोलावयाचे आणि निघून जावयाचे किंवा काही वेळ बसावयाचे. परंतु ही चर्चा कोण ऐकते हे माहीत नाही, या चर्चेला कोण उत्तर देणार आहे हे माहीत नाही. ही गोष्ट बरोबर नाही. सभापती महोदय, मी अत्यंत व्यथित होऊन ही बाब आपल्यासमोर माडीत आहे. तेव्हा याबाबतीत आपल्याला काय करता येईल ते पहावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी व्यथा माडलेली आहे तिला मी पाठिंबा देत आहे. मी मघाशी असे म्हणालो होतो की , 85 मुद्यांचे माननीय राज्यपालांचे भाषण आहे.त्या संबंधीची चर्चा करीत असतांना त्या त्या मुद्याशी सबंधित असलेल्या विभागाच्या कॅबिनट मंत्र्यांनी किंवा राज्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असले पाहिजे. आम्ही ज्या भावना व्यक्त करतो त्यां सबंधीची नोंद त्यांनी घेतली पाहिजे. एखाद्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या विभागाच्या संदर्भात काही विधायक सूचना केल्या असतील तर त्याची अंमलबजावणी कशी करता येईल याचा विचार त्यांनी केला पाहिजे व त्यासाठी संबंधित मंत्र्यांनी वा राज्यमंत्र्यांनी येथे उपसित असणे आवश्यक आहे. मी सकाळी बोलतांना असे म्हणांलो होतो की, आम्ही लोकप्रतिनिधी जनतेच्या भावनां या ठिकाणी व्यक्त करीत असतो त्या भावना ऐकण्यासाठी मंत्री उपस्थित असले पाहिजे. परंतु या ठिकाणी कोणीही मंत्री उपस्थित नाहीत.

(माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे सभागृहात येतात)

श्री.चंद्रकांत हंडोरे : मी नुकताच सभागृहाच्या बाहेर गेलो होतो.

श्री.मधुकर चव्हाण : मी आपल्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला नाही. मी जनरल मुद्दा मांडला होता. सभापती महोदय, सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करण्यात यावी . उपस्थिती ठेवण्याची जबाबदारी ट्रेझरी बेंचची आहे ही जबाबदारी आमची नाही. ..

श्री.चंद्रकात हंडारे : मी नुकताच बाहेर गेलो .

श्री.मधुकर चव्हाण : मी आपल्याबद्दल मुद्दा मांडलेला नसून जनरल स्वरुपाचा मुद्दा मांडला आहे. आपण उशिरा आलेला आहात. आपल्या अनुपस्थिती संबंधीचा तो विषय नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.भोगले 16.50

श्री.मधुकर चव्हाण ...

सान्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यानी या ठिकाणी अत्यंत तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. अनुपस्थिती संबंधी निषेध व्यक्त करण्यासारख्या त्या भावना आहेत. हे खुशालचेंडू सरकार आहे असा त्याचा अर्थ आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण यांनी व्यक्त केलेल्या भावनांची नोंद ट्रेझरी बेंचवरील मंत्री महोदयांनी आणि पक्षं प्रतोदांनी घ्यावी अशी मी त्यांना सूचना करतो. यानतर श्री. सुभाष चव्हाण यांनी भाषणास सुरुवात करावी.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाषण चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानून त्यांचे अभिनंदन करणऱ्या प्रस्तावावर आमच्या पक्षाचे प्रतोद श्री.जयप्रकाश छाजेड हे बोलले, त्यांना अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणातील पहिल्याच पानावरील तिसऱ्या परिच्छेदामध्ये त्यांनी म्हटले आहे की, 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरावर दहशतवादी हल्ला झाला. हा हल्ला केवळ या शहरावरच झाला नसून तो आपल्या संपूर्ण देशावर झाला होता. आणि म्हणूनच त्याची नैतिक जबाबदारी म्हणून महाराष्ट्र सरकारने आणि भारत सरकारने देखील जी कारवाई केली त्यामुळेच ही मुंबई लवकर शांत झाली, स्थिर झाली आणि मुंबई शहरातील घबराट नष्ट झाली व मुंबई पुन्हा पहिल्या सारखी उभी राहिली. त्याचे श्रेय संपूर्णत: आमच्या सरकारचे आहे. सभापती महोदय, ज्यावेळेस संसदेवर हल्ला झाला होता त्यासंबंधात बऱ्याच वक्त्यांनी म्हटले होते की, तेव्हा पंतप्रधानांनी राजीनामा दिला नव्हता. पण या वेळेस मात्र हा हल्ला झाल्याबद्दलची नैतिक जबाबदारी म्हणून आमच्या राज्याच्या गृहमंत्र्यांनीच नव्हे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील राजीनामा दिला इतकेच नव्हे तर भारत सरकारच्या गृहमंत्र्यांनी देखील राजीनामा दिला आहे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनवर बोलू इच्छितो. 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबई शहरात जो दहशतवादी हल्ला झाला होता त्यावेळी देखील मी म्हटले होते की, मुंबई तीन दिवस लढत आहे. पण त्यावेळी आमच्या राज्याचे गृहमंत्री काय म्हणत होते ? त्यावेळी त्यांना पत्रकारांनी विचारले होते की, आपण या हल्ल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देणार काय ? त्यावर त्यांनी आठवण करून दिली की, लोकसभेवर हल्ला झाला होता तेव्हा श्री.अडवाणी यांनी कोठे राजीनामा दिला होता. तसेच अक्षरधामवर हल्ला झाला म्हणून तेथील मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी राजीनामा दिला होता का ? मग मी देखील यासाठी राजीनामा देणार नाही. ते त्यावेळी अगदी लहान मुलासारखे याने केले नाही मग मी का करावे म्हणून सांगत होते. पण तेव्हा तुमच्या जबाबदार नेत्यांना, श्री.शरद पवारांनाच त्यातील गंभीरता जाणवली आणि त्यांनी सांगितले म्हणून मग त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी, आमच्या मित्रांनी तरी त्यांच्या राजीनाम्याचे कौतुक करू नका. तसेच त्यावेळी रामगोपाल वर्मा मुळे तत्कालीन मुख्यमंत्र्यांना जावे लागले होते हेही आपण लक्षात घ्यावे. आता त्या मुख्यमंत्र्यांना देव पावला आणि त्यांना येथून काढले गेले तरी पुन्हा वर घेतले आहे.

..... 3इ 2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी इतकेच सांगितले आहे की, त्यावेळी झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंबंधातील नैतिक जबाबदारी म्हणूनच आमच्या सरकारच्या गृहमंत्र्यांनी राजीनामा दिलेला आहे. आता आमच्या समोरच्या मित्रांचे त्याबाबत काही वेगळे मत असल्यास ते त्यांचे मत आहे इतकेच. पण त्यानंतर आमच्या सरकारने जी काही कारवाई केली त्यामुळे मुंबई शांत झाली इतकेच नव्हे तर सरकारने तेव्हा तातडीने घेतलेल्या निर्णयांमुळेच मुंबईत विरोधकांना, शिवसेनेला देखील एकही जागा लोकसभेच्या निवडणुकीत मिळू शकलेली नाही. याचे श्रेय कोणाचे आहे हे आमच्या मित्रांनीच लक्षात घ्यावे. असो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून या सरकारच्या योजना सांगण्यात आल्या आहेत. यामध्ये अनुसूचित जाती, जमातीच्या समाजाच्या हितासाठी काम करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की ज्याने आपल्या अर्थसंकल्पामध्ये या समाजाच्या विकासासाठी निधी ठेवला आहे. इतका निधी देशातील अन्य कोणत्याच राज्याने दिलेला नाही. या सरकारने या समाजासाठी इतके केले आहे की, संपूर्ण बॅकलॉग भरलेला आहे. भारतात नवीन सरकारमध्ये देखील बॅकलॉग भरला जात आहे. अनुसूचित जातींमध्ये सगळ्या जातींना सामावून घेण्याचे काम भारत सरकारने केलेले आहे. आज भारताच्या राष्ट्रपतीपदी एक महिला आहे, त्यानंतर नव्याने झालेल्या लोकसभेचे सभापतीपद चर्मकार समाजातील एका महिलेला दिले जात आहे.

(यानंतर श्री. सरफरे ..... 3एफ 1 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

मला आनंदाने सांगावेसे वाटते की, बाबू जगजीवनराम यांच्या कन्या या लोकसभेच्या सभापती झालेल्या आहेत. मी याचे श्रेय माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना देतो. केंद्र सरकारच्या नवीन मंत्रिमंडळामध्ये जवळ जवळ 40 टक्के मंत्री हे मागासवर्गीय, दलित आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : या अभिभाषणावरील चर्चेची वेळ 5 वाजेपर्यंत ठरविण्यात आली होती. अजून 9 माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची असल्यामुळे माननीय सदस्यांचे भाषण संपल्यानंतर उर्वरित माननीय सदस्यांची भाषणे उद्या घेण्यात यावीत असा एक पर्याय आपल्यासमोर आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कालची पुढे ढकलण्यात आलेली अर्धा तास चर्चा, आजची अर्धा तास चर्चा आणि उद्याची अर्धा तास चर्चा त्याचप्रमाणे अभिभाषणाच्या चर्चेवरील मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण उद्या होणार आहे. तेव्हा आम्ही आता आणखी काही वेळ थांबण्यास तयार आहोत. आम्ही आता याठिकाणी जे बोललो त्यावर आपण कशासाठी पाणी टाकीत आहात? दहा ते पंधरा मिनिटामध्ये बाकीचे माननीय सदस्य बोलतील, आणि आमच्या बाजूकडील माननीय सदस्य उद्या बोलतील...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजची माननीय सदस्यांची यादी आपण उद्यापर्यंत पेंडींग ठेवू नये. आपण आता नावे पुकारावीत, जे माननीय सदस्य गैरहजर असतील त्यांची नावे लॅप्स होतील.

तालिका सभापती : ठीक आहे, सभागृहाची वेळ एक तास वाढविण्यात येत आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्दांना 100 टक्के अर्थसहाय्य केले आहे. यामध्ये शेतकऱ्यांना कृषी उत्पन्नाकरिता भाडयाने यंत्रे दिली जाऊ शकतात. अनुसूचित जातीच्या, गरीब शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ होण्याकरिता आपण 10 कोटींची तरतूद केली आहे. त्यामध्ये आणखी वाढ केली पाहिजे असे मला वाटते. सभापती महोदय, कोकणातील इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी, मच्छिमारांच्या विकासासाठी, कोकण विकासासाठी विशेष पॅकेज जाहीर केले आहे. मघाशी माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, महिलांच्या बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत 6 टक्के व्याज दराने पत पुरवठा करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. सुभाष चव्हाण....

त्याचा फायदा या कॉग्रेस सरकारला झाला आहे. त्यामुळे महिलांच्या बचत गटामार्फत योजना राबविण्यात आल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हा कॉग्रेसमय झाला आहे हे आमच्या मित्र पक्षांना सांगण्यास मला आनंद होत आहे. त्याचप्रमाणे आम्ही आज सत्तेमध्ये आलो असल्यामुळे महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाच्या संदर्भातील विधेयक आम्ही पारीत करु . बहुसंख्य महिलांसाठी आम्ही आरक्षणाची अंमलबजावणी केली आहे. या ऐतिहासिक गोष्टीची नोंद माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने होईल. आणि माननीय राज्यपालांचे हे अभिभाषण म्हणजे एक दस्तावेज म्हणून कायम राहणार आहे.

सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना सांगू इच्छितो की, कोणताही पॉवर प्रोजेक्ट एनटीपीसी किंवा पॉवर ग्रीडमार्फत उभा करावयाचा असेल तर त्याला 3 वर्षापासून 10 वर्षापर्यंत कालावधी लागतो. आपल्या सरकारने मागील पाच वर्षात परळी, पारस, खापरखेडा, भुसावळ याठिकाणी प्रकल्प उभे केले. माननीय ऊर्जामंत्री श्री. सुशिलकुमारजी शिंदे यांनी दोन राज्यात मोठे प्रकल्प उभे केले. सोलापूर जिल्हयात होटगी येथे 1347 मेगावॅटचा प्रकल्प उभा केला. त्याठिकाणी जमिनीची किंमत एकरी 50 हजार रुपये असतांना प्रत्यक्षात शेतकऱ्यांना 7 लाख रुपये देण्यात आले. आणि त्यामधील 5 लाख रोखीने आणि 2 लाख रुपये एनटीपीसी ने फिक्स्ड डिपॉझीटमध्ये ठेवले. त्यामुळे हजारो एकर जमीन तीन महिन्यात ताब्यात आली आणि आचारसंहिता लागण्यापूर्वी दोन दिवस अगोदर कॉग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . . .

हा संपूर्ण प्रोजेक्ट उभा राहण्यासाठी किमान जास्तीतजास्त 10 वर्षे लागतील. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे तेथे ऊर्जा मंत्री असल्यामुळे मौद्याचा जवळजवळ 16 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आलेला आहे. पूर्वी तेथे तुमचे सिंधुदूर्ग जिल्हयातील एक आणि रत्नागिरी जिल्हयातील एक असे दोन मंत्री होते. पण ते एकही प्रोजेक्ट का आणू शकले नाहीत ? मात्र आता हे प्रोजेक्ट आल्यामुळे येत्या पाच वर्षामध्ये आपले राज्य हे ऊर्जा टंचाईपासून पूर्णपणे मुक्त होणार आहे म्हणजे पाहिजे तेवढी ऊर्जा मिळणार आहे, याची देखील नोंद घेतली पाहिजे. आपण नेहमी टीकाच करीत असतो. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर उपस्थित नाहीत. मी याचा साक्षीदार आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील देवगड मध्ये गिऱ्हे प्रकल्प आहे. माननीय श्री.सुशिलकुमार शिंदे ऊर्जा मंत्री झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी मी तेथे हा प्रकल्प आणण्यासाठी पहिला शब्द टाकला आणि माननीय श्री.नारायण राणे यांच्याबरोबर त्यांची बैठक घडवून आणली. मग गिऱ्हे प्रोजेक्ट देण्याचे निश्चित झाले, आता देवगड येथील सन्माननीय सदस्य श्री.अजित गोगटे, श्री.परशुराम उपरकर येथे उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी तेथे कोणाला प्रवेशच करु दिला नाही. श्री.प्रधान नावाचे सचिव आहेत, त्यांच्याबाबतीत सांगावयाचे तर माननीय श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्री असताना त्यांचे श्री.प्रधान सचिव होते, ते तेथे जॉईंट सेक्रेटरी आहेत. तसेच आमचे मित्र आहेत. त्यांनी असे सांगितले की, आम्हाला तेथे एन्ट्रीच करु दिली नाही. मग त्या भागामध्ये प्रकल्प कसे येणार आहेत ? माननीय श्री.नारायण राणे यांनी तो प्रकल्प तेथे आणला. पण जर तेथे प्रवेशच दिला नाही, तर तो प्रकल्प कसा होणार ? सभागृहामध्ये सिंधुदूर्ग जिल्हयातील जास्तीतजास्त आमदार आहेत. पण त्यावेळी तुम्ही प्रोजेक्टसाठी पाठिंबा दिला काय ? तर दिला नाही. त्यामुळे तेथे प्रोजेक्ट होऊ शकला नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (खाली बसून) : तुम्ही पक्षाच्या संदर्भात बोलत आहात की सरकारच्या संदर्भात बोलत आहात ?

श्री.सुभाष चव्हाण : दोन्ही बाजूने बोलत आहे. यामध्ये आम्ही सगळेच म्हणजेच राष्ट्रवादी पक्ष देखील आहे आणि काँग्रेस पक्ष देखील आहे. आम्ही एकत्रच आहोत. याचे तात्पर्य असे आहे की, केंद्र सरकारमध्ये आणि राज्य सरकारमध्ये आमचे सरकार असल्यामुळे राज्यातील प्रकल्प ताबडतोब होऊ शकतात. तुमच्याकडून जे झाले नाही, ते आम्ही करीत आहोत आणि त्याला तुम्ही पाठिंबा द्यावा असे मला तुम्हाला आवर्जून सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . . .

सभापती महोदय, विमानचालन परिवहनाचे महत्व लक्षात घेऊन, राज्य शासनाने चाकण (पुणे), सोलापूर व शिर्डी येथे नवीन विमानतळ विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.नांदेड येथे देखील विमानतळ निर्माण केलेला आहे.अशा प्रकारे मोठमोठे विमानतळ निर्माण केलेले आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील "चिपी"चे विमानतळाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी तो विषय उपस्थित केला. या विमानतळाचे काम जवळजवळ 8 ते 9 वर्षे तसेच पडून राहिलेले आहे. पण ज्या विभागातील नेता प्रभावी, पॉवरफूल आहे, त्या विभागाला भरपूर निधी मिळतो. तेथे ताबडतोब बैठका होतात, ताबडतोब निधी उपलब्ध होतो आणि ताबडतोब त्याची कार्यवाही होते.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : उदाहरण द्यावयाचे तर ?

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी येथे कोणाचे नाव घेत नाही. अशी असंख्य उदाहरणे आहेत.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तुम्ही माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांचे नाव घेतले, मग हे नाव देखील घ्यावे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या नावाचा देखील उल्लेख केलेला आहे. ऑगस्ट मध्ये याचे भूमीपूजन होईल. मी सदनाचा जास्त वेळ घेत नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पर्यटनाच्या बाबतीत उल्लेख केला आहे. मग मेळघाट असेल, सिंधुदूर्ग जिल्हा असेल त्याठिकाणी देखील काही तजवीज केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने आमच्यासाठी, गरीबांसाठी, लोकांसाठी, सर्वांसाठी जे काही कार्य केलेले आहे, त्याचा हा दस्तऐवज आहे आणि मी त्याला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .3 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सदनामध्ये आमचे सहकारी श्री.जयप्रकाश छाजेड यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडलेला आहे.त्या ठरावाला आमचे दुसरे सहकारी श्री.भास्करराव जाधव यांनी अनुमोदन दिलेले आहे. मी या ठरावाचे समर्थन करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, हे शेवटचे अधिवेशन आहे. हे मला मान्य आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुराथ कुलकर्णी....

या शेवटच्या अधिवशेनामध्ये माननीय राज्यपालांच्या अभीभाषणावर चर्चा होत आहे.माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे काय? तर गेल्या सन 2007-2008 या वर्षामध्ये राज्य शासनाच्या वतीने ज्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला तसेच राज्य कशा पध्दतीने, कोणत्या दिशेने चाललेले आहे, या बाबतचे दिशादर्शन करणारे जे अभिभाषण सन 2008-2009 या वर्षातील पहिल्या अधिवेशनाच्या निमित्ताने माननीय राज्यपालांनी दोन्ही सभागृहासमोर केलेले आहे त्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्याचा ठराव या ठिकाणी मांडण्यात आला आहे. त्या ठरावावर या सभागृहात चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, माझ्या काही सहकारी मित्रांनी हे राज्य कसे चाललेले आहे. राज्यात किती अंधार पडलेला आहे त्यामुळे काही दिसत नाही, अशा प्रकारची मते माननीय राज्यपालांच्या भाषणाच्या अभिनंदनाच्या प्रस्तावर बोलत असताना त्यांची मते याठिकाणी मांडलेली आहेत. त्यांच्या दृष्टीने तसे होऊ शकेल. पण आंधळयाला हत्ती दाखविला तर त्या आंधळयाचा हात हत्तीला ज्या ठिकाणी लागेल त्या पध्दतीने तो त्याचे वर्णन करीत असतो. कारण त्याला हत्ती दिसत नसतो. (अडथळा) माननीय वन मंत्री महोदय, सभागृहात उपस्थित आहेत म्हणून सन्माननीय सदस्यांना हत्तीची आठवण या ठिकाणी झालेली आहे. त्या ठिकाणी जे एक प्रात्यक्षिक झालेले आहे त्याचे वर्णन मी सभागृहामध्ये केलेले आहे. त्याचे वर्णन आपल्याला माहीत आहे. कोकणात हत्ती कधी नव्हते पण आता जवळ जवळ आठ ते नऊ हत्ती कोकणात वस्तीला आलेले आहेत. या हत्तींना इकडून घालविले की ते कर्नाटकात जातात. कर्नाटकातून ते गोव्याला जातात आणि गोव्यातून परत ते सिंधुदुर्गमध्ये येतात अशा प्रकारे त्यांचा प्रवास चाललेला आहे. मी पहिल्यादाच सांगितले की, विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब ऑगस्टच्या दरम्यान आचारसंहिता लागणार आहे. त्यानंतर कोणाचे सरकार येणार आहे हे आम्हाला माहीत नाही आणि तुम्हालाही माहीत नाही. पण नवीन सरकार येणार आहे. ते कशा पध्दतीने येणार आहे, याबाबतची चर्चा सुध्दा या चर्चेच्या अनुषंगाने करण्यात येत आहे. सन 1999 मध्ये ज्यावेळी युतीचे शासन होते त्यावेळी लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. युती शासनाने विधानसभेच्या निवडणुका सहा महिने अगोदर घेण्याची घाई केली आणि ती घाईच त्यांना नडली. त्या अनुभवातून आम्ही सन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी.....

2004 च्या निवडणुकांच्या वेळी शिकलो. तसेच सन 2009 च्या निवडणुकांच्या वेळीही आम्ही त्या अनुभवातून शिकलो. आणि म्हणून आम्ही निवडणुका घेण्याची घाई केली नाही. पण युती शासनाने निवडणुका घेण्याची घाई केली होती. त्याचे कारण असे होते की, तुम्हाला शंभर टक्के माहित होते. सन 2004 मध्ये शाईनिंग इंडियाचा प्रयोग झाला आणि ते सरकार गेले तशाच पध्दतीने युतीने ज्या पध्दतीने कामकाज केले होते, आम्ही मुंबईत 150 फ्लाय ओव्हर बांधलेले आहेत. आम्ही एक्स्प्रेस हाय-वे तयार केलेले आहेत. आम्ही अमूक केलेले आहे, तमूक केलेले आहे.म्हणून निवडणुका लवकर घेण्याची घाई केली होती. कोकणामध्ये जवळ जवळ सात ते साडेसात हजार रुपयांच्या पाण्याच्या प्रकल्पांचे भूमिपूजन झाले होते त्यावेळी 3500 कोटी रुपये सुध्दा तिजोरीमध्ये नव्हते ही वस्तुस्थिती आहे. म्हणून जे व्हायचे होते ते झाले आणि युतीचे 125 आमदार निवडून आले. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने एकमेका विरुध्द निवडणूक लढवून सुध्दा 1999 मध्ये आघाडीचे शासन राज्यामध्ये आलेले आहे. मला या ठिकाणी असा मुद्दा मांडावयाचा आहे की, हे अधिवेशन संपल्या नंतर ताबडतोब आचारसंहिता येणार आहे. आणि उद्याचे सरकार कोणाचे येणार आहे हे आपल्याला त्यावेळीच कळेल. इंडिकेशन्स काय आहेत? या राज्यामध्ये जो कार्यक्रम घेण्यात आलेला आहे, त्याचे सुतोवाच माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये केलेला आहे. विरोधी पक्षाच्या दृष्टीने या राज्यात काहीही कामे झालेली नाहीत असे त्यांना म्हणावयाचे आहे काय? असल्यास या राज्यामध्ये जी कामे झालेली आहेत ती बोगस कामे झालेली आहेत काय? या राज्यामध्ये झालेल्या कामापैकी केवळ दोन-चार कामांना विरोधी पक्षाकडून प्रशस्तीपत्र देण्यात येते आणि बाकी सर्व निराशाजनक आहे, अंधारमय आहे असे सांगण्यात येते.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये आपण काय पाहिले ? लोकसभेच्या निवडणुकीमध्ये एकतर्फी निवडणूक होईल की काय असे वातावरण निर्माण करणे सुरु होते. या ठिकाणी काय घडले ? माझ्या पक्षाची जी अपेक्षा होती त्याप्रमाणात आमच्या जागा निवडून आल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे परंतु दोन्ही कॉंग्रेसचे मिळून निवडून आलेल्या उमेदवारांची संख्या पाहिली तर महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाला 17 आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला 8 अशा एकूण 25 जागा दोन्ही कॉंग्रेसला मिळाल्या. मुंबईच्या बाबतीत आम्ही मोठ्या प्रमाणावर ऊहापोह करतो. मुंबईची महानगरपालिका शिवसेना-भाजपकडे आहे. आपण महानगरपालिकेचा कारभार पाहात असताना एमएमआरडीएमार्फत तसेच बीओटी तत्वावर मुंबईमध्ये जे प्रकल्प चालू झाले आणि जे कोट्यवधी रुपये खर्च केले त्याला आपण नावे ठेवता. परंतु आपण महानगरपालिकेचा कारभार सुधारला पाहिजे याबाबतीत कोणी टीका केली तर आपल्याला आवडत नाही. मुंबईमध्ये नाले, गटारे वाहात आहेत. पाण्याची गैरसोय आहे. मुंबईतील नाले दुर्गंधीने भरलेले आहेत. गटारे साफ करण्याचा 100 टक्के कार्यक्रम होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे सर्व अधिकार आहेत. आपल्याकडे सत्ता आहे. त्या ठिकाणी कशा पध्दतीने काम चालले आहे हे आपले नेते बघतात. अनेक ठिकाणी आपण पाहिले तर गटारे घाणीने तुंबलेली आहेत. त्या ठिकाणी माणसे कशी राहात असतील ? आपण म्हणतो की, पुढच्या जन्मामध्ये तुला नरकवास मिळेल अशा शाप देतो. आता नरकवासासाठी पुढच्या जन्मापर्यंत थांबण्याची गरज नाही. नरकवास दाखवावयाचा असेल तर मुंबईतील निरनिराळया झोपडपट्टयांमध्ये जावे. शिवाजीनगर असेल, बैंगनवाडी असेल अशा निरनिराळ्या झोपडपट्टयांमध्ये जाऊन पहावे. मुंबईतील सर्व सहा जागा दोन्ही कॉंग्रेसला मिळाल्या. मुंबई, ठाणे हा आपला बालेकिल्ला होता. आपण हक्काने सांगू शकत होता की, आमच्या या बालेकिल्याला कोणी हात लावू शकणार नाही. आमच्या बालेकिल्लयाला कोणी खिंडार पाडू शकणार नाही. परंतु आज ती वस्तुस्थिती नाही. हे मुंबईचे चित्र आहे. उद्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काय चित्र राहणार आहे याची दिशा जर माननीय राज्यपालांनी या कार्यक्रमांच्या निमित्ताने दिली असेल तर त्यामध्ये काय चूक आहे ? आपण महाराष्ट्रातील कोणताही कार्यक्रम बघावा. अनुशेषाच्या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे तावातावाने बोलत असत. आघाडीचे सरकार 1999 मध्ये आले. या ठिकाणी जो अनुशेष वाढला होता तो आघाडी सरकारच्या काळात वाढला नव्हता. अनुशेषाच्या संदर्भात निर्देशांक समितीने 1997 मध्ये अहवाल दिला होता. त्यावेळी युतीचे सरकार होते. त्यावेळी अनुशेष वाढला. तो बॅकलॉग वाढल्यानंतर 1999 मध्ये सरकार बदलले. त्यानंतर दरदिवशी सभागृहामध्ये अनुशेषाच्या संदर्भात चर्चा व्हावयाची. मराठवाडा आणि विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष होता. मी सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये गेल्या 50 वर्षामध्ये विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष दूर करण्याकरिता जेवढे पैसे खर्च झाले नाहीत तेवढे पैसे गेल्या सहा सात वर्षामध्ये खर्च झाले. आज विदर्भ आणि मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष भरुन निघाला आहे. असे असताना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल स्तुती करावयास नको काय ? शाबासकी द्यावयास नको काय ? माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले तसेच राज्य सरकारनेही पैसे दिले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मुंडासे बांधून सगळ्यात जास्त पदयात्रा काढल्या आणि चळवळ उभी केली. एका अधिवेशनामध्ये ते दर दिवशी सभागृहाचे कामकाज सुरु झाल्याबरोबर आज कोणत्या शेतकऱ्याने आत्महत्या केली याची डायरी वाचून दाखवावयाचे. त्यावेळी मी विचारले होते की, ही कोणती प्रथा आहे ? तरी सुध्दा ते सभागृहामध्ये वाचून दाखवावयाचे. आज निरनिराळ्या पॅकेजमुळे विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये जी नाराजी होती ती कमी होऊन आज आत्महत्येचे प्रमाण कमी झाले आहे, हे खरे नाही काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : आत्महत्याग्रस्त 6 जिल्हयांमध्ये आघाडी सरकारला लोकसभेची एकही जागा जिंकता आलेली नाही.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु त्याकडे मी नंतर येणार आहे. केंद्र सरकारने 71 हजार कोटी रुपये खर्च करुन शेतक-यांना कर्जमुक्त केले आहे, राज्य सरकारने 6500 कोटी रुपये दिले आहेत. साधारणपणे केंद्र सरकारने 8 हजार कोटी आणि महाराष्ट्र सरकारने 650 हजार कोटी रुपये असे 14500 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत राज्य सरकारने 1250 कोटी रुपयांचे शेतक-यांचे कर्ज माफ केले आहे. अमरावती भागामध्ये शासनाने निवडून येण्यासाठी काम केलेले नाही. त्या भागातील शेतक-यांचा आणि भागाचा विकास व्हावा या भूमिकेतून शासनाने काम केले आहे. ज्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या अधिक आत्महत्या होत होत्या त्या भागाला डोळयासमोर ठेवून मदत केलेली नाही. आम्ही केवळ मदतीची भूमिका डोळयासमोर ठेवून त्यांना मदत दिली आहे. या भूमिकेबद्दल शेतक-यांकडून आणि अन्य लोकांकडून शासनाचे कौतुक होत असेल. त्या भागामध्ये आम्ही निवडणूक हरलो असू. पण त्या भागात निवडणूक होत असताना तेथे पूर्वी एकच श्री.विलास मुत्तेमवार निवडून आले होते. पण यावेळी 5 खासदार निवडून आले आहेत. माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे जरुर स्वागत केले पाहिजे हे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मध्य वैतरणा धरणातून मुंबई शहराला पाणी मिळणार आहे. मुंबई शहराची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे या प्रकल्पातून मुंबईला पाणी मिळणार असेल, ठाणे शहराला पाणी मिळणार असेल तर ही आनंदाची गोष्ट आहे. हा नवीन प्रकल्प शासनाने हाती घेतल्यामुळे शासनाचे अभिनंदन केलेच पाहिजे. सभापती महोदय, एमएमआरडीएबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले आहे. मुंबईतील एखाद्या रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे असेल तर पूर्वी किती कष्ट पडत असत. एकही रस्त्याचे रुंदीकरण होत नव्हते. परंतु एमएमआरडीए या संस्थेला शासनाने स्वतंत्र अधिकार दिल्यामुळे मुंबईतील अनेक रस्त्यांचे चांगल्या प्रकारे रुंदीकरण झाल्याचे पहावयास मिळते, ही वस्तुस्थिती तुम्ही नाकारणार आहात काय ? या कामामुळे तेथील जनतेचे मत परिवर्तन झाले आहे ही वस्तुस्थिती तुम्ही कशी नाकारणार ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

अभिभाषणाबद्दल स्वागत करताना त्यामध्ये काही चुका आढळल्या असतील तर त्या दाखविण्याचा विरोधी पक्षाला अधिकार आहे. आमच्या सरकारने व्यवस्थितपणे काम केले नाही तर येणा-या सहा महिन्यात निवडणुका होणार आहेत. त्यामध्ये दूध का दूध, पानी का पानी होईल. त्यासाठी अधिक काळ थांबण्याचे कारण नाही. राजकारण बदल असते. आज सत्ताधारी पक्षाच्या बाकावर बसलेले लोक उद्या विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेले दिसू शकतात आणि विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेले सदस्य सत्ताधारी पक्षाच्या बाकावर बसलेले दिसू शकतात. या चर्चेच्या निमित्ताने हा मुद्दा देखील विचारात घेतला पाहिजे एवढीच मी विनंती करतो आणि या अभिभाषणाबद्दल मी राज्यपालांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.अशोक मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्याची माझ्यावर वेळ आलेली आहे. माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी भाषणामध्ये राजकीय वक्तव्यच अधिक केलेले आहे. सरकारच्यावतीने राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आलेला असला तरी त्या प्रस्तावाच्या पाठीमागे राज्यातील जनतेचे दु:ख लपलेले आहे. माननीय राज्यपालांनी ज्यादिवशी अभिभाषण केले आणि त्यांच्या अभिभाषणाबद्दल सभागृहात अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला तो विधान भवनातील माझा पहिला दिवस होता....

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि मी निवडून या सभागृहामध्ये आल्यानंतर माननीय राज्यपालांचे पहिले अभिभाषण मी ऐकले होते. मला त्यावेळी राज्यकर्त्यांचा अतिशय हेवा वाटला. कारण हे अभिभाषण हे ख-या अर्थाने राज्यातील जनतेला दाखविलेले मृगजळ आहे, पुढे येणा-या लोकसभेच्या निवडणुका नजरेसमोर ठेवून जनतेचा भ्रमनिरास करणारे आहे हे लक्षात आले. हे मृगजळ जनतेपर्यन्त पोहोचण्याकरिता ते माननीय राज्यपालांच्या तोंडून वदवून घेण्याचे काम शासनकर्त्यांनी या अभिभाषणाच्या माध्यमातून केलेले आहे. अतिशय उत्तम रीतीने हे काम केलेले आहे. परंतु मला असे वाटते की या अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांनी अनेक प्रलोभणे आणि पुढे होणा-या अनेक विकास कामांची नांदी सांगितली. 135 मोठे उद्योग राज्यामध्ये येत असून त्या माध्यमातून 3.31 लाख बेरोजगारांना आम्ही नोक-या देणार आहोत अशा प्रकारचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. या महाराष्ट्रातील 41 लाख बेरोजगार तरुणांनी सेवायोजन कार्यालयामध्ये आपले नाव नोंदविलेले आहे. अजूनही लाखो बेरोजगार तरुण आपले नाव सेवायोजन केन्द्रामध्ये नोंदवू शकलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. 135 कारखाने काढून 3.31 लाख बेरोजगार युवकांना नोक-या देण्याचे आश्वासन दिलेले आहे. परंतु राज्यात करोडो युवक आज बेरोजगार आहेत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शासनाने केलेली ही घोषणा फक्त घोषणाच राहील. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात अशा पध्दतीची ही घोषणा आहे असे माझे मत आहे. या महाराष्ट्रावर 1.54 लाख रुपयाचे कर्ज आहे. गेल्या 50 वर्षात एवढे कर्ज कधी झाले नव्हते आणि त्याची जाणीव या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना आहे. एवढे मोठे कर्ज झालेले असताना त्या मानाने महाराष्ट्राचा विकास मात्र झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. हे कर्ज फेडण्यासाठी पुढचा किती काळ लागेल याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी काही वक्त्यांनी महाराष्ट्र राज्य हे 50व्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याचे सांगितले. राजकारणामध्ये 50 वर्षामध्ये मॅच्युरिटी येते. तेव्हा हा महाराष्ट्र ख-या अर्थाने मॅच्युअर झालेला आहे काय असाही प्रश्न माझ्यासारख्याच्या मनात निर्माण होतो. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी असे स्वप्न पाहिले होते की, या महाराष्ट्रामध्ये जातीयवादाचा बिमोड व्हावा, महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक हा सुखी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अशोक मानकर....)

आणि संपन्न व्हावा, महाराष्ट्रातील उद्योगधंदे हे भांडवलशाहांच्या हातात न राहाता सर्वसामान्य माणूस देखील उद्योजक बनावा. परंतु हे त्यांचे स्वप्न स्वप्नच राहिले ही वस्तुस्थिती आहे. या अभिभाषणामध्ये सांगितलेला बढेजाव म्हणजे स्वत:ची पाठ स्वत:च्या हाताने थोपटण्यासारखे आहे. राज्यकारभारात सावळा गोंधळ आहे. प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार आहेत. सभापती महोदय, अलिबाबा आणि चाळीस चोरांची कथा मला आठवते.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री. शिगम 17:30

श्री. अशोक मानकर....

त्या गुहेमध्ये अलिबाबा आणि त्याचे 40 चोर जातात आणि संपत्तीचा शोध घेतात. या ठिकाणी देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. एक्केचाळीसावे माननीय मुख्यमंत्री आज तारेवरची कसरत करीत आहेत. या सभागृहात नुसत्या घोषणा करुन चालणार नाही. या शासनाने शेतक-यांना कर्जमाफी दिली. या कर्ज माफीचा फायदा किती आणि कोणी उचलला ? या निर्णयाचे श्रेय घेण्याची धडपड मात्र राज्यकर्ते करीत आहेत. या ठिकाणी प्रशासन चालले आहे. राज्यातील शेतकरी डबघाईस आलेला आहे. ज्यावेळी राज्यातील शेतकरी आत्महत्या करावयास लागला, तेव्हा त्याला पॅकेज देण्यात आले. राज्यातील शेतकरी आत्महत्या करावयास लागले, देशोधडीला लागले त्यावेळी त्यांना कर्ज माफी देण्यात आली. राज्यातील शेतक-यांना वाचविण्याचा प्रयत्न केला अशी मलमपट्टी त्यावर करण्यात आली. महाराष्ट्रातील पाच हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबियांची आज काय अवस्था आहे ? शेतक-यांनी आत्महत्या केल्याने त्यांच्या पत्नी विधवा झाल्या आहेत. त्यांच्या कपाळावरचे कुंकू पुसले गेले. त्यातील किती विधवांना शासनाच्या कर्जमाफीचा आणि पॅकेजचा लाभ मिळालेला आहे यासंबंधीची माहिती सभागृहाला देणे आवश्यक आहे. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबियांची स्थिती अत्यंत वाईट आहे. केवळ वर्धा आणि यवतमाळ जिल्हयातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या नाहीत तर नागपूर जिल्हयातील देखील काही शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतक-यांच्या आत्महत्येचे लोण नागपूर जिल्हयापर्यंत येऊन पोहोचलेले आहे. महागाई चार पटीने वाढलेली आहे. राज्य चौपट होत आहे. महागाई नियंत्रणात आणण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने या बाबतीत अनाकानी केलेली आहे. या महागाईमुळे सामान्य माणूस बेहाल झालेला आहे.

माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात शांततेचे आणि सुव्यवस्थेचे गोडवे गायले आहेत. परंतु राजकीय मंडळींच्या हत्या दिवसा ढवळया होत आहेत. महिलांची अब्रू लुटली जात आहे. चोर आणि दरोडेखोर सर्रास रस्त्याने वावरताना दिसत आहेत. अशा अवस्थेमध्ये आम्ही दहशतवादी हल्ल्यांचा कसा बिमोड करु याचा आपण विचार करीत आहोत. सामान्य माणसांना सुरक्षा कशी प्रदान करु याचा विचार मात्र अभिभाषण करताना केलेला दिसून येत नाही. पोलिसांची कुमक कमी आहे. ती वाढविण्याचा सुध्दा शासनाने प्रयत्न केलेला नाही. मी सभागृहात कालपासून

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर...

ऐकतो आहे की, आम्ही पोलिसांना नवीन व्हेपन्स उपलब्ध करुन देणार आहोत. मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, पोलिसांची आज काय अवस्था आहे ? पोलिसांना अठरा-अठरा तास बंदोबस्त करावा लागतो आहे, कधी कधी तर त्यांना दोन-दोन दिवस बंदोबस्त करावा लागतो. बंदोबस्तामुळे ते घरी जाऊ शकत नाहीत, त्यांना बंदोबस्ताच्या ठिकाणी अन्न मिळत नाही एवढी वाईट अवस्था पोलिसांची झालेली आहे. त्यामुळे पोलीस देखील आत्महत्या करण्यास प्रवृत्त होऊ लागला आहे. पोलिसांचे मनोधैर्य कमी झालेले आहे. त्यांचे मनोबल कमी झालेले आहे. म्हणून पोलिसांच्या बाबतीत देखील शासनाने काही तरी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. रक्षणकर्त्याचे मनोबल खचलेले असेल, ते सामान्य माणसांचे रक्षण कसे करणार हा खरा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात सिंचनाला अतिशय महत्व दिले आहे. शासनाने 3 हजार 200 कोटी रुपये सिंचनासाठी उपलब्ध करुन दिले आहेत. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत 1200 कोटी रुपये वाटले गेले आहेत. परंतु ते वाटलेले पैसे सिंचनाच्या कामी आले आहेत किंवा नाही हा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशामध्ये सिंचनाच्या अनेक योजना केल्या आहेत असे सांगितले गेले. शेततळयांच्या बाबतीत हे सरकार मोठया अभिमानाने प्रचार आणि प्रसार करीत आहे. परवा विदर्भामध्ये एक परिषद झाली. त्या परिषदेत मी स्वत: सांगितले की, दोन वर्षापूर्वी ज्या ज्या ठिकाणी शेततळयांची कामे करण्यात आली आहेत. त्या शेततळयांची आज काय अवस्था आहे याची पाहणी करण्यासाठी सिंचन विभागाचे अधिकारी तेथे गेले पाहिजे. या शेततळयांचा लाभ शेतक-यांना होतो आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी अधिका-यांनी तेथे भेटी देण्याची आवश्यकता आहे. माझ्या माहिती प्रमाणे दोन-तीन वर्षापूर्वी ज्या ज्या ठिकाणी शेततळयांची कामे झाली आहेत, त्या शेततळयांचा लाभ शेतक-यांना होत नाही. त्या ठिकाणी फक्त खड्डे करुन ठेवलेले आहेत. माझी शासनास विनंती आहे की, सिंचन क्षेत्रामध्ये केवळ पैसा खर्च करुन उपयोग नाही....

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.अशोक मानकर.....

तर तो खर्च करीत असलेला पैसा खऱ्याअर्थाने शेतकऱ्यांच्या लाभासाठी आहे की त्याला लाभापासून वंचित ठेवले जात आहे हे सुध्दा पाहण्याची गरज आहे. राज्यात आज 16-16 तास लोडशेडिंग केले जात आहे. 2005 आणि 2008 या वर्षात माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी वाचून अभ्यास केला. 2005 साली माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये 5000 मे.वॅट वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प पुढील तीन वर्षात आम्ही कार्यान्वित करु अशा प्रकारचे वचन दिले होते. 5 वर्षे निघून गेली आहेत. दुसरी निवडणूक आली. आता आम्ही म्हणतो की, 5500 मे.वॅट विजेचा तुटवडा आहे. एकही नवीन प्रकल्प पूर्णत्वास गेला नाही. होते तेच प्रकल्प सुरु आहेत आणि त्यातील अनेक प्रकल्पामधील जनित्रे बंद आहेत. त्यामुळे देखील विजेचा तुटवडा महाराष्ट्रात मोठया प्रमाणात भासत आहे. सिंगल फेज योजना आणली. थ्री फेजवरील 13 हजार गावांना सिंगल फेजवर ट्रान्सफर केले. सिंगल फेज लाईनमुळे गावामध्ये वीज आली. परंतु शेतीचे पंप थ्री फेजवर सुरु होऊ शकले नाहीत. जिल्हास्तरीय योजनेच्या माध्यमातून अनेक गावांना मोठमोठया पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधून देण्यात आल्या. अनेक नळयोजना मंजूर करण्यात आल्या. या सगळया नळयोजनांचे उद्घाटन करताना असा प्रश्न पडतो की, उद्घाटन झाल्यानंतर सिंगल फेज गाव असल्यामुळे व 16-16 तास वीजपुरवठा होत नसल्यामुळे या योजना चालणार कशा? गावांना पाणीपुरवठा कसा होणार? केवळ कागदोपत्री योजना मांडल्यामुळे सामान्य जनता मात्र हवालदिल झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. मागील 10 वर्षापासून महाराष्ट्राला अंधारात ढकलण्याचे काम या सरकारने केले आहे. अनेक उद्योगधंदे यामुळे बंद पडले आहेत. अनेक कुटुंबे बेकार झाली आहेत. मुंबईमध्ये 50 वर्षापूर्वी अनेक कापड गिरण्या अस्तित्वात होत्या. या कापड गिरण्यांमध्ये लाखो युवक काम करीत होते. मुंबई शहरातील सर्व कापड गिरण्या बंद पडल्या. तेथील कामगार देशोधडीला लागले. त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. अशा परिस्थितीत शासनाने कोणत्या कामगारांकडे लक्ष दिले हे सांगण्याची गरज आहे. आज गिरण्यांच्या जागा विकून कामगारांची देणी दिली जात आहेत ही वस्तुस्थिती आहे. याच्या अंमलबजावणीसाठी शासन काय करणार आहे हा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये बीओटी तत्वावर अनेक विकासाची कामे सुरु आहेत. जनतेच्या पैशातून विकास कामे केली जात असताना जनतेकडूनच टोल घेतला जात आहे. अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर.....

योजना केंद्र शासनाच्या आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी होण्यासाठी केंद्राकडून पैसा आला. पंतप्रधान ग्रामसडक योजना केंद्र सरकारची आहे. सर्वशिक्षा अभियान योजनेसाठी केंद्राकडून पैसा येतो. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेसाठी केंद्राकडून पैसा येतो. या योजना राज्यामध्ये राबविल्या जात असताना त्यांच्यासाठी केंद्र शासन निधी देत आहे. राज्य सरकारकडून गाडगे महाराज स्वच्छता अभियान योजना राबविण्यात आली. तंटामुक्ती गाव योजना अशी बिनपैशाची योजना राबविण्यात आली. बिनपैशाच्या योजना राज्य सरकारच्या आणि पैशाच्या योजना केंद्र सरकारच्या आहेत. केंद्र शासनाच्या भरवशावर राज्य शासन उडी मारत आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे. आज राज्यामध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी अनेक शाळांना परवानगी देण्याचे कबूल केले होते. न्यायालयाने याबाबत ताशेरे ओढले. शासन अद्याप एकाही शाळेला परवानगी देऊ शकले नाही. मोफत शिक्षणाची किमया बोगस शिक्षणाकडे वळलेली आहे. मोफत शिक्षण हे बोगस शिक्षण झाले आहे. त्यामुळे आज पुढची पिढी शिक्षण घेणार आहे परंतु ती विनासंस्कार शिक्षित पिढी घडत आहे. या सगळया वातावरणामध्ये सत्तेचे दोन महिने शिल्लक राहिले आहेत. शेवटच्या दोन महिन्यात निवडणुका कशा जिंकायच्या यादृष्टीनेच अभिभाषण तयार केले आहे.

.....3एन.1...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर .....

बरोबर आहे, सत्ता तुमची आहे, तुम्हाला निवडणुका जिंकावयाच्या आहेत पण जनतेला असे हवालदिल करुन चालणार नाही. राजकारण करावयाचे असेल, सत्तेत यावयाचे असेल विरोधी पक्षाच्या बाकावर बसावयाचे असले तरीही जनतेसाठी लढाणे आवश्यक आहे. जनतेचे दु:ख कमी करण्यासाठी प्रत्येक सदस्याने काम करण्याची आवश्यकता आहे. मग ते सरकारातील असोत अथवा विरोधी पक्षातील असोत. म्हणून हा महाराष्ट्र जर प्रकाशाकडे न्यावयाचा असेल तर आता तरी डोळे उघडावेत. जनतेला आवश्यक ती कामे सरकारकडून व्हावीत. प्रशासकीय अधिकारी, प्रशासनावर शासनाचा दबाव असावा त्याशिवाय त्यांच्यामध्ये धाक निर्माण होणार नाही आणि असा धोका असल्याशिवाय प्रशासन सुरळीत चालणार नाही. हा धाक सुध्दा प्रशासनाच्या आणि शासनाच्या अधिकाऱ्यांच्या मनातून आज निघून गेलेला आहे. शासनाने जनतेसाठी काम करावयाचे असेल तर शाळा उघडल्या पाहिजेत, गांव-खेड्यातील बेरोजगार युवकांसाठी आविश्चक आणि सामान्य जनतेला दिलासा देण्याच्या दृष्टीने सर्व गोष्टी करण्याची गरज आहे. असे यामध्ये नाही म्हणूनच हे अभिभाषण एक मृगजळ आहे. मघाशी सभागृहातच सांगण्यात आले की, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे शासनाचे प्रतिबिंब असते. पण ते आरशातील प्रतिबिंब नाही कारण आरसा फुटायला तरी वेळ लागतो. हे अभिभाषण म्हणजे पाण्यातील प्रतिबिंब दाखविले गेले. जनतेने साधा खडा जरी टाकला तरी ते प्रतिबिंब निघून गेल्याशिवाय राहणार नाही म्हणून सावध रहावे. योजना हाती घ्याव्यात त्या जनतेच्या हिताच्या दृष्टीने असतील अशाच घ्याव्यात. अशी भावना व्यक्त करुन मी पुन्हा अभिभाषणातील मुद्यांच्या बाबतीत खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर जी चर्चा सुरु आहे त्यावर खेद व्यक्त करुन माझे काही मुद्दे मी मांडणार आहे.

महोदय, मुंबईवर 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेल्या हल्ल्यात जे पोलीस जवान धारातीर्थी पडले त्यांच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी असे म्हटले आहे की, मुंबईवरील हल्ल्यात धारातीर्थी पडलेल्यांच्या कुटुंबियांना 600 ते 1000 फुटाची सदनिका आणि 2 मुलांना पदव्युत्तर शिक्षण मोफत देण्यात येईल. पण डिसेंबरमध्ये जे परिपत्रक काढण्यात आले त्यात असे म्हटले की, या मुलांना इंजिनिअरिंग आणि मेडिकल पदव्युत्तर व्यावसायिक प्रशिक्षणापर्यंतचा 10 लाखापर्यंतचा खर्च करण्याची जबाबदारी शासनाने घेतली. परंतु त्यानंतर 23 जानेवारी, 2009 रोजी जे पत्रक काढण्यात आले त्यानुसार मात्र 12 वी पर्यंतच्या शिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येईल, असे सांगितले आहे. खरे म्हणजे या हल्ल्यात जे धारातीर्थी पडले, जे शहीद झाले त्यांची चेष्टाच करण्याचे काम हे शासन करीत आहे. वास्तविक 12 वी पर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत देण्याची जबाबदारी शासनाने देखील घेतलेलीच आहे. मग यामध्ये शासन विशेष अशी कोणती काळजी घेतलेली आहे. अभिभाषणात एक सांगायचे आणि जी.आर. मात्र भलताच काढावयाचा आणि त्यातून या जवानांची चेष्टा करावयाची अशा प्रकारचे कृत्य शासनाने केलेले आहे. तसेच या भाषणातून पोलीस दलाचा दर्जा वाढविणे व सुधारणा करण्याचे काम शासनाने हाती घेतल्याचेही सांगितले आहे. सागरी किनाऱ्यावरील गस्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी उपाययोजना यात दिलेल्या आहेत. 12 नॉटिकल माईल्सपर्यंत मुंबई पोलिसांची हद्द आहे, तोपर्यंत रक्षणकरण्याची जबाबदारी देखील मुंबई पोलिसांचीच आहे. त्यानंतरच्या माईल्सचे रक्षण करण्याची जबाबदारी कोस्टल गार्डची असते. अशा प्रकारे 12 नॉटिकल माईल्सपर्यंत जे पोलीस सागरी गस्तीकरणासाठी जात होते त्यांना साधे पोहताही येत नव्हते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

तेव्हा याच्यामधून आपल्या काय लक्षात आले आहे ? ही हद्द सांभाळण्याची जबाबदारी केवळ 5 पोलिसांवर देण्यात आली होती. ज्या पोलिसांना सागरी हद्द सांभाळण्याची जबाबदारी दिली, गस्तीचे काम देण्यात आले होते त्या पोलिसांना पोहण्याचे साधे प्रशिक्षण सुध्दा देण्यात आले नव्हते, त्यांना पोहता सुध्दा येत नव्हते. माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात सांगितले आहे की, पोलिसांच्या दर्जात वाढ करण्यात येईल, त्यांचा दर्जा सुधारण्यात येईल. परंतु जे पोलीस 12 नॉटीकल्स माईल्स पर्यंत हद्द सांभाळत होते, त्यांच्याकडे सागरी हद्दीच्या गस्तीचे जे काम देण्यात आले होते ते त्यांच्याकडून काढून ते काम कोस्टल गार्डकडे देण्यात आले. शासन एका बाजूने सांगते की, आम्ही पोलिसांचा दर्जा सुधारु आणि दुस-या बाजूने पोलिसांना जे काम दिले जात होते ते काढून घेतले जात आहे अशी परिस्थिती आहे. गृहमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, आम्ही पोलिसांना चांगल्या बोटी देऊ. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, कोळयांच्या बोटीतून आता पोलीस गस्त घालण्याचे काम करीत आहेत. अतिरेक्यांकडे स्पीड बोटी आहेत आणि या स्पीड बोटीचा पाठलाग आता आपल्या पोलिसांना कोळयांच्या बोटीतून करावा लागत आहे. पोलिसांनी गस्तीचे काम स्पीड बोटीतून करावे असे शासनाला वाटत नाही काय ? पोलिसांचा दर्जा सुधारण्याचे हे काम आहे काय ? माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आम्ही असे करीत आहोत, आमचे शासन असे करील, तसे करील परंतु प्रत्यक्षात हे शासन काहीच करीत नाही. 3-4 दिवसापूर्वीची एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो की, मंत्री महोदय जर माझ्या बरोबर आले तर पोलीस कोळयांच्या बोटीतून कशा प्रकारे गस्त घालतात ते मी आपल्याला दाखवून देऊ शकेन. अशा प्रकारे मुंबईच्या पोलिसांची कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात धिंडवडें निघाले आहेत. माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात जी वचने दिलेली आहेत, सरकारच्या कारभाराच्या संदर्भात जे काही सांगितले आहे ते प्रत्यक्षात होतांना दिसत नाही तर त्याच्या उलटे होतांना दिसत आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पोलिसांना जे बुलेट प्रुफ जॅकेट पुरविण्यात आलेले आहेत त्याच्या खरेदीत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे पोलिसांना पुरविण्यात आलेल्या बुलेट प्रुफ जॅकेटच्या संदर्भात जेव्हा माहितीच्या अधिकाराचा वापर करुन माहिती मागविण्यात आली तेव्हा त्यावर पोलीस मुख्यालयाकडून सांगण्यात आले की, बुलेट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

प्रुफ जॅकेटच्या खरेदीच्या संदर्भातील जी काही फाईल आहे ती गायब झालेली आहे. ही जी माहिती आहे ती शासनानेच दिलेली आहे. त्यामुळे पोलिसांचे नैतिक बळ, पोलिसांचा दर्जा कसा काय वाढणार आहे याची माहिती अभिभाषणातच दिली असती तर आम्हाला आनंदच झाला असता.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात राज्य शासनाचे कौतुकच केलेले आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. एका बाजूने राज्यातील मुलांना बारावी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाते अशी परिस्थिती असतांना जे शूर पोलीस अधिकारी कर्तव्य बजावतांना 26/11 च्या घटनेत मृत्युमुखी पडले होते त्यांच्या पाल्यांना 12 वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाईल असा जी.आर.काढून त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम या शासनाने केलेले आहे. एका बाजूने वेगळी घोषणा करावयाची आणि प्रत्यक्षात जी.आर.वेगळा काढवयाचा असा प्रकार हे शासन करीत आहे. एका बाजूने आम्ही पोलिसांना सुविधा देत आहोत असे सांगावयाचे आणि दुस-या बाजूने पोलिसांचे खच्चीकरण करण्याचे काम या शासनाकडून केले जात आहे. अशा प्रकारचे खच्चीकरणाचे काम आज या महाराष्ट्रात सुरु आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये एसआरएच्या संदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे. यामध्ये मुंबईतील लोकांना एसआरए योजनेतून 225 चौरस फूटांच्या सदनिकेऐवजी 269 चौरस फूटांची सदनिका दिली जाईल असे सांगण्यात आले आहे. परंतु यासंदर्भात जेव्हा यु.डी.ऑफिसमध्ये फाईल जाते तेव्हा ती पासच होत नाही. जे लोक ट्रान्झीट कॅम्पमध्ये राहत आहेत, ज्यांची घरे तुटली आहेत, ज्यांच्या झोपडया तुटल्या आहेत ते लोक आज नरक यातना भोगीत आहेत, त्यांनाच या प्रश्नाच्या संदर्भात चांगली जाणीव आहे. एसआरए योजनेतील घरांच्या फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांची सही झाल्याशिवाय एसआरए योजनेतील लोकांना 225 चौरस फूटाच्या ऐवजी 269 चौरस फूटाची सदनिका मिळत नाही. परंतु ही सदनिका मिळून देण्यासाठी दलाल आता मोठया प्रमाणात फिरत आहेत. जे लोक पैसे देऊ शकत नाहीत त्यांना घरे मिळत नाही परंतु जे चिरीमिरी देतात त्यांना मात्र त्वरित 225 चौरस फूटाच्या सदनिकेऐवजी 269 चौरस फूटाची सदनिका मिळते. एका बाजूने माननीय राज्यपाल महोदय, आपल्या अभिभाषणात सांगतात की, आम्ही जनतेला सोयी सुविधा देत आहोत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब.....

.परंतु ज्या लोकांनी पुनर्वसन योजनेमध्ये भाग घेतलेला आहे ते लोक अक्षरश: नरक यातना भोगत आहेत. एका बाजूला या योजनेचे कौतुक करावयाचे आणि दुस-या बाजुला या लोकांना नरक यातना भोगावयास लावावयाचे हे काही बरोबर नाही. 225 स्केअर फुटा ऐवजी 269 स्केअर फुटाची सदनिका देण्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार एस.आर.ए.च्या सी.ई.ओ.कडे का देण्यात येत नाही ? या संदर्भात त्यांनीच जर निर्णय घेतला तर अधिक बरे होईल. त्यामध्ये फार मोठा निर्णय घ्यावयाचा आहे असे नाही. ही फक्त टेकनिकल करेक्शन नाही तर मनी मेकींग करेक्शन आहे असे मला वाटते. या प्रस्तावाच्या हजारो फाईल्स प्रलंबित पडलेल्या आहेत परंतु माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ मिळत नसल्यामुळे ते सही करु शकत नाहीत त्यामुळे हजारो फाईल्स मत्रालयात प्रलंबित आहेत. आपल्या प्रस्तावावर सही व्हावी म्हणून अनेक लोक सतत पाठपुरावा करीत आहेत. परंतु जे बिल्डर्स भरपूर पैसे देतात त्यांच्याच फाईल्स तेथे जातात आणि मंजूर होतात आणि ज्या सोसायटीतील लोकांनी या योजनेमध्ये भाग घेतला आहे पण ते पैसे देऊ शकत नाहीत ते मात्र अनेक वर्षापासून नरक यातना भोगत आहेत. त्या लोकांच्या फाईल्सवर निर्णय होत नाही. आता लवकरच पावसाळयाला सुरुवात होणार आहे. अजूनही काही लोक ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये राहत आहेत. ते लोक आपल्या इमारतीमध्ये जाऊ शकत नाहीत. काही इमारती तयार आहेत परंतु ते लोक सुध्दा तेथे जाऊ शकत नाहीत . या संबंधीचे करेक्शन झालेले नाही म्हणून ते लोक सुध्दा त्या इमारतीमध्ये जाऊ शकत नाहीत.झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये 225 स्केअर फुटा ऐवजी 269 स्केअर फुटाची सदनिका देण्याच्या प्रस्तावावर सही करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ नाही . परंतु काही प्रकरणात किती लवकर निर्णय घेतले जातात यासबंधी मी या ठिकाणी आपल्याला एक उदाहरण देतो. मी वांद्रा पूर्व येथील शासकीय कर्मचा-यांच्या वसाहतीच्या बाजूला राहतो. शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी पायाभूत समितीची बैठक शिवजयंतीच्या सुट्टीच्या दिवशी रात्री तातडीने वर्षा बंगल्यावर घेण्यात आली होती .त्या बैठकीतील निर्णयाचे मिनिटस अजून मंजूर झालेले नाहीत . माहितीच्या अधिकाराखाली मला अशी माहिती मिळालेली आहे की, अजून त्या बैठकीच्या मिनिटसला मान्यता मिळालेली नाही तरी सुध्दा तातडीने त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्या ठिकाणच्या शासकीय वसाहतीचा प्लॉट 96 एकराचा असून तो डेव्हलप करण्यासंबंधी आम्ही सतत भांडत आहोत. मुंबईमध्ये येऊन 15 वर्षे राहिलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या प्लॉटच्या एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाजूला घरे मिळालेली आहेत परंतु ज्यांनी 25 - 30 वर्षे शासनाची सेवा केलेली आहे अशा कर्मचा-यांना मात्र तेथे घरे न मिळाल्यामुळे निवृत्त झाल्यानंतर त्यांना उल्हासनगर, विरार येथे राहण्यासाठी जावे लागते. त्या कर्मचा-यांची अशी मागणी आहे की ,आम्हालासुध्दा याच भागामध्ये राहण्यासाठी घरे देण्यात यावीत. हे कर्मचारी ही घरे काही फुकट मागत नाहीत . त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही या ठिकाणी राहिलेलो आहे. आमचा जन्मसुध्दा येथे झाला असून आम्ही लहनाचे मोठेसुध्दा येथेच राहिलेलो आहोत तेव्हा येथेच नाममात्र दराप्रमाणे, रेडी रेकनरच्या दराप्रमाणे आम्हाला घरे देण्यात यावीत . परंतु त्यांना घरे दिली जात नाहीत. त्या ठिकाणी पूर्वी 138 एकर जागा होती. त्या जागेवर ज्या लोकांनी अतिक्रमण केले होते त्या जागेवर एस.आर.ए. ची योजना झाली .आंध्र प्रदेशमधून येऊन या ठिकाणी कचरा वेचण्याचे काम जे लोक करीत होते ते .शासकीय जागेमध्ये अतिक्रमण करुन राहिले होते त्यांना मात्र त्याच ठिकाणी घरे मिळाली आहेत पंरतु 25-30 वर्षे शासकीय सेवा करणा-या कर्मचा-यांना मात्र निवृत्ती नंतर उल्हासनगर विरारच्या पुढे जाऊन रहावे लागत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये यांबंधीचा उल्लेख होणे आवश्यक होते.. ज्या कर्मचा-यांनी शासनाची सेवा केली आहे, ज्या कर्मचा-यांनी मंत्र्यांची अहोरात्र सेवा केली आहे त्यांची काळजी घ्यावयास पाहिजे होती. एका बाजूला एस.आर.ए.ची योजना जाहीर करावयाची आणि दुसा-या बाजूला हा प्लॉट डेव्हलप करण्यासाठी सुट्टीच्या दिवशी बैठक घ्यावयाची हे बरोबर नाही. त्या बैठकीच्या मिनिटस दुस-या दिवशी ताबडतोब कॅबिनेटच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते आणि त्या ठिकाणी त्याला मंजुरी देण्यात आली. एका बाजूला अशा प्रकारे तातडीने निर्णय घेण्यात येतो आणि दुस-या बाजूला मात्र अनेक दिवस निर्णय प्रलंबित राहतात. कर्मचा-यांची मागणी मान्य न केल्यामुळे त्या ठिकाणच्या

कर्मचा-यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन सुरु केले होते. आचारसंहिता कधीही सुरु होईल आणि आचारसंहिता जर सुरु झाली तर हे काम थांबेल असे वाटल्यामुळे तातडीने त्या सबंधीचा निर्णय घेण्यात आला होता. जे गरीब लोक झोपडपट्टीमध्ये राहतात त्यांच्या योजनेसंबंधीचे प्रस्ताव आचारसंहितेमध्ये अडकून राहिले तर त्याबाबतीत आपल्याला काही पर्वा

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. परंतु हा प्लॉट ताबडतोब डेव्हलप झाला पाहिजे, त्यासबंधी तातडीने नोट तयार झाली पाहिजे ,त्या ठिकाणी हॉटेल झाले पाहिजे, बाकीच्या गोष्टी झाल्या पाहिजेत यासाठी मात्र तातडीने प्रयत्न करण्यात येत आहेत या प्रस्तावाचे काम बीओटी तत्वावर तातडीने करण्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी सुटीच्या दिवशी बैठक घेतली होती. हे या शासनाचे कर्तृत्व आहे.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मघाशी बोलतांना माननीय सादस्यांनी सांगितले की, 2004 साली साडे चार हजार मेगॅवॅटस विजेची कमतरता होती . मी 2004 सालापासून आमदार आहे तेव्हा पासून प्रत्येक मंत्री हेच सांगत आहेत की, येणा-या तीन वर्षात आम्ही महाराष्ट्रातील अंधार दूर करु परंतु आज पर्यत एकही मेगॅवॅटस वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प सुरु झालेला नाही. मी नेटवर माहिती घेतली असतांना मला असे समजले की , त्यावेळी एम.ओ.यु.करण्यात आले होते परंतु जागा कोणी घ्यावयाची यावरुन वाद सुरु आहे. तीन तीन वर्षे होऊन सुध्दा त्याबाबतीत सेटलमेन्ट होत नाही. दोन वेगवेगहया विद्युत कंपन्यांनी एकाच ठिकाणची जागा प्रकल्पासाठी दाखवलेली आहे.तो प्रश्न सोडविण्यासाठी शासनाला अजूनही वेळ मिळालेला नाही. गेल्या पाच वर्षात परळी, पारस सोडल्यास इतर ठिकाणी उर्जा क्षेत्रात किती प्रगती केलेली आहे हे शासनाने आम्हाला सांगावे सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांनी याबाबतीत मघाशी उल्लेख केला होता.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. परब ....

तुम्हाला या क्षेत्रातील ज्ञान आहे असे तुम्ही मघाशी म्हणालात. तर मग आपण मला सांगा की, तुमच्या या पाच वर्षातील एक प्रकल्प, परळी-पारस तोदेखील जुनाच आहे, याच्या व्यतिरिक्त चालू झालेला दुसरा प्रकल्प सांगावा. तुम्हीच मघाशी सांगितले की, एक प्रकल्प चालू होण्यासाठी तीन ते दहा वर्षे लागतात. तर मग आज सरकारने छातीठोकपणे सांगावे की, या अमुक दिवशी आमचे इतके प्रकल्प चालू होतील आणि जी यापूर्वी साडेपाच हजार मे.वॅ.विजेची शॉर्टेज होती, जी आता साडेसात हजार मे.वॅ.वर जाऊन पोहोचली आहे. तर आज जेव्हा ही निवडणूक संपेल तेव्हा या सरकारच्या पाच वर्षाच्या कारकीर्दीमध्ये आम्ही 2 हजार मे.वॅ. म्हणा किंवा 1 हजार मे.वॅ. शॉर्टेज कमी केले. असे आपण सांगू शकणार आहात का ? तेव्हा सभापती महोदय, या राज्यपालांच्या भाषणातून केवळ आश्वासनांमागे आश्वासनेच असतात. 2004 पासून 2009 पर्यंतची राज्यपालांची सगळी भाषणे मी तपासून पाहिली. त्यातील जी वाक्ये आणि परिच्छेद आहेत ते सारे जसेच्या तसेच आहे. म्हणजे एका बाजूला गरीबाला नाडण्याचे काम आणि दुसऱ्या बाजूला श्रीमंतांना आणखी मदत करण्याचे काम अशा प्रकारची एक सुपारी घेतलेले सरकार, अशा पद्धतीने काम करीत आहे म्हणून राज्यपालांच्या अभिभाषणावरील या चर्चेबद्दल मी खेद व्यक्त करून माझे दोन शब्द संपवितो.

***

..... 3क्यू 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत बोलण्यासाठी मी उभा आहे. खऱ्या अर्थाने आचार संहितेत असलेले राज्यपालांचे हे भाषण म्हणजे पूर्वलक्षी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांवर लक्ष ठेवून तयार केलेले महाराष्ट्र सरकारचे अभिभाषण आहे आणि त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, 1 फेब्रुवारी 2009 आणि नुकत्याच गडचिरोली येथे नक्षलवादी दहशतवाद्यांकडून झालेली घटना आणि त्यासाठी पुढील तीन वर्षांकरिता सरकारने 1387 कोटी रूपयांचा विशेष कृती कार्यक्रम केलेला आहे. सभापती महोदय, मला या निमित्ताने एक उदाहरण येथे सांगावयाचे आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आणि गोंदिया जिल्ह्यातील एक मधला रस्ता, देवरी-चिचगाव-कोरची-कुरखेडा या रस्त्यावर मध्यंतरी अनेक घटना घडल्या आहेत. मागील दोन वर्षात त्या रस्त्यावर काही ट्रकस् जाळले गेले. त्या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम चालू होते ते आजही तसेच पेंडींग आहे. या रस्त्यावर एक नाका आहे, त्या नाक्यावर पोलिसांचे अधिपत्य असते आणि त्या नाक्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व वाहनांची आणि लोकांची तपासणी तेथे पोलिसांकरवी होत असते. पण दुर्दैव हे की, सूर्यास्त होण्यापूर्वी हा नाका बंद होतो. सूर्यास्त झाला की, चिचगाव ते कोरखेडा या मार्गावर जाणे म्हणजे जीव मुठीत घेऊन जाणे असते. चुकून एखादे वाहन त्या रस्त्यावर सूर्यास्तानंतर गेले तर त्याचे काय भले-बुरे होईल याची काहीच शाश्वती नसते इतकी वाईट अवस्था या नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये आहे. कोरचीच्या भागामध्ये तर त्यांचा मोठा उपद्रव आहे. या उपद्रवाला पायबंद घालण्यासाठी अनेकदा आम्ही या ठिकाणी आमच्या भाषणातून खेद व्यक्त केला आहे. त्या भागातील पोलिसांचे जे खबरे असतात त्यापैकी एक श्री.कुमार दिसारा उईके, वय 34 वर्षे याला तो पोलीस खबऱ्या म्हणून त्याला मारण्यात आले होते. त्याच्या पाल्याला अजून न्याय मिळालेला नाही, त्याला अजूनपर्यंत कोठलीही मदत वा नोकरी मिळालेली नाही. नक्षलवादी श्री.दिनकर रेणू गोगा याला त्यांनी मारले. त्याचे दोन्ही हात-पाय तोडून त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. त्याच्याही परिवाराला सरकारतर्फे कोठलीही मदत देण्यात आलेली नाही. गडचिरोली जिल्ह्यातील झिंगापूर परिसरातील अडमेली गावात चकमकीत श्री.लंचा कासा मळे, वय वर्षे 50 या आदिवासीला गोळी लागली परंतु त्या आदिवासीच्या परिवाराला कोणतीही मदत सरकार कडून दिली गेली नाही. त्या आदिवासीचे हाड तुटले होते पण त्यांच्यावर इलाज देखील करण्यात

.... 3क्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मानकर ....

आले नाहीत. आपण या भागासाठी एवढे मोठे प्रोजेक्ट करीत आहोत तर मग सर्वतोपरी याचा विचार शासनाने केला पाहिजे आणि नक्षलवादी क्षेत्रामध्ये जे पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत किंवा तेथील जी सर्वसामान्य जनता आहे तिला साहस आणि दिलासा देण्याची गरज आहे. परंतु त्या संबंधातील कोठलीही योजना कृतीमध्ये येत नाही. म्हणून हे 1387 कोटी तीन वर्षात नाही तर एका वर्षात खर्च करण्याचा कृती आराखडा तयार करून या नक्षलवाद्यांचा बिमोड करण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलली पाहिजेत. सभापती महोदय, जून-जुलैला पाऊस अत्यंत कमी झाला ही गोष्ट सत्य आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी आढावा बैठका घेतल्या. अवर्षणाची परिस्थिती जाहीर केली. 13,116 गावांना पाण्याची टंचाई असल्याचे घोषित केले. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 3आर 1 ...

अशुधारित प्रत / परिशुद्धीकरणाची बाकी

श्री. केशवराव मानकर...

मला याठिक्राणी खेदाने सांगावेसे वाटते की, ज्या गावांची आणेवारी 50 टक्क्यांच्या खाली आहे,त्या गावांमध्ये दुष्काळ जाहीर केला पाहिजे. आता पावसाळा जवळ आला असतांना सुध्दा दुष्काळ जाहीर केला जात नाही. निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर तरी याचा लाभ सर्वसामान्य जनतेला दिला जात नाही. ज्या जिल्हयांमध्ये पाण्याची टंचाई आहे, त्या जिल्हयांसाठी करण्यात आलेली पाण्याची व्यवस्था अत्यंत अपूरी आहे. शासनाने त्यासंबंधी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या विदर्भातील चार जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात मालगुजारी तलाव आहेत. त्या तलावांची अवस्था अत्यंत वाईट आहे. जिल्हयातील काही तलावांमध्ये अजिबात पाणी नाही तर काही ठिक्राणी अल्प साठा आहे. या भागातील पाण्याच्या टंचाईच्या संदर्भातील आकडेवारी थोडक्यात याठिकाणी सांगतो. मागील वर्षी इटीयाडोह धरणात 281.76 दशलक्ष घनमीटर अर्थात 88.36 पाणी साठा होता. तो यंदा केवळ 24.44 दशलक्ष घनमीटर अर्थात 7.66 टक्के आहे, शिरपूर धरणात मागील वर्षी 174.72 दशलक्ष घनमीटर म्हणजे 90.73 टक्के साठा होता, तो यावर्षी 19.37 दशलक्ष घनमीटर म्हणजे 10.46 टक्के इतका आहे. पुजारीटोला धरणात मागील वर्षी 15.02 टक्के साठा होता, यावर्षी तो 14.55 टक्क्यावर आलेला आहे. माझ्या जिल्हयातील मोठी धरणे सुध्दा पाण्याअभावी आटलेली आहेत. या जिल्हयामध्ये जे छोटे प्रकल्प आहेत त्यामध्ये 10 टक्क्यापेक्षा कमी पाणी साठा आहे. एखाद्या धरणाचे वेस्टवेअर आणि केटीवेअर दुरुस्त करावयाचे असेल तर आपले अधिकारी त्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यास सांगतात. त्या प्रस्तावाला तांत्रिक मंजूरी आणि निधी मिळाल्यानंतर काम सुरु करण्यात येईल असे ते सांगतात. याबाबत अधिकाऱ्यांना आपण सांगितले पाहिजे की, या धरणासाठी आपण तीन चतुर्थांश पैसे खर्च करुन तरी हे वेस्ट वेअर दुरुस्त करावेत. या जिल्हयामधील पाणी टंचाई दूर करावयाची असेल, आणि पुढील येणारे पिक चांगले आणावयाचे असेल तर या तलावांच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी दिला पाहिजे. त्याकरिता जास्त निधीची आवश्यकता नसून प्रत्येक जिल्हयाला आपण 50-50 लाख मिळून चार जिल्हयांना 2 कोटी रुपये दिले तर या तलावांमधून 100 टक्के पाणी अडविले जाईल असा मला विश्वास वाटतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने आपण एवढया मोठया प्रमाणावर निधी दिला असतांना त्यातील प्रत्येकी 50 लाख रुपये चार जिल्हयांना देण्यात यावेत व मालगुजारी तलाव दुरुस्त करावेत अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/ MMP/ SBT/

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, जवाहर विहिरीच्या संदर्भात हे शासन अजून ठोस निर्णय घेत नाही. माननीय पालकमंत्री आणि आमदार यांच्या आपसातील मतभेदामुळे या कार्यक्रमाची नीट अंमलबजावणी होत नाही. प्रत्येक विहिर आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्याला कशी मिळेल हे पाहिले जात आहे. खरे म्हणजे गावातील गरीब शेतकऱ्याला त्या विहिरीचा लाभ मिळाला पाहिजे तो मिळत नाही. जिल्हा परिषदा या योजना राबविण्यास असमर्थ ठरत आहेत. जीवन प्राधिकरणाकडे निधी नसल्यामुळे त्यांच्या योजना निकासी पडल्या आहेत. जिल्हा परिषदा व ग्रामपंचायती निधी अभावी योजना राबवू शकत नाहीत अशी अवस्था आहे. याची शासनाच्या जलसंपदा विभागाने दखल घेतली पाहिजे. जीवन प्राधिकरणाच्या योजनांवर कोटयावधी रुपये खर्च होऊन सुध्दा त्या योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत. त्या योजना राज्य शासनाने चालवाव्यात. जेणेकरुन या योजना पूर्ण होऊन तेथील पाणी टंचाई दूर होईल. शासनाने निवडणुकीवर डोळा ठेवून अनेक योजना आखल्या. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या लोकांसाठी 100 टक्के अर्थसहाय्याची दारिद्रय निर्मूलनाची योजना घेतली. ती घेत असतांना अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी, विमुक्त जातीच्या लोकांसाठी आणि इतर मागासवर्गीय लोकांसाठी ही योजना कां घेण्यात आली नाही? मला याबाबत असे सांगावयाचे आहे की, 100 टक्के अर्थसहाय्याची ही योजना न करता 75 टक्के अर्थसहाय्याची योजना करुन ती सर्वांसाठी राबविली पाहिजे. शेतकऱ्याला एक चांगली बैलजोडी घ्यावयाची म्हटले तरी 50 हजाराचा खर्च तो शेतकरी झेपवू शकत नाही. त्यामुळे दारिद्रय निर्मूलन योजनेचा लाभ अशा शेतकऱ्याला दिला असता तर या अभिभाषणाच्या निमित्ताने मी शासनाचे निश्चितपणे अभिनंदन केले असते.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. सुरेश जेथलिया)

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण खेदाने असे म्हणावे लागते की, फक्त एकाच विशिष्ट जातीवर लक्ष ठेऊन, मतदानाचा उद्देश डोळयासमोर ठेऊन शासनाने हा जो निर्णय घेतलेला आहे, तो परत घ्यावा आणि तो सर्व शेतकऱ्यांसाठी लागू करावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, याठिकाणी रेल्वे मार्गाच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. खऱ्या अर्थाने हे रेल्वे मार्ग होणार आहे काय ? हा प्रश्न आहे. वर्धा-यवतमाळ-नांदेड, मनमाड-मालेगाव-धुळे-शिरपूर-इंदौर, अहमदनगर-बीडऱ्परळी-वैजनाथ, वडसा-देसाईगंज-गडचिरोली इ. ठिकाणे रेल्वे मार्गाने जोडण्यासाठी नवीन रेल्वेमार्ग बांधण्याचा 50 टक्के खर्च सोसण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या प्रकल्पावरील राज्य शासनाचा एकूण 50 टक्के हिस्सा 1,302 कोटी रुपये इतका असेल. अशा वेळी जर शासनाने हा हिस्सा भरलेला आहे असे याच अधिवेशनामध्ये जाहीर केले तर खऱ्या अर्थाने ही योजना कार्यान्वित होऊ शकेल असे म्हणता येईल. वडसा-देसाईगंज-गडचिरोली याठिकाणी रेल्वे मार्ग झाला तर नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्यासाठी उपयोग होऊ शकतो आणि तेथील सामान्य जनतेला खूप मोठा दिलासा मिळेल असे माझे म्हणणे आहे. म्हणून अधिवेशन संपण्यापूर्वी 1,302 कोटी रुपयांचा हिस्सा भरलेला आहे असे शासनाने या सदनाला सांगावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.81 बाबत सांगावयाचे तर हा मुद्दा अत्यंत चांगला आहे. यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्तिवेतनात वाढ केलेली आहे आणि ही वाढ दरमहा 2000 इतक्या रुपयांची आहे. तसेच पुरुष स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या विधवांना दरमहा 6000 रुपये एवढी आणि महिला स्वातंत्र्य सैनिकांना दरमहा 6100 रुपये एवढी रक्कम मिळत आहे. शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना आणि त्यांच्या विधवांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्याचाही निर्णय घेतलेला आहे. हा अतिशय चांगला निर्णय आहे. पण या विधीमंडळामधील जे सन्माननीय सदस्य आहेत, त्यांच्या विधवा पत्नींना आपण 5000 रुपये पेन्शन देतो. परंतु त्यांना वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ मिळू शकत नाही. याबाबतीत देखील माननीय संसदीय मंत्री महोदयांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. तसेच यासाठी जी.आर.मध्ये 1500 रुपयांची जी अट आहे, ती रद्द केली पाहिजे. आपण आमदारांना दहा हजार रुपये पेन्शन देणार आहोत, तेव्हा ही मर्यादा देखील 10 हजारापर्यंत वाढविली पाहिजे. जेणेकरुन दिवगंत आमदारांच्या विधवा पत्नी आहेत, त्यांना .....

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देखील वैद्यकीय मदत मिळू शकेल. जर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबाबतीत देखील उल्लेख झाला असता, तर बरे झाले असते. वेतनभत्ते वाढवावयाचे असतील तर त्याला कोणत्याही पक्षाचे आमदार विरोध करीत नाहीत. मग या गोष्टी करता विरोध केला जात आहे? हे शासनाला कळवावे अशी आमची आग्रहाची भूमिका आहे.

सभापती महोदय,याठिकाणी विजेच्या संबंघात उल्लेख करण्यात आला आहे, त्यामुळे याविषयी जास्त काही बोलत नाही. पण राज्यातील विजेचा लपंडाव कमी करण्यासाठी शासनाने निश्चित स्वरुपाचा कार्यक्रम आखला पाहिजे आणि ज्यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा असतील, तेव्हा 100 टक्के वीज उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. याठिकाणी मागील अधिवेशनामध्ये माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण आणि राज्य शासनाने जाहीर केलेले बजेट बाबत सांगावयाचे तर ते राज्य शासनाने निवडणुकीवर डोळा ठेऊन केलेले आहे. पण आमच्या मनामध्ये शंका आहे.आता मार्च, एप्रिल, मे आणि जून हे चार महिने संपत आले आहेत आणि पुढील दोन महिने विधानसभेच्या निवडणुकांमध्ये निघून जातील. यानंतर नवीन सरकार येईल आणि मग अभिभाषणामध्ये जी आश्वासने दिलेली आहेत, त्याची पूर्तता होईल का ? असा संशय आहे. खरे म्हणजे याची पूर्तता होणे शक्य नाही. परंतु निवडणुकीनंतर नवीन सरकार कसे असेल ते माहिती नाही. म्हणून या सरकारची नैतिक जबाबदारी आहे की, येत्या दोन महिन्यात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जे अभिवनच दिलेले आहे, त्याची पूर्तता करावी, जेणेकरुन पुढच्या अधिवेशनाच्या वेळी नवीन शासनाचे स्वागत करावयास सोपे होईल. राज्यामध्ये नवीन सरकार अस्तित्वात येईल, पण आम्ही विधान परिषदेतील सन्माननीय सदस्य येथेच काम करणार आहोत. तेव्हा नवीन सरकारचे स्वागत करीत असताना असे म्हणता येईल की, मागील पाच-सहा महिन्यापूर्वी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेल्या बाबींची पूर्तता झाली आहे. परंतु आम्ही सरकारचे अभिनंदन करावे की खेद व्यक्त करावा ही बाब पुढील अधिवेशनामध्ये ठरविणार आहोत. परंतु माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे जादूचा पेटारा आहे, यापलिकडे काही नाही. त्यामुळे या अभिभाषणातील आश्वासनांवर जनतेचा अजिबात विश्वास नाही, म्हणून खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. भारतमाता की जय.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .3 एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.सुरेश जेथलिया) : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उर्वरित चर्चा आणि माननीय मंत्री महोदयांचे भाषण उद्या घेण्यात येईल. आता अर्धा तास चर्चा घेण्यात येतील.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धा-तास चर्चेसंबंधी

तालिका सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर चार अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आल्या आहेत. त्यापैकी सन्मानीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या अर्धा-तासाच्या दोन सूचना आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे सभागृहात उपस्थित नाहीत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तासाची सूचना पुढे ढकलण्या बाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सभापतींना पत्र दिलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांची अर्धा-तास चर्चा उपस्थित करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील नद्यांचे पाणी दूषित असल्याबाबत.

मु.शी.: राज्यातील नद्यांचे पाणी दुषित असल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 41975 ला दिनांक 24 जुलै,2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स., यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : राज्यातील नद्यांचे पाणी दुषित असल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 41975 ला दिनांक 24 जुलै,2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रव्यापी म्हणता येईल, अशा प्रकारच्या या अर्धा-तासाच्या चर्चेचा मी सातत्याने गेल्या अधिवशेनापासून पाठपुरावा करीत आहे. जुलै, 2008 मध्ये महाराष्ट्रातील नद्यांच्या प्रदुषणाबद्दलचा एक अहवाल राज्य सरकारला प्राप्त झालेला आहे. त्या अहवालामध्ये जी माहिती समोर आलेली आहे तसेच जी आकडेवारी समोर आलेली आहे ती पाहिल्यानंतर अतिशय भयावह अशी ती आकडेवारी आहे, असे लक्षात येते. अनेक वेगवेगळया कारणामुळे महाराष्ट्रातील सर्व नद्यांशी म्हणजे मुळा-मुठा, कोल्हापुरातील पंचगंगा, औरंगाबाद शहरातील खांब, नागपूर मधील नाग, बीड मधील बिंदुसरा, नांदेडमध्ये आणि इतरत्र असणारी गोदावरी,अमरावतीतील आंबा, चंद्रपूर त्याचबरोबर, सांगली, पैठण या प्रत्येक भागातील नद्यांशी संबंधित असा हा विषय आहे. खरे तर हा अर्धा-तास चर्चेचा विषय नाही. यावर तपशीलवार चर्चा होणे अपेक्षित होते. गेल्या अधिवेशनात याबद्दल एक तारांकित प्रश्न स्वीकारला गेला होता. त्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी जी उत्तरे दिली होती त्यामध्ये त्यांनी हे मान्य केले होते की, राज्यातील नद्यांचे पाणी अशुध्द होत असल्यामुळे त्याबाबत काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. नद्यांचे पाणी अशुध्द होत आहे, याचे स्वरुप किती गंभीर आहे याची आपल्या सगळयांना जरी जाणीव असली तरी त्याबाबतीत काही मुद्दे या ठिकाणी परत एकदा सभागृहासमोर स्पष्टपणे माडण्याची आवश्यकता आहे. त्यातील पहिला भाग असा की,राज्यातील 22 महानगरपालिकांकडून हे अपेक्षित आहे की,

त्या महानगरपालिका जे पाणी वापरतात त्या पाण्यावर त्यांनी प्रक्रिया करुन ते पाणी त्यांनी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे...

नद्यांमध्ये परत सोडले पाहिजे.पाणी टंचाई म्हटले तरी लोक नाराज होतात. जनतेला पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे महानगरपालिकांमध्ये ज्या प्रमाणात वस्ती वाढते त्या प्रमाणात पाणी उचलले जाते. साधारणपणे दारोज 670 कोटी लिटर पाणी वापरले जाते आणि त्यापैकी दररोज 540 लिटर पाणी दुषित होऊन परत नद्यांमध्ये फेकले जाते. प्रत्येक्षात फक्त 16 टक्के पाण्यावर प्रिक्रिया करण्याची क्षमता या मोठया महानगरपालिकांकडे आहे. त्यामुळे ढोबळमानाने सांगावयाचे झाले तर प्रत्येक 6 लिटर दुषित पाण्यापैकी फक्त 1 लिटर पाण्यावर महानगरपालिका प्रक्रिया करु शकतात.

सभापती महोदय, दुसरा भाग असा की, ज्या कारणामुळे नद्यांचे पाणी दुषित होते त्यामध्ये जलपरणी हे एक मोठे कारण आहे. या जलपरणीच्या बाबतीत समाधानकारक उत्तर न शोधल्यामुळे अनेक नद्यांची पात्रे जलपरणीमुळे पूर्णत: भरली आहेत त्यामुळे तेथे असलेली मासेमारी असेल, पिण्याचे पाणी असेल या प्रत्येक बाबतीत विपरीत परिणाम झालेला आपल्याला दिसून येतो. नाशिक जिल्हयामध्ये वडनेर-भैरव या भागात पाणी पिवळे पडलेले आहे. डिस्टिलरीचे पाणी त्याठिकाणी सोडले जाते. चंद्रपूर या ठिकाणी बल्लारपूर इंडस्ट्रिजच्या कागद कारखान्यातील रासायनिक प्रदूषण आजही रोखले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. नागपूर येथील कन्हान नदीचे देखील हेच चित्र आहे. भिमा नदीवर उजणी धरण आहे. या परिसरात रासायनिक स्वरुपाचे प्रदूषण झालेले दिसून येते. महारष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिका सांडपाण्यावर प्रक्रिया करु शकतील एवढी त्याची क्षमता आहे काय?त्यांना राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने मदतीचा हात द्यावयास पाहिजे, तो प्रत्यक्षात दिला जात नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

महापालिकांना असे बंधन आहे याबाबत तेथील प्रमुख अधिकाऱ्यांना आणि आयुक्तांना सुध्दा माहीत नसते. उदा. कोल्हापूरमधील पंचगंगेचे पाणी फार प्रदूषित झालेले आहे. वर्षानुवर्षे अनेक साखर कारखांन्याची मळी थेट पंचगंगेमध्ये टाकली जाते. त्यावरुन सातत्याने कोल्हापूर महानगरपालिका, नागरिक आणि त्यांच्यामध्ये संघर्ष चालू असतो. पण यामध्ये खरा प्रश्न हा निर्माण होतो की, आम्ही उपाययोजना करु असे आश्वासन सरकारने आम्हाला गेल्या अधिवेशनात दिले असताना, नागपूरच्या अधिवेशनापर्यंत आमच्याकडे कॅबिनेटचा निर्णय येईल अशा पध्दतीचे उत्तर या सदनामध्ये दिले असताना आता हे नवीन अधिवेशन सुरु होऊन अजूनही त्यावर काय उपाययोजना करणार हे स्पष्ट नाही. आमच्याकडे अशी माहिती कळते की, कॅबिनेटकडे ती टिप्पणी जाणार आहे. वाळू उपसा थांबविला गेला नसल्यामुळे पुरांच्या रेषा आत घुसत चालल्या आहेत. या सर्व गोष्टींचा शेतीवर विपरित परिणाम होत आहे. रासायनिक प्रदूषण नियंत्रण करणारे जे महामंडळ आहे त्याच्या संदर्भात मी आपल्याला असे सुचवीन की, ते महामंडळ खऱ्या अर्थाने बरखास्त करुन त्याची चांगल्या प्रकारे पुनर्रचना केली पाहिजे. कारण हे जे रासायनिक प्रदूषण नियंत्रण महामंडळ आहे त्याच्या ऐवजी सर्टिफिकेट देणारे महामंडळ असे त्याचे नामांतर करावे की काय अशी शंका वाटते. कारण कितीही रसायने मिसळलेली असली तरी यांचे जे रिपोर्ट असतात त्यामध्ये ते इंडस्ट्रीजना क्लिअर स्वरुपाचे सर्टिफिकेट देऊन मोकळे होतात. मी इंडस्ट्रीजच्या विरुध्द नाही. परंतु सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी जी यंत्रे बसविलेली असतात, आम्ही स्वत: पुणे जिल्ह्यामध्ये पाहिलेले आहे की, ते उद्योग ती यंत्रे दिवसा चालूच ठेवत नाही. कोणी इन्स्पेक्शनला येत असतील तर महिन्यातून चार दिवस नाटकासारखे यंत्र चालू ठेवावयाचे आणि बाकीचे 22 दिवस तसेच सांडपाणी नदीमध्ये मिसळले जाते. अशा पध्दतीने इंडस्ट्रीजकडून फसवणूक केली जाते. याबाबतीत नगरपालिका, महानगरपालिका यांना सक्षम केलेले नाही. वाळूचा उपसा मोठ्या प्रमाणामध्ये होत आहे. मासेमारीला संरक्षण मिळत नाही. याबाबतीत सरकारने असे उत्तर दिले की, याबाबतीत एकच उपाय नसून हा विषय अनेक खात्यांशी संबंधित आहे. अनेक खात्यांशी संबंधित विषय असताना माननीय राज्यमंत्री यावर उत्तर देण्यासाठी आले ही स्वागतार्ह बाब आहे परंतु खरा प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

असा आहे की, वाळू चोरणारे लोक, रसायने टाकणारे लोक, महानगरपालिका आणि नगरपालिकांना सक्षम करण्याच्या दृष्टीने सरकारची दिसणारी अनास्था आणि त्याचबरोबर या नद्यांचे जल प्रदूषण होऊ नये म्हणून जी काही कार्यवाही करावयास पाहिजे त्याबाबत आपण दुर्लक्ष करीत असल्यामुळे आज आपल्याला असे चित्र दिसते की, अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोगराई वाढलेली आहे. आपण पाहतो की, सांगली सारख्या शहरामध्ये दर तीन चार महिन्याने काविळीचे हजारो रुग्ण आहेत म्हणून आपल्या सदनामध्ये लक्षवेधी सूचना लावल्या जातात व त्यावर उत्तर मिळते. अशी अनेक शहरे आहेत. बीड सारख्या शहरामध्ये डासांचा प्रचंड प्रादुर्भाव झालेला आहे. अनेक ठिकाणी काविळीसारखे आजार धुमाकूळ घालत आहेत. याचे महत्वाचे कारण असे आहे की, सरकार याबाबतीत काही लक्ष देत नाही. मी याबाबत आपल्याला एक छोटेसे उदाहरण देईन. पूर्वीच्या काळामध्ये ब्रिटिशांच्या संपूर्ण यंत्रणांना अनेक वेळा आपण नावे ठेवत होतो. परंतु पुण्याच्या जवळ भैरोबानाला येथे 1916 साली सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरु झाले होते. त्यातील पाणी शेतीला वापरले जात होते. परंतु त्यात नायट्रोजनचे प्रमाण अधिक असल्यामुळे ते पिकांसाठी त्रासदायक ठरते म्हणून कालव्याचे पाणी मिसळून पुणे ते हवेली भागातील शेतीला ते पाणी वापरले जात होते. अशा पध्दतीच्या उपाययोजना महानगरपालिकेच्या वापरल्या जाणाऱ्या सर्व पाण्याच्या बाबतीत करण्यासोबतच हे सर्व प्रदूषण रोखण्यासाठी आपण काय उपायोजना करणार आहात याकडे लक्ष वेधण्याच्या दृष्टीकोनातून मंत्रिमंडळासमोर जर आराखडाच ठेवलेला नाही तर मला असे वाटते की, त्याची देखील अवस्था ही राम प्रधान कमिटीच्या अहवालावरील कृती कार्यक्रमासारखीच होणार की काय अशी आम्हाला काळजी वाटावयास लागली आहे. आता पावसाळा येणार आहे. पूर नियंत्रण रेषांचा सगळा प्रश्न आहे. या पुढच्या काळामध्ये पर्यावरणाची हानी होत असताना तज्ज्ञ लोक असे मत मांडत आहेत की, एका बाजूला ग्लोबल वॉर्मिन्गमुळे पाण्याची टंचाई निर्माण होत आहे आणि दुसऱ्या बाजूला जे पाणी आहे त्याची वासलात आपण जर अशा बेफिकिरीने लावत असू तर जनतेला आपण एका अर्थाने ज्वालामुखीच्याच तोंडावर नेऊन बसवित आहोत. म्हणून मला असे वाटते की, आम्हाला या सभागृहात उत्तरे दिली जातात परंतु त्याची परिपूर्ती होत नसेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सामान्य नागरिकांचा जीव धोक्यामध्ये आहे. माननीय मंत्रिमहोदय ज्या भागातील आहेत, ज्या ज्या ठिकाणी आमदार आहेत त्या प्रत्येकाच्या बाबतीत मला हा प्रश्न विचारावासा वाटतो की, अशा पध्दतीचे पाणी पिऊन आणि अशा पध्दतीने मतदारांना पाणी पाजून आपण जनतेचा नक्की काय विकास करीत आहोत याच्याबद्दल विचार करुन ठोस उपाययोजना आणि कालबध्द कार्यक्रम शासनाने मांडला पाहिजे म्हणून मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी निवेदन

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल मी श्री.अण्णा हजारे यांच्या संदर्भात सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय गृहमंत्र्यांनी आज सभागृहात निवेदन करण्याचे मान्य केले होते. सभागृहामध्ये आता शेवटची अर्धा तासाची चर्चा सुरु आहे. सभागृहाचे कामकाज संपत आलेले असतानाही शासनाच्यावतीने ते निवेदन करण्यात आलेले नाही. माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे याबाबतचे निवेदन उद्या करण्याबाबत आपण शासनाला निर्देश द्यावेत.

तालिका सभापती (श्री.सुरेश जेथलिया) : उद्या यासंबंधीचे निवेदन करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील नद्यांचे पाणी दूषित असल्याबाबत

मु.शी.: राज्यातील नद्यांचे पाणी दूषित असल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 41975 ला दिनांक 24 जुलै, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनाच्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी राज्यातील नद्यांचे पाणी अशुध्द होत असल्याबद्दल आणि त्यावर शासनाने नेमलेल्या मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांच्या अहवालासंबंधी ही अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील नद्यांचे पाणी मोठया प्रमाणावर दूषित होत असल्यामुळे शासनाकडून ठोस उपाय योजले जावेत अशाप्रकारची भूमिका त्यांनी मांडली आहे. सभापती महोदय, हे खरे आहे की, महाराष्ट्रातील अनेक नद्यांचे पाणी दूषित झालेले आहे. त्यामुळे महानगरपालिकांकडून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी पर्यावरण विभागाकडून त्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. पर्यावरण सुरक्षा कायदा, 1986 नुसार केंद्र सरकारने केंद्रीय स्तरावर जलगुणवत्ता मूल्यांकन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. या प्राधिकरणामध्ये 12 केंद्रीय संस्था सभासद आहेत. सचिव, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. त्याप्रमाणे राज्य सरकारने सुध्दा मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अशाप्रकारची कृती समिती गठित केलेली आहे. या समितीमध्ये सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, उद्योग विभाग, प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळासमोर सदर अहवाल दिनांक 31 ऑगस्ट, 2008 रोजी सादर व्हावयाचा होता. परंतु मध्यंतरीच्या काळामध्ये आचारसंहिता लागू झाली आणि मे महिन्यामध्ये मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव आला होता. परंतु यावर अधिक अभ्यास करण्यासाठी मंत्रिमंडळाने

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.विजय वडेट्टीवार....

वेळ मागून घेतला होता. त्यानंतर दिनांक 27 मे, 2009 रोजी मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव ठेवण्यात आला. या समितीच्या अहवालात जे मुद्दे आहेत वा समितीचे जे निष्कर्ष आहेत ते सभागृहासमोर शासन ठेवणार आहे. सभापती महोदय, या अहवालात ज्या सूचना केल्या आहेत, ज्या शिफारशी व उपाययोजना सुचविल्या आहेत त्यातील बरीच माहिती माझ्यासमोर आहे. जवळजवळ सगळयाच महानगरपालिका व नगरपालिकांच्या हद्दीतून जाणाऱ्या नद्यांचे पाणी मोठया प्रमाणात दूषित झालेले आहे हे मान्य करावे लागेल. या अहवालात जलप्रदुषण रोखणे, जलसंवर्धन तसेच जलगुणवत्तेबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी काही शिफारशी केलेल्या आहेत. त्यामध्ये सांडपाणी प्रवाही करण्यापूर्वी विहित प्रक्रिया करणे, अज्ञात प्रदूषणाचे स्त्रोत शोधणे आवश्यक असून अशा स्त्रोतांचे संकलन व प्रक्रिया करणे आवश्यक आहे, विना कारखानदारी उद्योग जसे सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, खत प्रकल्प, कीड संवर्धन, गुरेढोरे पाळणे, मासेमारी, कचरा डेपो इत्यादी बाबी विकास प्रतिबंधित क्षेत्र (नदीच्या महत्तम पूर पातळीपासून 3 कि.मी.दोन्ही तीरावर) अ-1 क्षेत्रामध्ये अनुज्ञेय नसावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विजय वडेट्टीवार ....)

प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देशित केल्यानुसार कारखानदारी उदभारणीची अनुज्ञेयता लागू करणे, भूजल पुनर्भरण व एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेस प्रोत्साहन देणे, वर्षाजल संवर्धन करुन भूजल पातळीत वाढ करणेबाबत प्रोत्साहन देणे, पाणलोट क्षेत्रातील शेतक-यांना अनावश्यक व जास्तीची कीटकनाशके व रासायनिक खते वापरण्यापासून परावृत्त करणे, तसेच सेंद्रीय खते वापरण्यास प्रोत्साहन देणे, भूजल व भूपृष्ठजल यांचे प्रदूषण रोखण्यासाठी नियमांची कडक अंमलबजावणी करणे, आधुनिक सिंचन पध्दतीचा अवलंब करण्यास शेतक-यांना प्रोत्साहन देऊन जलसंवर्धन व भूस्खलन रोखणे, भूजल स्त्रोतांचा जास्तीचा उपसा करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी कायदेशीररीत्या उपययोजना करणे आणि जलगुणवत्ता बाबतचे महत्व साक्षरता अभियान राबवून जनजागृती करणे, अशा प्रकारच्या शिफारशी व उपापययोजना या अहवालामध्ये सुचविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी हा कृती आराखडा नेमका किती दिवसात तयार होऊन त्याची अंमलबजावणी होईल अशी विचारणा केली. हा अहवाल शासनाला प्राप्त झालेला असून शासनाने तो स्वीकारलेला आहे. पुढच्या तीन महिन्यामध्ये कृती आराखडा तयार होईल आणि या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या कार्यक्रमास निश्चितपणे सुरुवात होईल. 5 जूनला आपण राष्ट्रीय जागतिक पर्यावरण दिन साजरा करणार आहोत. त्या दिवसापासून या विषयाला सुरुवात व्हावी असा शासनाचा मानस आहे आणि त्यादृष्टीने शासनामार्फत सर्व कार्यवाही केली जाईल. संपूर्ण राज्यातील एमआयडीसीमध्ये जेथे केमिकल उद्योग आहेत अशा ठिकाणी 26 सामूहिक सांडपाणी यंत्रणा कार्यान्वित केलेल्या आहेत. त्यामधून 1.70 द.ल. पाणी प्रक्रिया करुन सोडण्यात येते. इंडस्ट्रियल बेल्टच्या ठिकाणी अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. ही व्यवस्था अपुरी असल्याची जाणीव शासनाला आहे. अशा प्रकारच्या सामूहिक सांडपाणी यंत्रणा मोठया प्रमाणावर कार्यान्वीत करण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत. या कृती आराखड्याची या सुवर्ण महोत्सवी वर्षात अंमलबजावणी होऊन राज्यातील जनतेला चांगले आणि स्वच्छ पाणी मिळावे यादृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत. माणसाच्या जीवनात पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. पाणी हे रोगाचे मूळ कारण आहे. मिळणारे पाणी हे पिण्यास उपयुक्त नसेल तर त्यापासून अनेक रोग जडतात. म्हणून पाणी स्वच्छ करण्याचे काम कृती आराखडा तयार करुन शासन तीन महिन्यामध्ये करील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : हा कृती आराखडा तीन महिन्यमध्ये होईल. तो लवकरात लवकर व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. प्रश्न असा आहे की, नद्यांमध्ये होणारे प्रदूषण, रेतीचा उपसा, रसायने सोडणे इत्यादी बाबी रोखण्यासाठी आताही यंत्रणा कार्यरत आहे. परंतु वारंवार नोटीसा देऊन देखील जे वेगवेगळे घटक नद्यांमध्ये रसायने सोडतात त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्याच्या दृष्टीने पावले उचलणे आवश्यक आहे. तेव्हा ही कारवाई आपण सुरु कराल काय ? जिल्ह्याचा विकास आराखडा जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात येतो. तेव्हा ज्या ज्या जिल्ह्यातन, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या क्षेत्रातून नद्या वाहतात त्या प्रत्येक जिल्ह्याने, स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वत:साठी एखादा प्लॅण्ट तयार करुन त्याची निगराणी त्यांनी स्वत: करावी, त्यासाठी नगरविकास किंवा ग्राम विकास विभागावर अवलंबून राहू नये असे मला वाटते. याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी जे म्हणणे मांडले ते खरे आहे. ही जबाबदारी सामुहिक आहे असे म्हणण्यास हरकत नाही. ही जबाबदारी कोणा एकटयाची नाही. महानगरपालिका हया स्वायत्त संस्था आहेत. जनतेला स्वच्छ पाणी देण्याची त्यांची देखील जबाबदारी आहे आणि त्यांचाही सहभाग आम्ही घेऊ. माझ्याकडे पर्यावरण विभाग सुध्दा आहे. अशा महानगरपालिकांच्या महापौरांची आणि विभागाच्या सचिवांची एक बैठक निश्चितपणे बोलाविली जाईल. त्यांच्या मागणी प्रमाणे या कामासाठी निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला जाईल. सदर संस्था, राज्य शासन आणि केंद्र शासन यांनी एकत्र येऊन एक संयुक्त जबाबदारी स्वीकारुन काम केले जाईल आणि त्यासाठी पुढचे धोरण आखले जाईल आणि यासंदर्भात महापौर आणि विभागाच्या सचिवांची लवकरात लवकर बैठक आयोजित करण्यात येईल.

तालिका सभापती (श्री. सुरेश जेथलिया) : अर्धातास चर्चा संपलेली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 3 जून 2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 31 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 3 जून, 2009 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही